म. ग्रं. मं. ठाणें
विषय
सं. नं.
सन- १८८६

म. ग्रं. सं. ठाणें

विषय
ालय क्रमांक

लेखक प्र. रा. मो. रा. भागवत
डभाणे मंडळी-बडोदें

सन
१८८६

पुस्तकाचें नांव वारमती

१८८६

सहविचारिणी सभेची ग्रंथमाला.

( पुस्तक १८ वें. )

# वीरमती.

(ऐतिहासिक, मनोरंजक व बोधपर कादंबरी.)

प्रकाशक

दामोदर सांवळाराम आणि मंडळी.

बडोदें,

पूर्णचंद्रोदय छापखान्यांत छापिली,

सन १८९६

किंमत एक रुपया.

ह्या पुस्तकासंबंधीं सर्व प्रकारचे हक्क प्रकाशकांनीं आपणाकडे ठेविले आहेत.

## अर्पणपत्रिका

गायकवाड कुलभूषण, सर्वलोकप्रीय, विद्याभिलाषि

**श्रीमंत रा. सा. संपतराव गायकवाड**

**एफ. आर. एस. एल. व एफ. आर. जी. एस.**

**ब्यारिस्टर ॲट लॉ,**

यांस

विद्याप्रसार, व देशभाषेची वृद्धि करण्याचे

कामीं खरी कळकळ तसेंच गुणग्राहकता,

औदार्य व सौजन्य इत्यादि गुणांच्या

स्मरणार्थ हें लहानसें पुस्तक

कर्त्यानें

आदर व नम्रतापूर्वक अर्पण केलें आहे.

# प्रस्तावना.

थकल्या भागलेल्या मनास विश्रांतीच्या वेळीं करमणूक करण्यास कादंबरीचें वाचन हें एक उत्तम साधन आहे, आणि ह्मणूनच कादंबरी वाचण्याकडे लोकांची प्रवृत्ति अधिक झालेली दिसते. अशा प्रसंगीं केवळ मनरंजनार्थ नुसत्या कल्पित कादंबऱ्या तयार करण्यापेक्षां जेणेंकरून इतिहासाची थोडीबहुत माहिती होऊन करमणुकेबरोबरच थोडा बहुत तरी बोध होईल अशासारख्या कादंबऱ्या निघूं लागल्यास, पुष्कळ हितावह होणार आहे. व ह्याच उद्देशानें ही कादंबरी लिहिली आहे.

ह्या पुस्तकांत जो कथाभाग घेतला आहे, तो **टाड-कृत हिंदराजस्थान** पुस्तकाच्या आधारानें घेतलेला आहे. ही हकीकत कोणत्या सालीं घडली याबद्दल आधारभूत पुरावा मिळत नाहीं. तथापि संवत् २३७ ह्मणजे शके १०२ नंतर घडली असावी असें आजूबाजूच्या गोष्टींवरून वाटतें.

**टाड**नें आपल्या पुस्तकांत जी हकीकत दिली आहे ती **भाट** लोकांच्या दंतकथेवरून दिलेली आहे. ती चांगली बोधपर व मनोरंजक वाटल्यावरून आमच्या **महाराष्ट्र** वाचकांकारितां शुद्ध मराठीभाषेंत कादंबरीरूपानें त्यांजपुढें ठेविली आहे. या पुस्तकांत ज्या **धारानगरी**चें वर्णन

केलें आहे, ती **धारानगरी** हल्लीं नाश पावली आहे असें प्रसिद्ध **सर जान मालकम** यांनीं **'मेमोयर आफ माळवा'** नांवाच्या आपल्या पुस्तकांत ह्मटलें आहे. परंतु हें शहर **उज्जनी** शहराजवळच असावें अशाबद्दल **'प्रबंधचिंतामणी'** नामक ग्रंथांत कांहीं हकिकत सांपडते. एवढ्यावरून त्या काळीं **गुजराथेंत धारानगरी** नांवाचें शहर होतें ही गोष्ट सिद्ध होते, पण तें शहर अमुकच असें ह्मणण्यास खातरीचें साधन सांपडत नाहीं. तसेंच **टुकटोडा** शहरास हल्लीं काय ह्मणतात तेंही समजत नाहीं.

प्राचीनकाळीं आपल्या देशांतील लोकांस इतिहास लिहून ठेवण्याची गोडी नसल्यामुळें जुन्याकाळची बिनचूक माहिती मिळण्यास मोठी अडचण पडते, ही मोठी दुःखाची गोष्ट होय. ही उणीव जेव्हां भरून निघेल तो सुदिन ह्मणाव-याचा. असो.

सदर पुस्तकांत घेतलेला कथाभाग नुसता मनोरंजक नाहीं, तर तो पुष्कळ बोधपर आहे. हल्लींच्या स्त्रीशिक्षण-प्रसाराचे प्रसंगीं आमच्या शिकलेल्या भगिनींस या पुस्तका-पासून पुष्कळ बोध घेतां येईल अशी माझी समजूत आहे. स्त्री व पुरुष हीं संसाररूपीं गाड्याचीं दोन चक्रें आहेत, ह्मणून तीं दोन्हीही सारखींच असलीं पाहिजेत, व तीं दोन्ही सारखीं असलीं ह्मणजे संसाररूपी गाडा कसा सरळ चालतो, व कशींही संकटें आलीं असतां त्यांतून पार पडून

शेंवट त्यांचा कसा दिग्विजय होतो, हें **जगदेव** व **वीरमती** यांच्या इतिहासावरून चांगलें लक्षांत येण्यासारखें आहे. तसेंच स्वामिनिष्ठा, व सत्याचरण यापासून आरंभीं जरी झाला नाहीं तरी परिणामीं त्यापासून कसा उत्कर्ष होतो याचा ठसा **जगदेव** व **धीरसिंह** यांच्या इतिहासावरून मनावर बराच वठूं शकेल. स्वामिद्रोह, परोत्कर्षासहिष्णुता, तोंडपुंजेपणा, परस्त्रिविषयीं अभिलाष; इत्यादि दुर्गणांपासून कशाप्रकारें वाईट परिणाम होतो यांचा बोध **क्रूरसिंग, कमला, डुंगरसी, लालखां**, या पात्रांवरून चांगला होईल. स्त्री-लंपट झालेल्या पुरुषाच्या हातून कसे अनाचार घडतात, व पोक्त विचार केल्याशिवाय उतावळे पणांत एकादें कृत्य केलें असतां परिणामीं तें पश्चात्तापास कसें कारण होतें, हें **उदयादित्य** राजाच्या हकीकतीवरून चांगलें लक्षांत येण्यासारखें आहे. सारांश, या पुस्तकांतील प्रत्येक पात्रापासून घेणारांस चांगला बोध घेतां येण्या जोगा आहे, व त्याप्रमाणें त्याचा ते स्वीकार करतील अशी अशा आहे.

मूळ हकीकतींत **पट्टण**च्या देवीपुढें **जगदेवानें** आपल्या मुलांस बळी दिल्यानंतर देवीनें प्रगट होऊन त्यांस जिवंत केल्याची हकीकत आहे; परंतु ती गोष्ट हल्लींच्या सुशिक्षित लोकांस संभवनीय वाटण्यासारखी नसल्यामुळें मूळ हेतु कायम ठेवून त्यांत संभवनीय असा फेरफार केला आहे. त्याचप्रमाणें इतर ज्या ज्या ठिकाणीं मूळ हकिकतींत अतिश-

# प्रस्तावना.

थकल्या भागलेल्या मनास विश्रांतीच्या वेळीं करमणूक करण्यास कादंबरीचें वाचन हें एक उत्तम साधन आहे, आणि ह्मणूनच कादंबरी वाचण्याकडे लोकांची प्रवृत्ति अधिक झालेली दिसते. अशा प्रसंगीं केवळ मनरंजनार्थ नुसत्या कल्पित कादंबऱ्या तयार करण्यापेक्षां जेणेंकरून इतिहासाची थोडीबहुत माहिती होऊन करमणुकेबरोबरच थोडा बहुत तरी बोध होईल अशासारख्या कादंबऱ्या निघूं लागल्यास, पुष्कळ हितावह होणार आहे. व ह्याच उद्देशानें ही कादंबरी लिहिली आहे.

ह्या पुस्तकांत जो कथाभाग घेतला आहे, तो **टाड-कृत हिंदराजस्थान** पुस्तकाच्या आधारानें घेतलेला आहे. ही हकीकत कोणत्या सालीं घडली याबद्दल आधारभूत पुरावा मिळत नाहीं. तथापि संवत् २३७ ह्मणजे शके १०२ नंतर घडली असावी असें आजूबाजूच्या गोष्टींवरून वाटतें.

**टाडनें** आपल्या पुस्तकांत जी हकीकत दिली आहे ती **भाट** लोकांच्या दंतकथेवरून दिलेली आहे. ती चांगली बोधपर व मनोरंजक वाटल्यावरून आमच्या **महाराष्ट्र** वाचकांकरितां शुद्ध मराठीभाषेंत कादंबरीरूपानें त्यांजपुढें ठेविली आहे. या पुस्तकांत ज्या **धारानगरीचें** वर्णन

योक्ति सारखें दिसलें, त्या त्या ठिकाणींही थोडा थोडा फेर-फार करून घेतला आहे; व कित्येक ठिकाणीं चांगला बोध होण्याकरितां थोडा विस्तार करावा लागला आहे. तथापि एकंदरींत मूळ हकीकत कायम ठेवून हें पुस्तक लिहिलेलें आहे.

सदर पुस्तक **श्रीसयाजीविजय** पुस्तकाच्या वर्गणीदारांस सन १८९७ सालच्या भेटीदाखल देण्याचा विचार एकदम ठरल्यामुळें पुस्तकें मुदतींत तयार करण्याकरितां छापण्यासंबंधीं बरीच धांदल करावी लागली, व त्यामुळें कित्येक ठिकाणीं हस्तदोषादि चुका राहून गेल्या आहेत, त्याबद्दल वाचकांनीं क्षमा करून हंसक्षीरन्यायानें याचा स्वीकार करावा अशी विनंती आहे.

**ग्रंथकर्ता.**

# सूचना.

सहविचारिणी सभेचें हें अठरावें पुस्तक एकदम हातांत आलेलें पाहून कित्येक लोक संशयांत पडतील, ह्मणून त्या संबंधीं येथें खुलासा करणें अवश्य आहे. सहविचारिणी सभेच्या कित्येक ग्रंथप्रकाशनाचें काम ज्या मंडळीकडे हल्लीं सोंपलें आहे, त्याच मंडळीच्या मालकीचें **श्रीसयाजीविजय** हें पत्र असल्यामुळें, व सन १८९७ सालच्या भेटीदाखल वर्गणीदारांस हें पुस्तक देण्याचा त्यांचा विचार आयते वेळीं ठरल्यामुळें हें पुस्तक तातडीनें छापून बाहेर पाडणें त्यांस भाग पडलें आहे. सभेचीं बाकीचीं पुस्तकें छापत आहेत, व तीं जसजशीं छापून तयार होतील तसतशीं बाहेर पडतील.

**शंकर मोरो रानडे**, बी. ए.

**हरि बाळकृष्ण तळवलकर**,
बी. ए., एलएल. बी.

**भानु केशव गांगनाईक**,
सहविचारिणी सभेचे सेक्रेटरीज.

# सूचना.

सहविचारिणी सभेचें हें अठरावें पुस्तक एकदम हातांत आलेलें पाहून कित्येक लोक संशयांत पडतील, ह्मणून त्या संबंधीं येथें खुलासा करणें अवश्य आहे. सहविचारिणी सभेच्या कित्येक ग्रंथप्रकाशनाचें काम ज्या मंडळीकडे हल्लीं सोंपलें आहे, त्याच मंडळीच्या मालकीचें **श्रीसयाजीविजय** हें पत्र असल्यामुळें, व सन १८९७ सालच्या भेटीदाखल वर्गणीदारांस हें पुस्तक देण्याचा त्यांचा विचार आयते वेळीं ठरल्यामुळें हें पुस्तक तातडीनें छापून बाहेर पाडणें त्यांस भाग पडलें आहे. सभेचीं बाकीचीं पुस्तकें छापत आहेत, व तीं जसजशीं छापून तयार होतील तसतशीं बाहेर पडतील.

**शंकर मोरो रानडे,** बी. ए.
**हरि बाळकृष्ण तळवलकर,**
बी. ए., एलएल. बी.
**भानु केशव गांगनाईक,**
सहविचारिणी सभेचे सेक्रेटरीज.

# वीरमती.

## ( ऐतिहासिक कादंबरी. )

## प्रकरण १ लें.

## तरुण घोडेस्वार.

वसंतऋतूस नुकताच आरंभ झालेला असल्यामुळें वृक्षांस नवी पालवी फुटून ते हिरवेचार दिसत होते. ऐन दोन प्रहरच्या सूर्यनारायणाचे तापानें आसमंतांत प्रदेश रखरखीत झाला होता. पक्षी आंपल्या पिलांसह गर्द छायेच्या झाडांच्या ढोलींतून लपत होते. तृषित झालेले हरणांचे कळप पाण्याकरितां इतस्ततः धांवत होते. मोठमोठाले पशु विस्तीर्ण झाड पाहून त्याखालील जमीन पायानें किंवा शिंगानें उकरून तापनिवारणाची सोय करून बसले होते. अशा समयीं एक तरुण घोडेस्वार गुजराथेंतील टुकटोडा शहराचे उत्तर दिशेकडून आपला घोडा मोठ्या वेगानें फेंकीत येत होता. त्याचा वर्ण श्यामगौर असून बांधा सडपातळ पण मजबूत होता. कपाळ विस्तीर्ण असून डोळे पाणीदार होते. ज्वानीच्या भरानें चेहरा रसरस करीत असल्यामुळें पाहणाराचें मन तेव्हांच आकर्षण पावत असे. ओंठावर नुंकतीच बारीक मिशी फुटत चालली होती, त्यावरून विशीपेक्षां त्याची जास्त उम्मर नसावी असें दिसून येत होतें. या तरुण स्वारानें डोक्यास एक पिवळ्या रंगाचा

साधाच रुमाल गुंडाळलेला होता, पण तो त्याच्या त्या मोहक चेहऱ्यास फारच शोभत होता. त्यानें अंगांत एक पांढरा चुणीदार अंगरखा घातला होता, व कंबर एका जुन्याशा शेल्यानें वेष्टिली होती. पाठीवर एक मोठी ढाल बांधली असून डाव्या बाजूस एक विस्तीर्ण तरवार लटकविलेली होती. त्याशिवाय कट्यार, बिचवा, भाला इत्यादि शस्त्रेंही योग्य प्रकारें कसलेलीं होतीं. या तरुण स्वाराचा घोडा भव्य व पाणीदार होता, तथापि तो फार दमल्यासारखा दिसत होता. घामानें व पांढऱ्या फेंसानें तो अगदीं थवथबून गेला होता. घोड्यावर बसलेल्या तरुण स्वाराच्या चेहऱ्यावर घर्मबिंदु येऊन तो म्लान झालेला दिसत होता, व त्यावरून त्यानें बराच देश कंठला असावा असें अनुमान करण्यास जागा होती.

**टुकटोडा** शहरापासून उत्तरेस सुमारें एक मैलाचे अंतरावर तेथील राजाचा एक सुंदर व रमणीय बाग होता. ह्या बागेशीं वरील तरुण स्वार येऊन ठेपला, व त्यानें एका आंब्याच्या झाडाशीं आपला घोडा बांधून बरोबरचें फराळाचें गाठोडें सोडून त्यांतील पदार्थाचें थोडें सेवन केलें, व जवळच वाहत असलेल्या ओढ्याचें दोन तीन ओंजळी पाणी प्याला. त्यायोगें त्यास बरीच हुशारी येऊन त्याचा चेहरा पूर्वीपेक्षां जास्त टवटवीत दिसूं लागला. त्यानें घोड्याच्या पाठीवरील गाशा सोडून तो जमिनीवर अंथरला, घोड्याच्या पाठीवरून हात फिरवून ती थोडीशी थापटली, थोडीशी हरळी तोडून आणून त्याजपुढें टाकली, व त्या विस्तीर्ण आम्रवृक्षाचे छायेखालीं अंथरलेल्या गाशावर—ढाल तरवार

उशाशीं घेऊन वामकुक्षि केली. प्रवासाच्या श्रमानें व वसंतऋतूच्या उन्हानें थकलेल्या त्या तरुण प्रवाशास बागेंतील झुळझुळ व गार वाहणाऱ्या वाऱ्यानें तेव्हांच गाढ निद्रा लागली.

ह्या बागेचा परिघ सुमारें एक मैलाचा होता. बागेमधून शुभ्र वालुकेचे मार्ग करून त्याच्या दोहों बाजूस सुवासिक पुष्पांचीं झाडें लावलेलीं होतीं. आम्र, फणस, केळी, नारळी, नारिंगें, पपनस, जांब वगैरे फळांच्या, आणि जाई, जुई, मोगरा, शेंवती, चांफा, गुलाब आदिकरून फुलांच्या झाडांनीं सर्व बाग गजबजून गेला होता. पश्चिम बाजूस एक लहानसें सरोवर होतें, व त्याच्या मध्यभागीं संगमरवरी दगडाचें सुंदर जाळीदार मंदिर बांधलेलें होतें. सरोवराच्या आसमंतांतील भागास जाई व जुईच्या वेलींचे ताटवे घालून त्यास आंत येण्यास एकच मार्ग ठेविलेला होता. त्या वेली इतक्या दाट होत्या कीं, त्याच्या पलीकडील पदार्थ मुळींच दिसत नसे. मध्यान्हींचा सूर्य पश्चिमेस वळून त्याचें प्रखर रूप शांत होत चाललें आहे,अशा वेळीं त्या जलमंदिरांतून पांच तरुण स्त्रिया बाहेर निघाल्या, व त्या ताटव्याच्या आंतील भागांत विहार करूं लागल्या. त्या प्रत्येकीनें वेगवेगळ्या रंगाचीं वस्त्रें परिधान केलीं होतीं. तथापि तिघींचीं वस्त्रें रेशमाचीं असून बहुमूल्य होतीं व दोघींचीं सुताचीं होतीं. ह्यावरून त्या तिघी कोणातरी मोठ्याच्या मुली असाव्यात व ह्या दोन त्यांच्या दासी असाव्यात असें पाहणाराच्या सहज लक्षांत येत होतें. तिघींपैकीं एकीचें वय सुमारें १६ वर्षांचें व दुसऱ्या दोघींचें वय १२ किंवा १३ वर्षांचें

असावें असें वाटत होतें. जिचें वय १६ वर्षांचें होतें तिच्या अंगावर जरी फारसे अलंकार नव्हते, तरी तिचें विस्तीर्ण कपाळ, कमळासारखे प्रफुल्लित नेत्र, चांफेकळी-सारखें सरळ नाक, कमानदार भिंवया, पोंवळ्यासारखे रक्त-वर्ण ओंठ, गुलाबाच्या गेंदासारखे रसरसीत गाल, गोंडस बांधा, सुवर्णकेतकीसारखा गौर वर्ण, वगैरे चिन्हें इंद्राच्या अप्सरेसही खालीं मान घालण्यास लावीत होतीं. तिच्या मैत्रिणी रत्नखचित अलंकारांनीं जरी नखशिखांत नटलेल्या होत्या, व त्यांचे नाकडोळे तरतरीत असून त्या गौरवर्णी होत्या, तथापि हिच्या इतकी त्यांच्या चेहऱ्यांत रमणीयता व मोहकपणा दिसत नव्हता. त्यांच्यांतील एकजण वरील तरुणीस उद्देशून ह्मणाली. 'बाई **वीरमती**! तूं अशा उदास वृत्तींत आणखी किती दिवस घालविणार? तूं मि-ष्टान्न वर्ज्य केलेंस, अर्धपोटीं उपवास केलेस; सुंदर वस्त्रालं-काराचा त्याग करून उदासवृत्ति धारण केलीस, आणखी ह्व्या तितक्या गोष्टी करून स्वतःच्या जिवास जाळून घेतलेंस, तरी तुझ्या पतीस तुझें हें एकनिष्ठेचें व्रत समज-ण्यास कांहीं तरी साधन आहे काय? किंवा तूं सर्व उपभो-गांचा त्याग केल्यानें तो धांवून येणार आहे? अग वेडे, असेंच वागल्यानें कुठें पतिप्रेम दिसत नाहीं. खावें, प्यावें, ल्यावें, नेसावें, आनंदांत दिवस काढीत असावें, पतिविरहचिंता जितक्या पुरती तितकीच असावी. आपण मात्र रात्रंदिवस चिंता करून सर्व सुखोपभोगांचा त्याग करावा, व त्यांनीं तिकडे खुशाल आनंदांत रहावें. त्यांस वर्षावर्षांत आमचें स्मरण सुद्धां होऊं नये. हें चांगलें काय?'

आपल्या मैत्रिणीच्या तोंडचे हे शब्द ऐकून **वीरमतीस** वाईट वाटलें, तिच्या चेहऱ्यांत लगेच फरक झाला, व ती तिरस्कारयुक्त स्वरानें ह्मणाली, 'बाई **कुमुदिनी**, तुझे विचार तुलाच आवडोत. स्त्रियांस सर्व अलंकारांत पति हाच मुख्य अलंकार, व त्याची सेवा हेंच मिष्टान्न होय. सुख किंवा दुःख हें मनावर अवलंबून असतें. भक्ताला देवाचें दर्शन न झालें ह्मणजे त्यास व्यवहारांतील सर्व उपभोग तुच्छ वाटतात, तद्वत् पतिव्रतेस पतिविरहित संसारांतील सर्व सुखें तुच्छ वाटतात. पति ह्मणजे व्यवहारांतील सुखोपभोगाची एक वस्तुच आहे असें तुला वाटतें काय? आत्मा शरीरांत नसला ह्मणजे त्या शरीराची जशी किंमत नाहीं, तशीच पतिवांचून स्त्रियांची स्थिति आहे.—'

**वीरमती** बोलत आहे तोंच **मालती** तिचा हात धरून मध्येंच ह्मणाली.—' ताईसाहेब, **कुमुदिनी** बोलून चालून प्रधानकन्या, तेव्हां तिचे विचार आपणासारखे कोठून असणार? शिवाय आह्मांला पतिमाहात्म्य अद्याप कोठें समजूं लागलें आहे? दहापांच पुस्तकें वाचलीं, व झालों आहोंत शहाण्या; पण खरें पतिसौख्य ज्या वेळेस अनुभवास येईल, त्या वेळीं आमचे हे विचार कदाचित् बदलतील. हो पण ताईसाहेब, बरी आठवण झाली. मी आपणास विचारीन विचारीन ह्मणून किती दिवसांपासून ह्मणत होतें, पण तसा प्रसंगच आला नाहीं. आज बरा अनायासेंच आला आहे, तर पण विचारूं कां कांहीं? '

**वीरमती** दीर्घश्वास टाकून ह्मणाली—'विचार; बाई **मालती**, तुला जें विचारावयाचें असेल तें खुशाल विचार.'

**मालती** हे शब्द ऐकतांच किंचित् पुढें सरली, व तिच्या उजव्या हाताची करांगुली आपल्या डाव्या हातांत धरून, व गालांतल्या गालांत किंचित् हास्य करून हलकेच ह्मणाली—'बाई **वीरमती,** पौर्णिमेस आपण **रणछोडजी**च्या दर्शनास गेलों होतों, त्या दिवशीं तुझा चेहरा चांगला प्रफुल्लित होता, व त्यापूर्वी कधींही तो इतका उदास दिसला नव्हता; पण अलीकडे सात आठ दिवसांतच तुझ्या प्रकृतींत विशेष फरक दिसूं लागला आहे. तूं आपले नेहमीचे वाळण्याचे अलंकार सुद्धां काढून टाकलेस. मोगऱ्याच्या वेणीची तुला किती तरी हौस! पण अलीकडे मोगऱ्याच्या फुलांस नुसता स्पर्श देखील तूं करीत नाहींस! जेव्हां पहावें तेव्हां चेहरा उतरलेला! असा एकदम फेरफार होण्याचें कारण तरी कांहीं तसेंच विशेष असलें पाहिजे. कळविल्यास आह्मीही आपल्या दुःखाच्या वांटेकरणी होऊं. आपलें दुःख मैत्रिणींस सांगितलें असतां तें कमी होतें असें ह्मणतात.'

**वीरमती** ह्मणाली—'बाई **मालती,** तूं ह्मणतेस तें कांहीं खोटें नाहीं. आपण **रणछोडजी**च्या दर्शनास गेलों होतों त्याच दिवशीं माझा उजवा डोळा लवूं लागला होता, व त्याची काळजी मी करीत होतेंच. तोंच दुसरे दिवशीं **धारानगरी**हून सांडणीस्वार लाखोटा घेऊन आला. त्यांत बाई, '* * स्वारी एकटीच कुठें निघून गेली आहे, **वीरमती**स तुह्मीं पाठविण्याचा जो विचार केला आहे तो तूर्त रहित करावा. पुढें आपणास कळवूं'—वगैरे मजकूर होता. एकदोन दिवसांत दर्शनाचा लाभ होईल अशी

जी आशा होती, त्या आशेचा वृक्ष ह्या पत्ररूपी झंझावातानें एकदम ढांसळून पडला!' हे शेवटले शब्द तोंडांतून निघतांना तिचे डोळे पाण्यानें भरून आले, जीभ अडखळली, व छाती भरून आली.'

**मालती** आपल्या पदरानें तिचे डोळे पुसून हलक्या स्वरानें ह्मणाली-'ताईसाहेब, असें दुःख करून काय होतें! महाराजांची स्वारी बाहेर निघाली असल्यास खरोखर येथें आल्यावांचून राहणार नाहीं. थोडा धीर धरा. त्यांचें प्रेम आपणावर तसेंच आहे. ते आपली भेट घेतल्यावांचून कधीं राहणार नाहींत.

**वीरमती**-तूं ह्मणतेस तें सर्व खरें, व मलाही प्रथम तसेंच वाटत होतें; परंतु पंधरा दिवस होऊन गेले, अद्याप तसा कांहींच योग जमून आला नाहीं. **धारानगरी**हून येथें येण्यास फार फार तर आठ दिवस बस्स होतात. येथेंच येणें असतें तर इतके दिवस न लागते! धाकट्या सासूबाईच्या तापानें कदाचित् बाई त्यांनीं भलतीच दिशा धरली असेल असें राहून राहून वाटूं लागतें. पण बाई माझा डावा डोळा व बाहु कां बरें उडूं लागला? आशा तर कांहींच दिसत नाहीं. मग एकादें भलतेंच तर कांहीं संकट येत नाहींना?'

जाईच्या वेलींनीं वेष्टन घातलेल्या मोगऱ्याच्या झाडाकडे टक लावून पहात असलेली **कुमुदिनी** एकदम मागें वळून हंसत हंसत ह्मणाली-'नाहीं, कांहीं भलतें संकट मुळींच येणार नाहीं; पण त्या जाईच्या वेलीसारखी तूं आपल्या पतीस लवकरच आलिंगन देशील बरें!'

**वीरमती** किंचित् रागानें ह्मणाली—'तुला थट्टेवांचून दुसरें कांहींच दिसत नाहीं.' ( मध्येंच दचकल्यासारखें करून) 'पण बाई हें काय? इतक्यांत माझा उजवा डोळा-ही कसा उडायला लागला?'

**कुमुदिनी**—यावरून असं वाटतं, कीं तुझी व तुझ्या पतीची भेट होईल, पण पुन्हां लगेच वियोग होईल.

**मालती**—चल, राहूंदे तुझ्या ह्या कोट्या व शास्त्रार्थ. ताईसाहेब, शरीरांतील उष्णपित्तवाताच्या मानानें शरीराच्या भागांवर स्फुरण होत असतं. त्यावरून भावी अनुमान करणं वेडेपणा आहे.

**वीरमती**—तसं ह्मणावं, तर याचा अनुभव पुष्कळ वेळां मला आला आहे. मग बाई त्यास खोटें कसं ह्मणतां येईल!

वरप्रमाणें तिघींचा संवाद चालला आहे, इतक्यांत एक दासी लगबगीनें धांवत आली, व अडखळत अडखळत घाबऱ्या घाबऱ्या ह्मणाली—'बाईसाहेब, बागेच्या पूर्व दरवाज्याजवळील आंब्याचे झाडाखालीं एक तरुण स्वार निजला आहे. त्याच्या चेहऱ्यावरून ते **जगदेव** महाराजच असावे असें वाटतें.'

**मालती**—कांग, तो स्वार **जगदेव** महाराजच असं तूं कशावरून ह्मणतेस?'

**दासी**—बाईसाहेबांच्या महालांत जी महाराजांची तसवीर आहे तिच्या सारखाच ह्या स्वाराचा चेहरा आहे, व मी तो चांगला न्याहाळून पाहिला आहे.

दासीच्या तोंडचे हे शब्द ऐकतांच **वीरमतीस** स्फुरण आलें. तिचा तो म्लान झालेला चेहरा एकदम टवटवीत दिसूं लागला. तिचे बाहु स्फुरण पावूं लागले. थोड्या वेळांपूर्वी तिच्या अंगांतील कंचुकी जी सैल दिसत होती, ती ही शुभवार्ता ऐकून तटतटूं लागली. आनंदाच्या भरांत **वीरमतीनें मालतीच्या** गळ्यांत एकदम मिठी मारली, व ‘ चल बाई आतां लवकर त्यांचें दर्शन घेण्यास ’—असें ती एकदम म्हणाली.

# प्रकरण २ रें.

## अचानक गांठ व वियोग.

पतिव्रता स्त्रियांस पतिदर्शनापुढें जगांतील सर्व सुखें तुच्छ वाटतात! पतीचा किंचित् विरह सुद्धां त्यांस दु:सह होतो. पतीस जें सौख्य तेंच आपणास सौख्य, व पति-सेवा हाच प्रपंचांतील ऐषआराम. सारांश पतीवांचून त्यांस जगांतील सर्व ऐषआरामाच्या वस्तू तुच्छ वाटत असतात. पण अशा पतिव्रता हल्लींच्या काळांत फार थोड्या आ-हेत. हल्लींच्या बायकांना पतीचें कांहीं होईना, पण आ-पल्या अंगावर शेर सवाशेर सोनें त्यानें घातलेंच पाहिजे; आपल्या मैत्रिणींनीं आपल्या नथेची तारीफ केलीच पाहिजे; तसें नसलें तर त्या बिचाऱ्या नवऱ्याचा रोज कुरकुर करून अर्धा जीव घेतील. कधीं सुखाचा शब्द देखील मिळणार नाहीं. बाईसाहेबांच्या किरकिरीमुळें कधीं पोटभर जेवण होणार

नाहीं. धुसफुस, तडफड, मुलाबाळांवर घालून पाडून बोलणें, भांड्याकुंड्याची आपटाधोपट, असा प्रकार नेहमीं घरांत चालू असावयाचा. सारांश, त्या बिचाऱ्या नवऱ्यास सारा दिवस श्रमलेल्या जिवास विश्रांतीचें ह्मणून आमच्या पूर्वजांनीं व शास्त्रकारांनीं ठरवून दिलेलें जें पतिरूपी स्थान तें घरीं येतांच आस्वलीच्या घरासारखें खावयास उठणार! अशा पुरुषास संसारांतील सुखाचा तर लेशही नसतो, परंतु वैतागानें त्यास प्रपंचापेक्षां मरण विशेष प्रिय वाटूं लागतें. याचा अनुभव आमच्या वाचकांपैकीं पुष्कळांस असेल. असो. येथें सांगावयाचें इतकेंच कीं, **वीरमती** अशा स्त्रियांसारखी नव्हती, तर खरी पतिव्रता होती; व ती पतिसांनिध्यावांचून जगांतील सर्व सुखें तुच्छ मानणारी होती. पतीची वार्ता दासीच्या तोंडानें ऐकतांच ती आपल्या मैत्रिणींसह लगबगीनें चालूं लागली. दासी पुढें व ही तिच्या मागें अशा भराभर चालत होत्या. ह्या वेळीं **वीरमतीस** तो बागेंतील रस्ता किती तरी लांब आहे असें वाटूं लागलें. आपल्या पायाखालीं काय आलें, आपल्या पातळाचा पदर झाडास अडकेल, आपण कोणत्या दिशेनें चाललों, वगैरे गोष्टींचें तिला मुळींच भान राहिलें नसावें असें तिचा पाय वरचेवर अडखळत असे त्यावरून सूक्ष्म दृष्टीनें पहाणारांच्या लक्ष्यांत तेव्हांच येण्याजोगें होतें. असो; जेमतेम करून त्या सर्वजणी जेथें आमचा प्रवासी स्वार निद्रिस्त झाला होता, तेथें येऊन पोंचल्या.

निजलेल्या स्वारानें आपल्या अंगावर जो हिरवागार शेला घेतला होता, तो पायापासून छातीपर्यंतच

होता, त्यामुळें त्याचा चेहरा न्याहाळून पहाण्यास व ओळख पटण्यास विलंब लागला नाहीं. प्रवासांतील उन्हाच्या तापामुळें त्याचा चेहरा कांहींसा काळसर दिसत होता. व श्रमामुळें मुखकमल जरी म्लान झालेलें होतें, तरी त्यावरील मोहकपणा जशाचा तसा कायम होता. तो चेहरा पहातांच **वीरमती**चे डोळे आनंदाश्रूंनीं एकदम भरून आले, व आपल्या प्रियपतीस आलिंगन देण्यास तिचे दोन्ही बाहु ओढ घेऊं लागले. तिच्या हृदयमंदिरांत, आनंद, उत्साह, लज्जा व भीति यांचा एकच गोंधळ उडून गेला. आपण कोठें आहोंत, आपणाबरोबर कोण आहे, याचें भान न राहून ती आपल्या निद्रिस्त प्रियपतीस आलिंगन देण्याकरितां एकदम पुढें सरसावली. इतक्यांत **मालती**नें तिचा हात धरला. त्यासरशी ती एकदम दचकली व लज्जित होऊन खालीं पाहूं लागली. **मालती** हळूच ह्मणाली–'ताई-साहेब उतावीळ होऊं नका. आपण ह्या झाडाच्या आड उभ्या राहूं. आतां महाराज जागे होतील, मग युक्तीनेंच त्यांची भेट घेऊं. त्यांस राजवाड्यांत घेऊन जाऊं. उतावळीनें केलेलें काम फसतें हें आपणास माहीत असतां तसेंच करणें चांगलें नाहीं.'

**वीरमतीस मालती**चें ह्मणणें कबूल करावें लागलें व ती आपल्या मैत्रिणींसह समोरच एक कलमी आंब्याचें विस्तीर्ण झाड होतें त्याच्या आडोशास जाऊन उभी राहिली, व तेथून आमच्या तरुण प्रवाशाच्या जागृतावस्थेची मार्गप्रतीक्षा करूं लागली. पुरी पाव घटका लोटली नाहीं तोंच चार घोडेस्वार जेथें आमचा तरुण प्रवासी निजला

होता तेथें येऊन ठेंपले, व ते आपसांत कांहीं कुजबुजत असल्याचें दिसलें. थोड्या वेळांत त्यांनीं आपसांत कांहीं बेत ठरवून त्यांतील एकानें आपल्या खिशांतून एक लहा-शी कुपी काढिली, व तिचें बूच उघडून तींतील पाणी एका रुमालावर शिंपडलें, आणि तो रुमाल त्या तरुण स्वाराच्या तोंडावर टाकला, व लगेच दोघांनीं त्या तरुण स्वारास उचलून एकाच्या पुढें दिला; दुसऱ्यानें त्याचा गाशा व ढाल तरवार गुंडाळून आपल्या घोड्यावर घेतली; व ते तांतडीनें जावयास निघाले.

हा चाललेला प्रकार झाडाआड उभी राहिलेल्या **वीरमतीस** व तिच्या मैत्रिणींस स्पष्ट दिसत होता. हे लोक कोण, येथें कशाकरितां आले, त्यांचा हेतु काय असावा, अशाबद्दल **वीरमती**च्या मनांत एकामागून एक विचार येऊं लागले. त्या लोकांनीं **जगदेवास** जेव्हां घोड्यावर घेतलें, तेव्हां तिची पक्की खातरी झाली कीं यांत कांहीं तर दगा आहे. तो प्रकार पाहतांच रागानें तिचे डोळे लालभडक झाले, व सर्व अंग थरथर कांपूं लागलें. त्या आवेशासरसें ती एकदम 'हँ थांबा चोरांनो, तुह्मी कोणास उचलून नेता.?'—असें बोलत त्यांच्या आंगावर सरसावली. लांब लांब दाढीमिशांचे, धिपाड शरिराचे, तशांतून शस्त्रास्त्रयुक्त, अशा चार पुरु-षांपुढें त्या सुकुमार तरूण अबलेचा पाड काय लगणार? तशांतून इजजवळ नाहीं घोडा कीं तरवार! अर्थात ओरडून आंगावर जाण्यापलीकडे ह्या प्रसंगीं त्या सुकुमार पण शूर अबलेचा कांहींच उपाय राहिला नव्हता. त्या चौघा धटिंगण स्वारांनीं तिच्या ओरडण्याकडे मुळींच

लक्ष न देतां **जगदेवास** घेऊन आपले घोडे भरधांव फेंकले, व हॉं हॉं ह्मणतां दिसेनासे झाले. आपल्या पतीची फारां दिवसांनीं झालेली अकस्मात् भेट व लागलीच घडलेला भयंकर वियोग यांयोगें **वीरमतीस** एकदम मूर्छा येऊन ती धाडदिशी जमिनीवर पडली! तिची अशी अवस्था पाहतांच तिच्या मैत्रिणींची व दासींची एकच धांदल उडाली. **मालतीनें** तिचें डोकें आपल्या मांडीवर घेतलें, व **कुमुदिनी** आपल्या पदरानें वारा घालून तिला सावध करूं लागली. दासीनें पाणी आणून तिच्या डोळ्यास लावलें व महत्प्रयासानें शुद्धीवर आणून हळू हळू त्या सर्वजणी तिला जलमंदिरांत घेऊन गेल्या.

# प्रकरण ३ रें.

## पूर्व हकीकत.

वरील भाग वाचून आमचे वाचक अगदीं गोंधळून गेले असतील. प्रवासी स्वार कोणाचा कोण, तो प्रवासास कां निघाला, त्याला पकडून नेणारे स्वार कोण असावेत वगैरे गोष्टी समजून घेण्याविषयीं ते उत्सुक झाले असतील, ह्मणून अगोदर त्यांची जिज्ञासा पूर्ण करून नंतर पुढील कथाभागाकडे वळूं.

महीकांठ्याच्या उत्तरेस आणि वायव्येस वसलेल्या भागांस **दांताचें** राज्य मानण्यांत येतें. येथील राज्यकर्त्या पुरुषास **महाराणाश्री** अशी पदवी आहे. येथील राज्य-

कर्ते **सूर्यवंशी** पाटवी शाखेचे असून **उज्जनी** नगरींतील प्रख्यात **विक्रमादित्य** राजाचे वंशाचे **पवार** अथवा **परमार** जातीचे रजपूत आहेत. या राज्याचा विस्तार २३०० चौरसमैल आहे. याचे उत्तरेस सिरोही नदी, दक्षिणेस गायकवाडांचा मुलूख, पूर्वेस ईडरचें राज्य व पश्चिमेस पालनपूरचें राज्य आहे. विक्रमादित्याचे पिढींतील ४८ वा व शालिवाहनाचा २१वा पुरुष **उदयादित्य** हा संवत् २३७ ह्मणजे शके १०२ मध्यें गादीवर बसला. यानें **मालव** देशांतील **धारानगरी** हें राजधानीचें शहर करून तेथें आपलें वास्तव्य ठेविलें होतें. हा राजा मोठा शूर व चतुर होता. यास **वाघेली** कुळांतील एक व **सोळंकी** कुळांतील एक अशा दोन राण्या होत्या. त्यांत **वाघेली** कुळांतील राणी आवडती होती, व **सोळंकी** कुळांतील नावडती होती. **वाघेली** राणीस **रणधवल** नांवाचा व **सोळंकी** राणीस **जगदेव** नांवाचा असे दोघी राण्यापासून राजास दोन पुत्र होते. **जगदेव** हा **रणधवल**पेक्षां दोन वर्षांनीं धाकटा परंतु देखणा, शहाणा व हुशार होता. **वाघेली** राणी दिसण्यांत सुंदर असून स्वभावानें मानी व संतापी असे. परोत्कर्ष तिला कधीं सहन होत नसे. तिनें राजाला आपलेसें करून ठेविलें होतें; व तिच्या संतापी स्वभावामुळें राजाही तिला फार भीत असे. पुरुष एकदा स्त्रीच्या अंकित झाला ह्मणजे त्याचें सर्व ज्ञान नाहींसें होऊन तो मूढ बनतो. असे दाखले व्यवहारांत आपणास अनेक सांपडतात. त्याप्रमाणेंच **उदयादित्य** राजा **वाघेली** राणीच्या अंकित होऊन मूढ बनला होता. त्यानें

**सोळंकी** राणीस दोन गांव तोडून देऊन गांवाबाहेर ठेविलें होतें. तेथें ती, पुत्र व आपल्या आश्रित मंडळीसह जाड्याभरड्या अन्नवस्त्रावर कालक्रमणा करीत असे. **सोळंकी**राणी जात्या शांत व गंभीरस्वभावाची असल्यामुळें तशा स्थितींतही ती पुत्रासह आनंदांत राहत असे. आई सुशिक्षित व चतुर असली ह्मणजे मुलांसही अनायासें सुशिक्षणच मिळतें. त्याप्रमाणें **जगदेवास** त्यांच्या आईपासून उत्तम शिक्षण मिळालें होतें. या मातापुत्रांस जरी राजानें आपल्यापासून दूर ठेविलें होतें, व त्यांजबद्दल तो किंचित्‌ही काळजी घेत नसे, तथापि मिळणाऱ्या अल्प वेतनांतच **सोळंकी** राणीनें आपला चरितार्थ चालवून **जगदेवास** क्षात्रकुलास योग्य असें सर्व प्रकारचें शिक्षण दिलें होतें.

एके प्रसंगीं **जगदेव** आपल्या सोबत्यांशीं खेळत असतां एकानें त्यास चिडविलें व ह्मणाला, ‘ तूं नावडतीचा मुलगा आहेस ह्मणून महाराजांनीं तुह्मास गांवाबाहेर ठेविलें. तुला राजसुखांपैकीं कांहीं तरी आहे काय? तुझ्या संगतीपासून आह्मांस कोणताही लाभ होत नाहीं. तुझा सावत्र भाऊ **रणधवल** ह्याचे संगतीनें आह्मांस नेहमीं उत्तम पक्वान्नें व अनेक प्रकारच्या वस्तु मिळतात, व किती तरी ऐषआराम होतो. तेव्हां तुझ्या संगतींत वेळघालविण्यापेक्षां **रणधवल**च्या संगतींत राहणें आह्मांस विशेष प्रिय वाटतें.’

सोबत्याच्या तोंडचे हे शब्द **जगदेवास** फार लागले. तो तसाच आपल्या आईकडे गेला, आणि ह्मणाला ‘आई, बाबा आपणाकडे कधींच कां बरें येत नाहींत? **रण-**

**धवलास** जसे उत्तम वस्त्रालंकार तसे मला कां नसावेत? बाबांनीं आपल्यास ह्या खेड्यांत कां ठेविलें? तूं सरकारवाड्यांत कां चलत नाहींस?' असें ह्मणून त्यानें आपलें तोंड हिरमुसलें केलें.

मुलाच्या तोंडचे हे शब्द ऐकून **सोळंकी** राणीचा कंठ भरून आला. तिनें **जगदेवा**ला पोटाशीं कुरवाळून धरलें आणि दीर्घश्वास सोडून ती ह्मणाली—'बाळा **जगदेवा**, आपण पूर्वजन्मीं परमेश्वराचा कांहीं गुन्हा केला असेल, ह्मणूनच महाराजांची आपणावर इतराजी झाली असावी. नाहीं तर ते आपणास अशा स्थितींत कां ठेवते? तुझी सावत्र आई **वाघेली** राणी महाराजांस आपणाकडे येऊं देत नाहीं, व ते तिच्या स्वाधीन झाल्यामुळेंच आपणास येथें येऊन अशा स्थितींत रहावें लागलें आहे. त्यांत तिजवर दोष देण्यापेक्षां आपल्या प्रारब्धावरच देणें चांगलें!—' यापुढें तिचा कंठ एकदम भरून आला, व तिच्या तोंडांतून एक शब्दसुद्धां निघेनासा झाला.

**जगदेवा**नें आपल्या आईची अशी स्थिति पाहून त्यास पुष्कळ वाईट वाटलें व स्फुरणही चढलें. त्यानें आपल्या आईचे डोळे पुसले; व ह्मणाला—'आई, तूं अशी खंत करूं नकोस. मी बाबाकडे जातों व त्यांचा रंगरूप काय आहे तो एकदा पाहून येतों. बाबांनीं आह्मांस टाकलें ह्मणून परमेश्वरही टाकील काय? असें ह्मणून तो तसाच उठला. **सोळंकी** राणीनें न जाण्याबद्दल त्याची पुष्कळ प्रकारें समजूत घातली, पण अखेर तिची कशी तरी सम-

जूत करून तो आपल्या तट्टावर स्वार होऊन तडक आपल्या बापाच्या भेटीकरितां निघाला.

**उदयादित्य** राजानें जरी **सोळंकी** राणीस दूर ठेविलें होतें, तरी त्यास वारंवार तिचें व तिच्या पुत्राचें स्मरण होत असे, व तो हस्तें परहस्तें त्यांचा समाचार ही घेत असे. **वाघेली** राणीचे हेर पाळतीवर असल्यामुळें आपल्या पत्नीस व पुत्रास भेटण्याची इच्छा त्यास मनांतले मनांत दाबून ठेवावी लागे. **जगदेव** बाळपणापासूनच देखणा व चपळ असल्यामुळें तो जरी शहराबाहेर राहत असे, तरी त्याजवर प्रधानादि मंडळीचें फार प्रेम असे. तथापि **वाघेली** राणीच्या कडक स्वभावामुळें कोणासही प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या त्यास साह्य करवत नसे. **जगदेव** आईचा निरोप घेऊन जो निघाला, तो तडक राजदरबारच्या दाराशीं येऊन ठेपला. ह्या प्रसंगीं राजा आपल्या मंत्रिमंडळासह दरबारांत कांहीं कामाचा विचार करीत बसला होता.

**जगदेवाचा** पोशाख अगदीं मळीण होता, तथापि राजतेज त्याच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत असे, व महाराजांनीं जरी त्यास दूर ठेविलें होतें तरी सर्व प्रजा व सरकारी नोकरादि मंडळी त्यास **रणधवल**पेक्षां अधिक मान देत असत. त्यास पहातांच द्वारपालानें धांवत जाऊन दिवाणजीस **जगदेव** आल्याची वर्दी दिली. द्वारपालाच्या तोंडचें हें वर्तमान ऐकतांच **उदयादित्य** राजास पराकाष्ठेचा आनंद झाला. तो लगेच सिंहासनावरून उठला, व **जगदेवाचा** हात धरून त्यानें त्यास आपल्याजवळ बसविलें. त्याच्या तोंडावरून हात फिरविला व–' बाळां तूं अशा भिकार

स्थितींत कां रहातोस, तुला वस्त्रालंकार नाहींत काय?'— ह्मणून विचारलें. बापाचें बोलणें ऐकून **जगदेवानें** किंचित् हास्यवदन केलें व हात जोडून तो बापास म्हणाला—'बाबा, आपण जन्मदाते आहांत; पण माझें संरक्षण करणारा जो प्रभु त्यास मी अशाच स्थितींत राहणें आवडतें. त्याच्या मनांत जेव्हां मीं उत्तम वस्त्रालंकार परिधान करावें असें येईल, त्या वेळीं ते मला आपोआप मिळतील.'

**जगदेवाच्या** तोंडचे हे शब्द ऐकून राजा खजील झाला. त्यास फार वाईट वाटलें; पण **वाघेली** राणीच्या क्रोधी स्वभावाचें त्यास स्मरण होऊन त्यास कांहींच बोलवे-नासें झालें. तथापि त्यानें मन घट्ट करून पुनः **जगदे-वाच्या** तोंडावरून हात फिरविला, आणि जवळच्या मनु-ष्यास आज्ञा करून उत्तम पोशाख मागविला, व तो **जग-देवाचे** अंगावर चढवून एक कंठा, ढाल, तरवार, व एक सुंदर घोडा देवून त्याच्या खास हातखर्चाकरितां सालीना १२,००० रुपयांची नेमणूक करून देण्याविषयीं दिवाण-जीस आज्ञा केली. हा सर्व प्रकार पाहून **जगदेव** बापास हात जोडून म्हणाला.—'बाबा, तुम्ही हें सर्व करतां तें ठीक आहे, पण हें वर्तमान धाकट्या आईसाहेबांस सम-जलें तर आपणास पुष्कळ जाच होईल, व इतकेंच नाहीं तर हें दिलेलें सर्व ऐश्वर्य कदाचित् आपणांस परत घेण्या-चाही प्रसंग येईल. ह्मणून म्हणतों आपण जें करतां तें विचारानें करा. मी आपणाजवळ वस्त्रालंकार मागण्यास आलों नाहीं, पण कित्येक गोष्टींचा खुलासा करून प्रवा-सास जाण्याची रजा मागण्याकरितां आलों आहें.'

वरप्रमाणें पितापुत्रांचें बोलणें चाललें आहे इतक्यांत द्वारपाळ एक लखोटा घेऊन आला, त्यानें तीन वेळ मुजरा करून लखोटा पुढें ठेवला आणि म्हणाला—'**टुकटोडा**च्या महाराजांकडून एक सांडणीस्वार व ब्राह्मण हा लखोटा घेऊन आले आहेत. ते बाहेर उभे आहेत त्यांस काय निरोप सांगावयाचा त्याची आज्ञा व्हावी.'.

राजानें तो लखोटा दिवाणजीच्या स्वाधीन केला, व त्यांत काय लिहिलें आहे तें वाचावयास सांगितलें. दिवाणजीनें लखोटा फोडला व वाचून दाखविला. त्यांत पुढील प्रमाणें मजकूर होता—

श्री.

सकलगुणैश्वर्यमंडित **धारा**नगराधिपति महाराणा **उदयादित्य** महाराज स्नेहांकित **चावडा** कुलोत्पन्न **बिरज** राजाजीचे अनेक प्रणाम.

वि. वि. आमची भगिनी **वीरमति** हल्लीं उपवर झाली आहे. आमचे वडिलांची वृद्धावस्था झाल्यानें त्यांच्या मनांतून आपल्या कन्येचें लग्न येत्या मार्गशीर्षांत करावयाचें आहे. देशदेशच्या राजपुत्रांच्या मागविलेल्या तसबिरांत आपले कनिष्ठ चिरंजीव **जगदेव** यांची तसबीर आमच्या भगिनीनें पसंत केली आहे, व इतकेंच नाहीं, तर तिनें आपल्या पुत्रास मनानें वरलें आहे. आणि त्याप्रमाणें आमच्या उपाध्याबरोबर नारळ पाठविला आहे त्याचा स्वीकार व्हावा, आणि आपण सहपरिवार कार्यसिद्धीकरितां कधीं निघणार तें लगत कळविण्याची कृपा व्हावी. कळावें लोभ असावा

ही विनंति. मिति कार्तिक शुद्ध १ शके ११८ मुकाम **टुकटोडा.**

आपला स्नेहांकित,

**चावडा कुलोत्पन्न राजा विरज.**

पत्रांतील मजकूर पहातांच दरबारांतील मंडळीस पुष्कळ आनंद झाला. **उदयादित्य** राजासही ह्या शुभवार्तेपासून अत्यानंद झाला, पण लगेच त्याच्या डोळ्यांपुढें **वाघेली** राणीची क्रोधयुक्त मूर्ति दिसूं लागली. हा घडलेला प्रकार राणीस समजला ह्मणजे ती कसा आकांत करील याबद्दलचे तरंग त्याच्या मनांत एकामागून एक येऊं लागले. तो अगदीं भांबाऊन गेला. त्याच्या चेहऱ्यावर क्षणांत आनंद, क्षणांत चिंता, क्षणांत क्रोध असे प्रकार दिसूं लागले. आलेल्या सांडणीस्वारास काय जबाब द्यावा व हें कार्य कसें शेंवटास जाईल त्याबद्दल त्यास कांहींच सूच पडेना. महाराजांकडून कांहीं जबाब मिळेना, तेंव्हां दिवाणजींनीं पुढें सरून तोंडास शेला आडवा धरून हळूच विचारलें, 'महाराजांचा कोणात्या बाबतींत विचार चालला आहे. तो समजाविल्यास कृपा होईल. योग उत्तम घडून आला आहे. तेंव्हां चालून आलेली लक्ष्मी नाकारणें बरें दिसत नाहीं.'

'प्रधानजी, **वीरमती**सारखी रूपगुणसंपन्न मुलगी पाहूं गेल्यास मिळावयाची नाहीं. माझ्या **जगदेवा**चें मोठें भाग्य ह्मणूनच त्याला अशी वधू चालून आली. महत्प्रयासानें न घडणारा योग अनायासें घडून आला आहे, तेंव्हां तो मी कसा नाकारीन? पण '—

**प्रधान**—पण, ह्मणून कां थांबतां, आपणास कोणती अडचण दिसते? हल्लीं तिजोरींत शिल्लक भरपूर आहे, सर्वत्र शांतता आहे, शिवाय यंदा पीकपाणीही मुबलक आहे. असे सर्व योग आहेत मग अडचण कसली?

**राजा**—तसें कांहीं नाहीं. मला वेगळीच चिंता उत्पन्न झाली आहे. राणीची प्रकृति कशी तापट आहे हें आपणास माहीत आहेच. त्यांतून **रणधवल**चें लग्न अद्याप झालें नाहीं. **वीरमतीनें रणधवला**सच पसंत करावें ह्मणून राणीनें त्याची तसबीर चांगल्या चितार्‍याकडून रंगवून पाठविली होती. शिवाय तिनें **वीरमती**चें मन वळविण्याकरितां अनेक प्रकारचे यत्नही केले होते असें माझ्या ऐकण्यांत आलें आहे. तेंव्हां तिला जर हें वर्तमान समजलें तर ती किती आकांत करील? **जगदेवा**चें नांव काढलें तर जिची पायाची तिडीक मस्तकास जाऊन पोंचते, तिला—**वीरमतीनें जगदेवा**स पसंत केलें—हें वर्तमान किती दुःसह होईल; व हें कार्य कसें शेंवटास जाईल, याची मला मोठी चिंता वाटत आहे. काय करावें व कोणता जवाब पाठवावा तें कांहींच सुचत नाहीं.' असें ह्मणून राजानें दीर्घश्वास सोडला.

महाराजांची अशी 'स्थिति पहातांच **जगदेव** हात जोडून म्हणाला—बाबा इतकी चिंता करण्याची मुळींच जरूर नाहीं. **वीरमतीनें** जरी माझी तसबीर पसंत केली असली' तरी आपण तिच्या बंधूस असा उलट निरोप पाठवा कीं, **रणधवल जगदेवा**पेक्षां वडील आहे व **रणधवल**चें लग्न झाल्याशिवाय **जगदेवा**चें लग्न आम्हांस करतां येत नाहीं.

ह्मणून मार्गशीर्ष मासींच लग्न करण्याची तुमची इच्छा असल्यास **वीरमतीनें रणधवलासच** वरमाळा घातली पाहिजे. तिचा पिता वृद्ध झाला असून त्यास उतावळीनें लग्न करण्याची उत्कट इच्छा असल्यानें आपलें ह्मणणें ते सहज कबूल करतील. शिवाय त्यांतच आपण असेंही कळवा कीं, **रणधवल** हा जेष्ठ असून आवडत्या राणीचा पुत्र असल्यानें हल्लीं सर्व ऐषआरामाचा व राज्याचा भोक्ता तोच आहे, व **जगदेव** नावडत्या राणीचा पुत्र असून त्यास आपल्या मातेसह राज्याबाहेर ठेवलेलें आहे. अशा प्रकारें खऱ्या हकीकतीचें पत्र गेलें ह्मणजे **वीरमती**चेंही मन तावडतोब फिरेल. स्त्रियांस संपत्तीची व ऐषआरामाची स्वाभाविक फार हौस असते, व ती मला वरल्यापासून पुरण्याची आशा नाहीं असें समजलें ह्मणजे ती व तिचा बंधु **रणधवल**दादास तेव्हांच कबूल करतील.

**जगदेवा**चें वरील भाषण ऐकून दरबारांतील सरदार मंडळी त्याच्या शहाणपणाबद्दल थक्क झाली. कोणाच्या तोंडून एक शब्द सुद्धां निघेना. राजाही पुत्राचें भाषण ऐकून सचिंत झाला, व त्यास काय जबाब द्यावा हें सुचेना. इतक्यांत **धीरसिंह** नांवाचा एक वृद्ध सरदार उठून उभा राहिला व मुजरा करून ह्मणाला.—'महाराज, **जगदेव**महाराजांचें भाषण शहाण्या व थोर मनाच्या माणसास शोभण्यासारखें आहे, पण त्यांच्या ह्मणण्याप्रमाणें जबाब मात्र पाठवितां येणार नाहीं. मला जी माहिती मिळाली आहे तिजवरून मी खात्रीनें सांगतों कीं, हा लखोटा त्यांनीं सर्व गोष्टीचा विचार करूनच पाठविला

आहे. **रणधवल** वडील असून **जगदेव** महाराज धाकटे आहेत हें त्यांस पुरतेपणीं माहीत आहे. **जगदेव** महाराज नावडत्या राणीचे पुत्र असून त्यास पोटभर अन्न व अंगभर वस्त्रही मिळत नाहीं, महाराज त्या दोघां मातापुत्रांचा मनापासून तिरस्कार करितात, गादीचा हक्क **रणधवला**स आहे, वगैरे अनेक प्रकारचा निरोप राणीसाहेबांनीं आपल्या **गंभीरसिंग** सरदाराबरोबर पाठविला होता व इतकेंच नाहीं, तर आपल्या प्रीतींतील दोन दासी **वीरमतीस** मथविण्याकरितां पाठविल्या होत्या. त्या कालरोजींच परत आल्या. त्यांच्या बोलण्यावरून असें समजतें कीं, त्यांनीं आपली होती नव्हती तितकी पराकाष्ठा केली, परंतु कांहींच निष्पन्न झालें नाहीं. उलट **वीरमतीनें** शपथेवर असें निश्चित केल्याचें समजलें कीं, **जगदेव** महाराज कशाही गरीब स्थितींत असले तरी त्यांसच वरलें आहे. त्यांजवांचून इतर सर्व पुरुष मग ते इंद्र किंवा चंद्रासारखे असले, तरी माझे बाप व बंधूप्रमाणें मीं मानले आहेत. अशा प्रकारें तिचा जेव्हां दृढ निश्चय पाहिला; तेव्हां ही शिष्टाई करण्यास गेलेली मंडळी परत आली. ही सर्व हकीकत आज सकाळींच आमच्या अंतर्गृहांतून मला समजली आहे. तेव्हां मला वाटतें, असे भलभलते विचार करण्यांत अर्थ नाहीं. चिठ्ठीप्रमाणें लग्नाची तयारी करावी. **वाघेली** राणीसाहेब जरी मानी व तापट स्वभावाच्या आहेत, व त्यांस हा प्रकार मुळींच आवडण्यासारखा नाहीं, तथापि लौकिकांत बरें ह्मणून घेण्याची त्यांस हौस आहे. तेव्हां निदान लोकापवादाच्या

भीतीस्तव तरी त्या या गोष्टीस अनुकूल होतील. शिवाय **वीरमती रणधवलास** कबूल करीत नाहीं, याबद्दलही तिची खात्री होऊन चुकली आहे. वरराजास नेऊन समारंभानें लग्न करणें जर अडचणीचें दिसत असलें तर खड्ग पाठवून द्यावें, आणि त्याच्याशीं लग्न लावण्यास सांगावें, मग सवडीप्रमाणें वधूस घेऊन यावें. परंतु ही गोष्ट **विरज** राजा कबूल करणार नाहीं. त्यांचें हें शेवटचें कार्य असून तें थाटानें करण्याचा त्यांचा मानस आहे. आपणासही ईश्वरानें सर्व गोष्टी अनुकूल दिल्या आहेत, व **वाघेली** राणीसाहेबांची समजूत सहज होण्यासारखी आहे.

**राजा—धीरसिंह**जी, आपण ह्मणतां असें असल्यास मग फारशी भीति नाहीं. परंतु मला वाटतें राणीचा अभिप्राय घेतल्यावांचून या लखोट्याचा जबाब पाठवूं नये. हें अभिप्राय घेण्याचें काम आपल्या कुटुंबाकडूनच झाल्यास बरें पडेल. कारण आपल्या कुटुंबास ती चांगली मानते.

**धीरसिंह**—जशी महाराजांची आज्ञा. मी आतांच जाऊन कुटुंबास राणीसाहेबांकडे हा लखोटा देवून पाठवितों; व राणीसाहेबांचें मन वळवून अनुकूल अभिप्राय आणवितो.

याप्रमाणें ठरून त्या दिवशीं दरबार तितक्यांवरच बरखास्त करण्यांत आला. **जगदेवास** राजवाड्यांतच राहण्याबद्दल महाराजांनीं पुष्कळ आग्रह केला, परंतु ' मी आईची आज्ञा घेतली नाहीं, व मी न गेल्यास ती चिंता-

कुल होईल, मला गेलेंच पाहिजे. पाहिजे असल्यास पुन्हा उद्यां दरबारच्या वेळीं हजर होईन' असें सांगून त्यानें बापाची रजा घेतली. महाराजांनीं दोन घोडेस्वार बरोबर देऊन—'नव्या घोड्यावर बसून जा, व उद्यां जरूर ये. आनंदांत रहा, तुझ्या आईला माझा कुशल निरोप कळीव'—असें सांगितलें. बापाची आज्ञा घेऊन **जगदेव** जो निघाला तो तडक इकडे तिकडे न पाहतां आपला नवा ताजा घोडा भरधांव फेंकीत आपल्या त्या लहान घराजवळ येऊन ठेपला.

**जगदेव** निरोप घेऊन गेल्यापासून—त्याचा अपमान होईल काय; त्यास कोणी टाकून बोलेल काय; याचा स्वभाव तापट पडला, कदाचित् कोणीं कमीजास्त बोललें तर तें यास सहन होणार नाहीं; हा कांहीं तरी भलतेंच करून बसेल—वगैरे अनेक प्रकारचे तरंग **सोळंकी** राणीच्या मनांत एकामागून एक येत होते. मधून मधून तर ती एकदम दचकत असे, व 'परमेश्वरा **जगदेवास** लवकर सुखाचा परत येऊं दे' अशी ईश्वराची प्रार्थना करीत असे. तिचे डोळे एकसारखे **जगदेवा**ची मार्गप्रतीक्षा करण्याकडे तटस्थ लागले होते. जसजसा सूर्यनारायण पश्चिमेस जाऊं लागला तसतसा तिचा चिंताग्नि जास्त भडकूं लागला. आतां दोन घटका सुद्धां दिवस राहिला नाहीं असें जेव्हां तिला समजलें, तेव्हां तर तिचा धीर एकदम उडून गेला. ती बसलेल्या जागेवरून तटकन उठून उभी राहिली. तिची वृत्ति कावरीबावरी झाली, व ती इकडे तिकडे फेऱ्या घालूं लागली. इतक्यांत दुरून घोड्यांच्या टां-

पांचा आवाज येऊं लागला. ती खिडकीजवळ जाऊन उभी राहते आहे, तों तिच्या दृष्टीस तीन घोडेस्वार भरधांव येत असल्याचें पडलें. त्यांस पाहून तिचें मन अधिक गोंधळांत पडूं लागलें. ती आपल्याशीं ह्मणाली—'ह्या तिघां स्वारांत एकाचा बांधा **जगदेवा**सारखाच दिसतो, पण त्याच्या डोक्यावर मंदील कोठून आला? तसेंच तो इकडून जातांना आपल्या लहान्या तट्टावर बसून गेला होता, व हा तरुण मुलगा तर भव्य घोड्यावर बसलेला आहे! शिवाय त्याच्या बरोबर दोन सरकारी स्वार आहेत, तेव्हां हा कोणी तरी सरदारपुत्र असावा'—अशा प्रकारें विचारतरंग येत आहेत, इतक्यांत ते तिघे स्वार त्या लहान घराच्या अगदीं दाराशीं येऊन ठेंपले. **जगदेवानें** घोड्यावरून ताडकन उडी टाकली, व घोड्याचा लगाम स्वारास धरावयास सांगून आपण धांवत माडीवर गेला, व आपल्या प्रिय मातेस दृढालिंगन दिलें. **जगदेवास** पहातांच **सोळंकी** राणीस एकदम आनंदाचें भरतें आलें. तिनें **जगदेवाचें** मुख कुरवाळून त्याला पोटाशीं गच्च आवळून धरलें. आणि—' बाळा, हे सरकारी स्वार तुझ्याबरोबर कोणीं पाठविले?'—असा प्रश्न केला. **जगदेवानें** दरबारांत घडलेली सर्व हकीकत आपल्या आईस निवेदन केली, व बापानें दिलेला पोशाख दाखविला.

हा घडून आलेला शुभयोग, व त्यांतच **जगदेवाचें** लग्नाचें वर्तमान ऐकून **सोळंकी** राणीस पुष्कळच आनंद झाला. पण **वाघेली** राणी या गोष्टीस अनुकूल मत देणार नाहीं, व राजा तिच्या ताब्यांत असल्यामुळें तिच्या मनाविरुद्ध त्यांच्याच्यानें जाववणार नाहीं; अर्थात् हा

योग घडणें दुरापास्त आहे, असेंही तीस वाटूं लागलें. असो. आलेल्या स्वारांनीं राणीसाहेबांस व **जगदेवास** मुजरा करून रजा घेतली, व राणी आपल्या मनाशीं पुढील कार्यभाग कसा शेंवटास जाईल याचा विचार करीत बसली. **जगदेवानें** बापानें दिलेली तरवार म्यानांतून बाहेर काढून ती नीट न्याहाळून पाहिली, व त्या भव्य सारंग्या घोड्यावरून हात फिरवून 'ह्या घोड्याच्या साह्यानें मला प्रवासाचें काम किती तरी सुलभ होईल' असें तो ह्मणाला. सायंकाळीं भोजनोत्तर उभयतां मातापुत्र निद्रिस्त झालीं.

## प्रकरण ४ थें.

## लग्नसमारंभ.

स्त्रियांचे अंगीं परमेश्वरानें असे कांहीं गुण ठेविले आहेत कीं, त्यायोगें पुरुषावर त्या आपला पाहिजे तसा पगडा बसवूं शकतात. त्यांच्या नेत्रकटाक्षांत एकदाका मनुष्य सांपडला ह्मणजे तो अक्कलशून्य झाल्यावांचून राहत नाहीं. **विश्वामित्रा**सारखा महान् तपस्वी, पण तो **मेनके**च्या नेत्रकटाक्षांत सांपडतांच त्यास तिच्यामागें कुत्रें होऊन जावें लागलें!! सारांश, स्त्रीपाशांत सांपडला नाहीं असा **शुका**सारखा पुरुष हल्लींच्या काळांत तर सांपडणें कठीणच; पण ज्यावर स्त्रीचा पगडा बसला नाहीं असे पु-

रुप सुद्धां फारच कमी. स्त्रियांचा पगडा आपणावर ब-सवून घेणें अथवा आपला पगडा त्यांजवर बसविणें हें आपल्या स्वाधीन आहे. स्त्री जात्या सुशील असली तर तिजपासून कोणत्याही स्थितींत सुखच होतें; पण ती जर मत्सरी, मानी व विचारशून्य असली, व तशा स्थितींत तिच्या धोरणानें पुरुष वागूं लागला, तर त्याच्या संसाराची माती झाल्यावांचून राहत नाहीं; व त्यास खऱ्या सुखाचा लवलेशही मिळत नाहीं. ह्मणून व्यवहारांत पुरुषांनीं आपल्या स्त्रीची खरी परीक्षा केल्यावांचून तिच्या अंकित होऊं नये, आणि होतां होईल तोंपर्यंत त्यांस आपल्या दाबांत ठेवून सुमार्गाचें वळण लावून देण्यास झटत जावें. असो.

मागील भागांत सांगितल्याप्रमाणें **धीरसिंहानें** आ-पल्या पत्नीस **वाघेली** राणीची समजूत घालून तिचें मन वळविण्याकरितां पाठविलें. **वाघेली** राणी जरी मनापा-सून **जगदेवा**चा द्वेष करीत असे, तरी लोकांनीं आप-ल्यास चांगलें ह्मणावें अशी तिची नेहमीं इच्छा असे; त्यामुळें तिला आपला दुष्ट हेतु एकदम शेवटास नेववत नसे. **जगदेव** दरबारांत आला होता, त्याला महारा-जांनीं उत्तम पोशाख दिला, वर्षासन बांधून दिलें, आणि त्याच्या लग्नाचा बेत ठरला, ही हकीकत तिच्या हेरानें तिला लागलीच कळविली होती, व ती ऐकल्यापासून तिच्या हा-तांपायांची अगदीं आग भडकून गेली होती. **जगदेवाचा** कधीं सूड घेईन, असें तिला झालें होतें. तथापि **धीर सिंहाचें** कुटुंब आपल्याकडे समजूत घालण्याकरितां ये

णार आहे व ती बाई फार चाणाक्ष आहे, हें तिला माहित असल्यामुळें तिनें त्या वेळचा आपला क्रोधाग्नि होईल तितका दाबून धरण्याचा प्रयत्न चालविला होता. **धीरसिंहाचे** स्त्रीचें नांव **रूपवती** होतें. तिचें जनन थोर कुळांतील असून ती वयानें पोक्त व स्वभावानें सच्छील असल्यामुळें, तसेंच राजघराण्याशीं तिच्या आईबापाचें श्रेष्ठपणाचें नातें असल्यानें, राज्यांतील सर्व लोक तिला पुष्कळ मान देत असत. **वाघेली** राणीही तिला फार वचकून असे. नवऱ्याच्या आज्ञेप्रमाणें **रूपवती वाघेली** राणीकडे गेली, त्या वेळीं राणी आपल्या रंगमहालांत विचारांत निमग्न झालेली होती. **रूपवती**बाई आल्याचें वर्तमान दासीनें सांगतांच ती चटकन उठून उभी राहिली, आणि सामोरें जाऊन तिला तिनें आपल्या रंगमहालांतील लोडाशीं आणून बसविलें. थोडावेळ इकडच्या तिकडच्या गोष्टी झाल्यानंतर **रूपवती**बाईनें हळूच **जगदेवा**च्या लग्नाची गोष्ट काढली. ती ह्मणाली–' राणीसाहेब, हल्लीं एक योग फार चांगला जमून आला आहे; व तो जर तुह्मीं विचारानें शेंवटास नेला, तर तुमच्या दुस्मानांचीं तोंडें काळीं होऊन लोक तुमची कीर्ति गाणार आहेत. तुमची इच्छा असल्यास सांगतें.'

**रूपवती**बाईचें इतकें भाषण ऐकतांच ती पुढें काय बोलणार हें **वाघेली** राणीनें तेव्हांच ताडलें. तिला सर्व हकीकत पूर्वीच समजली होती, तरी तिनें तसें न दाखवितां वेड्याचें मिष घेतलें. ती ह्मणाली–' **रूपवती**बाई, मी आपल्या विचाराबाहेर कधीं तरी गेलें आहें काय ?

त्यांतून आपण मला कधीं खोटा सल्ला देणार 'नाहीं अशी माझी खातरी आहे. काय असेल तें सांगा.'

**रूपवती**–हें पहा राणीजी, **सोळंकी**राणीजीस व **जगदेवास** महाराजांनीं तनखा तोडून देऊन शहराबाहेर ठेवल्यापासून कित्येक लोकांनीं आपल्या नांवाचा विनाकारण गिल्ला केला आहे. यांत वास्तविक आपला कांहीं तरी संबंध आहे काय? परंतु लोकांच्या तोंडास कोणी हात लावावा? मला तर असं वाटतं कीं, **रणधवल**पेक्षांही तुह्मी **जगदेवा**वर जास्त प्रीति करीत असाल, पण तें लोकांच्या नजरेस येत नाहीं. हल्लीं मात्र लोकांचे डोळे थंडे करण्यासारखा योग आला आहे. **टुकटोड्या**च्या राजाकडून आजच सांडणीस्वार लखोटा घेऊन आला आहे. त्यांत **वीरमतीनें जगदेवास** पसंत केलें आहे, व लग्नसमारंभ येत्या मार्गशीर्ष मासांत करणें आहे, तरी ही गोष्ट आपण कबूल करावी–अशा प्रकारचा मजकूर आहे. ऐश्वर्यसंपन्न आपल्या **रणधवलास** सोडून **जगदेवास**च तिनें पसंत केलें, यांत कांहीं तरी कपट झालें असावें. कांहींही होवो, परंतु **रणधवला**पूर्वी **जगदेवाचें** आपण लग्न केलें, ह्मणजे लोकांचा वाईट समज दूर होऊन तुमच्या दुस्मानांचीं तोंडें काळीं होण्यास वेळ लागणार नाहीं; व असें झालें, तर तुमच्या मनाच्या मोठेपणाबद्दल चोंहीकडे वाहवा होणार आहे. ह्मणून ह्मणतें, हा आलेला योग तुह्मी होऊन शेवटास नेला पाहिजे. वडील पुत्राचें लग्न केल्यावांचून **जगदेवाचें** लग्न प्रथम करण्याचे बाबतींत कदाचित् महाराज आढेवेढे घेतील, व त्यांस ही गोष्ट

कदाचित् पसंतही वाटणार नाहीं. तथापि त्यांचें मन तुम्हीं वळविलें पाहिजे. तुमचा शब्द ते कधीं मोडणार नाहींत. मग कसा काय तुमचा विचार आहे तो कळूं द्या.'

लोकांकडून बरें म्हणून घेण्याकरितां **वाघेली** राणीस जरी **रूपवती**च्या म्हणण्याप्रमाणें करणें पसंत वाटलें, तरी **जगदेवा**चें लग्न आपल्या मुलाच्या लग्नापूर्वी करणें, त्यांतून जी नवरी आपल्या मुलास मिळावी अशी उत्कट इच्छा होती, व जी मिळण्याबद्दल आपण विशेष प्रयत्न केले होते, तीच नवरी आपल्या सवतीच्या मुलास मिळणार, याबद्दल तिला अतोनात वाईट वाटलें. पण करते काय? तिचे सर्व प्रयत्न निष्फळ झाले होते. तेव्हां शेंवटीं हा यश मिळविण्याचा योग घालवून आपल्या कारस्थानास तूर्तच लोकापवादाची भर घालण्यापेक्षां **रूपवती**च्या म्हणण्याप्रमाणें वागून मिळेल तितका यशाचा वांटा मिळविणें बरें, असें तिच्या मनानें ठरविलें, व तिनें **रूपवती**-बाईजवळ तिच्या म्हणण्याप्रमाणें वागण्याचें कबूल केलें. व आणखी असें सांगितलें कीं,—'महाराजांनीं किती जरी आढेवेढे घेतले, तरी मी त्यांचें मन वळवून **जगदेवा**च्या लग्नाचा हा योग जुळवून आणीन. लोकं मेलीं विनाकारण माझ्या नांवानं खडे फोडतात, त्यांचे तरी डोळे उघडले पाहिजेत.'

राणीजीचें निश्चयाचें भाषण ऐकून **रूपवती**स समाधान वाटलें. तिनें राणीजवळून वचन घेऊन जाण्याचा निरोप घेतला, व झालेलें वर्तमान आपल्या पतीस निवेदन केलें. तें ऐकून **धीरसिंहा**सही आनंद झाला. तो तसाच उ-

ठला, आणि महाराजांकडे जाऊन झालेलें सर्व वर्तमान त्यानें महाराजांस सांगितलें, व राणीशीं कशा प्रकारें वागून आपला इष्ट हेतु शेंवटास न्यावयाचा तेंही सांगून ठेविलें.

रात्रौ भोजनोत्तर रंगमहालांत उभयतांची भेट झाली. महाराजांनीं होऊन **जगदेवा**च्या लग्नाची गोष्ट काढावी असें राणीच्या मनांत होतें; परंतु **धीरसिंहा**नें गुरुमंत्र दिला असल्यामुळें, महाराज ओंठाजवळ आलेली गोष्ट वरचेवर गिळून जात असत, व आपण त्या गांवचेच नव्हत असें दाखविण्याचा त्यांचा क्रम चालला होता. बराच वेळ निघून गेला. राणीनें दोन तीन वेळ आपल्या भाषणाचा ओघ महाराजांच्या तोंडून हकीकत बाहेर काढण्यासारखा आणला, पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. तेव्हां शेंवटीं तिनें होऊनच गोष्ट काढली. किंचित् रागाचा आवेश दाखवून ती ह्मणाली,—'आपण मजशीं कपटानें वागतां असें जें मीं ह्मणतें तें कांहीं खोटें नाहीं. आज कचेरींत केवढी मोठी नवलाची हकीकत घडली असून त्याबद्दलचें एक अक्षर तरी आपल्या तोंडून निघतें आहेका? बायकांची जात भेली भोळी, त्यांस पुरुषांचें कपटी वर्तन समजत नाहीं! त्या त्यांच्या भाषणावर तेव्हांच भरंवसा ठेवतात व फसतात.'

**राजा**—तूं ह्मणतेस अशी नवलाची हकीकत घडल्याचें मला कांहींच स्मरत नाहीं, व तशी एकादी घडली असती, तर मी तुला सांगितल्यावांचून कधींच राहिलों नसतों. तूंच सांगना, तुला अशी कोणती हकीकत समजली आहे ती?

राजाचे तोंडचे हे शब्द ऐकतांच कोणीं तरी त्यांचें मन भरविलें आहे, अशाबद्दल राणीची खातरी झाली. आपणासंबंधीं हा सर्व कपटव्यूह रचला आहे असें तिला वाटून तिचा क्रोधाग्नि जास्त भडकला, तथापि तिला पुढील एक महत्वाचा कार्यभाग साधून आपला इष्ट हेतु शेंवटास नेणें असल्यामुळें तिनें आपलें खरें स्वरूप ताबडतोब बदललें, व पुन्हा लडिवाळपणें पण किंचित् क्रोधयुक्त हास्यवदन करून ती म्हणाली–'आज **जगदेव** कचेरींत आला होता; त्यास आपण उत्तम पोशाख दिला; शिवाय त्यास हातखर्चास वर्षासन बांधून दिलें; आणि मार्गशीर्षांत त्याच्या लग्नाचा विचार ठरविला. इतक्या विशेष गोष्टी घडल्या असून मला आपण त्या सांगूं नयेत हें कपटी वर्तन नव्हे काय?'

**राजा—जगदेव** कचेरींत आला होता; त्याच्या अंगावर चांगले कपडे नसल्यामुळें लोक आपणासच नांवें ठेवणार ह्मणून त्यास पोशाख दिला, व साधारण चांगल्या इतमामानें राहतां यावें ह्मणून थोड्याशा खर्चाची व्यवस्था करून दिली, यांत विशेष तें काय झालें? **टुकटोड्या**हून सांडणीस्वार व ब्राह्मण असे आले होते, पण त्यांस जबाब दिला नाहीं. कारण **रणधवलाचें** लग्न झाल्याशिवाय **जगदेवाचें** लग्न आम्हांस कसें करतां येईल?

**राणी**—हो हो, किती तरी माझ्या **रणधवलवर** प्रीति! त्यावांचून आपणास कांहीं सुचत नाहीं! झांकली मूठ सवा लक्षाची; ती उघडी करण्यांत अर्थ नाहीं. कपटी मनुष्यास सर्व जग कपटी दिसतें असें जें ह्मणतात तें कांहीं खोटें नाहीं. कधींच नाहीं, व आज **जगदेवास** पोशाख दिला,

वर्षासन बांधून दिलें, लग्नाचा विचार ठरविला, तरी म्हणे—नवलाची हकीकत कांहीं नाहीं!—ठीक आहे. आपलें मन असें कां झालें तें मीं जाणलें आहे. त्याचें आज कांहीं प्रयोजन नाहीं. परंतु **रणधवला**चें लग्न झालें नाहीं, ह्मणून जुळून आलेलें **जगदेवा**चें लग्न कांहीं मागें टाकायला नको हो ?

**राजा**—तूं कांहीं म्हण, पण माझें मन तशा प्रकारचें मुळींच नाहीं. तूं शहाणी आहेस, तुला सर्व गोष्टी समजतात. **जगदेवा**पेक्षां **रणधवला**वरच मला जास्त प्रेम ठेवावें लागतें हें सर्व जाणत आहेत. **रणधवला**च्या लग्नापूर्वी **जगदेवा**चें लग्न करणें मला मुळींच पसंत नाहीं, आणि तुला ही हकीकत समजल्यास कदाचित् तूं आग्रह धरशील, व माझ्या मनाविरुद्ध मला वागण्याचा प्रसंग येईल, ह्मणूनच मुद्दाम ती मीं तुला सांगितली नव्हती. अशा प्रकाराला तूं कपट ह्मणत असशील तर निरुपाय आहे.

राजाचें हें भाषण जरी वरकांती होतें, तरी त्यापासून राणीस बराच आनंद झाला. तथापि तिला त्या प्रसंगीं लोकांत बरें ह्मणून घेऊन आपला कार्यभाग साधावयाचा होता; व **रूपवतीस** दिलेलें वचन खरें करण्याकरितां **जगदेवा**चा लग्नाचा बेत शेंवटास न्यावयाचा होता; ह्मणून झालेला आनंद दाबून ठेवून ती म्हणाली—' हो, आपलें प्रेम तसेंच आहे हें मला माहीत आहे. कांहींही असो, पण **जगदेवा**चें लग्न मार्गशीर्ष मासांत झालेंच पाहिजे. मी आपलें म्हणणें कधीं ऐकणार नाहीं. लोकं मेलीं माझ्या नांवानं खडे फोडतात कीं मीं सवतीच्या मुलाची दुर्दशा

केली ! त्या मेल्यांचीं तोंडें काळीं झालींच पाहिजेत. तुम्हीं त्या सांडणीस्वारास—मार्गशीर्ष मासांत आम्ही सर्व तयारीनिशीं लग्नास येतों—असें पत्र देऊन उद्यांचे उद्या पाठवा. मी उद्या मनुष्यें पाठवून बाईस व **जगदेवास** राजमहालांत आणवितें, व लग्नसाहित्याच्या तयारीस लागतें. आपल्या नांवालौकिकाप्रमाणें लग्नाचा थाट उत्तम झाला पाहिजे. माझा निश्चय झाला. आपण आढेवेढे घेऊं नका. **रणधवलाचें** लग्न चांगलीशी राजकन्या पाहून पुढील वर्षी यापेक्षांही उत्तम थाटानें करा ह्मणजे झालें.

राजाच्या मनांत होतें तसाच योग घडून आल्यामुळें त्यास अतोनात आनंद झाला. तथापि त्यानें तो स्पष्ट दिसूं न देतां मोठ्या कष्टानें तिच्या ह्मणण्यास रुकार दिल्यासारखें दाखविलें. **वाघेली** राणीनें दुसरे दिवशीं शिपाई प्यादे व दासदासींसह **सोळंकी** राणीस बुरख्याचा रथ पाठवून तिला व **जगदेवास** राजवाड्यांत आणविलें. मनांतून जरी नव्हतें, तरी लोकापवादाकरितां ती वरून **सोळंकी** राणीशीं गोडगोड बोलूं लागली, व **जगदेवा**वरही तिनें आपल्या कपटी प्रेमाचें जाळें पसरलें. हें इचें सर्व कपटी प्रेम आहे, हें **सोळंकी** राणी जाणून होती, तथापि आपल्या मुलाच्या कार्यांत विघ्न येऊं नये ह्मणून तीही—' घोरपड बाई तुझी पाठ मऊ ' या म्हणीप्रमाणें **वाघेली** राणीशीं प्रेमानें वागूं लागली.

महाराजांनीं दुसरे दिवशीं दरबार भरवून **टुकटोड्या**हून आलेल्या उपाध्यास व सांडणीस्वारास पोशाख दिले. आणि—' आम्ही आपल्या ह्मणण्याप्रमाणें लग्नास तयार

आहोंत, व सर्व तयारीनिशीं हजर होतों. वर व वधूस शुद्ध पंचमीची तिथि चंद्रबळासह चांगली लाभते. आम्ही शुद्ध प्रतिपदेस तेथें हजर होऊं.'—अशा प्रकारें पत्र लिहून तें सांडणीस्वाराचे स्वाधीन केलें, व लागलेंच **धीरसिंह** सरदारास जवळ बोलावून—पुढील व्यवस्था करण्याकरितां आणि आयते वेळीं मानपानसंबंधीं तंटाभांडण न व्हावें म्हणून वधूपक्षाकडील मंडळीनें कसें वागावें, वरमाईचा मान देते प्रसंगीं **वाघेली** राणीची मर्जी सुप्रसन्न राहील याबद्दल कशी दक्षता ठेवावी, सारांश, आयतेवेळीं तंटाभांडण न होईल व आपलें गृहछिद्र उघडें न पडेल अशा प्रकारची खबरदारी ठेवण्याबद्दल सांगून—त्यास कांहीं निवडक मंडळीनिशीं पूर्व व्यवस्थेकरितां **टुकटोड्यास** जाण्याची आज्ञा केली.

**वीरज** राजास **उदयादित्य** राजाकडील लखोटा पोंचतांच त्यानें लगेच उलट जबाब पाठविला कीं—शुद्ध पंचमीची तिथी आम्हांस पसंत आहे. आम्हीं सर्व प्रकारची तयारी करितों. आपण प्रतिपदेस जरूर यावें—असा जबाब पाठवून लग्नाची तयारी जारीनें सुरू केली. वरपक्षाकडील मंडळीस उतरण्याकरितां शहराबाहेरील मोतीबागेंतील बंगला शृंगारण्याची धामधूम चालविली. वऱ्हाडी मंडळीकरितां सरकारी इमारती रिकाम्या करून रंगरोगणानें सुशोभित केल्या. ज्या ज्या मार्गानें वरघोडा जावयाचा तो रस्ता—कित्येक घरें घरधन्याजवळून विकत घेऊन तीं पाडून—भव्य केला. रोपनाई अशी करावयाची, वरघोडा असा निघाला पाहिजे, हत्ती, घोडे वगैरे लवाजमा अमुक पद्ध-

तीनें असला पाहिजे, वराकडील मंडळीची बरदास्त एकंदर प्रकारें कशी उत्तम ठेविली पाहिजे, वगैरे बाबतींचे पूर्वलेख व व्यवस्था करण्याबद्दल दिवाणजींची व खासगी कारभाऱ्यांची एकच धांदल उडून गेली. **उदयादित्य** राजाची **वीरमती** ही एकुलती एक बहीण; तिच्या वडिलांचे वृद्धापकाळचें हें शेवटलेंच कार्य; त्यांतून घरांतील सर्व मंडळीचें तिजवर असलेलें अतोनात प्रेम; इत्यादि कारणांमुळें तिच्या लग्नासंबंधीं सर्वांसच उत्साह वाटणें साहजिक होतें.

क्षत्रियरिवाजाप्रमाणें ह्या प्रसंगीं **वीरमती**चें वय ऐन ज्वानींत आलें होतें. तिच्या वयाला नुकतेंच १६ वें वर्ष बसलें होतें. क्षत्रियांच्या मुलींप्रमाणें तिला सर्व प्रकारचें शिक्षण मिळालेलें होतें. हल्लींच्या सुशिक्षित स्त्रियांप्रमाणें तिला जरी व्याकरण, भुगोल, इतिहास वगैरेचें शिक्षण मिळालेलें नव्हतें; तरी उत्तम लिहितां वाचतां येत असून, जरूरीपुरतें गणितही येत होतें. याशिवाय घोडयावर बसणें, दांडपट्टा, भाला, निशाण मारणें, वगैरे शिक्षण तिला चांगलें मिळालें होतें. तसेंच कशिदा, चित्रकला, नृत्य, गायन यांतही ती चांगली निष्णात होती. याशिवाय सर्वांत विशेष जें नीतिशिक्षण व धर्मशिक्षण, तें तर तिच्या हृत्पटलावर पूर्णपणें ठसलेलें होतें. सारांश. रूप, शौर्य व गुण या तिन्ही गुणांनीं आमची नायिका परिपूर्ण होती, व त्यामुळेंच ती सर्वांस सारखी प्रिय होती.

आपण आतां गृहिणी होणार; पिताबंधूंची सेवा सुटून आतां आपणास सासू, श्वशुर व पति यांची सेवा करावी

लागणार; त्यांची मर्जी प्रसन्न राहण्याकरितां आपण कसें वर्तन ठेवलें पाहिजे, त्यांस कोणत्या गोष्टी आवडतात व कोणत्या आवडत नसतील; अशाप्रकारचे विचार एव्हांपासूनच **वीरमती**च्या मनांत घोळूं लागले. ही अशी विचारांत बसलेली पाहिली कीं, तिच्या मैत्रिणी तिला शृंगारिक टोले टोपणे देऊन बोलत असत. एकीनें ह्मणावें—'बाई, इतक्या चिंतातुर कां होतां? **जगदेव** महाराजांच्या आलिंगनानें आपला कंठ लवकरच मंडित होईल.' दुसरीनें ह्मणावें—'छे ग, तसें नाहीं. आपला वियोग होणार ह्मणून त्यांस वाईट वाटत असेल.' तिसरीनें ह्मणावें—'ताईसाहेबांची सावत्र सासू फार वरचढ आहे असें ह्मणतात, तेव्हां त्याबद्दलची त्यांस आतांपासूनच काळजी पडली असावी.'—अशा प्रकारें आमच्या नायिकेस तिच्या मैत्रिणी वेगवेगळ्या प्रकारें टोंचून विनोद करीत. **वीरमती** त्यांचें बोलणें नुसतें ऐकून घेई व फार तर—'बोला बायांनो, तुह्मास अशी संधि पुन्हां कधीं मिळणार आहे?'—असें उत्तर देऊन ती आपले मनांतील विचार आंवरून धरी, आणि त्यांच्यांत मिसळे.

लग्नतिथि जवळ येऊन ठेपली. वरपक्षाकडील वऱ्हाडीमंडळ येऊं लागलें. गांवोगांवचे राजे रजवाडे व सरदार वगैरे मंडळी आपापल्या लवाजम्यासह येऊन दाखल झाली. सर्व शहर आणि त्याचा आसमंत भाग गाड्या, घोडीं, हत्ती, उंट, इत्यादिकांनीं अति गजबजून गेला. दक्षणेच्या आशेनें गांवोगांवच्या भिक्षुकमंडळीच्या झुंडीच्या झुंडी लोटल्या; कलावंतिणींचे ताफे, भांडांचे तमाशे, कोल्हाट्यांचे खेळ, वगैरे अनेक

प्रकारचे करमणुकीचे आखाडे येऊन दाखल झाले. शुद्ध द्वितीयेचे दिवशीं वरराजांचा प्रवेशाचा मुहूर्त होता, ह्मणून त्या दिवशीं त्यांस सामोरें जाऊन थाटानें आणण्याची एकच गर्दी उडाली होती. पायदळ, घोडेस्वार, डंका, निशाण, वाजेगाजे, शृंगारलेले हत्ती, अशा लवाजम्यासह **वीरज** राजाची स्वारी सामोरी निघाली. गांवाबाहेर एक मोठा तंबू ठोकला होता तेथें वराकडील मंडळीस अत्तरगुलाब वगैरे देऊन नवरदेवास भरगच्ची पोशाख देण्यांत आला. नंतर शृंगारलेल्या हत्तीवरील अंबारींत त्यांस बसवून एकंदर लवाजम्यासह हा वरघोडा गांवांत यावयास निघाला. नवरदेवाच्या हत्तीमागून **वीरज**राजा व इतर गांवोगांवचे आलेले राजे रजवाडे, सरदार, शेटसावकार आदिमंडळी चालत होती. वरघोड्याचा थाट पाहण्याकरितां रस्त्यांतून, घरांच्या माड्यांतून व छपरांवरून स्त्रिया व पुरुष मुंग्यांप्रमाणें बसलेले दिसत होते. **जगदेवा**चा तो मोहक व रमणीय चेहरा पाहून, खिडकीच्या झरोक्यांतून हळूच वांकड्या दृष्टीनें पहात असलेल्या कित्येक तरुण युवति सलज्ज होऊन खालीं माना घालूं लागल्या. वृद्ध स्त्रिया बसल्या ठिकाणावरूनच लिंबलोण करून 'हा महादेवपार्वतीचा जोडा दीर्घायु होवो.' असा आशीर्वाद देऊं लागल्या. अशा थाटानें वाजत गाजत हा वरघोडा मोतीबागेच्या बंगल्यांत येऊन दाखल झाला.

पंचमीचे दिवशीं क्षात्र रिवाजाप्रमाणें नवरानवरीस हळद लागून गोरज मुहूर्तावर वरवधूवर अक्षता पडल्या, आणि त्याच रात्रीस साडे वगैरे होऊन वरात निघाली. कन्यादा-

नाचे प्रसंगीं **वीरज** राजानें आपल्या शक्तीप्रमाणें लाखों-रुपयांचें जड जवाहीर, हत्ती, घोडे, पालखी वगैरे व शिवाय पांच गांव आंदण दिले होते. सारखा चार दिवस-पर्यंत दानधर्म होत होता. ब्राह्मणभोजनाची तर चंगळ उडाली होती. अतीत अभ्यागत, गोरगरीब, यांस तर सारखें मुक्तद्वार ठेवलें होतें. रोषनाई तर इतकी केली होती कीं, चार दिवसपर्यंत सर्व शहर पेटलें आहे कीं काय असें वाटत होतें. सारांश, हे लग्नाचे चार दिवस **टुकटोड्यां**तील लोकांस इतके आनंदांत गेले कीं, तसे आनंदाचे दिवस त्यांस पूर्वीं कधींच गेले नव्हते. रोज रात्रौ लग्नमंडपांत रोषनाई, आतसबाजी, नाच, तमाशे, गायन वगैरे प्रकार चालत असतच; परंतु त्यांशिवाय शहरांतही जागोजाग मोठमोठाले मंडप उभे केले होते, व त्याठिकाणीं गांवो-गांवाहून आलेल्या लोकांकरितां नाच, तमाशे वगैरे वेगवेगळ्या प्रकारचे खेळ अहोरात्र होत असत. वराकडील एकंदर मंडळीस **वीरजराजानें** त्यांच्या मानपानाप्रमाणें चढते उतरते पोशाख आणि एकंदर वऱ्हाडणींस चोळ्या, लुगडीं वगैरे देऊन कोणासही कुरकुर करण्यास जागा ठेवली नव्हती. विशेषतः वरमाईचा मान ठेवण्यांत त्यांनीं इतकी दक्षता ठेविली होती कीं, **सोळंकी**राणीस तर नाहींच, पण **वाघेली** राणीस रुसण्यासारखी अथवा सावत्रपणा दाखवि-ण्यासारखी थोडीशी ही चूक वधूपक्षाकडून होऊं दिली नाहीं. **वाघेली** राणीचा मानी स्वभाव व तिचा सवतमत्सर-भाव माहीत असल्यामुळें, भांडणतंटा होण्याची व आय-ते वेळीं भलतेंच संकट ओढवण्याचीही दोन्ही पक्षांकडील

मंडळीस पुष्कळ भीति होती; परंतु शेंवटपर्यंत दोन्ही पक्षांकडील मंडळी तिची पदोपदीं स्तुति करण्यांत व तिचा मान ठेवण्यांत चांगली तत्पर राहिल्यामुळें त्या भरांत तिला मजसारखी कोणीच धन्य नाहीं असें वाटूं लागलें होतें. तथापि तिच्या हृदयांतील मत्सराग्नि कमी झाला नव्हता; व तो **वीरमतीस** प्रत्यक्ष पाहिल्यानंतर तर अधिक भडकला होता; तथापि तिनें तो त्या प्रसंगीं बाहेर दिसूं दिला नाहीं.

असो; याप्रमाणें सर्व लग्नविधी आटपल्यावर वरराज वधूसह आपल्या राजधानीस एकंदर लवाजम्यासह आले. राजे रजवाडे आपापल्या देशीं निघून गेले. वधूबरोबर वधूचा मामा आला होता, त्यानें १६ दिवस **धारा**नगरींत मुक्काम करून **वीरमतीस** घेऊन तो परत आपल्या राजधानीस ( **टुकटोड्यास** ) निघून गेला. **उदयादित्य** राजानें वधूबरोबर आलेल्या मंडळीस परत जातेवेळीं बहुमोलाचे पोशाख नजर केले, आणि परत पोंचविण्याकरितां आपल्या लष्करांतील एक तुकडी देऊन **जवानसिंह** सरदारास बरोबर पाठविलें.

## प्रकरण ५ वें.

## सवतीमत्सराचा प्रभाव.

मनुष्यस्वभावच असा कांहीं चमत्कारिक आहे कीं, त्याचे मनानें एक वेळ जी गोष्ट घेतलेली असते, तिला कांहीं कारणानें मध्यंतरीं जरी वेगळें वळण मिळालें, तरी

ती समूळ नाहींशी होत नाहीं. पुरुषाच्या मनाची स्थिति एकादवेळ फिरण्याचा संभव असतो; परंतु स्त्रियांची गोष्ट अगदीं स्वतंत्र असते. त्यांच्या मनांत जी गोष्ट एक वेळ भरलेली असते ती कांहीं केल्या दूर होत नाहीं. त्यांतून जेथें सवतीमत्सरपणासारखा नाजुक प्रसंग असतो, तेथें तर त्याचें नांवच नको. स्त्रियांस इतर हवीं तितकीं संकटें आलीं, प्रसंगीं पोटास पुरेसें अन्न व अंगास अंगभर वस्त्र न मिळालें, तरी त्याबद्दल त्यांस तितकें वाईट वाटत नाहीं. परंतु एकाद्या कामांत सवतीचा वरचढपणा झाला, तर त्यांच्या तळपायाची आग मस्तकास जाऊन पोंचते. 'तिचा केव्हां पाडाव करीन' या मंत्राचा तिच्या हृदयांत रात्रंदिवस जप चाललेला असतो. याच्या उलट वर्तनाच्याही जगांत स्त्रिया असतात; पण त्या फारच थोड्या. ही गोष्ट साधारण स्त्रियांची झाली. मग जी जन्मतांच मानी स्वभावाची, मत्सर व अहंकारानें जिच्या मनावर आपला पूर्ण पगडा बसविलेला, जिच्या स्वाधीन राजसत्तेचें मूळ असून जिनें आपल्या पतीस सर्वस्वी अंकित केलेलें, अशा राणीस आपल्या साह्यानेंच कां होईना, पण आपल्या सवतीचा झालेला वरचढपणा कसा सहन होणार? **वीरमती**सारखी रूपगुणसंपन्न मुलगी अगणित संपत्तीसह आपल्या मुलास न मिळतां आपल्या सवतीच्या मुलास मिळाली, आणि पुढें-मागें **वीरजराजास** संतति नसल्यामुळें **टुकटोड्याचें** राज्य-सूत्रही मिळण्याचा संभव, व असें झालें ह्मणजे जरी महाराजांकडून सवतीस तिच्या मुलासह हांकून लावविलें तरी तिचा आपणावर वरचढपणा झाल्यावांचून रहाणार नाहीं,

अशा प्रकारचे एकामागून एक कुत्सित विचार **वाघेली** राणीच्या मनांत येऊं लागले.—'लोकांत बरेंपणा मिळविण्याकरितां मी या गोष्टीस अनुकूळ झालें, पण आतां तीच गोष्ट मला जन्माची दुःखदात्री झाली आहे. मी थोडासा हट्ट धरला असता तर असा प्रसंग कधीं न येता; इतकेंच नाहीं, पण थोडासा जोर दाखविला असता, तर **वीरमतीस रणधवला**लाच वरणें भाग पाडलें असतें, व तसें ती न करती, तर तिच्या भावावर स्वारी करवून तिला हरप्रयत्नें तसें करणें भाग पडलें असतें. पण काय करावें? माझ्या बुद्धीस कसा भ्रंश झाला, कांहीं समजत नाहीं!'—अशा अनेक प्रकारच्या विचारतरंगानें **वाघेली** राणीचें मन अस्वस्थ होऊन गेलें, व तिला खाणेंपिणें, ऐषआराम कांहींच आवडेनासें झालें.

एकंदर लग्नविधि आटोपला; **टुकटोड्याहून** वधूबरोबर आलेली मंडळी वधूस घेऊन परत आपल्या देशीं निघून गेली; पण **सोळंकी** राणीस पूर्ववत् शहराबाहेरील खेडेगांवांतील झोंपड्यांत न पाठवितां शहरांतील राजवाड्यांतच ठेवून घेतलें होतें. आणि **वाघेली** राणीप्रमाणें तिच्या तैनातींत थोडे दासदासी देऊन मानमरातब ठेवण्याची विशेष व्यवस्था केली होती. या योगानें वर्षोनवर्ष न होणारें पतिदर्शन तिला दोन चार दिवसांनीं तरी होण्याचा योग घडूं लागला. आपले नष्ट दिवस जाऊन आतां आपणास चांगले दिवस आले असें **सोळंकी** राणीस वाटून ती आनंद मानूं लागली. तथापि सवतीचे मनांत आपणाविषयीं मत्सर उत्पन्न झाल्यास कदाचित् पुन्हां आपणास शहराबा-

हेर जाऊन राहण्याचा प्रसंग येईल ह्मणून ती फार भिऊन लागत असे.

राजवाड्यांतच राहणें झाल्यानें **जगदेवास** वरचेवर दरबारांत जाण्याचा योग घडूं लागला. पदोपदीं त्याचें चातुर्य लोकांच्या दृष्टीस पडूं लागलें. शिकारीस जाणें, आपल्या गरीब प्रजेचें गाऱ्हाणें ऐकणें, एकाद्या महत्वाच्या विषयांत वादविवाद करणें, वगैरे गोष्टी त्यास फार आवडत असत; व त्यामुळें त्याजवर लोकांचें प्रेम अधिकाधिक बसत चाललें. **रणधवलास** यापैकीं कोणताही विषय आवडत नसे. जन्मापासूनच त्याजवर वेड्याची छाया पडली होती. तो आपल्या आईप्रमाणेंच गोरापान असून नाकाडोळ्यानेंही तरतरीत होता, तथापि चांगल्या गुणाचा त्याच्या अंगीं लवलेशही नव्हता. विद्याभ्यासाबद्दल महाराजांनीं व राणीनें आपले होते नव्हते तेवढे सर्व प्रयत्न केले होते; पण त्याच्या मठ्ठ मेंदूंत त्याचा किंचित्‌ही प्रवेश झाला नव्हता. सारा दिवस खेळगड्यांत हुतूतू घालणें, त-त-त-प-प-प-बोलत कोणाच्या अंगावर थुंकणें, कांहीं विचारलें असतां भलतेंच उत्तर देणें, अशा प्रकारच्या वेडेचारांशिवाय त्यास दुसरा विषय माहीत नव्हता. स्वारीचें वय २१ वर्षांचें झालें होतें तरी त्यास दुसऱ्या मनुष्यानें भरवावें लागत असे. **वाघेली** राणीच्या कडकडीत स्वभावामुळें, दरबारची मंडळी जरी त्यास युवराजाप्रमाणें मान देत असे, तथापि **जगदेवा**वर सर्वांचें विशेष प्रेम असल्यामुळें पदोपदीं त्याचा सत्कार लोकांकडून स्वाभाविकपणें अधिक होत असे; आणि अशा

गोष्टी **वाघेली** राणीच्या कानावर तिच्या हेरांकडून जों जों येत तों तों तिचा संताप अधिक होत असे.

**जगदेव** स्वतः फार धूर्त व शहाणा होता. तशांतून वरचेवर **सोळंकी** राणीकडून त्यास शिकवणीच्या गोष्टींचा उपदेश होत असल्यामुळें, तो सावत्रमाता **वाघेली** राणीशीं फार नम्रपणानें वागत असे. तिच्या मनांत आपणाविषयीं नेहमीं प्रेम रहावें ह्मणून वरचेवर भेटीस जाई; तिजजवळ नम्रपणानें वसें; लडिवाळपणानें वागून तिची मर्जी प्रसन्न ठेवी; व **रणधवला**सही वडील बंधूप्रमाणें पदोपदीं मान देई. परंतु या एकंदर गोष्टीपासून **वाघेली** राणीस समाधान न होतां उलट अधिक संताप होत असे. त्यास असें राजवाड्यांत राहूं दिलें तर पुढें मागें तो खचित् गादीचा मालक होईल आणि मग आपणास आपल्या सवतीचें दास्य करावें लागेल, वगैरे विचार तिच्या मनांत रात्रंदिवस घोळत असत, व ह्या तिच्या विचारांस तिच्या दासींपैकीं आवडत्या **कमळा** नांवाच्या दासीकडून वरचेवर भर मिळत असे.

ह्या दासीकडे **वाघेली** राणीनें हेराचें काम सोंपलेलें होतें. **सोळंकी**राणी व **जगदेव** यांजसंबंधीं थोडीशी गोष्ट असली, तरी तिला मीठमिरची लावून बनवून सांगण्यांत तिचा हातखंडा असे; व त्यामुळें **वाघेली** राणीची तिच्यावर इतकी प्रीति बसली होती कीं, कोणतीही व कशीही नाजूक अथवा महत्वाची गोष्ट असली, तरी तींत ती तिचा सल्ला घेत असे; व **कमळा** सांगेल तें प्रमाण असें झालें होतें. त्यामुळें दरबारचे लोक खुद्द राणीपेक्षांही **कमळे**स फार भीत असत. ज्यावर **कमळे**ची मर्जी प्रसन्न, त्यास

हरप्रयत्नानें बहुडती, इनाम हें मिळावयाचेंच; व तो कसाही असला तरी चांगला ठरावयाचा. यायोगें लबाड व लुच्चे लोकांस चांगलें फावलें होतें. समजदार मंडळीच्या कानांवर ह्या गोष्टी येत असत, परंतु जो तो पोटाचा मारलेला असल्यामुळें राजाजवळ सांगण्यास कोणी धजत नसे. राजा **वाघेली** राणीचा इतका कांहीं अंकित झालेला होता कीं, ती सांगेल तसें वागणें त्यास भाग पडत असे. त्यामुळें **वाघेली** राणीविरुद्ध कोणतीही गोष्ट राजाच्या कानावर घालणें मोठें जोखमेचें होऊन पडलें होतें.

दिवसेंदिवस जों जों **जगदेवा**चा मान वाढत चालला, तों तों **वाघेली** राणीची काळजी दुणावत चालली. **जगदेवा**चा पाय येथून कसा निघेल, त्याजवर बसलेली महाराजांची व लोकांची प्रीति कशी नष्ट होईल, राज्याधिकारांत त्याचा शिरकाव न होण्यास काय काय उपाय योजिले पाहिजेत, अशाबद्दलचे विचारतरंग तिच्या मनांत एकसारखे उसळ्या घेऊं लागले. तिला अहोरात्र चैन पडेनासें झालें. शेंवटीं तिनें,—आपलें हृद्गत **कमळे**जवळ सांगावें ह्मणजे ती कांहींतरी योग्य सल्ला देईल—असें ठरविलें; व एके दिवशीं **कमळे**स एकांतांत घेऊन तिला आपला हेतु कळविला. **कमळा** बोलून चालून हलक्या कुळांतील; तेंव्हां तिचे विचार किती पोक्त असणार? तिनें आपल्या बुद्धीप्रमाणें राणीस लागलीच सल्ला दिली. ती ह्मणाली—'यांतहो कठीण काय आहे? महाराजांच्या मनांत **जगदेवा**विषयीं अशी कांहीं वाईट कल्पना भरून द्यावी कीं, जेणेंकरून त्याच्याविषयीं महाराजांच्या मनांत तिरस्कार उत्पन्न होऊन

ते लागलेच त्यास हद्दपार करतील. असें झालें ह्मणजे आपणाबद्दल लोकांत कांहींएक संशय न येतां, सुंठीवाचून खोकला नाहींसा होईल.'

कमळेच्या तोंडचे हे शब्द ऐकून राणी मोठ्या उत्सुकतेनें ह्मणाली–'महाराजांच्या मनांत अशी कोणती कल्पना भरवावी कीं, ते असें करतील? सांग पाहूं तूं० कोणती कल्पना शोधून काढली आहेस ती?'

**कमळा**–(थोडासा विचार करून) हें पहा, जगांत कनक व कांता ह्यांसारखी प्रळय करणारी दुसरी कोणतीच वस्तु नाहीं. त्याचाच थोडा युक्तीनें उपाय केला ह्मणजे झालें.

**राणी**–तुझें हें संदिग्ध बोलणें मला बरोबर समजत नाहीं. कनक व कांता यांचा उपयोग येथें कसा करावयाचा तें मला उघड सांग!

**कमळा**–इतकें उघड करून सांगितलें असतां आपल्या लक्षांत येत नाहीं? बरें असो. हें पहा, आपलें रसरशीत तारुण्य व मोहक स्वरूप यांस महाराज इतके लुब्ध झाले आहेत कीं, आपणावांचून त्यांस क्षणभरसुद्धां चैन पडत नाहीं, व ते आपणास नेहमीं जिवापेक्षांही अधिक प्रिय मानतात, ही गोष्ट खरी आहेना? तेव्हां अशा आपल्या आवडत्या वस्तूचा कोणीं अभिलाष केल्यास तो त्यांस पसंत पडेल काय? कधींच नाहीं. झालें तर मग. **जगदेव** आपणावर अशी वाईट नजर ठेवतो ही गोष्ट युक्तीनें महाराजांच्या मनांत भरवून दिली, ह्मणजे तो कितीही

आवडता असला, तरी त्यावर इतराजी होण्यास व त्यास देशोधडीस लावण्यास काडीमात्र उशीर लागणार नाहीं.

**राणी**—सगळी गोष्ट खरी, पण महाराजांच्या मनांत ही गोष्ट कोणत्या मार्गानें भरवावी व ती त्यांस खरी कशी वाटावी ?

**कमळा**—बाईसाहेब, आपणास अद्याप डावपेंच माहीत नाहींत त्यामुळें असें वाटतें; पण यांत कांहींच अवघड नाहीं. **जगदेव** हल्लीं आपणाकडे नेहमीं येतो; आपण कोणतीही सांगितलेली गोष्ट तो मनापासून ऐकतो; आपण त्याजवर **रणधवल**प्रमाणें प्रेम करावें ह्मणून तो नेहमीं आपल्या पुढें पुढें करीत असतो; ही गोष्ट खरी आहेना ? झालं तर, दोन दिवस आपण त्याशीं भाषण करूं नका, व तो आला ह्मणजे रागानें उठून रंगमहालांत जात जा. ह्मणजे आपल्या रागावण्याचें कारण समजून घेण्याकरितां त्यास चटपट लागेल. पुढें कसा घाट घडायाचा त्याची तयारी मी करतें. पण आज रात्रीं आपण मात्र महाराजांचे कान थोडेसे भरवून ठेवा. त्यांत विशेष कांहीं करावयाचें नाहीं. तर फक्त किंचित् राग दाखवून महाराजांचें मन आतुर करा, आणि **जगदेव** अलीकडे वाईट दृष्टि ठेवीत आहे असें सहज मनांत भरवून द्या. शिवाय प्रत्यक्ष खात्री करून घेणें असल्यास—'आपण शिकारीस जाण्याचें निमित्त करून वाड्याजवळ लपून रहा, ह्मणजे **कमळेस** बोलावणें पाठवून आपली खात्री करून देईन'—असेंही सांगून ठेवा. त्यांचें मत काय पडतें तें उद्यां कळवा. पुढील व्यवस्था कशी काय करावयाची आणि कसा घाट घडवून आणावयाचा तें मीं सगळें करतें.

**कमळेच्या** सल्ल्याप्रमाणें **वाघेली** राणीनें करण्याचें ठरविलें. नेहमीप्रमाणें त्या दिवशीं फिरण्यास जाण्यापूर्वी **जगदेव** तिसरे प्रहरीं आपल्या सावत्र मातेच्या भेटीस आला. त्यास पहातांच ठरल्याप्रमाणें एकदम दचकल्यासारखें करून **वाघेली** राणी कपाळास आंठ्या घालीत तेथून निघून गेली. चार महिन्यांत कधींच नाहीं, आणि आज एकदम असा अपूर्व प्रकार पहातांच **जगदेव** गोंधळून गेला. 'मातुश्रींची तब्यत मजवर कां रुष्ट झाली ? मजबरोबर नेहमीं प्रेमानें बोलायाच्या, दरबारच्या गोष्टीं विचारायच्या, मला खाऊ द्यावयाचा, असें असतां आज मला पाहतांच कपाळास आंठ्या घालून कां वरें उठून गेल्या ? मजकडून असा कोणता अपराध झाला ?' असे अनेक प्रकारचे विचार त्याच्या मनांत भराभर येऊं लागले. त्याचें मन अस्थिर झालें, व असें होण्याचें कारण काय तें समजून घेण्याची त्यास अतिशय उत्कंठा उत्पन्न झाली. **कमळा** जवळच उभी होती. तिला त्यानें मातुश्रींच्या रागावण्याचें कारण विचारलें. तेव्हां—'कांहीं नाहीं. आज सकाळीं महाराजांची स्वारी येऊन गेल्यापासून त्यांचं डोकं दुखत आहे; त्या कोणाशींच अंड बोलत नाहींत; आपणावर रागावण्याचं कारण दिसत नाहीं; तथापि आपली इच्छा असल्यास रागाचं खरं कारण विचारून आपणास कळवीन' असा तिनें जबाब दिला.

'जरूर, मासाहेबांस राग येण्यास काय कारण झालें आहे याचा तपास करून मला कळीव हो ?' असें

**कमळेस** पुन्हां बजावून **जगदेव** बाहेर पडला. त्या दिवशीं त्यास फिरणें वगैरे कांहीं गोड लागलें नाहीं. रात्रौ भोजनोत्तर त्यानें घडलेली हकीकत आपल्या प्रिय **सोळंकी** मातेस सांगितली. ती ऐकून त्या विचारीला आपणावर कांहीं भलतेंच संकट ओढवत नाहींना, असें वाटूं लागलें.

**वाघेली** राणीच्या रंगमहालांत नेहमीं उत्तम रोपनाई करून महालाच्या पश्चिम भागांत कलावंतिणीचें नृत्य-गायन सुरू ठेवण्याचा परिपाठ असे. पण सदर दिवशीं राणीनें हा सर्व प्रकार बंद ठेवून रंगमहालांत फक्त एक हंडीच लावण्यास सांगितली होती. भोजनोत्तर महाराजांची स्वारी रंगमहालांत येऊन पहाते तों सर्वच विपरीत. जिकडे तिकडे अंधार असून दोन दासी दारांत उभ्या आहेत व राणी पलंगाखालीं टाकलेल्या गालिच्यावर उजवा हात मानेखालीं घेऊन सचिंत पडली आहे. 'आज असें कां? रोपनाई कां केली नाहीं? राणीजी जमिनीवरच कां निजल्या आहेत?' असे महाराजांनीं त्या दासीस अनेक प्रश्न केले. त्यांवर—'आज दोन प्रहरपासून त्यांची तब्यत चांगली नाहीं; त्या कोणाशींच धड बोलत नाहींत; इतकेंच नाहीं, पण आज तिसरे प्रहरची न्याहारी आणि रात्रीचें जेवण सुद्धां त्यांचें झालेलें नाहीं.'—असा दासींकडून जबाब मिळाला.

राणीची तब्यत एकाएकीं बिघडण्यास काय झालें, त्याचा खुलासा दासीच्या जबाबांत न झाल्यामुळें राजा तसाच राणी जवळ गेला; व त्यानें तिच्या तोंडावरून हात फिरवून रागाचें कारण विचारलें. पण तिजकडूनही कांहींच

जबाब मिळाला नाहीं. तेव्हां राजानें पुन: तिची हनवटी उजव्या हातानें वर उचलून—'कां, आमच्याशीं सुद्धां बोलायचें नाहीं असा आम्हीं कोणता अपराध केला? आपल्या रागाचें कारण जर समजलें नाहीं, तर मग आम्हीं तरी काय अनमान करावें?'—असें म्हटलें.

**राणी**—किंचित् राग व गहिंवर आणून ह्मणाली—' जी गोष्ट स्वप्नांत सुद्धां कोणास खरी वाटावयाची नाहीं, अशी गोष्ट सांगून आपलीच फजिती करून घेण्यापेक्षां न सांगितलेली काय वाईट? अगोदर लोकं आपल्या नावानं खडे फोडतात, त्यांत भर घालून आपला धिंडवडा कोणीं करून घ्यावा? परमेश्वर एकदाचं मरण देता ह्मणजे या त्रासांतून मुक्त होतें.'

राणीचें हें संदिग्ध बोलणें ऐकून तर राजाचें मन अगदींच गोंधळून गेलें. त्यानें राणीस आपल्या पोटाशीं धरून तिचे तोंडावरून हात फिरवून म्हटलें—' प्रिये तुझ्या या भाषणावरून मीं काय समजावें बरें? माझा तुजवर पूर्ण भरंवसा आहे. तूं कधीं खोटें बोलणार नाहींस. तूं सांगितलेली गोष्ट आजपर्यंत कधीं तरी मीं खोटी मानली आहे काय? सांग सांग, खरें काय असेल तें सांग. मी त्याबद्दल अवश्य बंदोबस्त करीन.'

राजाचें हें आश्वासनयुक्त भाषण ऐकून राणी म्हणाली—' महाराज, कुंपणच जर शेत खाऊं लागलं, तर धन्यानं त्याचा बंदोबस्त कसा करावा? तसंच आपल्या आवडत्या मुलानं जर—पण राहूं द्या. आपण सांगितलेलं कधीं खरं

वाटायाचं नाहीं; मग उगीच सांगून जीवास तरी दुप्पट त्रास करून घ्यावयास नको.'

**राजा**–अशी मध्येंच थांबू नकोस. जें कांहीं असेल तें सर्व सांग. मी अपराध्यास योग्य प्रायश्चित दिल्यावांचून कधीं राहणार नाहीं. मग माझा आवडता मुलगा असो, कीं पाहिजे तो असो.

**राणी**–आपला इतका निश्चयच आहे तर सांगतें. पण आपण या गोष्टीचा परिस्फोट बिलकूल न होऊं देतां बंदोबस्त कराल असं अगोदर मला वचन द्या.

**राजा**–ठीक आहे, हें घे वचन तर. सांग आतां लवकर, काय हकीकत आहे ती.

**राणी**–**जगदेवा**सारखा शहाणा व चतुर मुलगा नाहीं असं मी समजत होतें; व माझ्या **रणधवल**पेक्षांही मी त्याजवर जास्त प्रीति करीत होतें. पण कोणाला ठाऊक, मेल्याचे सापासारखे पोटांत पाय आहेत ते! अलीकडे तो वरचेवर मजकडे येई व गोड गोड बोले. मला वाटे पोर गरीब आहे, पण त्याचं कपटी वर्तन आतां सर्व दिसून आलं. त्याचं मन पापानं भरलं आहे. त्याचा बंदोबस्त वेळींच न झाला, तर माझ्या पातिव्रत्यरूपी भांडारावर तो केव्हां उडी घालील याचा नियम नाहीं. आणि तसा प्रसंग आलाच तर मी आपला जीव कधींच ठेवणार नाहीं!

राणीच्या तोंडचें हे शब्द ऐकून राजा खेदानें व आश्चर्यानें थक्क होऊन गेला. **जगदेवा**सारख्या शहाण्या, चतुर, विचारी मुलाच्या हातून अशी गोष्ट कशी घडेल? असे त्याचें मनच त्याला प्रश्न करूं लागलें? राणीस खोटें ह्मणावें

तर तसें म्हणण्यासही कांहीं मार्ग दिसेना. राणीच्या म्हणण्याप्रमाणें **जगदेव** वरचेवर येतो ही गोष्ट खरी आहे, पण त्याच्या मनांत असें पाप असेल हें मुळींच संभवत नाहीं. अशा प्रकारें एकामागून एक येणारे विचारतरंगांत राजाचें मन गोंधळून तो चित्राप्रमाणें स्तब्ध बसला.

बराच वेळ झाला, तरी राजाच्या तोंडून कांहींच शब्द निघेना असें पाहून, राणी म्हणाली–' मी अगोदर ह्मणत होतेंच, कीं माझं बोलणं खरं वाटणार नाहीं. आणि म्हणूनच मी सांगत नव्हतें. असो, बोलण्यावर विश्वास पटत नसला, व प्रत्यक्ष अनुभव पहाणं असला, तर महाराजांनीं उद्यां शिकारीस जाण्याचं निमित्त करून वाड्यांतच लपून रहावं, ह्मणजे आपल्या डोळ्यांचंही कदाचित् पारणं फिटेल!! '

हे शेंवटले शब्द ऐकून तर राजाचें मन **जगदेवा**च्या वर्तनाविषयीं फारच साशंक झालें, आणि राणीच्या म्हणण्याप्रमाणें त्यानें प्रत्यक्ष अनुभव घेण्याचें कबूल केलें.

मासाहेब आपणावर कां रागावल्या याचें कारण समजून घेण्याकरितां **जगदेवा**चें मन फार आतुर झालें होतें. त्यास सारी रात्र झोंप लागली नव्हती. **कमळा** कधीं भेटते, आणि आईसाहेबांच्या रागाचें कारण केव्हां समजतें, असें त्यास होऊन गेलें होतें. तो एकसारखा **कमळे**ची मार्गप्रतिक्षा करीत बसला होता.

सकाळ होतांच राणीनें **कमळे**जवळ रात्रींची सर्व हकीकत सांगितली. तिनें पुढें कसें काय करावयाचें तें सर्व राणीस सांगून ठेवलें, आणि आपण **जगदेवा**कडे निघून

गेली. **जगदेव** तिची मार्गप्रतीक्षा करीत बसलाच होता. **कमळेस** आपल्याकडे येतांना पाहून तो चटकन पुढें सरला, आणि मोठ्या उत्सुकतेनें विचारूं लागला–‘ काय **कमळा**-बाई, मासाहेबांस कशाचा राग आला त्याचा खुलासा तूं केला असशीलच ? ’

**कमळा**–महाराजांनीं सांगितलेली कामगिरी ह्या दासी-कडून होणार नाहीं असं कधीं तरी होईल काय ?

**जगदेव**–नाहीं असें कसें होईल ? तूं तशीच हुशार आहेस. सांग, मासाहेब कां रागावल्या होत्या त्या ?

**कमळा**–महाराज काय सांगूं ? माझी जीभ वहात नाहीं. जगांत लोक कसे विघ्नसंतोषी असतात हें आपणास माहीत नाहीं असं नाहीं. ज्या मेल्यांस लोकांचं बरं पहावत नसेल त्यांनीं आपले डोळे फोडून घ्यावे; परंतु कुटुंबांतील मनुष्यांत असा वीट पाडूं नये.

**जगदेव–कमळा**बाई, हें तूं कोणास उद्देशून बोलतेस ? आपल्या कुटुंबांत वीट पाडण्याचा कोणीं प्रयत्न केला ? व असें कृत्य करणारा तो कोण अधम आहे ?

**कमळा**–त्या अधमाचं नांव मला माहीत नाहीं; पण त्यांत आपल्या मातुश्रीचं कांहीं तरी अंग असावं असं वाटतं. कसंही असलं, तरी अशी गोष्ट करणं अगदींच नीचपणाचं हो !

**जगदेव**–तूं काय म्हणतेस तें मला मुळींच समजत नाहीं. माझ्या मातुश्रीचें अंग ? आणि तें कशांत ? असें मला गोंधळांत ठेवूं नको. स्पष्ट काय असेल तें सांग.

**कमळा**—**वाघेली** राणीसाहेब व आपल्या मातुश्री या दोघी सवती आहेत, व त्यांचं पटत नाहीं हें आपणास माहीत आहेच. तसंच महाराज **वाघेली** राणीच्या विचारानं नेहमी वागतात हेंही आपणास माहीत आहेच. तेव्हां आपल्या पतीची आपल्या सवतीवर असलेली प्रीति नष्ट व्हावी अशी इच्छा त्यांस होणं स्वाभाविक आहे. त्यांनीं स्वतः जरी नसेल तरी कोणाचे तर्फे महाराजांच्या मनांत **वाघेली** राणीसाहेब व्यभिचारी असल्याचं भरून दिलं असावं असं वाटतं. कारण परवांचे रात्रीपासून महाराज बाईसाहेबांवर अतिशय रागावले आहेत. ते नाहीं नाहीं तसे त्यांस टाकून बोलले; इतकेंच नाहीं पण कालचे रात्रीं तर त्यांनीं त्यांस चाबकानं फोडून काढलं ! आज दोन दिवस झाले त्यांनीं तोंडांत पाणीसुद्धां घेतलं नाहीं. ( असें ह्मणून तिनें डोळ्यांस पाणी आणिलें. )

**जगदेव**—हरहर ! कोण हा प्रसंग ! पण मी खात्रीनें सांगतों कीं, यांत माझ्या मातुश्रीचा काडीमात्र सुद्धां संबंध नाहीं. हें कृत्य करणारा कोणी तरी वेगळाच हरामखोर असेल, व मी त्याचा शोध लावून त्यास योग्य शासन केल्यावांचून कधीं राहणार नाहीं. पण **कमळा**बाई, माझी व **वाघेली** मासाहेबांची एकदा भेट करून दे. त्यांच्या मनांत माझ्या मातुश्रीविषयीं आलेला विकल्प अवश्य दूर केलाच पाहिजे.

**कमळा**—भेटीची आतां आशा नाहीं. कारण महाराजांनीं, **रणधवल**शिवाय कोणींही परकी पुरुषानं बाईसाहेबांच्या महालांत जाऊं नये असा सक्त हुकूम केला आहे.

**जगदेव**—ठीक आहे, तर मग मी महाराजांस भेटून त्यांची परवानगी घेऊनच मासाहेबांच्या भेटीस येतों, आणि ही गोष्ट त्यांस कोणीं सांगितली हेंही विचारतों.

**कमळा**—आपण म्हणतां तें खरं, पण महाराज येथें आहेत कुठें? मी तुझं काळं तोंड मुळींच पहाणार नाहीं असं बोलून ते सकाळींच शिकारीचं निमित्त करून गेले.

**जगदेव**—काय म्हणतेस? महाराज शिकारीस निघून गेले? आणि त्याबद्दल कोणासच वर्दी नाहीं!

**कमळा**—वर्दी कशी नाहीं, हुजऱ्याबरोबर दिवाणजींस निरोप पाठविला हें मला माहीत आहे. ते एकटे गेले का बरोबर त्यांनीं कोणास घेतलं, हें मात्र मला माहीत नाहीं.

**जगदेव**—( सुस्कारा टाकून ) मोठेंच आश्चर्य! ही बातमी जरा लवकर समजती तरी बरें होतें. कांहीं हरकत नाहीं. महाराजांचा शोध लावण्यास किती वेळ? पण कमळा, कसेंही करून तूं अगोदर मासाहेबांची व माझी भेट घालून दे. त्यांच्या मनाचें समाधान केल्यावांचून मला गोड लागणार नाहीं.

**कमळा**—आपण ह्मणतांच तर मी आपली भेट करून देईन. परंतु—

**जगदेव**—परंतु ह्मणून थांबूं नकोस. कांहीं असेल तें एकदम सांग. हें एकंदर वर्तमान ऐकल्यापासून माझ्या मनास फार हुरहुर लागली आहे.

**कमळा**—नाहीं. ह्मटलं बाईसाहेबांच्या महालांत पुरुषास जाण्याची सक्त मनाई झाली आहे, तेव्हां आपण डोक्यावरून ओडणीचा बुरखा घेऊन संध्याकाळचे वेळीं चल-

ण्याचा विचार केला पाहिजे. हें आपणास पसंत पडतं कीं नाहीं, ह्मणून विचारांत होतें.

**जगदेव**—ठीक आहे. तूं सांगशील तसें करण्यास मी तयार आहें, पण एकदा मासाहेबांचें शांतवन करून मला महाराजांच्या शोधाकरितां जाऊं द्या.

**कमळा**—ठीक आहे तर मग. संध्याकाळ होऊन अंधार पडला ह्मणजे आपण रंगमहालाच्या पश्चिमदरवाज्या-पाशीं या. तेथें मी ओडणी घेऊन हजर असतें, व लाग-लीच आपली भेट करून देववितें. मात्र बाईसाहेबांच्या रंगमहालांत प्रवेश होईपर्यंत कोणी न ओळखील अशा हुशारीनं आपणास जावं लागेल. जातें मी आतां, तुह्मी जरूर या. नाहीं तर मी आपली वाट पहातच उभी राहीन!

असें सांगून **कमळा** जी निघाली ती थेट रंगमहालांत गेली. तिनें **वाघेली** राणीस झालेली सर्व हकीकत क-ळविली, आणि पुढें कसें करावयाचें तें सांगून आ-पण तशीच महाराजाकडे धांवत गेली, व त्यांस हात जोडून ह्मणाली—' महाराज, आपण शिकारीस गेल्याचं वर्तमान समजल्यापासून **जगदेव**जींस पुष्कळ आनंद झाला आहे, व ते एका दासीच्या साह्यानं स्त्रीवेश घेऊन आज संध्याकाळींच राणीसाहेबांच्या महालांत येणार आहेत अशी मला भरंवशाची बातमी लागली आहे. आपणास खात्री करून घेणें असल्यास महालाच्या पश्चिमेकडील अगाशींत बसावें व तेथील जाळीदार आरशांचे खिडकीवाटे काय मजा होते ती पहावी. आतां मी जातें.' असें सांगून ती निघून गेली.

**कमळे**च्या तोंडचे हे शब्द ऐकतांच राजा थक्क होऊन गेला. त्याचे मनांत एकामागून एक विचार येऊं लागले. हा वेळपर्यंत **जगदेवा**विषयीं त्याचे मनांत जी पूज्य-बुद्धि वास करीत होती ती एकदम नाहींशी झाली. त्याच्या हृदयांत क्रोधाग्नीचा एकदम भडका झाला. त्याचे डोळे लाल झाले. ' सर्वांग थरथर कांपूं लागलें. तो ह्मणाला.— 'हा मूढा, **जगदेवा**, तूं इतका अधम पातकी आहेस हें जर मला ठाऊक झालें असतें, तर तुला कधींच जवळ ठेवला नसता. माझ्या प्रिय राणीशीं कपट करून **रणधवला**पूर्वी तुझें लग्न केलें, त्याचे उपकार तूं चांगले फेडलेस! तुह्मी दोघेंही मातापुत्र जवळ ठेवण्यास अगदीं नालायक आहांत अशी आतां माझी पक्की खातरी झाली. थांब, आज तुला तुझ्या गुणाचें प्रायश्चित्त दिल्यावांचून राहत नाहीं. ' असें ह्मणून त्यानें आपल्या म्यान्यांतील तरवार झरकन बाहेर खेंचली. रागानें खेंचलेल्या हाताचा वेग एकदम वर झाल्यानें तिचा झटका हंडीस लागून ती खळाळ करून कोसळली! त्याबरोबर झोंपेंतून एकादा मनुष्य जसा दचकून जागा होतो तसा राजा एकदम शुद्धीवर आला. त्यानें आपली तरवार पुन्हां म्यानांत घातली, आणि आपल्या मनाशीं विचार करीत तो सचिंत बसला.

# प्रकरण ६ वें.

## अविचारीपणाचा मासला.

रागाच्या आवेशांत मनुष्यानें कोणतीही गोष्ट करूं नये. शास्त्रानें जें षड्रिपूंचें वर्णन केलें आहे, त्यांत क्रोधास द्वितीयस्थान दिलें आहे. त्याच्या स्वाधीन जो मनुष्य होतो त्यास जगांत सुखाचा ह्मणून कधींच लाभ होत नाहीं. रागाच्या आवेशांत केलेलें कृत्य नेहमी पश्चात्तापास कारण होतें, अशाबद्दल हजारों दाखले आले आहेत व नेहमीं येत आहेत. शांतपणा व विचार हे सुखानें संसार चालविण्याचे मुख्य खांब आहेत. त्यांचा आश्रय जो घेत नाहीं त्याच्या नशिबीं दुःख व चिंता हीं ठेविलेलींच असतात. ह्मणून मनुष्य प्राण्यांनीं नेहमी परमेश्वरानें दिलेल्या बुद्धीचा उपयोग करून कोणतीही गोष्ट उतावळीनें न करतां त्याबद्दलची पूर्ण खात्री झाल्यावर विचारपूर्वक जें करणें तें करावें; ह्मणजे त्यापासून पश्चाताप न होतां उलट समाधान होईल. ही गोष्ट **उदयादित्य** राजानें क्रोधाचे स्वाधीन होऊन उतावीळपणांत केलेल्या अविचारी कृत्यावरून वाचकांच्या लक्षांत आल्यावांचून रहाणार नाहीं. असो.

मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें संध्याकाळ होतांच **कमळेच्या** सूचनेप्रमाणें **जगदेव** रंगमहालाच्या पश्चिमदरवाज्याशीं येऊन दाखल झाला. राजा आगाशींत बसलेला होताच, व त्याची नजर सारखी समोरील रस्त्याकडे होती. अंधार असल्यामुळें समोरून आलेल्या **जगदेवाचा**

चेहेरा जरी राजास दिसला नाहीं, तरी त्याच्या चालण्याच्या ढबीवरून हा आलेला मनुष्य **जगदेव**च असावा अशी राजाची खातरी झाली; व त्याचे डोळे पुढील प्रकार पहाण्याविषयीं आतुर झाले.

**कमळा** महालाच्या दाराशीं **जगदेवा**ची वाट पहात उभी होतीच. **जगदेवा**स पहातांच तिला आनंद झाला. तिनें त्यास लगेच बाजूस घेऊन ओडणी पांघरावयास दिली, आणि हळूच जिन्याचें दार उघडून त्यास आपल्यामागें यावयास सांगितलें. ती पुढें व हा मागें या प्रमाणें दोन जिने चढून गेल्यावर **कमळा** उभी राहिली, आणि **जगदेवा**चे कानाजवळ तोंड नेऊन हळूहळू तिनें त्यास पुढील हकीकत सांगितली. ती ह्मणाली—'आतां कांहीं धास्ती नाहीं. हें दालन ओलांडून पलीकडच्या दालनांत गेलां, ह्मणजे तिथं दाराजवळच एक हंडी जळत असलेली आपणास दिसेल. त्या दारावर लाल मश्रूचा पडदा सोडलेला आहे. तो एकीकडे करून आपण आंत जा. तिथं राणीसाहेब पलंगावर एकट्याच निजल्या आहेत. त्यांनीं तोंडावरून पांघरून घेतलं असल्यास तें तुह्मी हळूच काढा ह्मणजे झालं. त्या कांहीं झोंपीं गेल्या नाहींत. कालपासून अशा तोंड झांकून नुसत्या पडून राहिल्या आहेत. त्या कोणाशींच बोलत नाहींत; पण आपणाशीं बहुतकरून बोलतील. मी आतां माझ्या कामाला जातें.' असें सांगून ती तेथून चालती झाली.

महाराज ज्या ठिकाणीं बसले होते त्या ठिकाणीं अंधार असल्यामुळें खोलींतील मनुष्यास ते दिसत नव्हते, पण खोलींत

उजेड असल्यामुळें महाराजांस मात्र खोलींतील सर्व प्रकार स्पष्ट दिसत होता. तथापि त्यांत विशेष अशी मजा होती कीं, ज्या जाळीदार खिडकीजवळ महाराज बसले होते, ती कांचेची असून बंद केलेली होती, व ह्या बाजूनें वारा येण्याजाण्यास इतरही मार्ग नव्हता. त्यामुळें आंतील बोलणें त्यांस ऐकूं येण्यास मुळींच साधन नव्हतें.

**कमळे**च्या सूचनेप्रमाणें **जगदेवानें** दुसऱ्या दालनांत जाऊन दारावरील मश्रूचा पडदा हळूच बाजूस सारला, आणि आंत प्रवेश करून डोक्यावरून घेतलेली ओडणी बाजूस काढून ठेविली. तो हळू हळू **वाघेली** राणीच्या पलंगाजवळ गेला. **वाघेली** राणी तोंडावरून शाल घेऊन झोंपेचें मिष करून स्वस्थ पडली होती. **जगदेवानें** 'मासाहेब, मासाहेब;' ह्मणून हलक्या स्वरानें तीन हांका मारल्या, परंतु त्यास जबाब मिळाला नाहीं. तेव्हां तो विचारांत पडला. तो आपल्या मनाशीं ह्मणाला—'मासाहेबांस दोन दिवसांचे त्रासानें डोळा लागला असावा असें वाटतें. **कमळे**च्या सूचनेप्रमाणें त्यांच्या तोंडावरील शाल काढावीका? काढल्यास त्यांच्या झोंपेचा मोड तर होणार नाहीं? तेव्हां आतां काय करावें? थोडा वेळ येथेंच थांबावें, किंवा आलों तसें परत निघून जावें?' अशा प्रकारें त्याच्या मनांत विचार उद्भवून त्यांत तो गर्क झाला.

गच्चीवर बसलेल्या महाराजांस कांचेच्या खिडकीवाटें हा सर्व प्रकार स्पष्ट दिसत होता. परंतु त्यांस **जगदेवानें** मारलेल्या हांका मुळींच ऐकूं आल्या नाहींत. रात्रीच्या प्रसंगीं ओडणी पांघरून **जगदेवा**चें महालांत येणें, त्याचें ह्या वेळचें हळू हळू

चालणें, भ्यालयासारखें आजूबाजूस पाहणें, राणीच्या पलंगाजवळ हळूच जाणें, खालीं मान वांकवून कांहीं बडबड करणें व तेथेंच विचार करीत उभें राहणें, वगैरे गोष्टींपासून राजाच्या मनांत भरून दिलेल्या संशयास पुष्कळ जोर आला. त्या वेळची ती **जगदेवा**ची मूर्ति त्यास महान् पातक्याप्रमाणें दिसूं लागली; व पूर्वीप्रमाणेंच त्याच्या हृदयांत राग मावेनासा झाला. तथापि ह्या प्रसंगीं त्यानें थोडा धीर धरला, आणि पुढें काय काय होतें तें पाहण्याचा निश्चय केला.

थोडा वेळ निघून गेल्यानंतर **जगदेवानें** पुन्हां 'मासाहेब, मासाहेब,' ह्मणून हांका मारल्या; पण जबाब मिळाला नाहीं. तेव्हां असाच वेळ घालवीत उभें राहण्यापेक्षां हळूच जागें करावें, व त्यांचें समाधान करून महाराजांच्या शोधाकरितां निघून जावें हें चांगलें, असा त्यानें निश्चय केला; व मन घट्ट करून उजव्या हातानें तोंडावरील शालजोडीचा पदर हळूच एकीकडे सारून तो ह्मणाला—'मासाहेब, मी आपला बालक **जगदेव** आलों आहें, याच्याशीं दोन शब्द—' इतकें त्याच्या तोंडांतून पुरें निघतें न निघतें तों, एकादें भयंकर स्वप्न पडलें ह्मणजे झोपेंतील मनुष्य जसें दचकून वरळत उठतें, त्याप्रमाणें **वाघेली** राणी एकदम 'धांवा धांवा, चांडाळ मजवर बलात्कार करीत आहे.' असें मोठ्यानें ओरडत उठली. तिनें ताडकन् पलंगावरून खालीं उडी टाकिली; व एकाद्या भेदरल्या मनुष्याप्रमाणें ती थरथर कापूं लागली. तिनें आपली बोवडी लागलीच वळवली, डोळे गच्च लावून घेतले, आणि 'दे-दे-देवा, मा-मा-माझें र-र-रक्षण

क-क-कर, को-को-कोणी मला सोडवा.' अशा प्रकारें ती बरळूं लागली.

हा चमत्कारिक प्रकार पाहतांच **जगदेव** अगदीं घाबरून गेला.—' मासाहेब, घाबरूं नका, दुसरें कोणी नाहीं. मी आपला बालक **जगदेव** आपल्या समाचारास आलों आहें '—असें तो ह्मणूं लागला, पण त्याचें बोलणें तेथें कोणास ऐकूं येणार! राणीची ओरड ऐकतांच ठरल्याप्रमाणें बाहेर लपून बसलेल्या दासी एकदम आंत आल्या, व त्यांनीं लागलींच **जगदेवा**चे हात मागें खेंचून बांधले.—' मी परका कोणी नाहीं. **जगदेव** आहें, मला कां बांधतां? मीं कोणता गुन्हा केला?'—असें **जगदेव** त्या बायांस बोलूं लागला; परंतु त्याच्या बोलण्याकडे कोण लक्ष देतो! त्यांनीं एकच धांदल करून त्यास फरफर ओढीत त्या खोलीच्या बाहेर काढिलें. इतक्यांत गच्चीवर बसलेली महाराजांची स्वारी रागानें लाल झालेली तेथें येऊन उभी राहिली.

महाराजांस पहातांच **जगदेवास** मोठेंच आश्चर्य वाटलें, व आजच्या ह्या एकंदर कृत्यांत कांहीं तरी खास कपट आहे असें त्यास स्पष्ट दिसून आलें. **कमळे**च्या बोलण्यावर भरंवसा ठेवून आपण अशा भलत्या वेळीं, तशांत स्त्री वेष घेऊन, येथें आलों; ही अतिशय मोठी चूक केली, अशी त्याची खातरी झाली. **कमळेचें** कपटी भापण, **वाघेली** राणीनें दाखविलेला स्त्रीचरित्राचा मासला, दासींनीं एकदम येऊन पकडणें, आणि तितक्यांत शिकारीस गेलेली महाराजांची स्वारी मूर्तिमंत पुढें उभी राहणें, वगैरे गोष्टींचा

प्रकाश त्याच्या मनावर एकदम पडून तो अगदीं गोंधळून गेला. त्याच्या तोंडून एक शब्द सुद्धां निघेना.

महाराजाच्या मनावर ह्या घडलेल्या एकंदर प्रकाराचा अंमल इतका कांहीं जबरदस्त झाला होता कीं, त्यायोगें कांहींवेळ त्याचें देहभान ठिकाणावर राहिलें नाहीं. ते **जगदेवा**कडे एकसारखे पहातच उभे राहिले. **जगदेवानें** बापाची ती क्रुद्ध मुद्रा पाहून अधोवदन केलें. आंतल्या बाजूस भेदरल्यासारखें राणीनें आपलें वरळणें चालविलेंच होतें. चौघी दासी **जगदेवास** धरून एकमेकींकडे पहात चित्राप्रमाणें तटस्थ उभ्या राहिल्या होत्या. अशा स्थितींत थोडा वेळ गेल्यानंतर त्या स्त्रीलंपट विचारशून्य **उदयादित्य** राजाचें तोंड उघडें झालें. दोन्ही भिवया चढवून कर्कश शब्दानें तो ह्मणाला–' **जगदेवा,** तुला मी फार गरीब व शहाणा समजत होतों; पण आज तुझें सर्व शहाणपण दिसून आलें. तुझ्यासारखा अधम ह्या त्रिभुवनांत कोणी नसेल. ह्या वेळेस तुला जी शिक्षा करावी ती थोडीच आहे. पण पुत्रहत्येचें पातक घेण्यास माझा हात वाहत नाहीं. अधमा, असें पापकर्म करण्यास तुझा जीव कसा धजला ?'

**जगदेवानें** कांपत कांपत उत्तर दिलें–' महाराजांनीं क्षमा करावी. विचाराअंतीं मी कोणत्याही प्रकारें अपराधी नाहीं, असें महाराजांस समजून येईल.'

**राजा** रागाच्या आवेशांतच दांत चावून ह्मणाला–'मला सर्व समजून आलें आहे. तुझ्यासारख्या नीचास जवळ ठेवणें महत्पाप असें मी समजतों. जास्त बोलून तूं माझ्या

क्रोधाग्नीस अधीक भडकवूं नकोस. ह्या प्रसंगीं मी तुला हीच शिक्षा करतों कीं, तूं आतांच्या आतां माझ्या राज्याच्या बाहेर निघून जावें. आणि तुझें काळें तोंड मला पुन्हा कधींही दाखवूं नये.'

**जगदेव**—आपली आज्ञा मला शिरसावंद्य आहे; पण मजकडून कोणता अपराध झाला हें कळविल्यास कृपा होईल.

**राजा**—काय? अपराध! आणखी कोणता अपराध तुझ्या हातून झाला पाहिजे? रात्रीच्या प्रसंगीं स्त्रीवेश घेऊन येथें येण्याची तुला काय जरूर होती?

**जगदेव**—अशा प्रकारें येणें बरें नाहीं खरें; परंतु—

**राजा**—परंतु बिरंतु कांहीं नाहीं. तुझ्यासारख्या कपटी, पापी व नीच मनुष्याचे शब्द माझ्या कानास फार त्रासदायक होत आहेत. तुझ्या तोंडून जास्त खुलासा ऐकण्याची मला मुळींच इच्छा नाहीं. तूं आपल्या अंगावरील जडजवाहीर सर्व काढून ठेव, आणि आपला घोडा घेऊन ह्या घटकेस निघून जा. कोण आहेरे तिकडे? जमादारास बोलावून मीं सांगितल्याप्रमाणें आतांच्या आतां ह्या अधमास हांकून लावण्यास सांगा.

**जगदेव**—निघून जाण्यास मी तयार आहें. पण मजवर हा खोटा आरोप आहे, याचा—

**जगदेवा**च्या तोंडून इतके शब्द पुरे निघतात न निघतात तोंच महाराजांची स्वारी नाकाचा शेंडा चढवून तिरस्कारयुक्त दृष्टीनें पहात पहात निघून गेली, व जमादारानें **जगदेवास** महालाबाहेर चलण्याविषयीं सुचविलें. आ-

पणावर हा भलताच व अगदीं निंद्य आरोप आला, व त्यांतून निर्दोष ठरण्यास कांहींच मार्ग राहिला नाहीं हें पाहून त्यास फार वाईट वाटलें. 'ह्या प्रसंगीं आपण जीव तोडून पाहिजे तितकें जरी महाराजांस सांगितलें, तरी त्यांस आपलें बोलणें खरें वाटणार नाहीं. इतकेंच नाहीं, तर आपण उलट गुन्हा लपविण्याकरितां मुद्दाम लबाडीनें कांहीं तरी खोटें सांगत आहोंत असें वाटेल. तेव्हां आतां येथें जास्त वाटाघाट करण्यापेक्षां येथून निघून जाणेंच चांगलें,' असा त्यानें आपल्या मनाचा निग्रह केला. तथापि—'आपल्या प्रिय मातुश्रीस ही हकीकत समजल्यास त्या आपल्या जिवास कदाचित् अपाय करून घेतील! माझा वियोग त्यांस बिलकूल सहन होणार नाहीं; व साऱ्या सरकारवाड्यांत त्यांचें शांतवन करणारा कोणीच नाहीं.' हे विचार त्याचे मनांत येऊन तो फारच दुःखी झाला. त्याचा कंठ भरून आला, व काय करावें हें त्यास कांहींच सुचेनासें झालें. जमादाराचा तगादा लवकर शहराबाहेर निघून जाण्याचा चालू होताच. पण मातुश्रीच्या भावी परिणामाबद्दल एकामागून एक येणाऱ्या विचारांनीं **जगदेवाचें** देहभान ठिकाणावर राहिलें नव्हतें. शेंवटीं त्यानें आपल्या मनाशीं बराच वेळ विचार करून, ह्या प्रसंगीं मातुश्रीस भेटण्यापेक्षां त्यांस ह्या जमादाराबरोबरच कांहीं तरी समाधानाचें पत्र पाठवावें असें ठरविलें. आणि जमादाराची विनवणी करून त्यास कागद, दऊत व लेखणी आणून देण्यास सांगितलें. जमादारानें कांहीं हरकत न घेतां कागद, शाई व लेखणी आणून दिली. **जगदेवानें** आ-

पल्या मातुश्रीस पत्र लिहून त्याचा लखोटा केला, आणि तें पत्र आपल्या **सोळंकी** मातुश्रीस पोंचविण्याबद्दल त्यानें जमादारास विनयपूर्वक सांगितलें. नंतर महाराजांच्या आज्ञेप्रमाणें अंगावरील सर्व अलंकार जमादाराजवळ काढून देऊन ढाल, तरवार, बिचवा, भाला, कट्यार वगैरे जरूरीचीं हत्यारें घेऊन तो आपल्या सारंग्या घोड्यावर स्वार झाला. निघतांना जमादारास तें पत्र आपल्या **सोळंकी** मातुश्रीस पोंचविण्याबद्दल पुन्हां विनयपूर्वक सांगून त्याचा निरोप घेतला. घोड्यास टांच मारतांच तो भरधांव निघाला, आणि हां हां ह्मणतां दिसेनासाही झाला.

जमादारानें त्याच पायीं **जगदेवाचें** पत्र **सोळंकी** राणीस नेऊन पोंचविलें. अपल्या मुलाचें पत्र, अशा रात्रीच्या प्रसंगीं कधींच नाहीं व आज आलें ह्मणून **सोळंकी** राणीचे मनांत एकदम धस्स झालें. तिनें लागलींच कागद उघडला. त्यांत पुढीलप्रमाणें मजकूर होता.—

श्री.

परमप्रिय मातुश्री साहेब—

साष्टांग नमस्कार विनंती विशेष. माझ्या प्रिय पित्यानें मला कांहीं जरूरीची कामगिरी सोंपल्यामुळें मी तिकडे गेलों आहे. ती कामगिरी लांबच्या प्रदेशाची असल्यामुळें आपली व माझी लवकर भेट होण्याची आशा नाहीं. तथापि मजबद्दल आपण काडीमात्र काळजी करूं नये. परमेश्वर लवकरच मला आपल्या चरणाची भेट देईल. आपणास भेटून गेलों नाहीं, ह्मणून कदाचित् आपणास वाईट वाटेल; पण वडि-

त्यांची आज्ञा इतकी तांतडीची होती कीं, आपली भेट घेण्यास मुळींच अवकाश मिळाला नाहीं. मनुष्यावर एकादी मोठी कामगिरी अथवा भयंकर प्रसंग आल्यावांचून त्याच्या अंगचे खरे गुण लोकांच्या दृष्टीस पडत नाहींत. तोच प्रसंग परमेश्वरानें अनायासें जुळवून आणल्याबद्दल मला फार आनंद झाला आहे. आपण मजविषयीं कोणत्याही प्रकारची काडीमात्र काळजी न करितां आनंदांत रहावें. आपल्या आशीर्वादेंकरून आपला पुत्र लवकरच विजयी होऊन आपल्या चरणांजवळ हजर होईल. मात्र आपण ह्या पत्राचा परिस्फोट करूं नये, तसेंच माझ्या जाण्यासंबंधीं जास्त चौकशीही करूं नये, अशी हातजोडून विनंती आहे. कारण तसें करण्यापासून आपणास खरी हकीकत न समजतां कदाचित् विघ्नसंतोषी लोकांकडून भलतेंच सांगण्यांत येईल, व त्यापासून आपल्या जिवास निष्कारण त्रास होईल. सबब माझी इतकी विनंती आपण मान्य कराल अशी मला पूर्ण आशा आहे.

आपला प्रिय बालक,

**जगदेव.**

पत्रांतील वरील मजकूर पाहून **सोळंकी** राणी गूढ विचारांत पडली. तिचे मनांत अनेक प्रकारच्या विचारांच्या लाटा उसळ्या घेऊं लागल्या. ती आपल्या मनाशीं ह्मणाली—'लांब प्रदेशाची अशी कोणती कामगिरी असावी? मला नुसती भेटण्यापुरतीही फुरसद मिळूं नये इतकी तांतड? आणि मीं तपास करूं नये ह्मणून लाग-

लीच विनंती! यावरून **जगदेवाच्या** जाण्यांत कांहीं तरी घोंटाळा दिसतो. मला विचारल्यावांचून जो बाहेर सुद्धां पडत नसे, तो इतक्या लांबच्या प्रवासास कसा जाईल? खरोखर यांत कांहीं तरी काळेंबेरेंच असलें पाहिजे. अलीकडे त्याचा वाढत चाललेला मानमरातब **वाघेली** राणीस पाहवत नाहीं असें ऐकण्यांत होतेंच. तेव्हां तिनेंच महाराजांच्या मनांत कांहीं तरी भरविलें असेल, व ते **जगदेवास** कांहीं टाकून बोलले असतील. **जगदेवाचा** स्वभाव तापट आहे, त्यास अपमान कधीं सहन होत नाहीं! त्यास वडिलांचें अपमानकारक भाषण सहन न झाल्यामुळें–मी कदाचित् आड येईन ह्मणून माझीही भेट न घेतां–तो निघून गेला असावा. आणि माझ्या समजुतीकरितांच त्यानें हें पत्र लिहिलें असावें.'–अशी तिच्या मनाची पक्की खात्री झाली. आणि लागलीच–'**जगदेव** कोणीकडे गेला असेल, प्रवासांत त्याचे काय हाल होतील, त्यास वेळचे वेळीं अन्नपाणी कोण देईल, रात्रींची विश्रांति तो कोठें घेईल'–असे एकामागून एक तिच्या मनांत विचार येऊं लागले. तिचा कंठ भरून आला. प्रियपुत्राच्या वियोगाचें मूर्तिमंत चित्र तिच्या डोळ्यापुढें उभें राहून तिच्या नेत्रांतून अश्रुधारा वाहूं लागल्या. माझ्या बाळाला मी कोठें पाहूं? तो मला आतां कसचा भेटतो? ह्या अभागिणीला थोडें बहुत पुत्रसुख होतें तेंही परमेश्वरानें कसें नष्ट केलें? असें ह्मणून ती ढळढळां रडूं लागली. पण तिचें समाधान करण्यास त्या वेळेस तिजजवळ कोणीच नव्हतें. बराच वेळ अशा प्रकारें शोक केल्यानंतर त्या

दु:खाच्या भरांतच तिचा डोळा लागला, आणि पुढीलप्रमाणें तिला स्वप्न पडलें.

**जगदेव वीरमती**सह एका घोर अरण्यांतून चालला असतां, एका दाट झाडीच्या दरीच्या चिंचोळ्या भागांत दोन पुरुष एका भयंकर वाघाच्या तावडींत सांपडल्यामुळें दीनस्वरानें ओरडत असल्याचें त्यांच्या पहाण्यांत आलें. त्यांचा बचाव करण्याकरितां **जगदेवानें** त्या वाघावर तीर सोडला, त्यामुळें वाघानें आपला मोरचा फिरवून **जगदेवा**वर उड्डाण केलें. इतक्यांत **वीरमतीनें** त्या वाघाच्या पोटांत हातांतील भाला नेमानें खुपसल्यामुळें त्याचीं आंतडीं बाहेर येऊन तो मरण पावला. ते दोघे पुरुष आपली मुक्तता झाल्याबद्दल आभार मानून चालते झाले. पुढे एका राज्यांत **जगदेव** गेला. तेथील राजानें त्यास आपली कन्या देऊन आपल्या गादीवर बसविलें, व दोघी स्त्रियांसह तो मोठ्या समारंभानें आपल्या राजधानीस परत येऊन आपण त्यास प्रेमालिंगन देत आहों.' असें स्वप्न पडून तिनें जगदेवास आलिंगन देण्याकरितां झोंपेंतच आपले हात लांब केले. तों जवळच जळत असलेल्या समईस धक्का लागून ती खालीं पडली, व त्या आवाजासरशीं ती जागी झाली. ह्या पडलेल्या स्वप्नाबद्दल तिच्या मनांत एकामागून एक विचार येऊं लागले. शेंवटीं तिनें आपलें मन घट्ट करून, एकाद्या चांगल्या दयाळू व इमानी सरदारामार्फत **जगदेवा**चा शोध ठेवावा, असें ठरविलें, आणि **श्रीजगदंबे**ची स्तुति करून ती आपल्या बिछान्यावर जाऊन निजली.

**जगदेव** शहराबाहेर निघून जाईपर्यंत **कमळेनें** त्याच्या मागें आपले हेर ठेवले होते. **जगदेव** शहरच्या पूर्व दरवाज्यानें निघून गेल्याचें वर्तमान त्यांनीं **कमळेस** येऊन कळविलें, व ती लागलीच **वाघेली** राणीकडे तें कळविण्यास गेली. राणीसाहेब तिची मार्गप्रतीक्षा करीतच बसल्या होत्या. **कमळेस** पहातांच राणीला आनंद झाला, व ती मोठ्या उत्सुकतेनें ह्मणाली—'कां **कमळा**बाई, गेला कां मेला निघून? तूं गडे छान व्यूह रचलास. मला तर मोठी काळजी होती. जर कां आपला बेत फिसकला असता, तर मग आपल्या फजितीस पारावारच नव्हता.'

**कमळा**—मला तर आपलीच फार भीति होती; पण आपणही चांगलीच बतावणी केली. बरं असो. एवढ्यावर कांहीं भागलं नाहीं. अजून खरी कामगिरी पुढंच आहे. कदाचित् **जगदेव** आपल्या सासुरवाडीस जाऊन राहिला, तर तें राज्य त्याच्या ताब्यांत येऊन तो प्रबळ होण्याची, आणि पुढं मागं आपलं हें कृत्य उघडकीस येवून भलताच परिणाम होण्याची, भीति आहे.

**राणी**—मग त्याकरितां तूं कोणती युक्ति शोधून काढली आहेस?

**कमळा**—आपल्या तैनातींत जे स्वार आहेत, त्यांवरील जमादार **कूरसिंग भिल्ल** चांगला हुशार आहे. त्याजवळ कित्येक औषधें फारच सुरेख आहेत. त्यानं दोन तीन इसम मदतीस घेऊन **जगदेवा**च्या पाठोपाठ जावं आणि रानांतच **जगदेवास** गांठून ठार करावं, व त्याचा मुर्दा व्हाल्या रस्त्याच्या बाजूस ठेवून निघून यावं, असं

ठरविलं आहे. हा इतका बेत सिद्धीस गेला ह्मणजे आपला कांटा समूळ नाहींसाच झाला. **जगदेव** मेल्याची बातमी कोणा तरी वाटसराकडून गांवांत यावयाचीच; व ती एकदा **सोळंकी** राणीस समजली ह्मणजे पुत्रशोकानें पुढें मागें तीही मरण पावेल, आणि **वीरमती**ही सती जाईल. मिळून आपले सर्व शत्रूंचा नाश आपोआप होऊन पुढें मागें आपणास कसलीच भीति राहणार नाहीं.

**राणी**—असं झालं, तर मग आपणास कसलंच भय राहणार नाहीं खरं. पण क्रूरसिंगानं हें सर्व कबूल केलं कां? काम फार बेमालूम झालं पाहिजे?

**कमळा**—तो कसलं काम करतो? 'दाम करी काम.' पहिल्यानं तो उडवाउडवीच करीत होता; पण हजार मोहरांची लालुच दाखवितांच झाला कबूल. काम बेमालूम होण्याबद्दल आपणाला काळजी नकोच. तो जातीचा **भिल्ल**, तशांत शिपाईबच्चा. अशीं कामं करूनच जमादारी मिळविलेली. तेव्हां त्याच्या कामाबद्दल आपणास काळजी वाहण्याचं मुळींच कारण नाहीं.

**राणी**—तें सर्व खरं, पण तो येथून कधीं निघणार? **जगदेव टुकटोड्यास** जाऊन पोंचल्यावर मग याचं कांहीं वळणार नाहीं.

**कमळा**—त्याची काळजी आपणास नको. उद्यां सकाळींच निघण्याबद्दल त्यास सांगितलं आहे. शिवाय मी आतां पुनः तिकडेच जातें. त्यास वाटेस लावल्यावांचून मला कसली झोंप येते?

**राणी**–**कमळाबाई** या कामांत तुझे मजवर पुष्कळ उपकार झाले आहेत, ते कधीं फिटतील कोण जाणे?

**कमळा**–आपण असें मात्र मनांत आणूं नका. मी आपली दासी आहें, व आपल्याच अन्नावर वाढलें आहें. आपण सुखी असलां ह्मणजे त्यांतच आह्मांस सुख आहे. बरं तर, बाईसाहेब, मी आतां रजा घेतें. रात्र बरीच झाली आहे. कदाचित् महाराज आतां येतील.

अशा प्रकारें दोघींचा संवाद होऊन **कमळा** राणीची रजा घेऊन निघाली, ती थेट **क्रूरसिंग** जमादाराच्या मुक्कामावर गेली. तो तिची मार्गप्रतीक्षा करीतच बसला होता. **कमळेस** पहातांच त्यास पुष्कळ आनंद झाल्याचें दिसलें. त्यानें उठून तिचा हात धरला, व तिला आपल्याजवळ बसविलें. मग दोघांनीं थोडेसें मद्य घेऊन कित्येक पदार्थांचीं ताटें भरून ठेवलीं होतीं त्यावर यथेच्छ हात मारला. **कमळेनें** त्यास चांगलीच आशा दाखऊन हें काम हुशारीनें करण्याबद्दल स्फुरण चढविलें. यांची मौजमजा पहाटपर्यंत चाललीच होती. पहाट होतांच **कमळेनें** त्यास निघण्याचा तगादा सुरू केला. **क्रूरसिंगानें** आपले साथीदारांस बोलावून सर्वजण आपापल्या शस्त्रास्त्रानिशीं घोड्यावर स्वार झाले. घोड्यावर बसण्यापूर्वी **क्रूरसिंगानें** 'एक साखरेचा' ह्मणून **कमळेच्या** तोंडाजवळ तोंड नेलें. तिनें आपल्या डाव्या हातानें त्याच्या गालफडांत एक चपराक लगवून त्यास मागें लोटलें. व –'आतां नाहीं. तूं बरोबर काम बजावून आल्यानंतर एक सोडून हजार साखरेचे देईन'–असें ती ह्मणाली. 'बरें तर बुवा'–असें

ह्मणून गाल चोळीतच क्रूरसिंगाची स्वारी एकदाची घोड्यावर बसली, व कमळेकडे पहात पहात आपल्या सोबत्यांसह चालती झाली.

सारी रात्र जागरण, व त्यांतच बेताबाहेर निशा झाल्यामुळें जमादार साहेबांची स्वारी थोडावेळ गेला नाहीं तो घोड्यावरच पेंगूं लागली. जसजसें उन्ह चढूं लागलें, तसतसें यांचें अवसान कमी होत चाललें. शेंवटीं त्यांनीं एक विस्तीर्ण झाड पाहून तेथें मुक्काम करण्याचा विचार ठरविला; आणि त्याप्रमाणें ते रानांतच एका झाडाखालीं तो सबंध दिवस व रात्र घोरत पडले. दुसरे दिवशीं सकाळीं आदले दिवसाचा उपास पडल्यानें त्यांस उभे राहण्याची सुद्धां शक्ति राहिली नव्हती. मग जवळ जें थोडेसें फराळाचें होतें तें खाऊन त्यांनीं जेमतेम मजल कांटण्यास सुरूवात केली. रस्त्यांत कोणी भेटल्यास त्यास—ह्या रस्त्यानें कोणी तरुण स्वार गेल्याचें तुह्मीं पाहिलेंका? अथवा रस्त्यांत कोणी तुह्मांस अमुक असा रंग, रूप व उमरीचा स्वार भेटलाका?—असें विचारीत, व त्या धोरणानें जात. अशा प्रकारें १२ दिवसपर्यंत ते भटकले; परंतु त्यांस कांहींच थांग लागला नाहीं. तेव्हां शेंवटीं त्यांनीं टुकटोड्यास जाण्याचा निश्चय केला, व त्याप्रमाणें त्या गांवचा मार्ग धरला. पंधरावे दिवशीं त्यांस ह्याच रस्त्यानें यांच्या खाणाखुणाप्रमाणें एक तरुण स्वार गेल्याची बातमी एका शेतकऱ्याकडून समजली. ती ऐकतांच त्यांस आनंद झाला, व त्या मार्गानें त्यांनीं आपले घोडे भरधांव फेंकले ते संध्याकाळचे सुमारास टुकटोडा गांवाबाहेरील सरकारी बागेंत जाऊन पोंचले. तेथें

त्यांची शिकार आयतीच त्यांच्या हातीं लागली. **क्रूरसिंगानें** भुलीच्या औषधाचें पाणी रुमालावर शिंपडून तो रुमाल **जगदेवाचे** तोंडावर टाकला, आणि त्यास उचलून ते लोक कसे पसार झाले वगैरे हकीकत पहिल्या भागांतच आमच्या वाचकांनीं वाचली आहे.

आतां **जगदेव टुकटोड्यास** कसा आला, तो रस्त्यांतच ह्या लोकांच्या तावडींत कां सांपडला नाहीं, याचा थोडक्यांत खुलासा करून हें प्रकरण संपवितों. **जगदेव** पूर्वदिशेनें निघाला होता हें मागेंच सांगितलें आहे. रस्त्यानें जातांना त्याचे मनांत अनेक तर्क येऊं लागले. शिवाय आपणावर हें अरिष्ट कोसळण्यास राणीचें कपटजालच कारण आहे, अशी त्याची खात्री झाली होती. तेव्हां कदाचित् ती आपल्यामागें मारेकरी पाठवील अशी त्यास भीति उत्पन्न झाली, आणि थोडा मार्ग क्रमल्यानंतर त्यानें मुद्दाम आडरस्त्यांत प्रवेश करून पश्चिमची दिशा धरली. त्यामुळें पूर्व दिशेनें सरळ गेलेल्या स्वारांस रस्त्यांत कोठेंच याचा थांग लागला नाहीं. थेट **पट्टण**च्या राजाकडे जाऊन तेथें कांहीं तरी नोकरी पत्करावी, आणि नंतर बेतबात पाहून आपल्या मातुश्रीस बोलावून घ्यावें, असा **जगदेवानें** विचार केला होता, आणि त्या बेतानें त्यानें तो मार्ग धरिला होता. परंतु त्याचा विचार पुन्हां फिरला; व जातां जातां आपल्या धर्मपत्नीस भेटून तिचा निरोप घेऊन नंतर **पट्टणास** जावें, ह्मणजे ती काळजी करणार नाहीं, असें त्यानें ठरविलें. व त्याप्रमाणें मजल दरमजल करीत १६ वे दिवशीं दोनप्रहरीं **टुकटोड्याचे** बागेंत येऊन

तो दाखल झाला. संध्याकाळपर्यंत येथेंच मुक्काम करून थोडासा अंधार पडला ह्मणजे शहरांत जाण्याचा त्याचा विचार होता; व त्याप्रमाणें उपहार करून तो त्या विस्तीर्ण आम्रवृक्षाखालीं निजला होता. पण इतक्यांत वरील स्वारांच्या टोळीनें तेथें येऊन त्याच्या तोंडावर भुलीच्या औषधानें भिजलेला रुमाल घालून त्यास उचलून नेलें होतें.

# प्रकरण ७ वें.

## अपूर्व भेटीचा योग.

प्रातःकाळचा समय झाला होता. पक्षी किलबिल किलबिल करूं लागले होते. सूर्यनारायण आपलीं आरक्त किरणें नुकतीच बाहेर काढीत होता. अशा समयीं टुकटोड्याच्या उत्तरेकडील निबिड अरण्यांत एका ठिकाणीं आलेल्या वृक्षांचे दाट गर्दीत कोणी आपापसांत कांहीं कुजबुज करीत होते. रस्त्यानें जाणाऱ्या मार्गस्थांच्या दृष्टीस पडूं नये म्हणून जरी त्या लोकांनीं एका बाजूस गर्द छायेची जागा शोधून काढलेली होती, तरी थोडें वळण घेऊन उभें राहणारास दोन झाडांमधून त्यांचा सर्व प्रकार दिसण्यासारखा होता. जमिनीवर उगवलेल्या बारीक गवतावर त्यांनीं एक घोंगडी अंथरली होती. त्यावर एक तरुण पुरुष निजलेला होता. त्याचे शेजारींच चौघे धिप्पाड व दांडगे ज्वान चिलमीचे झुरके सोडीत आपापसांत कांहीं बेत ठरवीत होते. हे लोक

कोण, काय, याचा खुलासा करण्याऐवजीं त्यांचें जें बोलणें चाललें आहे; तें आपण जरा आड उभें राहून ऐकूं, ह्मणजे त्यांची ओळख पटण्यास विलंब लागणार नाहीं. त्यांतील एकजण चिलमीचा झुरका सोडीत म्हणाला—'जुवो जमादारसाब, हवे तो अमो बधा थाकी गया छीये, माटे आजे अहिंथी नजीकज जे गामडूं आवे त्यां रहिये. अने पछी आगळ जईये.' त्यावर दुसरा म्हणाला—'ना, तेम करवाथी वेळा वही जसे, ने ( त्या निजलेल्या मनुष्याकडे बोट करून ) आ लफडूं गळें चोटी पडसे.' तिसरा ह्मणाला—'देखो, अभी उसकी धास्ती करनेकी जरूर नहीं. ओ तो अभी थंडा होनेवाला. ओर दो दीन दम पकडेगा फिर उसके जानकी आशा रखनेकी कुछ जरूर नहीं. आपना काम तो हो गया है.' त्यावर चौथा म्हणाला—'जमादारसाब, आपका कहना सच है. लेकीन ए बिचारेकूं ऐसे गफलतसे मारना अछा नहीं. मेरा कहना हय के इसका अंमल उतारके इसकू थोडा खानेकूं देना, ओर आपनी सब विना कहके उसकू दूरदेसकू निकल जानेकू कहना. उसकी ढाल, तरवार, फेंटा मंग लेके राणीसाबकू दिखाना; ओर कहेना के हमने उसकू मार डाला. ए बिचारेका नाहाक जान लेनेमे आपकू कुछभी फायदा नही होनेका.' त्यावर जमादार ह्मणाला—'येतो सच बात आहे, पण इस बातमें **पेमला** ने **गेमला**का क्या कहना है सो समझना चाहिये.'

**पेमला**—नारे बा, आ तो शेरनुं बच्चुं छे. एने हवे जगाडसो, तो तमारी बधानी मोत आव्या वगर रेहेज नहीं.

**गेमला**—जमादारसाब, पेमलानुं कहेवुं हाचुं छे. आ रजपूत लोक घणाज कडवा होय छे. तेमने गफलतथीज कबजामां लेवां जोईये. सामा थाय तो, बे चार जणने पुरा कर्या वगर रेहेज नहीं.

**जमादार**—तुमाराबी कहना बराबर है. लेकिन अब एहांसे जलदी कुच करना चाहिये. बखतपर पिछेसे कोन आ पोहोंचेगा.

याप्रमाणें यांचें बोलणें चाललें आहे, इतक्यांत घोड्यांच्या टांपा त्यांस ऐकूं आल्या. त्यासरसें त्यांचें काळीज धस्स झालें, व ते त्या झाडाच्या गर्दीतून पुढें होऊन पाहूं लागले. तों त्यांच्या दृष्टीस दोन घोडेस्वार अगदीं आपल्याजवळ येऊन ठेंपल्याचें दिसलें. ह्या वेळेस चांगलें फटफटीत उजाडलें असल्यामुळें त्यांचें स्वरूप ह्या लोकांच्या नजरेस स्पष्ट येण्यास अडचण पडली नाहीं. ते दोघेही अगदीं अल्पवयीं असून फारच देखणे होते. त्यांच्या चेहऱ्यावरून ते कोणी तरी राजपुत्र असावेत असें दिसत होतें. दोघांनींही आपल्या डोक्यास जरीकांठी रुमाल बांधले होते, व त्यांत त्यांचे कान झांकून गेले होते. त्यांत जो वयानें वडील दिसत होता, त्यानें आपल्या अंगांत हिरव्या रंगाचा किनखापी अंगरखा घातला होता; व दुसऱ्यानें पांढरा जाळीदार अंगरखा घातला होता. दोघांनींही आपल्या पाठीवर मोठाल्या ढाली बांधून डावे बाजूस तरवार व उजवे बाजूस तीरकमठा लटकविला होता, आणि हातांत एक एक भाला घेतला होता. ते स्वार बालस्वरूपी असून नाजूक असल्याचें त्यांचे पहाण्यांत जेव्हां आलें, तेव्हां त्यांच्या मनां-

तील भीति नष्ट होऊन चावटपणा करण्याकरितां ते चौघे-जण मुद्दाम त्या उभयतां घोडेस्वारांच्या समोर गेले; व 'तुम कोण हो? किधर भाग जाते हो? तुमारे पास क्या है, सो इधर रख देव.' असें ते दरडावून म्हणाले.

ह्या चौघां हरामखोरांस पहातांच त्या दोघांही तरुण स्वारांनीं एकमेकांस खुणा केल्या. त्यांच्या चेहऱ्यांत लागलाच फरक झाला. जणू काय आपले इच्छित शत्रू अनायासेंच आपल्यापुढें आले, असें त्यांस वाटल्याचें दिसून आलें. एवढा वेळ जे त्यांचे चेहरे कोमल व मोहक दिसत होते, ते एकदम आरक्त होऊन क्रूर दिसूं लागले. त्यांपैकीं ज्याचे अंगांत हिरवा किनखाबी अंगरखा होता, त्या तरुण स्वारानें आपल्या घोड्यास टांच मारून तो एकदम जमादाराचे अंगावर घातला, व आपल्या हातांतील भाला नेम धरून अशा आवेशानें फेंकून मारला कीं, त्याचा प्राणच जावा. परंतु जमादारानें ताडकन उडी मारल्यामुळें नेम किंचित् चुकून त्याच्या डाव्या मांडींत भाल्याचें फळ शिरलें, व तेथून धो धो धो रक्त वाहूं लागलें. जमादाराची ही स्थिति पाहतांच ते तिघे आपलीं शस्त्रें घेण्याकरितां झाडींत धाऊं लागले. पण इतक्यांत दुसऱ्या तरुण स्वारानें कमठ्यास तीर चढवून तो त्यांवर सोडला. सूं-सूं करीत निघालेला तो तीर **पेमला**च्या पाठींत बसून छातीवाटे पार निघून गेला, व **पेमला** धाडकन जमिनीवर आपटला. इकडे तो तरुण स्वार जमादारावर पुन्हा तरवारीचा वार करणार, इतक्यांत त्यानें बाजूच्या उंच टेकड्यावरून खालील खिंडारांत ताडदिशीं उडी मारली, त्यामुळें त्याचा

बचाव झाला. आपल्या दोघा मित्रांची ही स्थिति पाहतांच **दयाळसिंग** व **गेमला** यांची पांचावरच धारण बसली; त्यांचें सर्व अवसान नाहींसें होऊन त्यांचे पाय लटलट कांपूं लागले; व आपल्या मित्राच्या बचावाच्या सर्व गोष्टी सोडून ते जीव घेऊन त्या झाडींतील आडव्या तिडव्या वाटेनें पळत् सुटले. झाडी अतिशय दाट असल्यामुळें ह्या तरुण स्वारांस त्यांचा पाठलाग करितां येईनासा झाला. एक हरामखोर ठार झाला, दुसऱ्यास बराच मार लागला आहे, पण दोघे अजीबात पळाले, ह्मणून त्या तरुण स्वारांस थोडें वाईट वाटलें. तथापि विशेष त्रास न पडतां आपला अर्धाअधिक कार्यभाग शेंवटास गेला, ह्मणून त्यांस बराच आनंदही झाला. व त्यांनीं त्या दोघांचा पाठलाग करण्याचा विचार लगेच सोडून ते आपल्या इष्ट वस्तूचा शोध करूं लागले.

तो हिरव्या अंगरख्याचा तरुण स्वार ह्मणाला—बाई **मालती**, त्यांची स्वारी इथं कुठं दिसत नाहीं! ह्या मेल्यांनीं त्यांचं कांहीं बरं वाईट तर केलं नसेलना?

**मालती**—ताईसाहेब, आपण अशा घाबरूं नका. बहुशा ह्या दाट झाडीच्या गर्दीतच ते आपणांस सांपडतील. (थोडें न्याहाळून पाहिलेसें करून) ते पहा, त्या झाडांच्या पलीकडे घोड्यांसारखं कांहीं दिसत आहे. तेथेंच बहुतकरून आपली इष्ट वस्तु असेल.

असें ह्मणून ते दोघेही वेशधारी तरुण स्वार त्या ठिकाणीं हळू हळू आपले घोडे घेऊन गेले; तों—एका बाजूस चार घोडे झाडांच्या बुंधांशीं काढणींनीं बांधले आहेत; मध्य-

भागीं थोडी खुलावट जागा असून, तेथें एका घोंगडीवर एक मनुष्य निजलेला आहे; त्याचें सर्वांग शुभ्र वस्त्रानें झांकलेलें आहे; घोंगडीच्या बाजूस एक लहानशी धुनी पेटविलेली असून जवळच एक मातीची चिलीम, एक मळकें फडकें, एक पाण्यानें भरलेला तांब्या, अशा जिनसा असून थोडीशी तंबाखू सांडलेली आहे; एका बाजूस घोड्यांवरील खोगिरें, गाठोडीं व इतर कांहीं सामान आणि ढाली, तरवारी, तीरकमठे, भाले अशीं शस्त्रें पडलेलीं आहेत;— असें त्यांच्या दृष्टीस पडलें. त्या निजलेल्या मनुष्यास पाहतांच त्या हिरव्या अंगरख्याच्या तरुण स्वारानें झटकन घोड्यावरून खालीं उडी टाकली, व आपला घोडा एका झाडाच्या फांदीशीं बांधून तो लगबगीनें त्या निद्रिस्त मनुष्याजवळ गेला. त्यानें त्याच्या अंगावरील तें शुभ्र वस्त्र हळूच एका बाजूस केलें; तों त्या निद्रिस्त मनुष्याचें तोंड एका पांढऱ्या रुमालानें गच्च बांधलें असल्याचें त्यास दिसून आलें. इतक्यांत तो दुसराही तरुण स्वार आपला घोडा झाडास बांधून तेथें आला, व तो प्रकार पाहून 'हर हर! मेल्यांनीं महाराजांची काय ही दशा केली' असें ह्मणाला. 'ही वेळ दुःख करण्याची नाहीं. अगोदर यांस सावध करून येथून नेण्याची तजवीज केली पाहिजे.' असें दुसऱ्यानें उत्तर दिलें. दोघांनीं मिळून त्या निद्रिस्त मनुष्याच्या तोंडावरचा रुमाल सोडला. त्या रुमालास एक प्रकारचा आंबूस व उग्र वास येत होता; व त्या निद्रिस्त मनुष्याचें तोंडही नुकतेंच हिरवें पडत चाललें होतें. हा प्रकार पाहतांच त्या रुमालावर कांहीं तरी विषारी पदार्थाचा प्रयोग

केलेला असावा, अशी त्या तरुण स्वारांची खातरी झाली. त्यांनीं तो रुमाल बाजूस फेंकून दिला. एकानें तेथील पाण्यानें भरलेला तांब्या उचलून आणिला, व निद्रिस्त स्वाराचें तोंड स्वच्छ धुवून ते दोघेही आपल्या कंबरेचे शेले सोडून त्यांच्या पदरांनीं त्यास वारा घालूं लागले. त्या हिरव्या अंगरख्याच्या तरुण स्वारानें त्या निद्रिस्त पुरुषाचें डोकें आपल्या मांडीवर उचलून घेतलें; व डोळ्यास वरचेवर पाणी लावावें, मधून मधून थोडें तोंडांतही घालावें, शेल्यानें पुन्हा: त्याचें तोंड पुसून वारा घालावा, असा त्यानें एकसारखा क्रम चालविला. त्याचे डोळे एकसारखे त्या निद्रिस्त मनुष्याच्या मुखाकडे वेधून गेले होते. ह्याप्रमाणें बराच वेळ गेल्यानंतर, एकादा मनुष्य गाढ निद्रेंतून हळू हळू जागा होतो, तशा प्रकारें त्या निद्रिस्त पुरुषाचें चलनवलन होऊं लागलें. इतका वेळपर्यंत छातींतील धुगधुगी शिवाय आणि हातांच्या नाडयांशिवाय जीवंतपणाची साक्ष देण्यास ज्याचें एकही इंद्रिय सावध नव्हतें, त्याचीं सर्व इंद्रियें आतां चलनवलन करूं लागलेलीं पाहून, त्या दोघां तरुण स्वारांस आनंद होऊं लागला, व ते अधिकाधिक आपले उपचार करूं लागले. थोड्या वेळानें त्या निद्रिस्त तरुण पुरुषानें आपले कमलासारखे तेजस्वी नेत्र उघडले, आणि आपणाजवळ बसलेल्या त्या दोघां तरुणांकडे न्याहाळून पाहिलें. उठून बसण्याकरितां तो अवसान करूं लागला; पण त्याच्या मस्तकावर त्या रुमालांतील विषाचा झालेला अंमल पुरता उतरला नसल्यामुळें त्यास लगेच घेरी आली, व त्यानें आपले डोळे पुन्हा मिटले. हा

प्रकार पाहतांच त्या दोघां तरुणांनीं पुन्हा त्याच्या मस्तकावर गार पाणी शिंपडून थोडेसें तोंडांत घातलें आणि वारा घालणें सुरू केलें. थोड्या वेळानें तो निद्रिस्त पुरुष चांगला शुद्धीवर आला. त्यानें आजूबाजूस नीट न्याहाळून पाहिलें, व डाव्या कुशीस वळून, उजव्या कोंपराचा भार जमिनीवर देऊन तो हलकेंच उठून आपल्या मनाशीं विचार करीत स्तब्ध बसला. ज्या तरुणानें त्याचें डोकें आपल्या मांडीवर घेतलें होतें, तो चटकन त्या पुरुषाच्या पाठीसरसा झाला. त्यानें आपला उजवा हात त्या पुरुषाच्या पाठीमागून बगलेंत नेवून त्याचा त्यास टेका दिला, आणि डाव्या हातांत शेल्याचा पदर घेऊन त्यानें तो वारा घालूं लागला. कांहीं वेळानें तो पुरुष चांगला हुशार झाला; व त्यानें आपल्या जवळील तरुणास ‘आपण कोण? येथें कां आला? मजवर इतकें प्रेम दाखवितां याचें कारण काय?’ असे प्रश्न केले. त्यांवर ‘आह्मी मार्गस्थ आहोंत; आपणही आमच्यासारखेच प्रवासी असल्याचें दिसून आल्यावरून आह्मी आपणाजवळ आलों, व आपणास आमच्याबरोबर घेऊन जावें या हेतूनें आपल्या निद्रेचा भंग केला, त्याबद्दल क्षमा असावी’ असा त्या तरुणानें जबाब दिला.

ह्या जबाबावरून व आजूबाजूच्या देखाव्यावरून आपण ज्या बागेंत निजलों होतों, ती जागा ही नसून आपण एका अरण्यांत आहोंत, असें त्या पुरुषाच्या लक्षांत आलें. तो आश्चर्यभरीत होऊन ह्मणाला—‘मी ज्या ठिकाणीं निद्रिस्त झालों होतों, ती जागा ही नाहीं. माझा सारंगा घोडा येथें कोठें दिसत नसून येथें हे सहा घोडे कोणाचे

बांधले आहेत? माझ्या उशाशीं ठेविलेली माझी प्यारी तरवार व ढालही कोठें दिसत नाहीं! हा प्रकार काय आहे? कृपा करून सांगितल्यास मजवर महत् उपकार होतील.'

तो तरुण स्वार ह्मणाला—यांतला खरा प्रकार काय आहे तो आह्माला माहीत नाहीं. परंतु आपण आमच्याबरोबर आल्यास, आमचें गांव येथून जवळच आहे, तेथें आपल्या ह्या सर्व गोष्टींचा खुलासा समजूं शकेल.

'ठीक आहे. पण माझ्या अंगांत शक्ति मुळींच नाहीं. अशी स्थिति कां झाली तें कांहींच समजत नाहीं. शिवाय माझा घोडाही नाहीं. तेव्हां माझ्याच्यानें आपल्या गांवापर्यंत कसें चालवत येववेल?' असें तो पुरुष ह्मणाला.

'आपण कांहीं काळजी करूं नका. ह्या सहा घोड्यांपैकीं जो पसंत पडेल त्यावर आपण बसा. इच्छा असल्यास येथें कांहीं फळें मिळाल्यास तोडून आणतों, त्यांचें सेवन केल्यास आपल्यास बरीच हुशारी येईल.'—असें त्या तरुणानें उत्तर दिलें, व बाजूस बसलेल्या आपल्या मित्रास कांहीं तरी खाण्याचे पदार्थ आणण्याबद्दल इशारा केला. त्याचा सोबती लागलीच उठला आणि ज्या ठिकाणीं त्या चौघा स्वारांचीं बोचकीं पडलीं होतीं तेथें गेला. तीं विसकडून पहातां त्यांत त्यास एक पितळेचा डबा सांपडला. ह्या डब्यांत कांहीं मुगदळाचे लाडू व एका पानांत गुंडाळलेला लोणच्याचा आंबा होता. त्यांतील थोडें लोणचें व दोन लाडू एका पानावर घेऊन ते त्यानें आपल्या मित्रास आणून दिले, व जवळच वाहत असलेल्या झऱ्यांतून तांब्या भरून पाणी आणिलें. त्या तरुण पुरुषानें मुखमार्जन करून त्यांतील अर्धा लाडू खा-

ह्या, व वर तो थोडेसें पाणी प्याला. त्यायोगें त्यास बरीच हुशारी आली. नंतर ह्या आपल्या नवीन तरुण मित्रांच्या विनंतीप्रमाणें तो एका घोड्यावर स्वार झाला. ज्यानें आपल्या अंगांत पांढरा जाळीदार अंगरखा घातला होता, त्या तरुणानें तेथें पडलेलें एक ओळखीचें गाठोडें उचलून घेतलें, व हे तिघे स्वार टुकटोड्याकडे आपले घोडे हळू हळू फेंकीत चालले.

रस्त्यानें चालतांना त्या हिरव्या अंगरख्याच्या तरुणानें आपला घोडा त्या पुरुषाच्या डाव्याबाजूनें बरोबर चालविला होता, व त्याचा मित्र ह्या दोघांच्यामागून आपला घोडा चालवीत होता. तो तरुण पुरुष त्या हिरव्या अंगरख्याच्या तरुणाकडे वरचेवर न्याहाळून पहात असे; व फारा दिवसांनीं एकादा ओळखीचा चेहरा पहाण्यांत यावा, पण त्याची खूण पटूं नये; असा प्रकार झाला ह्मणजे जशी एकाद्या मनुष्याची स्थिति होते, तशाप्रकारें त्याची स्थिति झालेली दिसत होती. तो वरचेवर आपल्या मनाशीं विचार करी, त्या रूपसंपन्न तरुणाकडे न्याहाळून पाही; त्याची व याची दृष्टादृष्ट झाली कीं, तो आपली मान खालीं घाली: असा प्रकार साऱ्या रस्त्यानें चालला होता. असो. अशा विचारांतच मार्ग क्रमीत दोनप्रहरच्या वेळेला ते तिघेही स्वार टुकटोड्याच्या बागेच्या पश्चिम दरवाज्याशीं येऊन ठेपले. तेथें दोघी स्त्रिया उभ्या होत्या. त्यांस ह्या वेषधारी तरुणानें खूण करितांच त्या लगबगीनें धांवत गेल्या. त्यांच्या मागोमागच त्या तिघांनींही आपले घोडे चालविले. थोडेसें वळण घेतल्यानंतर ते एका वेलीच्या

ताटव्याशीं येऊन ठेपले. तेथील दार उघडेंच होतें. त्या वाटेनें त्यांनीं प्रवेश केल्यानंतर ते एका जाळीदार जलमंदिराजवळ येऊन पोंचले. तेथें ते दोघे तरुण स्वार आपापल्या घोड्या-वरून खालीं उतरले, व त्यांनीं ह्या आपल्या पाहुण्यास खालीं उतरण्यास सांगितलें. त्या मंदिरांतून तीन स्त्रिया बाहेर आल्या, व त्या तिन्ही घोडयांच्या लगामा धरून घोडे घेऊन तेथून निघून गेल्या. जलमंदिरांतील मुख्य दिवा-णखाना वेगवेगळ्या वस्तूंनीं सुरेख शृंगारलेला होता, तेथें हे तिघे गेले. त्या उभयतां तरुणांनीं ह्या पाहुण्यास, मध्य-भागीं एक नकशीदार चंदनाचा चौरंग ठेवला होता, त्यावर बसण्यास विनंती करून, दोघेही चटकन शेजारच्या खोलींत शिरले.

हा पाहुणा ज्या ठिकाणीं बसला होता, त्या समोरच चांदीच्या नकशीदार चौकटींत एका राजपुत्राची तसबीर बसविलेली होती, त्याकडे याची नजर गेली. ती तसबीर पहातांच तो एकदम चपापल्यासारखा झाला. तो आपल्या मनाशींच ह्मणाला—'काय माझी तसबीर! आणि ती येथें कशी? **वीरमती**कडे लग्नापूर्वी माझी तसबीर काढून पाठविली होती असें मला स्मरतें. व तीच ही असावी! (थोडा वेळ न्याहळून पाहून) निःसंशय तीच ही. पण ही येथें कोणीकडून आली? हा **वीरमती**चाच महाल नसे-लना? खास तिचाच हा महाल. ही पहा, मीं तिला प्रेमानें काढून दिलेली तिची तसबीर येथें लटकत आहे. पण हे दोघे तरुण पुरुष येथें कोठून आले? त्यांनीं मला येथें काय हेतूनें आणलें? **वीरमती**चा व यांचा काय संबंध असावा?'

अशा विचारांत त्याचें मन गर्क होऊन गेलें. त्याच्या मनांत एकामागून एक अनेक कल्पना येऊं लागल्या. होतां होतां त्याच्या मनानें पक्कें ठरविलें कीं, 'आपला बऱ्याच दिवसांचा वियोग सहन न झाल्यामुळें **वीरमतीनें** आपल्या ऐषआरामाकरितांच हे दोघे तरुण ज्वान ह्या जलमंदिरांत बाळगले असावेत. एरव्हीं स्वतःच्या घरासारखे हे येथें मालकीनें कसे वागते? निःसंशय येथें कांहीं तरी पाप आहे.'

अशा प्रकारें त्याच्या मनाचा ग्रह होतांच त्याचे डोळे रागानें आरक्त झाले, अंग थरथरा कापूं लागलें, व त्या भरांत दांतओंठ खाऊन तो आपणाशींच पण मोठ्यानें ह्मणाला—'हा दुष्टे, तुला मी महान् पतिव्रता समजत होतों, पण तूंही शेंवटीं जारिणी निघालीस! तुझ्या भेटीकरितां मी मुद्दाम वांकडा रस्ता करून येथें आलों, ही केवढी मोठी चूक केली? तुझें पापकर्म माझ्या दृष्टीस पडूं नये, ह्मणून परमेश्वरानेंच मला दूर नेलें असतां, तेथें तुझ्या जारांनीं येवून पुन्हा तुझ्या महालांत आणावें, व तुमचा ऐषआराम पहाण्याचें माझ्या नशिबीं यावें, त्यापेक्षां तुझा अथवा माझा बळी पडलेला काय वाईट? ठीक आहे! मी येथें आलों, तें विधात्यानेंच तुमच्या पापाची झडती घेण्यास पाठविलें आहे! करा आतां मजा, किती करितां ती?' असें बोलून तो त्या चौरंगावर पुन्हा विचार करीत बसला.

**जगदेव** विचारांत इतका गर्क होऊन गेला होता कीं, त्यास आपल्या मागें कोण येऊन उभें राहिलें याचें सुद्धां भान राहिलें नाहीं. बराच वेळ अशा प्रकारें विचार के-

त्यानंतर तो पुन्हा एकदम मोठ्यानें ह्मणाला—'**वीरमती,** खरोखर तूं मजशीं कपट केलेंस!' इतके शब्द त्याच्या तोंडून पुरे होत आहेत तोंच—' महाराजांनीं याबद्दल दासीस क्षमा करावी '—असा पाठीमागून त्यास जबाब मिळाला. त्यासरसें **जगदेव** एकदम दचकला, व त्यानें मागें वळून पाहिलें. तों एक तरुण सुंदरी आपल्यामागें तोंडावरून् शालूचा बुरखा घेऊन खालीं मान घालून उभी असल्याची त्याच्या दृष्टीस पडली. तिचा चेहरा जरी त्याच्या दृष्टीस पडला नाहीं, तथापि ही **वीरमतीच** असावी, असें त्यास खास वाटलें. आणि ' एवढा वेळ आपण जी बडबड केली ती इनें ऐकली नसेलना ? तेवढ्यावरून तिनें आपल्या मनाचीही परीक्षा केली नसेलना ? आपण पूर्ण तपास केल्यावांचून रागाच्या भरांत अनुचित गोष्ट केली,' असे विचार एकदम त्याच्या मनांत उभे राहिले. तथापि त्यानें लगेच आपलें मन आवरून व जसा एकादा अनोळखी मनुष्य असतो, तसें मिष करून तो ह्मणाला—' हे सुंदरी तूं कोण आहेस ? '

' जिनें आपणाशीं कपट केलें, तीच ही आपल्या चरणाची दासी आहे '—असें तिनें उत्तर दिलें.

' काय ? **वीरमती** ?' असा त्यानें पुन्हा प्रश्न केला.

'मीच ती महाराज' असें ह्मणून तिनें आपल्या तोंडावरील बुरखा एकीकडे सारून ती आलिंगन देण्याकरितां पुढें सरली. लागलीच **जगदेवा**नेंही आपले हात पुढें करून तिला आलिंगन दिलें; व दोघेही त्या चौरंगावर बसले. **जगदेवा**चे मनांत भरलेलें संशयरूपी पि-

शाच गेलें नव्हतेंच. त्यानें आपला पगडा पूर्णपणें वसविलेला असल्यामुळें **जगदेव** पुन्हा विचारांत मग्न झाला.

'फार दिवसांनीं भेट झाली, ह्मणजे आनंदानें सुखदुःखाच्या गोष्टी बोलायच्या, असें असतां यांचें मन वेगळ्याच विचारांत मग्न झालेलें दिसतें. यावरून आपण ज्या वेषानें यांस येथें आणलें, त्याबद्दलच यांच्या मनांत कांहीं तरी भलते विचार आले असावेत, व त्यामुळेंच मघापासून हे विचारांत पडले असावेत' असें **वीरमतीनें** तेव्हांच ताडलें. आणि हा संशय यांचे मनांत फार वेळ राहूं देणें बरें नाहीं, असें मनाशीं ठरवून, ती ह्मणाली 'महाराजांचं चित्त कसल्या विचारांत इतकं मग्न झालं आहे ?'

'ज्या तरुण स्वारांनीं मला येथें आणलें, ते जर इतक्यांत आले व त्यांनीं आपणा उभयतांस असें एकांतांत बसलेलें पाहिलें, तर त्यांस वाईट वाटेल; व याबद्दल ते मला दोष देतील. ह्मणून येथें असें बसावें, अथवा उठून जावें, याचा मी विचार करीत आहे'—असें **जगदेवानें** उत्तर दिलें.

'यावरून त्या तरुण स्वारांस महाराजांनीं ओळखलें नाहींसं वाटतं ?'—असा **वीरमतीनें** पुन्हा प्रश्न केला.

'त्यांची माझी पूर्वीं कधींच भेट झालेली नाहीं. व त्यांनीं आपलीं नांवें सुद्धां मला सांगितलीं नाहींत, मग कसें ओळखणार ?'—असें **जगदेव** ह्मणाला.

'मोठंच आश्चर्य ! ज्याचा आपला जन्माचा ऋणानुबंध परमेश्वरानं बांधून दिला; ज्याच्या सर्व सुखाचे व जीवित्वाचे आधारस्तंभ आपण आहांत; अशा आपल्या मि-

त्रास आपण इतक्यांतच विसरलां? तर पुढं कसं होणार?' असें **वीरमती** ह्मणाली.

**जगदेव**—काय, त्यांचा माझा जन्माचा ऋणानुबंध!! तुझें हें संदिग्ध बोलणें मला मुळींच समजत नाहीं.

**वीरमतीनें** उत्तर दिलें—'ठीक आहे. महाराजांची प्रत्यक्षच खात्री करून देतें.' असें ह्मणून ती चटकन उठून खोलींत गेली, व आंतील स्त्रीचा पोषाख कायम ठेवून, वरून पूर्वीचा पुरुषवेश धारण करून, मालतीसह ती दिवाणखान्यांत आली व **जगदेवास** वंदन करून त्या दोघी उभ्या राहिल्या. **वीरमतीच्या** व या तरूण स्वाराच्या चेहऱ्यांतील सारखेपणा पाहून **जगदेव** पुन्हा विचारांत पडला. तेव्हां **वीरमतीनें** 'महाराजांस या दासीची ओळख पटत नाहीं वाटतें?' असें बोलून, **जगदेवासमक्ष** आपल्या डोक्यावरील रुमाल, अंगांतील तो हिरवा किनखाबी अंगरखा व पायांतील पायजमा काढून टाकला, व लागलीच आलिंगन देण्यास ती पुढें सरसावली. पण **मालतीनें** आपला पोषाख उतरला नसल्यामुळें ह्या तरूण मुलासमक्ष आलिंगन देणें न आवडून **जगदेव** थोडा मागें सरकला. असा प्रकार पहातांच **वीरमतीनें मालतीस** पुरुषवेश काढून टाकण्याचा इशारा केला. त्याबरोबर तिनेंही आपला पोशाख काढून टाकला, व पदरसावरून ती खालीं मान घालून उभी राहिली. हा एकंदर प्रकार पहातांच **जगदेवाचे** मनांत जें संशयरूपी पिशाच्च शिरलें होतें, तें एकदम नाहींसें होऊन आपल्या पत्नीच्या निर्मळ वर्तनाचा प्रकाश त्याच्या हृदयांत चटकन पडला.

तो एकदम पुढें सरला व त्यानें **वीरमतास** मोठ्या प्रेमानें आलिंगन देऊन तिच्या अधरोष्ठाचें किंचित् पान केलें. उभयतां प्रेमांत आलेलीं पाहून **मालती** चटकन तेथून निघून गेली. **जगदेवानें वीरमती**च्या गळ्यांत हात घालून तिला आपल्या मांडीवर बसविलें, आणि तिच्या हनवटीस हात लावून तो ह्मणाला–' प्रिये, मी तुझ्या भेटीकरितां कालच येथें आलों होतों; आणि थोडा वेळ विश्रांति घेऊन रात्र पडली, ह्मणजे शहरांत जावें, व तुझी एकांतीं भेट घ्यावी, असा विचार करून गांवाबाहेरील एका बागेंत निजलों होतों. पण पुढें त्या अरण्यांत कसा गेलों व तेथें तुह्मी दोघी पुरुषवेशानें कशा आलां, तें कांहींच समजत नाहीं ! '

**वीरमती** ह्मणाली–' महाराज ज्या बागेंत निजले होते, तोच हा बाग. **धारानगरी**हून आल्यापासून मी आपला मुक्काम येथेंच ठेवला आहे; ( समोरील **जगदेवाचे** तसबिरीकडे बोट करून ) व ह्या मुर्तीकडे पाहून मी आपला वेळ इथं घालवीत आहे. काल तिसरे प्रहरीं आपण बागेच्या उत्तरेकडील दरवाजाशीं झाडाखालीं निद्रिस्त असल्याचं वर्तमान दासीनं मला सांगतांच मी तिथं आलें होतें; व आपण जागे व्हाल ह्मणून मार्गप्रतीक्षा करीत समोरील एका झाडाच्या आड मैत्रिणीसह उभी होतें. इतक्यांत चार धिप्पाड स्वार तिथं आले, व त्यांनीं आपणास उचलून नेलं. त्या वेळींच मी त्यांचा सूड घेणार होतें, परंतु काय करूं, मी शस्त्रहीन असल्यामुळें माझा उपाय चालला नाहीं. असा प्रकार माझ्या डोळ्यासमक्ष झाला

असतां मजकडून कांहींच साह्य झालं नाहीं, याबद्दल मला अतिशय वाईट वाटलं. क्रोध व दुःख यांनीं माझं हृदय भडकून गेलं. सर्वांगास कंप सुटला व लागलीच मी बेशुद्ध होऊन पडलें. माझ्या मैत्रिणीनं मला जेमतेम हुशार करून इथं आणलं; परंतु चैन लागेना. शेवटीं पुरुषवेश घेऊन त्या चोरांचा पाठलाग करावा असा निश्चय करून, मी व **मालती** अशा दोघीजणीं उत्तर रात्रीस घोड्यांवर स्वार झालों, तों पहाटेच्या सुमारास आपण ज्या ठिकाणीं निजलां होतां, त्याजवळच ते चारी हरामखोर आयतेच आह्मासमोर आडवे आले. त्यांच्याजवळ शस्त्रें वगैरे नसल्यामुळं आपल्या चरणकृपेंकरून त्यांचं पारिपत्य करण्यास वेळ मुळींच लागला नाहीं. एक तर तिथेंच ठार झाला. एकाच्या पायास भाल्यानें चांगलीच जखम झाली आहे. त्यासही ठार केलें असतें; पण बाजूच्या उंचवट्यावरून त्यानें खालील खिंडींत उडी मारल्यामुळें तो बचावला गेला. तथापि त्यांतून तो जिवंत राहील, ही आशा नको. पण दोघे मात्र पळून गेले. त्यांचा पाठलाग करण्यास आह्मास साधन मिळालं नाहीं. अशा प्रकारें चौघांची वाताहत झाल्यावर आह्मी आपल्या शोधास लागलों. आपलं मुखकमल त्या हरामखोरांनीं विषारी रुमालानं गच्च बांधलं होतं. तें सोडून पहातां आपल्या मस्तकावर त्याचा अंमल बराच बसला असल्याचं दिसून आलं. मग मी व **मालती** मिळून बराचवेळ वारा घालून पाण्याचे उपचार केल्यानं आपण सावध झालां. झालं, पुढं आपण इथं आलों. जगदंबेची पूर्ण कृपाच, ह्मणून आजचा

भयंकर प्रसंग टळला, व आपले चरण ह्या दासीच्या पुन्हा दृष्टीस पडले.' असें बोलत असतां **वीरमतीचा** कंठ भरून आला, व तिच्या नेत्रावाटे टपटपा अश्रुबिंदु गळूं लागले.

**जगदेवानें** आपल्या शेल्यानें तिचे नेत्र पुसून सांत्वन केलें; व बोलण्याचा ओघ फिरवून तो ह्मणाला—पण प्रिये, माझा सारंगा घोडा आणि प्रिय तरवार कोठें आहे?

'आपला घोडा आणवून ठाणावर बांधला आहे; व आपल्या तरवारीसह एकंदर हत्यारांचं गाठोडं करून ते हरामखोर घेऊन गेले होते, तें गाठोडं **मालती** बरोबर घेऊन आली आहे.' असें **वीरमतीनें** डोळे पुशीत उत्तर दिलें व ती ह्मणाली—'पण आपण असे एकटेच बाहेर पडण्याचं काय कारण झालं? दादांनीं 'मला पाठवून देऊं कां' ह्मणून पत्र पाठविलं होतं. त्याचा जबाब—आपण रागानं कुठं निघून गेलां आहांत, करितां तूर्त पाठवूं नये—असा आला. त्या दिवसापासून माझा जीव अगदींच उडून गेला होता. आतां बाई, मी आपणास सोडून कधींच राहणार नाहीं. हो पण, आपल्या निघण्याचं कारण मला समजलं पाहिजे.'

पत्राची हकीकत ऐकून **जगदेवास** फारच आश्चर्य वाटलें, तथापि त्यानें तसें कांहीं दिसूं न देतां आपल्या निघण्याचें एकंदर कारण **वीरमतीस** सांगितलें. तो ह्मणाला—'ज्या चौघा हरामखोरांनीं मला मारण्याकरितां उचलून नेलें होतें, ते तरी आमच्या **वाघेली** मासाहेबांनींच पाठविले असावेत. असो, आतां मला येथें फार दिवस राहतां येत

नाहीं. येथें राहिल्यानें मजपासून तुझ्या भावास व तुलाही त्रास होण्याचा संभव आहे. कोठें तरी लांबच्या मुलखांत जाऊन मला माझ्या प्रारब्धाची प्रचीति पाहिली पाहिजे.'

**जगदेवाच्या** तोंडचे हे शब्द ऐकून **वीरमतीस** वाईट वाटलें. ती ह्मणाली—आपला जर जाण्याचाच निश्चय झाला आहे, तर मलाही आपणाबरोबर घेऊन चलावें. आपला विरह आतां मला क्षणमात्रही सहन होणार नाहीं.

**जगदेव**—असा भलताच आग्रह धरूं नकोस. प्रवासांत अनेक प्रकारचीं संकटें येणार, तीं तुझ्याच्यानें कशीं सहन होतील? तूं येथेंच हुशारीनें रहा. मी लवकरच तुला नेण्याचा विचार करीन.

**वीरमती**—तें कांहीं नाहीं. आपण जिकडे, तिकडे मी. आपण प्रवासांत हवीं तशीं संकटं सोसावीं, आणि आम्ही खुशाल ऐषआराम भोगावा, हा कुठला न्याय? मी तर कधींही आपणास सोडून राहणार नाहीं. आपणाबरोबर असतां हजारों संकटं आलीं, तरी मला किंचित्‌ही दुःख होणार नाहीं; परंतु आपणाविरहीत या महालांतील एकंदर ऐषआराम मला अग्निज्वालाप्रमाणें भाजून टाकतील?

**जगदेव**—प्रिये, काय हा दुराग्रह? तुझ्या ह्मणण्यास रुकार देण्यास मला मोठेंच जोखमेचें वाटतें; व या गोष्टीस तुझा बंधुही अनुमत देणार नाहीं.

**वीरमती**—त्याची काळजी आपणास नको. आपण आल्याचं वर्तमान दासीबरोबर सांगून पाठविलं आहे. तेव्हां दादाची स्वारी इतक्यांत इथं येईल. त्यांची परवानगी आ-

पणासमक्षच घेतें, ह्मणजे तर झालंना? बरं पण, चला आपण स्नान करून जेवून घ्या. वेळ फार झाला आहे.

**जगदेव**—ठीक आहे. **वीरज** महाराज आले, ह्मणजे त्यांच्या विचारानें ठरवूं. मला तर खास वाटतें कीं, त्यांस माझेंच ह्मणणें विशेष पसंत पडेल.

'कसंही झालं तरी मी आपणाबरोबर येणार; हें मात्र खास आहे.' असें **वीरमतीनें** उत्तर दिलें; व तीं दोघेंही उठून स्नानास गेलीं. **जगदेवाच्या** अंगास सुगंधी तेलें व उटणीं **वीरमतीनें** स्वतः लावून त्यास स्नान घातलें. नंतर दासींनीं **वीरमतीस** स्नान घातलें. मधल्या घरांत रांगोळ्या घालून ताटांची सर्व तयारी करून ठेवली होतीच. **जगदेवानें** भोजन केल्यानंतर **वीरमतीनें** त्यास गोविंदविडा दिला, व आपण पतीच्या ताटावर बसून भोजन केलें. भोजनोत्तर उभयतां दिवाणखान्यांत परस्परांच्या सुख-दुःखाच्या गोष्टी सांगत बसलीं. इतक्यांत एका दासीनें येऊन **वीरज** महाराज आल्याचें वर्तमान सांगितलें. तें वर्तमान ऐकतांच **वीरमती** चटकन उठून आंतल्या खोलींत गेली; व **जगदेव** त्यांस भेटण्याकरितां सामोरा गेला. दोघांनीं पर-स्परांस आलिंगन दिलें, व हातांत हात घालून ते दिवाण-खान्यांतील चौरंगावर येऊन बसले. थोडा वेळ इकडील ति-कडील क्षेमकुशल गोष्टी झाल्यानंतर, एकदम सड्यास्वारीनें घरांतून निघणाचें कारण, **वीरज** राजानें **जगदेवास** विचा-रलें. तेव्हां त्यानें खरें कारण लपवून ठेवून, देशोदेश पहा-ण्याच्या हेतूनें निघालों आहे, व वडील कदाचित् आज्ञा

देणार नाहींत, ह्मणून त्यांसही हें वर्तमान कळविलें नाहीं, असें सांगितलें.

'प्रवासांत एकटें जाणें बरें नाहीं. आपल्या इतमामाप्रमाणें थोडेसें तरी लष्कर बरोबर ठेवावें, आणि आपल्या पत्नीसही बरोबर घेऊन जावें,' असें **वीरजराजा** ह्मणाला.

'आपल्या ह्मणण्याप्रमाणें मीं केलें असतें; पण कित्येक अडचणीमुळें तसें मला करितां येत नाहीं,' असें **जगदेवा**नें उत्तर दिलें.

**वीरमती** दाराच्या आड उभी राहून उभयतांचें बोलणें ऐकत होती. ती **जगदेवा**चें वरील भाषण ऐकून थोडीशी पुढें सरली व ह्मणाली 'दादांच्या ह्मणण्यास महाराजांनीं रुकार दिल्यास बरें पडेल.'

**वीरज** राजानें, थोडेसे लोक तरी बरोबर नेण्याबद्दल पुष्कळ आग्रह केला; पण ती गोष्ट **जगदेवानें** कबूल केली नाहीं. मात्र विशेष आग्रहामुळें **वीरम.ीस** बरोबर घेण्याचा विचार ठरविला. **वीरज** राजानें–**वीरमती**बरोबर एक दोन दासी तरी असूं देण्याबद्दलही–पुष्कळ सांगितलें, तथापि तीही गोष्ट **जगदेवानें** कबूल केली नाहीं. आणि 'आजपासून तिसरे दिवशीं प्रातःकाळीं उभयतां आह्मी सड्यास्वारीनिशीं घोड्यावर स्वार होऊन जाणार' असें सांगितलें. शहरांतील राजवाड्यांत येण्याबद्दल **वीरज** राजानें **जगदेवास** आग्रह केला असतां, तीही गोष्ट कित्येक अडचणी दाखवून त्यानें कबूल केली नाहीं. शेवटीं दोन दिवस त्याच जलमंदिरांत राहण्याचा विचार ठरला. **वीरमतीनें मालतीस** बोलावून तिला,

आपण पुरुषवेश घेऊन गेल्याचें वगैरे वर्तमान गुप्त ठेव-ण्यास सांगितलें; आपल्या वृद्ध पित्यास भेटून त्याचा आशीर्वाद् घेतला; तसेंच बंधु व भावजय यांचीही भेट घे-ऊन त्यांस नमस्कार केला; आपल्या मैत्रिणींचा शेंवटचा निरोप घेतला; व आपल्या प्रीतींतील कित्येक दा-सींस तिनें थोडथोडीं बक्षिसें वांटलीं. याप्रमाणें सर्वांचा निरोप घेऊन ठरलेल्या दिवशीं प्रातःकाळीं आमची नायिका शस्त्रास्त्रांनिशीं सज्ज होऊन आपल्या आवडत्या बदामी घोडीवर स्वार झाली. तिच्या मैत्रिणींनीं तिला फरा-ळाचें बांधून दिलें, व प्रवासांत अडचण पडूं नये ह्मणून एक मोहरांची थैली ती ' नको नको ' ह्मणत असतां वळेंच दिली. तिला पोंचविण्याकरितां तिचा बंधु, आप्त-सोयरे, व मैत्रिणी बऱ्याच लांवपर्यंत गेल्या. शेंवटीं मोठ्या कष्टानें तिला सर्वांनीं निरोप दिला. त्या वेळीं **वीरज** राजाच्या व तिच्या मैत्रिणींच्या डोळ्यांतून एकसा-रख्या अश्रुधारा वाहूं लागल्या. दृष्टीची मजल पोंचेपर्यंत ही सर्व मंडळी आमच्या नायिकेस ' लवकर ये बरें ' असें हातवारे करून सूचना करीत होती; व ' आपण आतां जा, काळजी करूं नका ' असें **जगदेव** व **वीरमती** हातांनीं खुणवीत होतीं. शेंवटीं जेव्हां या उभयतांचे घोडे दृष्टीपलीकडे निघून गेले, तेव्हां आमच्या नायिकेच्या विरहानें वि-व्हल झालेली ही सर्व मंडळी डोळे पुशीत मागें वळली.

# प्रकरण ८ वें.

## वाघांची शिकार.

जगांत मनुष्यप्राण्यास जे उत्तम ह्मणून गुण सांगितले आहेत, त्या सर्वांत परोपकाराचें महत्व विशेष आहे. लोकांवर उपकार करणें, ह्यासारखें शास्त्रांत दुसरें कोणतेंच पुण्य मानलें नाहीं. त्यांतून प्रत्यक्ष आपल्या शत्रूवर प्रसंगीं उपकार करणें, ह्यासारखें जगांत थोरपणाचें दुसरें साधनच नाहीं. ह्मणून मनुष्यप्राण्यांनीं नेहमीं दुसऱ्यावर हरएक प्रसंगीं उपकार करण्यास कधीं विसरूं नये. असो, मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें **जगदेव** व **वीरमती** सर्वांचा निरोप घेऊन निघालीं, तीं मजल दरमजल करीत दोन प्रहऱ्च्या सुमारास एका खेड्याजवळ जाऊन पोहोंचलीं. तेथें गांवाबाहेर एक मोठें थोरलें पिंपळाचें झाड होतें, त्यास पार बांधलेला होता, व जवळच एक पाण्याची विहीर होती. या गांवापासून तीन दिशेला तीन रस्ते फुटले होते. आमच्या उभयतां प्रवाश्यांनीं ती निवाऱ्याची जागा पाहून संध्याकाळपर्यंत तेथें मुकाम करण्याचा विचार ठरविला. त्यांनीं आपल्या घोड्यांवरील सामान उतरून त्यांस पाणी पाजलें; एका शेतकऱ्याकडून थोडेसें गवत घेऊन तें त्यांजपुढें टाकलें; व आपणही थोडा फराळ केला. सुमारें चार घटका दिवस राहिला आहे, अशा समयीं त्यांनीं पुनः आपल्या घोड्यावर सामान कसलें. नंतर ते तीन रस्ते कोणीकडे जातात त्याचा त्यांनीं तपास केला, तों त्यांस असें समजून आलें

कीं, पूर्व दिशेकडील रस्ता **महीकांठ्यास**, व उत्तर दिशेकडील रस्ता **मेवाडांत** जात असून दक्षिणेकडील रस्ता **अणहिलपुर पट्टणास** जात आहे; त्यांत दक्षिण दिशेच्या रस्त्यांत एक वाघ व वाघीण यांनीं प्रलय करून सोडला असल्यामुळें तो रस्ता फार जोखिमेचा झाला आहे. अशा प्रसंगीं **अणहिलपुरासच** जाणें असलें, तर पूर्व दिशेच्या रस्त्यानें वळण घेऊन जावें, असें तेथील लोकांनीं सांगितलें. या हकीकतीवरून वास्तविक त्यांनीं दक्षिणचा रस्ता वर्ज्य करावयाचा होता; परंतु लोकांवर उपकार करणें हें ब्रीद त्यांनीं धारण केलें असल्यामुळें, हजारों लोकांचें संकट दूर करण्याच्या हेतूनें स्वतःच्या जीवांची परवा न ठेवितां त्यांनीं मुद्दाम दक्षिणचाच रस्ता धरला.

ते सुमारें ५ कोस गेले असतील किंवा नसतील, सूर्य नुकताच अस्ताचलास चालल्यामुळें दिशा लाल दिसत होत्या. अशा समयीं डाव्या बाजूच्या झाडींतून आमच्या प्रवाशांस कोणी दीन स्वरानें ' अमारो जीव बचावो, अमो मरिये छिये ' असें ओरडत असल्याचें ऐकूं आलें. त्यासरसें त्यांनीं आपले घोडे त्या दिशेकडे वळविले. ते थोडे दूर गेले नाहींत, तों एक विक्राळ वाघ एका झाडाखालीं आ पसरून आपलें शेंपूट हालवीत आहे, व त्या झाडावर दोन मनुष्यें बसलीं असून तीं आपलें रक्षण होण्याकरितां मोठमोठ्यानें ओरडत आहेत, असें त्यांच्या नजरेस पडलें. त्या वाघाचा रंग पिंवळाधमक असून तो साधारण मोठ्या बैलाएवढा होता. माणसांचें रक्त पिऊन त्यायोगें आलेल्या चरबीनें त्याची मानगर्दन एक झालेली होती.

त्याच्या अंगावर लांब लांब काळे पट्टे असून मानेवर व पायांवर केशाचे पुंजके वाढलेले होते. अशा ह्या भेसूर वाघोबाची स्वारी त्या झाडावरील मनुष्यांची शिकार करण्याकरितां झट्टे घेत व वरचेवर आपलें शेंपूट जमिनीवर आपटीत होती; आणि जणूं काय आपल्या साथीदारणीनें आपल्या साह्यास यावें ह्मणून तो मधून मधून मोठमोठ्यानें किंकाळ्या फोडीत होता. आमच्या प्रवाशांनीं हा प्रकार पाहून आपले घोडे हलकेच एका झाडाच्या आड घेतले; आणि तेथून नेम धरून **जगदेवानें** तीर सोडला, तो त्या वाघाच्या पुठ्ठयांत जाऊन बसला. त्यासरशी त्यानें मोठी किंकाळी फोडून आपला मोरच्या फिरविला, व एकदम यांच्या अंगावर धांव घेतली. **जगदेव** आपल्या कमठ्यास दुसरा तीर चढवून तो पुनः सोडणार, इतक्यांत वाघानें त्याच्यावर नेमकी उडी घेतली. थोडा अवकाश झाला असता, तर त्या भयंकर प्राण्यानें **जगदेवास** खास यमसदनास पाठविलें असतें. परंतु **वीरमतीनें** चपळाई करून वाघाचे उडीबरोबर आपल्या हातांतील भाला त्या क्रूर पशूच्या पोटांत अशा जोरानें फेंकला कीं, त्याबरोबर त्याचें पोट चिरून सर्व आंतडीं बाहेर आलीं, व शेंवटची भयंकर किंकाळी फोडून धाडकन तो मागें उलथून पडला.

इतका प्रकार होत आहे, तों दुरून मोठमोठ्यानें किंकाळ्या फोडीत व आपलें शेंपूट जोरानें जमिनीवर आपटीत आपल्या पतीच्या साह्यार्थ वाघिणीची स्वारी उड्या घेत मोठ्या वेगानें येत असल्याचें दिसलें. **जगदेवानें** आपला घोडा सांवरून त्या धांवत येणाऱ्या प्राण्यावर सारखा नेम धरून

एक बाण सोडला. मादीची जात जात्या चपळ असते, त्यांत ती चवताळलेली असून लांब लांब उड्या घेत येत असल्यामुळें, बाणाचा नेम चुकून तो तिच्या मस्तकास ओझरता लागून निघून गेला. अशा प्रकारें बाण तर वायां गेलाच, पण त्यायोगें त्या वाघिणीस अतिशय स्फुरण आलें. बाणाचा झटका कानास बसतांच तिनें अशी एक मोठ्यानें किंकाळी फोडिली कीं, तिच्या प्रतिध्वनीनें त्या अरण्यांतील प्रदेश दणदणून गेला; व त्यासरशी ज्या झाडावर ते दोघे इसम मुठींत जीव धरून बसले होते, त्यांची गाळण होऊन त्यांपैकीं एक तर धाडकन जमिनीवर पडला. हा आतां खास मरणार असें जेव्हां **जगदेवानें** पाहिलें, तेव्हां त्यानें आपला घोडा एकदम वाघिणीच्या रोंखावर घेऊन दुसरा बाण सोडला. हा इतका प्रकार होईपर्यंत ती संतापलेली वाघीण अगदीं जवळ येऊन ठेपली, व **जगदेवाच्या** कमठ्यांतील हा बाण तिच्या मागील पायाच्या उजव्या जांघेंतून आरपार निघून गेला. त्या वेदनेनें तिनें अशा आवेशानें उडी घेतली कीं, **जगदेवास** तिनें कवट्यांतच घ्यावें, पण इतक्यांत **जगदेवानें** हातांतील कमठा टाकून दिला, व म्यान्यांतील तरवार बाहेर काढून घोड्यास टांच मारली; त्याबरोबर तो चारी पायांनीं एकदम उडाला. समोरून वाघिणीची उडी व इकडून घोड्याची उडी असा दोघांचा एकच योग होऊन दोघेंही एकमेकांवर आदळलीं. **जगदेवाच्या** हातांतील नंगी तरवार त्या वाघिणीच्या जबड्यांत खुपसली जाऊन ती धाडकन मागें आदळली. पण तिच्या उडीचा धक्का घोड्याच्या छातीवर बसल्यानें तो मागें

उलथून पडला, व त्याच्या छातीस वाघिणीच्या पंज्याचा ओरखडा बसल्यानें ती छिन्नभिन्न झाली. **जगदेवा**चा रोंख समोर असून त्याच्या हातांतील तरवारीचें पान त्या वाघिणीच्या जबड्यांत खुपसतांना त्यास एकदम झटका बसला, व त्याबरोबर तो त्या वाघिणीच्याच अंगासरसा अचूक पडला.

ती घाय लागून उताणी पडलेली वाघीण आपल्या शत्रूचा सूड घेण्याकरितां बाजूस वळून उठणार, इतक्यांत **वीरमतीनें** आपली घोडी एकदम तिच्या अंगावर आणून आपल्या हातांतील भाला तिच्या कुशींत आवेशानें मारून खेंचला. त्याबरोबर तिचा कोथळा बाहेर पडला; तथापि तशाही स्थितींत त्या विक्राळ वाघिणीनें मोठ्यानें किंकाळी फोडून **जगदेवा**वरील मोरच्या फिरवून **वीरमती**वर उडी घेतली. इतक्या अवकाशांत **जगदेवानें** उठून मोठ्या आवेशानें तिजवर तरवारीचा वार केला. तो तिच्या कंबरेंत बसला व त्यामुळें त्या क्रूर प्राण्याच्या शरीराचे दोन भाग होऊन दोहींकडे पडले. अशा प्रकारें त्या दोन्ही प्राण्यांचा शेंवट लाविल्यावर उभयतां त्या झाडाखालीं पडलेल्या मनुष्याकडे आले. ह्या वेळेस सूर्य अगदीं अस्तास जाऊन शुद्धपक्षांतील अष्टमीच्या रजनीनाथानें सर्व दिशा प्रकाशित केल्या होत्या. झाडाखालीं पडलेला मनुष्य तर मुळींच शुद्धीवर नव्हता, पण झाडावर बसलेला त्याचा साथीदार थोडा हुशार होता. हा सर्व प्रकार पाहून त्यास बराच धीर आला, व झाडावरून खालीं उतरून त्यानें आपल्या प्राणदात्यांस साष्टांग नमस्कार

घातला. नंतर त्यानें आपल्या सोबत्यास वारा घालून शुद्धीवर आणलें.

**जगदेवा**च्या घोड्यास त्या वाघिणीच्या पंज्यापासून बरीच इजा झाली होती. त्या वेदनेनें तो अगदीं व्याकुळ झाला होता. त्या पडलेल्या मनुष्यास शुद्धीवर आणल्यानंतर **जगदेव** आपल्या आवडत्या घोड्याच्या समाचारास आला. आपल्या धन्यास पाहतांच त्या इमानी जनावराच्या डोळ्यांतून पाण्याच्या धारा वाहूं लागल्या. त्यानें आपली मान वर उचलली, आणि तो थोडासा खिखाळला. जणूं काय आपल्या धन्याजवळ तो हा शेंवटचाच निरोप मागत होता. आपल्या आवडत्या घोड्याची ही दशा पाहून **जगदेवा**चा कंठ भरून आला. त्याच्या डोळ्यांवाटे टपटपा अश्रु पडूं लागले. त्यानें त्याचें तोंड आपल्या मानेसरसें धरलें, व 'बेटा सारंगा! तूं मला सोडून जाणार अं?' असें तो सद्गदित कंठानें ह्मणाला. हा प्रकार पाहून **वीरमती**सही रडें कोसळलें, तथापि तें आवरून ती ह्मणाली—'महाराज, असा शोक करीत बसून काय होतें? उपचार करून पाहिला पाहिजे. मला वाटतें, याची जखम बांधल्यास रक्तप्रवाह बंद होऊन तो शुद्धीवर येऊं शकेल. परंतु थोडेसें पाणी मिळालें पाहिजे.'—असें ह्मणून तिनें त्या दोघां इसमांपैकीं एकास पाणी आणण्यास सांगितलें, व आपल्या शेल्याची दोन हातांची धिडोटी काढून तिनें त्या घोड्याच्या छातीवरील जखम बांधिली, व तिजवर त्या इसमानें आणून दिलेल्या पाण्याची धार धरली. वाघिणीच्या

नखानें घोडयाच्या छातीस झालेली जखम जबर होती, व त्यांतून बराच रक्तप्रवाह निघून गेला होता, त्यामुळें ह्या उपचारापासून त्यास फायदा होऊं शकला नाहीं. त्या उभयतांनीं त्या इमानी जनावरास आराम पडावा ह्मणून आपली होती तितकी पराकाष्ठा केली; पण त्याच्या वेदना व रक्तप्रवाह कमी झाला नाहीं. तो वरचेवर आपली मान व दोन पाय वर उचली, उठण्याचा प्रयत्न करी व धाडदिशीं पुन्हां पडे. अशी त्याची तरफड पाहून **जगदेवा**च्या व **वीरमती**च्या पोटांत तटतटा तुटे. कांहीं-वेळ अशी तरफड चालविल्यानंतर त्या मुक्या प्राण्यानें उठून उभें राहण्याचा शेवटचा प्रयत्न केला. त्यानें आपले मागील पाय सारखे करून पुढील पायांवर नेट दिलें व मान समोर उचलून तो उठूं लागला; पण इतक्यांत त्यास घेरी येऊन त्याची वर उचलेली मान एकदम खालीं वांकली. तोंडावाटे फेंस, लाळ व रक्त आलें, आणि त्याचें शरीर धाडकन जमिनीवर आडवें पडलें. जीभ बाहेर आली; डोळ्यांवाटे घळघळ पाणी येऊन ते निस्तेज झाले, व एक आचका येऊन त्याच्या शरीराचें चलनवलन बंद पडलें! त्या वेळची त्याची ती कृति पाहून जणूं काय त्यानें आपल्या धन्याचे चरणीं लीन होऊन शेवटचा निरोप घेतला असें वाटलें.

आपल्या जिवलग साथ्याचा अशा प्रकारें शेवट झालेला पाहून **जगदेवास** मनस्वी वाईट वाटलें; पण होणार गोष्टींपुढें कोणाचा इलाज नाहीं असें मानून त्यानें आपलें दुःख आवरलें, व त्या घोडयाचें शव आपल्या

अंगावरील शेल्यानें आच्छादून तेथून निवण्याचा विचार केला. हा इतका प्रकार होईपर्यंत दहा घटका रात्र झाली होती. शुद्धाष्टमीचा चंद्रप्रकाश बराच शिलक असल्यामुळें मार्ग कंठण्यास अडचणीसारखें नव्हतें, ह्मणून जवळच कोठें निवाऱ्याची जागा पाहून तेथें राहिलेली रात्र काढण्याचा त्यांनीं विचार ठरविला. **जगदेवाच्या** घोड्याचा असा परिणाम झाला, तेव्हां **वीरमतीनें** त्यास आपल्या घोडीवर स्वार होण्याविषयीं विनंती केली. पण आपण घोडीवर बसावें व **वीरमतीनें** पायीं चालावें हें **जगदेवास** पसंत पडेना. शेंवटीं दोघांनींही त्या घोडीवर स्वार व्हावें, व त्या दोन मनुष्यांनीं रस्ता दाखवीत बरोबर पायीं चालावें असें ठरलें. त्याप्रमाणें ते हळूहळू चालत एका उतरणीच्या भागांत गेले. तेथें एक भला मोठा वटवृक्ष एका लहानशा ओढ्याच्या काठीं असलेला त्यांच्या दृष्टीस पडला. ती जागा उरलेली रात्र काढण्यास त्यांस पसंत पडली, व तेथें त्यांनीं आपला मुक्काम केला. घोडीस पाणी पाजून **जगदेव** व **वीरमती** यांनीं त्या ओढ्यावर मुखप्रक्षालन केलें. बरोबरच्या त्या दोन मनुष्यांनीं घोड्यांवरील गाशा जमिनीवर टाकला होता त्यावर उभयतां येऊन बसलीं, व हे दोघे इसमही त्यांच्या समोरच आपल्या कंबरेचें धोतर अंथरून त्यावर बसले. नंतर **जगदेवानें** त्यांस—' तुह्मी कोण, कोठील व ह्या रानांत कसे आलां? ' असा प्रश्न केला. तेव्हां त्यांतील जो वयानें मोठा होता तो पुढें सरला, व त्यानें आपली हकीकत सांगण्यास सुरुवात केली.

तो ह्मणाला—' आमचें गांव **धारानगरी**पासून दहा कोसांवर आहे. आह्मी तेथें शेतीकरून असतों. आमचा काका **धारानगरी**चे राजाजवळ हुजऱ्या आहे. आज वीस दिवस झाले, **धारानगरी**चे राजाचा एक मुलगा कोठें नाहींसा झाला आहे, ह्मणून त्याच्या शोधाकरितां **धीरसिंह** नांवाचे सरदार पंचवीस घोडेस्वार घेऊन निघाले आहेत. त्यांनीं आह्मां दोघां भावांला तैनातीस ठेवलें आहे. सतरा दिवस झाले, आह्मी सारखे फिरत होतों; परंतु राजपुत्राची भेट झाली नाहीं. परवां पहाटे आह्मी नेहमीप्रमाणें पुढील मुक्कामाची सोय पहाण्याकरितां निघालों, त्या रस्ता चुकून ह्या अरण्यांत आलों, व काल तिसरे प्रहरीं अचानक त्या क्रूर पशूंच्या भक्ष्यस्थानीं पडत होतों; त्या इतक्यांत आपण येऊन आह्मांस जीवदान दिलें. आमचे धनीसाहेब कोठें गेले असतील व त्यांची आमची भेट आतां कशी होईल ? आज दोन दिवस झाले आह्मी रानांतील फळांवर निर्वाह करीत आहोंत. आपण कोणीतरी थोर कुळांतील आहांत, तेव्हां आपणाजवळच आह्मांस ठेवल्यास आह्मी आपले फार आभारी होऊं. '

त्यांच्या या भाषणावरून आपल्या मातुश्रीनेंच **धीरसिंहास** आपल्या शोधाकरितां पाठविलें असावें असें **जगदेवास** वाटलें. त्यानें त्या दोघां शेतकऱ्यांस आपणाजवळ राहण्यास सांगितलें. दुसरे दिवशीं सकाळीं त्यांनीं त्या ओढ्यावर स्नानादि विधि आटोपून थोडासा फराळ केला, व ते पुढील मुक्कामास जावयास निघाले. त्या दोघां शेतकऱ्यांपैकीं एकजण पुढें, त्याच्यामागून **जगदेव** व

**वीरमती** यांची घोडी, व त्यांचा मागें तो दुसरा शेतकरी असे चालूं लागले. अशा प्रकारें ही प्रवासी मंडळी सरासरी चार पांच कोस गेली असेल किंवा नसेल, तोंच दोनप्रहरच्या कडक उन्हापासून त्यांस विशेष ताप होऊं लागला. तेव्हां त्यांनीं, एकादी निवाऱ्याची जागा पाहून तेथें चार घटका मुक्काम करावा, व ऊन्ह उतरल्यानंतर पुन्हां चालूं लागावें, असा विचार ठरविला. त्याप्रमाणें एका विस्तीर्ण वटवृक्षाखालीं त्यांनीं आपला मुक्काम केला. त्या दोघां भावांनीं त्या वृक्षछायेखालीं गाशा टाकून दिला, व त्यावर **जगदेव** व **वीरमती** बसले. एकजण पाणी आणण्याकरितां गेला आणि एकजण चुलीच्या व्यवस्थेकडे लागला. इतक्यांत समोरून कांहीं घोडेस्वार येत असल्याचें त्यांच्या दृष्टीस पडलें. त्यांस पहातांच **धीरसिंह** सरदाराचीच ती टोळी असावी असें वाटून **जगदेव** उत्सुकतेनें त्यांजकडे न्याहाळून पाहूं लागला. पण ते जसजसे जवळ जवळ येऊं लागले तसतसा यांचा समज खोटा ठरत चालला. ते स्वार आठ इसम होते, व त्यांच्या एकंदर देखाव्यावरून ते कोणी तरी रानटी भिल्ल वगैरे असावेत असें वाटत होतें. त्यापैकीं पांचजणांजवळ तीरकमटे व तरवारीच होत्या, व तिघांजवळ ढाली, तरवारी, भाले, कटार, बिचवे वगैरे बहुतेक शस्त्रें होतीं. त्या तिघांपैकीं एकाचा पोशाख थोडा उंची असून तो दिसण्यांतही बराच भव्य व क्रूर दिसत होता. त्याच्या देखाव्यावरून तो त्या मंडळीचा नाईक असावा असें वाटत होतें. त्यानें आपल्या पायाची डावी मांडी वस्त्राचे लपेटे करून गच्च बांधलेली होती. आमच्या प्रवाशांस पहातांच त्या स्वारास

आनंद झाल्याचें दिसलें. त्यानें आपल्या साथीदारांस लागलाच इशारा केला, त्यासरशीं ज्यांनीं त्यांनीं आपापलीं शस्त्रास्त्रें सांवरून त्या उभयतांस वेढा घातला. हा अकस्मात् प्रकार पहातांच यांत कांहीं तरी दगा आहे असें **जगदेवाच्या** तेव्हांच लक्षांत आलें. त्यानें आपली आवडती तरवार सरकन म्यानांतून बाहेर काढली. **वीरमतीनें** त्या स्वाराच्या नायकास तेव्हांच ओळखलें, व ती आपली तरवार बाहेर काढून त्या नायकाचे अंगावर एकाद्या चवताळलेल्या वाघाप्रमाणें धांवून गेली, व म्हणाली—'हरामखोरा, त्या वेळेस माझ्या झपाट्यांतून तूं बचावला होतास, पण आतां तुझे प्राण राहणें कठीण आहे! तुझे आयुष्याचे दिवस पुरे भरले ह्मणूनच काळानें तुला मजपुढें पुन्हां पाठविलें आहे.'

**वीरमतीच्या** ह्या भाषणावरून--ज्या तरुण स्वारानें भाला मारून आपल्या पायास जब्बर इजा केली होती तोच स्वार ही स्त्री असावी—असें त्याचे लक्षांत आलें, व आपल्या शत्रूचा सूड उगविण्यास त्यास अधिक स्फुरण चढलें. आपल्या हातांतील तरवार नीट सावरून धरून तो म्हणाला—' अबे लवंडी, तेरी क्या विसाद है? एक झपाटेमें तेरे दो तुकडे बना देउंगा, मरदका वेस लेके तुने हमकू फसाया, लेकीन अब तो तेरेकू बगलमें मारके ले जाउंगा. हमारे गुन्हेगारपर आशक होके तूं भाग आई, लेकीन अभी उस्की हम तो चटणी उडा देते है, देख ले.' असें म्हणून त्यानें आपला घोडा **जगदेवाच्या** अंगावर घातला. आपण दोघें व ते आठजण असून शिवाय घोड्यांवर स्वार

झालेले, तेव्हां अशा प्रसंगीं समोर हात करून आपला निभाव लागणार नाहीं, ह्मणून जगदेवानें वीरमतीस दांडपट्ट्याचा हात फिरवून स्वतःचें संरक्षण करण्यास सुचविलें, व आपणही तोच क्रम सुरू केला. दोघांचाही पट्ट्याचा हात इतक्या वेगानें फिरूं लागला कीं, त्या वेळीं वायूसही त्यांच्या अंगास स्पर्श करण्याची आज्ञा होत नव्हती. मग ह्या स्वारांस त्यांच्या अंगावर चाल करून जाण्याची छाती कोठून होणार? आपल्या नवीन धन्यावर हा आलेला प्रसंग पाहून ते दोघेही गडी घाबरून एका झाडावर चढले, आणि तेथून 'धांवाहो आमच्या धन्याला चोर मारीत आहेत' अशा प्रकारें मोठ्यानें ओरडूं लागले. त्या स्वारांनीं त्या दोघांस कबज्यांत घेण्याकरितां आपली होती नव्हती तेवढी सर्व पराकाष्ठा केली, पण कांहीं उपाय चालेना, तेव्हां त्यांनीं त्यांच्या अंगावर दुरून तीर सोडणें सुरू केलें. पण या उभयतांचा पट्ट्याचा हात वाऱ्यासारखा चालला असल्यामुळें ते सों सों करीत येणारे तीर पट्ट्याचा झटका बसतांच मोडून पडत असत. अशा प्रकारेंच लढत राहिल्यास आपल्याच्यानें फार वेळ टिकाव धरवणार नाहीं, व शेवटीं शत्रूंच्या कबज्यांत जावें लागेल, असें मनांत आणून जगदेवानें त्या लोकांनीं घातलेला वेढा तोडून बाहेर निघण्याचा विचार केला, व त्याप्रमाणें करण्यास वीरमतीसही सुचविलें. पतीच्या सूचनेप्रमाणें वीरमती पट्ट्याचा हात फिरवीत त्या नाइकाचे अंगावर घसरली, व जगदेव तिच्या विरुद्ध दिशेवर घसरला. त्यांचा पाडाव करण्याकरितां त्या लुटारूंनीं तिरांचा वर्षाव करण्यांत आपली

पराकाष्ठा चालविली होतीच, पण हे जसे अंगावर येत चालले तशी त्यांनीं पिछेहाट सुरू केली. त्या आठजणांचे घोडे आठ दिशेला फांकले, असें पाहतांच **जगदेवानें** लगट करून पट्टा फिरविण्याचे वेगांत एकावर असा नेमका वार केला कीं, मांडीपासून त्याचा पाय तुटून वेगळा पडला, आणि घोड्याचें पोट फाटून घोड्यासह तो जमिनीवर धाडकन हापटला. एकाची अशी वाट लागतांच **जगदेवानें** दुसऱ्यावर तशीच लगट केली. इकडे **वीरमतीनें** नाइकाचे अंगावर लगट करून त्यास चित करण्याचा योग आणिला, पण त्या नायकानें आपला घोडा एकदम फिरविल्यामुळें **वीरमती**चा नेम चुकून तो घोड्याच्या मानेवर बसला. त्यासरशी धडापासून त्याची मान वेगळी पडून त्याचें धड नाइकासह धाडकन जमिनीवर आदळलें. तें धड डाव्या बाजूवरच आदळल्यामुळें नाइकाचा डावा दुखरा पाय घोड्याचे पोटाखालीं दबला गेला, व त्यायोगें त्यास अधिक दुःख होऊन तो बेशुद्ध झाला.

आठजणांपैकीं दोघांची, त्यांतून नाइकाची, अशी अवस्था झालेली पाहून बाकीच्या सहा जणांस अतिशय त्वेष चढला, व त्यांनीं **वीरमती**वर विशेष जोरानें तिरांचा वर्षाव सुरू केला. सारखा तीन घटका पट्टा फिरविण्याच्या श्रमानें **वीरमतीस** बराच थकवा आला होता; तशांत चोहोंकडून तिजवरच तिरांची वृष्टि होऊं लागली, तेव्हां ती हतवीर्य होण्याच्या रंगांत आली. तशांत एक तीर सणणण करीत येऊन तिच्या डाव्या पायाच्या घोट्यांत शिरला, व त्याबरोबर त्यांतून रक्तप्रवाह सुरू झाला. तथापि तिनें धीर

न सोडतां पद्याचा हात फिरवीत लगट करण्याचें चालू ठेवलेंच होतें, आणि तितक्यांत तिनें एका स्वारावर वार करून त्यासही घोड्यासुद्धां निजविलें. पण एवढ्यांत दुसरा एक तीर येऊन तिच्या मणगटास लागल्यामुळें तिच्या हातांतील तरवार खालीं पडली. साहीजणांनीं **वीरमतीवर** अशा प्रकारें घाला घातलेला पाहतांच **जगदेव** चवताळलेल्या वाघाप्रमाणें त्यांजवर धांवला. **वीरमती** आपली पडलेली तलवार घेण्याकरितां खालीं वाकली, अशा संधीस एका स्वारानें पटकन घोड्यावरून उडी मारून तिचे हात मागच्या मागें खेंचून धरले, व—'क्यं लवंडी हवडे क्यां नाशी जसे'—असें तो ह्मणाला. आतां मात्र आपण शत्रूच्या कबज्यांत गेलों असें समजून **वीरमती** मान वळवून आपला हात धरणाराकडे पाहत आहे, इतक्यांत **जगदेवानें** वाघासारखी तडफ करून आपल्या तीक्ष्ण तरवारीच्या धारेनें त्या चांडाळाचें डोकें धडापासून वेगळें केलें. हा प्रकार पहातांच बाकीच्या पांचीजणांनीं घोड्यावरून उड्या टाकून ह्या दोघांस घेरलें. तीन घटका पडलेले सारखे श्रम, तशांत पायास व हातास झालेल्या जखमेंतून वाहिलेला रक्तप्रवाह, यायोगें **वीरमतीस** घेरी येऊन ती खालीं पडली व तिचा बचाव करून शत्रूशीं लढण्याचा प्रसंग एकट्या **जगदेवावर** येऊन ठेपला. आपली धनीण पडली व धनीही आतां खास पडणार आणि शेंवटी आपणावरही धाड येणार असें त्या झाडांवर चढून बसलेल्या गड्यांना आतां खास वाटलें. एवढा वेळ धरलेली त्यांची आशा नष्ट झाली. व असें तसेंही मरावयाचेंच मग ह्या

वेळीं आपल्या धन्यास होईल तितकें साह्य तरी कां करूनये असा निश्चय करून त्या झाडाच्याच मोठाल्या दोन डगळ्या तोडून घेऊन त्यांनीं जमिनीवर उड्या टाकल्या; व 'मारो मारो' ह्मणत ते त्या नवर धांवले. इतक्यांत कांहीं घोडेस्वार मोठ्या त्वरेनें आपणाकडेच घोडे फेंकीत येत असल्याचें दिसलें. ते कोण असावेत असा जो ही मंडळी विचार करीत आहे, तों त्यांनीं येऊन एकदम या सर्वांस वेढा घालून कैद केलें.

# प्रकरण ९ वें.

## धीरसिंहाचा प्रवास.

सहाव्या प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें **जगदेवाचा** शोध लावण्याचा निश्चय करून जरी **सोळंकी** राणी आपल्या बिछान्यावर जाऊन निजली होती, तरी तिला चांगली झोंप लागली नाहीं. **जगदेवाचे** शोधास कोणास पाठवावें, आपला कळवळा वाळगणारा या राज्यांत कोण आहे; असे विचार तिच्या मनांत सारी रात्र चालले होते. शेंवटीं **धीरसिंह** सरदारच या कामास योग्य आहे, व त्याशिवाय अशा प्रसंगीं उपयोगी पडणारा दुसरा कोणी नाहीं, असें तिच्या मनानें ठरविलें. दिवस उजडतांच तिनें आपल्या दासीस **धीरसिंहास** बोलावण्याकरितां पाठविलें. इतर मंडळीप्रमाणें **धीरसिंह** तोंडपुंजा नव्हता. त्यास कारस्थानें व लबाडया ह्यांचा फार तिरस्कार असे व त्यामुळें **वाघेली**

राणीचें वर्तन त्यास आवडत नसे. **सोळंकी** राणी महाराजांस नावडती असल्यामुळें सर्व मंडळी, तिजशी जरी तुटून वागत असे, तथापि तिच्या सोज्वल वर्तनाबद्दल **धीरसिंह** तिला फारच मान देत असे. **सोळंकी**राणीचें बोलावणें येतांच **धीरसिंह** तिजकडे गेला. रीतीप्रमाणें तीन वेळ लवून मुजरा करून तो हातजोडून राणीसमोर बसला, व —'मा साहेबांची काय आज्ञा आहे? दासाला कां बोलावणें केलें?'—असें तो ह्मणाला. **सोळंकी**राणी **जगदेवाचें** पत्र त्याजपुढें टाकून ह्मणाली,—'या पत्रावरून **जगदेवाचे** जाण्याचा काय हेतु असावा तो बरोबर समजत नाहीं. ह्मणून आपणास कदाचित माहीत असल्यास विचारावें, एवढ्याचकरितां आपणास तसदी दिली.'

पत्रांतील एकंदर मजकूर पाहून **धीरसिंह** मोठ्या विचारांत पडला. **जगदेवास** एवढ्या तातडीनें पाठविण्याचें कारण काय असावें हें त्याच्या लक्षांत मुळींच येईना. तो ह्मणाला—'मासाहेब, ह्या पत्रांतील हेतू मलाही समजत नाहीं. कोणतेंही व कशाही तातडीचें काम असल्यास तें मला समजल्या वांचून राहत नाहीं. मग ह्या प्रसंगींच असें कां झालें तें कळत नाहीं. तथापि महाराजांजवळून याचा खुलासा काढून आपणास कळवीन.'

**राणी**—महाराजांकडे गोष्ट काढून खरा खुलासा मिळेल असं दिसत नाहीं. बारकाईनं व अंतस्थ रीतीनं शोध केल्यावांचून खरी हकीकत समजणें कठीण दिसतं. मला तर कांहीं विपरीतच वाटत आहे; व तसेंच कांहीं असल्यास आपल्यावांचून या जगांत साह्यकर्ता मला दुसरा कोणीच नाहीं.

(इतकें बोलत आहे तों तिचा कंठ भरून आला व डोळ्यावाटे टपटप अश्रुबिंदु पडूं लागले.)

**सोळंकी**राणीची अशी स्थिति पाहून **धीरसिंहास** वाईट वाटलें. त्याचाही कंठ भरून आला. तथापि आपलें मन लागलींच आवरून तो ह्मणाला—' मासाहेब आपण अशा घाबरूं नका. आपण सांगितल्याप्रमाणें मी दोन दिवसांत बारकाईनें तपास करून खरी हकीकत बाहेर काढतों, व **जगदेव** महाराज कोठें गेले आहेत, त्याचाही शोध लावतों. आपण निर्घोर रहा.'

'बरं आहे. सर्व भरंवसा आपला आहे. आपणावांचून मजवर दया करणारा दुसरा कोणीच नाहीं. ईश्वर तुमचें कल्याण करो.' असें **सोळंकी** राणी डोळे पुशीत पुशीत ह्मणाली.

राणीचें समाधान करून **धीरसिंह** निघाला तो परत आपल्या घरीं गेला. **जगदेवा**च्या अकस्मात् जाण्यासंबंधीं त्याच्या मनास चटपट लागून गेली होती. घरी जातांच त्यानें आपल्या प्रियपत्नीस जवळ बोलाविलें, व तिला इत्थंभूत हकीकत कळविली. ती ऐकून **रूपवती**सही पुष्कळ वाईट वाटलें, व **जगदेवा**च्या अकस्मात् जाण्यांत **वाघेली** राणीचेंच कांहीं तरी अंग असावें असें लागलींच तिच्या मनांत आलें. ती ह्मणाली—' असा कांहींतरी विपरीत प्रसंग येईल असें मला वाटत होतेंच. शेवटीं त्या रांडांनीं घाट घातलाच—' **रूपवती**चे तोंडचे हे शब्द ऐकून **धीरसिंहा**चें मन अधिक गोंधळांत पडलें. तो ह्मणाला—' काय?

**जगदेवा**च्या अकस्मात जाण्यांत कोणा स्त्रीचें अंग आहे? व ती हकीकत तुला माहीत आहे?'

**रूपवती**—मला सर्व हकीकत कांहीं माहीत नाहीं; पण आपली **चंपा** दोन दिवसांपूर्वी **वाघेली** राणीचें व **कमळा**चें कांहीं खलबत चालत असल्याबद्दल सांगत होती. तिच्या बोलण्यांत—**सोळंकी**राणीजी व **जगदेव** यांस घालवून देण्याबद्दल **वाघेली** राणी **कमळे**च्या विचारें कांहीं खटपट करणार आहे—असं आलं होतं. त्यावेळीं मला तिचं बोलणं खरं वाटलं नाहीं; पण आतां त्यांतच कांहीं तरी असावं असं खास वाटतं.

**धीरसिंह**—तर मग आतां याचा तपास लावून खरी हकीकत काय आहे ती कळीव. ह्मणजे मला पुढील व्यवस्थेस लागण्यास ठीक पडेल. (असें सांगून तो आपल्या उद्योगास निघून गेला. व **रूपवतीनें** **चंपा** नांवाच्या आपल्या दासीस बोलावून तिला एकंदर हकीकत मिळविण्याची कामगिरी सांगितली.)

**चंपा**चा व **कमळा**चा चांगला स्नेह असे, इतकेंच नाहीं पण त्या दोघांचें मावस बहीणींचें नातें होतें. त्यामुळें केव्हां केव्हां **कमळा** नादांत असली ह्मणजे आपला मोठेपणा दाखविण्याकरितां न सांगण्याच्या गोष्टी सुद्धां **चंपा** जवळ बोलून जात असे. **चंपा** आपल्या धनिणीप्रमाणेंच मोठी धूर्त व खोल विचाराची वायको होती. अशी कांहीं गोष्ट **कमळे**च्या तोंडून ओझरती चुकून निघाली, तर ती तिच्या पोटांत शिरून युक्तीनें सर्व काढून घेत असे. व तशीच कांहीं महत्वाची बावत असल्यास ती आपल्या ध-

निणीस कळवीत असे. त्यामुळें **वाघेली** राणीचीं कारस्थानें इतरांस जरी समजत नसत, तरी **रूपवतीस चंपाचे** द्वारें समजल्यावांचून राहत नसत. पण गेल्या दोन दिवसांत **चंपा**-ची व **कमळा**ची भेट झाली नसल्यामुळें तिला पुढील हकीकत समजली नव्हती.

आपल्या धनिणीची आज्ञा होतांच **चंपा** लागलीच **कमळा**च्या भेटीस गेली. सारी रात्र जागरण झाल्यामुळें ह्यावेळीं **कमळा** आपल्या खोलीचें दार आंतून लावून घे-ऊन घोरतच पडली होती. **चंपानें** दारास पुष्कळ धक्के दिले, मोठमोठ्यानें हांका मारल्या, पण तिला प्रत्युतर ह्मणून मिळालें नाहीं. शेंवटीं ती त्रासून निवून गेली व सायंका-ळीं पुन्हा आली. त्यावेळीं **कमळा** चट्टी पट्टी करून राणी-कडे जाण्याच्या तयारींत होती. **चंपास** पाहतांच ती ह्म-णाली—'कां ताईसाहेब, आज अशा भलत्याचवेळीं आपली स्वारी इकडे कोणीकडे?'—**चंपानें** उत्तर दिलें—' अलीकडे रात्रीचीं मोठमोठीं महत्वाचीं कामें करावीं लागत असल्या-मुळें सर्व दिवस झोपेंत जातो. मग भेटीचा लाभ घेणारांनीं अशा वेळींच नकोका यायला? मोठ्या लोकांच्या मर्जीप्रमाणें चाललं पाहिजे. त्यांत वेळ अवेळ कसली ? '

**कमळा**—एकूण तर मग ताईसाहेबांची स्वारी दोनप्रहरीं इथं आली होती वाटतं? खरंच बाई, काल सारी रात्र जा-गरण घडल्यामुळें अगदीं दमून गेलें होतें व त्यामुळें आज दोन प्रहरपर्यंत कसा तो डोळाच उघडला नाहीं.

**चंपा**—आपणावर सरकारची मर्जी तशीच प्रसन्न आहे, ह्मणून अशीं जागरणं घडतात.

**कमळा**—मर्जी उगीच प्रसन्न होत नाहीं. मोठमोठालीं जोखमेचीं कामें जिवाची आशा न धरतां करावीं लागतात; समजलां ?

**चंपा**—कां, कुठं कांहीं लढाई बिढाई मारायला गेलां होतां वाटतं ?

**कमळा**—अग, ती लढाई तर सर्वच मारतात; पण मनांत सलत असलेला शत्रुरूपी कांटा, डांव पेंच लढवून काढून टाकणें, हें काम फार कठीण आहे.

**चंपा**—सांगा तर खरं, अशी कोणती नाजूक कामगिरी आपण बजाविली ती ?

**कमळा**—तूं कोणाजवळ बोलणार नाहींस अशी शपथ घे, ह्मणजे सांगतें.

चंपानें लागलीच शपथ घेतली व **कमळानें** तिच्या कानांत आदले दिवशीं घडलेली सर्व हकीकत सांगून ह्मटलें—'कां, ही कामगिरी साधारण आहे ? पण मीं ती कशी बेमालूम तडीस लावली पहा.'

**चंपा**—कामगिरी तर नाजूक खरीच; पण पढें मागें हें कृत्य उघडकीस आल्यास तुमची काय वाट होईल ?

**कमळा**—अहाग वेडे, ज्यानं इतकं काम केलं त्यानं पुढील गोष्टीचा विचार केला नसेल वाटतं ? **क्रूरसिंग** जमादार आज बरेच दिवस, मी वश व्हावें ह्मणून लाळ घोटीत होता. त्यासच पुढील कामगिरी सांगून आज सकाळींच रवाना केलें. मेल्याला पैसा आणि स्त्री दोन्ही आशा लावल्या आहेत. तेव्हां तो काम फत्ते करील याची

शंकाच नको. काम बजावून आल्यावर त्याचं समाधान करणं फारसं जड नाहीं.

**चंपा**–खरोखर, तुझ्या सारख्या धाडशी स्त्रीया फारच थोड्या. नाहीं तर आह्मीं; सांगितल्या कामाच्या व दिल्या भाकरीच्या. एक गोष्ट दहा वेळ सांगितली तरी लक्षांत भरत नाहीं.

**कमळा**–बरं पण ताईसाहेब, मला आतां राणीसाहेबांकडे लवकर गेलं पाहिजे. त्यांचीं बोलावणीं तीन चार येऊन गेलीं. त्या वाट पहात बसल्या असतील. तुह्मी पुन्हां एकादवेळ आल्यास आपण बोलत बसूं. पण सांगितलेली गोष्ट कुठं बोलायची नाहीं हो ? नाहीं तर कराल आमची फजिती ! तूं माझी जिवलग मैत्रिण ह्मणून तुजजवळ मला कांहीं चोरून ठेववत नाहीं.

**चंपा**–आजपर्यंत कधीं तरी मजकडून तुझी गोष्ट फुटली आहे का ? मग उगीच भलतीच शंका कां घेतेस ?

**कमळा**–नाहींग, मी आपली सहज बोलल्यें. त्याबद्दल इतकं वाईट मानायला नको. बरं पण, आतां तूं कधीं भेटशील ?

'लवकरच भेटेन' असें ह्मणून **चंपानें** रजा घेतली, व **कमळा** राणीकडे निघून गेली. **चंपा** घरीं आल्यावर तिनें आपल्या धनिणीस एकंदर हकीकत सांगितली. ती ऐकून **रूपवतीस** पराकाष्टेचें वाईट वाटलें. रात्रौ भोजनोत्तर तिनें आपल्या पतीस ती सर्व हकीकत निवेदन करून उशीर न लावतां **जगदेवाच्या** शोधास जाण्याबद्दल विनंती केली.

हकीकत ऐकून **धीरसिंहास** फारच सखेदाश्चर्य वाटलें. त्याच्या मनांत एकामागून एक विचार येऊं लागले. तो मनांत ह्मणाला—'ते दुष्ट लोक **जगदेवाच्या** पाठोपाठ गेले आहेत; तेव्हां त्यांनीं त्यास गांठलें असेल. हा एकटा, तशांत अल्पवयी, व ते चौघे धटिंगण, त्यांजपुढें याचा पाड कसा लागेल? खरोखर ते बिचाऱ्या निरापराधी व सज्जन प्राण्याचा घात करतील; व **सोळंकी**राणीस हें वर्तमान समजतांच ती प्राणत्याग केल्यावांचून राहणार नाहीं! हर हर! कोण हा प्रसंग! महाराजांची बुद्धी कोठें गेली! त्यास हें कपट कसें समजलें नाहीं! अथवा त्यांस तरी बोल लावून काय उपयोग? ब्रह्मदेवाच्या घरच्या योगायोगाप्रमाणें सर्व घडून यावयाचेंच. बरें, पण **सोळंकी**राणीस ही हकीकत सांगितली तर तिची काय अवस्था होईल? बिचारीचा सर्व जीव कीं प्राण **जगदेवावर**. ती कदाचित् घाबरून आपल्या जिवास भलतेंच करून घेईल! तेव्हां तिला खरी हकीकत समजूं देणें बरोबर नाहीं. ही रात्र केव्हां जाईल ती जावो. सकाळ होतांच महाराजांजवळून रजा घेऊन मला अगोदर **जगदेवाच्या** शोधास गेलें पाहिजे.'—अशा प्रकारच्या विचारतरंगांत त्याचें मन गढून गेलें. त्यास साऱ्या रात्रींत झोंप लागली नाहीं. सकाळ होतांच स्नानभोजनादि विधि आटोपून तो **सोळंकी** राणीस जाऊन भेटला; व तिच्या मनास हुरहुर लागेल ह्मणून खरी हकीकत न सांगतां कांहीं तरी सांगून त्यानें तिची समजूत घातली. 'आपण आतांच **जगदेवाच्या** शोधास जाणार आहों, तुह्मी कांहीं काळजी करूं नका, मी लवकरच त्यांस घेऊन परत येतों;' असें

सांगून त्यानें **सोळंकी** राणीची रजा घेतली; व त्याच पायीं महाराजांकडे जाऊन--कांहीं जरूरीच्या कामाकरितां ह्मणून--त्यांजपासून एक महिन्याची रजा घेतली. याप्रमाणें तयारी झाल्यावर त्यानें आपल्या तैनातींतील खात्रीचे असे पंचवीस स्वार व जरूरीपुरती शिधासामुग्री बरोबर घेतली, व आपल्या प्रियपत्नीस **सोळंकी** राणीचा वरचेवर समाचार घेण्याबद्दल बजावून सांगितलें, व तिचीही रजा मागितली.

**रूपवतीनें** पानाचा विडा देऊन **धीरसिंहास** नमस्कार केला, व 'यशस्वी होऊन लवकर परत या' असें ती ह्मणाली.

**चंपेनें** सांगितलेल्या दिशेनें **धीरसिंह** मजल दरमजल करीत चालला. रस्त्यांत कोणी भेटल्यास 'अमुक अमक्या प्रकारचा तरुण मनुष्य तुह्मी पाहिलाका?' ह्मणून विचारावें; त्यांनीं नाहीं ह्मटल्यास पुढें चालावें; असा क्रम चालला होता. संध्याकाळपर्यंत त्यानें बराच रस्ता कांटला, पण त्यास थोडासाही सुगावा लागला नाहीं. त्या रात्रीस त्यानें एका लहानशा गांवांत मुक्काम केला. हें गांव अतिशय लहान होतें. यांत काय तीं शेतकऱ्यांचीं लहानशीं दहापंधरा झोंपडीं होतीं. तेथील एक दोन मनुष्यांस मार्ग दाखविण्याकरितां बरोबर घ्यावें असें **धीरसिंहास** वाटलें. त्यांनीं तेथील लोकांस जवळ बोलावून त्यांची हकीकत विचारली, व त्यांपैकीं **वझा** व **रामा** या दोघां भावांस पसंत करून त्यांस बरोबर घेतलें. नंतर ही सर्व मंडळी **जगदेवाचा** तपास करीत चालली. रोज पहांटेस उठून मुखमार्जनादि विधि आटोपला ह्मणजे कोणत्या दिशेस किती लांबपर्यंत जाव-

याचें हें ठरवीत. तें ठरलें ह्मणजे **वझा** व **रामा** पादचारी असल्यामुळें आड रस्त्यानें त्या धोरणावर जाऊन पोंचत, व तेथें पाण्याची वगैरे व्यवस्था पाहून मुक्कामाची जागा नक्की करीत; व घोडयावरील मंडळी थोडी फांकून सुगावा काढीत चालत. आणि दोन प्रहरीं मुक्कामावर सर्व एकत्र जमत. नंतर स्वयंपाक वगैरे करून जेवण आटोपल्यावर थोडा-वेळ विश्रांति घेऊन उन्ह कललें ह्मणजे पुन्हां पुढील मुक्काम ठरवून त्या धोरणानें तेथें जात, व रात्रींचा मुक्काम करीत. अशा प्रकारें रोज त्यांची आठ पासून दहा कोसांची मजल होत असे. या हिशेबानें बारा दिवसांत त्यांनीं आडवा तिडवा मिळून शंभर सवाशें कोसांचा प्रवास केला. इतक्या मुदतींत त्यांस पांच घोडेस्वार पश्चिमेच्या दिशेनें गेल्याचा मात्र सुगावा लागला. ह्या धोरणावर त्यांनीं पुढें सहा दिवस तपास केला, पण कांहीं उपयोग झाला नाहीं.

अठरावे दिवशीं सकाळीं दिशा ठरवून ही मंडळी निघाली, तों दोनप्रहरीं मुक्कामाचे ठिकाणीं **वझा** व **रामा** आले नव्हते. **धीरसिंहानें** त्यांची संध्याकाळपर्यंत मार्गप्रतीक्षा केली, व शेंवटीं निराश होऊन तो स्वारांसुद्धां पुढें चालता झाला. या मंडळीनें त्या रात्रीस जेथें तीन रस्ते फुटतात त्या गांवाशीं येऊन मुक्काम केला. तेथें तपास करितां एक दिवसांपूर्वीच एक तरुण स्त्री व तरुण पुरुष असे उभयतां आले होते व ते दक्षिणच्या दिशेनें गेले असें समजलें. तेथल्या लोकांनीं त्यांच्या रूपगुणाचें जें वर्णन केलें, त्यावरून तीं **जगदेव** व **वीरमतीच** असावींत असें **धीरसिंहास** वाटलें, व

पहाट होतांच ज्या मार्गानें ते उभयतां गेले होते त्याच मार्गानें त्यानेंही कुच केलें. ह्या वेळेस ही मंडळी आजूबाजूस दृष्टि ठेवून आपले घोडे भरधांव फेंकीत चालली होती. जातां जातां दोन प्रहरच्या सुमारास त्यांस कांहीं अंतरावर कोणी मनुष्य निजला असल्याचा भास झाला, ह्मणून त्यांनीं आपले घोडे हळू हळू तिकडे वळविले. ते जसजसे जवळ जाऊं लागले, तसतसा, दोन भयंकर वाघांचीं धडें छिन्नभिन्न होऊन पडलेलीं, जागोजाग रक्त सांडलेलें, व एका शेल्याखालीं घोड्याचें शव झाकलेलें असा प्रकार त्यांच्या दृष्टीस पडला. तो एकंदर प्रकार पाहून ही मंडळी प्रथम तर भ्यालीच; पण ते मृत प्राणी आहेत अशी जेव्हां त्यांची खातरी झाली, तेव्हां त्यांस धीर आला. ते पुढें सरले, व जवळ पास कोणी मनुष्य आहे का ह्मणून पाहूं लागले. पण त्यांच्या नजरेस कोणीच पडलें नाहीं. **धीरसिंहानें** घोड्याच्या अंगावरील शेला बाजूस केला; तों **जगदेवाचा** सारंगा घोडा मरून पडलेला त्याच्या दृष्टीस पडला. त्यावरून व त्याच्या अंगावर घातलेल्या शेल्यावरून **जगदेव** येथें आला होता, अशी त्याची पक्की खातरी झाली; व त्यानेंच ह्या क्रूर प्राण्यांचा नाश केला असावा असेंही त्यास वाटलें. पण ह्या भयंकर प्राण्यांची शिकार करण्यांत त्यास कांहीं इजा झाली नसेलना अशी लागलीच त्याच्या मनांत शंका येऊन तो जास्त चिंतातुर झाला. त्यानें आसपास पुष्कळ तपास केला, पण कोठेंच कांहीं थांग लागेना. तथापि तेथील चिन्हांवरून तो प्रकार अगदीं ताजा झालेला दिसत होता. यावरून

जगदेव जवळपासच कोठें तरी भेटेल असें त्यास वाटलें; व दोन प्रहरची वेळ झाली होती, तरी मुक्कामाचा विचार न करितां त्यानें स्वारांसह आपले घोडे पुढें फेंकले. सरासरी चार पांच कोस जमीन चालून गेले नाहींत, तों त्यांस मनुष्यांचा गलबला ऐकूं येऊं लागला, तेव्हां त्या धोरणावर त्यांनीं आपले घोडे भरधांव फेंकले, व हां हां ह्मणतां त्या गलबला करणारे मंडळीस गांठून मागील भागांत सांगितल्याप्रमाणें सर्वांसच एकदम कैद केलें.

## प्रकरण १० वें.

## ताटातूट.

आपण कैद केलेल्या मंडळींत **जगदेवास** पाहतांच **धीरसिंहास** अतोनात आनंद झाला. त्यानें आपल्या मंडळीस सांगून त्यास तावडतोब बंदमुक्त केलें, व साष्टांग प्रणाम करून तो हात जोडून पुढें उभा राहिला. **धीरसिंहास** पहातांच **जगदेवास** एकदम आनंदाचें भरतें आलें. त्यानें एकदम पुढें सरून **धीरसिंहास** आलिंगन दिलें, व 'आपण अशा ह्या भयंकर अरण्यांत कसें आलां?' असा प्रश्न केला. **धीरसिंहानें** आलेला प्रेमाचा हुंदका आवरून **जगदेवाचे** तोंडावरून हात फिरविला, व- 'महाराजांनीं आतां थोडा वेळ विश्रांति घ्यावी, मग सर्व हकीकत निवेदन करतों' असें तो ह्मणाला. नंतर

त्यानें थोडें पाणी मागवून तें **विरमतीच्या** डोळ्यांस लाविलें. **जगदेवानें** तिच्या पायाची व हाताच्या बोटांची अशा दोन्ही जखमा एका फडक्यानें आंवळून बांधल्या, व त्यावर पाण्याची धार धरली, व **धीरसिंह** आपल्या शेल्याच्या पदरानें तिला वारा घालूं लागला. थोड्या वेळानें **वीरमती** चांगली सावध झाली, व **धीरसिंहास** पहातांच चटकन उठून रजपूत स्त्रियांच्या रिवाजाप्रमाणें तोंडावरून बुरखा घेऊन बाजूस सरून उभी राहिली. तेव्हां **धीरसिंह** ह्मणाला.—'बेटा, वडिलांचा मान ठेवण्याची ही वेळ व स्थळ नाहीं. अगोदर तुझ्या हातापायाच्या जखमेची व्यवस्था होऊं दे तूं चागली हुशार हो, आणि घरी गेल्यानंतर तूं आमचा हवा तसा मान ठेव.' **वीरमतीनें** खाली मान वाकवून उत्तर दिलें, जशी आज्ञा. पण वडिलांनीं माझ्या शत्रूचा सूड घेण्याची मला आज्ञा द्यावी.' त्यावर **धीरसिंह** ह्मणाला—"तुमचे सर्व शत्रु कैद केले आहेत, त्यांस आतां हवी ती शिक्षा करा.'

**धीरसिंहाचे** तोंडचे हे शेंवटले शब्द ऐकून **वीरमतीनें** आपल्या तोंडावरील पदर किंचित् वर करून बाजूस न्यहाळून पाहिलें; तों तिच्या दृष्टीस आपणाशीं लढत असणारी मंडळी चतुर्भुज करून उभी केलेली दिसली, व त्यांतच ज्यांस आपण वाघांच्या दाढेंतून सोडवून आश्रय दिला होता, त्या **बज्रा** व **रामासही** कैद केलेलें तिनें पाहिलें. त्यांस पाहतांच ती हात जोडून **धीरसिंहास** ह्मणाली—'वडिलांनीं कैद केलेल्या मंडळींत दोन निरपराधी प्राणी आहेत; त्यांस सोडण्याची कृपा करावी.' **विरमती-**

च्या सूचनेप्रमाणें करण्याकरितां **धीरसिहानें** त्या कैद्यांस पुढें आणण्याबद्दल आपल्या मनुष्यांस सुचविलें; व **जगदेव** आणि **वीरमती** यांस आंथरलेल्या गाशावर बसवून आपण **जगदेवा**च्या उजवे बाजूस पण थोडे अंतरावर बसला. **वीरमती** डावे बाजूस तोंडावरून पदर घेऊन बसली. नंतर एकेका कैद्यास पुढें आणून **धीरसिंह** हकीकत विचारूं लागला.

प्रथम **वझा व रामा** यांस पुढें आणलें. त्यांनीं आपल्या जुन्या व नव्या धन्यांस साष्टांग दंडवत घातला, व आपण मार्ग चुकून भलतीकडे कसें गेलों, तेथें वाघाच्या तावडींत कसें सांपडलों, त्या ठिकाणीं **जगदेव** व **वीरमती** यांनीं पराक्रम करून आपली सुटका कशी केली, वगैरे हकीकत सांगून, आपण येथें कसें आलों, व येथें आल्यानंतर कसा कसा प्रकार घडला, तें इत्थंभूत वर्तमान सांगितलें. ह्या दोघांच्या तोंडून **जगदेव** व **वीरमती** यांच्या पराक्रमाची हकीकत ऐकून **धीरसिंहाचे** नेत्र आनंदाश्रूंनीं भरून आले. आपण ज्यांच्याविषयीं नेहमी पूज्यबुद्धि बाळगितों, ते खरोखरच रणशूर आहेत अशाबद्दल त्याची खातरी होऊन त्यास धन्यता वाटली; व त्या भरांत त्यानें त्या उभयतांकडे प्रेमदृष्टीनें न्यहाळून पाहिलें. **वझा व रामा**ची हकीकत ऐकल्यानंतर त्यांस बंदमुक्त केलें. त्यांनीं आपल्या जुन्या व नव्या धन्यांस लवून मुजरे केले, आणि 'स्वयंपाकाची तयारी करण्यास लागूंका'—ह्मणून आज्ञा विचारली. आज्ञा होतांच ते आपल्या कामास लागले.

नंतर **क्रूरसिंग** जमादारास पुढें आणलें. **धीरसिंहास** पहातांच त्याचें सर्व धैर्य नाहींसें झालें, व आतां आपली सुटका होत नाहीं अशी त्याच्या मनाची खातरी होऊन तो थरथर कांपूं लागला. त्याच्या तोंडांतून एक शब्द सुद्धां निघेना. बराच वेळ निघून गेला तरी तो आपली हकीकत सांगण्यास सुरुवात करीना, तेव्हां **धीरसिंह** त्यास दरडावून ह्मणाला—'असें केल्यास तुझी सुटका तर होणार नाहींच, पण उलट तूं आपले जिवाचे हाल मात्र करून घेशील. जी कांहीं खरी हकीकत असेल ती सांग. मला अगोदरच सर्व कळून चुकलें आहे; पण तुझ्या तोंडून ती ऐकली पाहिजे. बोल सांगतोस कीं नाहीं, कां चवदावें रत्न दाखवूं ?'

**धीरसिंहा**च्या तोंडचे हे शब्द ऐकतांच **क्रूरसिंगा**ची गाळण होऊन गेली. आतां आपण खरी हकीकत न सांगितल्यास हे लोक आपले हाल करतील, त्यापेक्षां खरी हकीकत सांगून तूर्त तर मार वांचवावा, व पुढें नशीबानें जें होणें असेल तें होईल, असा निश्चय करून त्यानें हकीकत सांगण्यास सुरुवात केली. तो ह्मणाला—'मी जातीचा **भिल्ल** असून माझें नांव **क्रूरसिंग** आहे. आज बारा वर्षें मी **धारानगरी**च्या **उदयादित्य** राजाजवळ राणीवशाकडे पहाऱ्याच्या नोकरीवर आहें. **वाघेली** राणीसाहेबांच्या तैनातींत **कमळा** नांवाची एक दासी आहे, ती फार लबाड बायको आहे, असें आतां मला वाटूं लागलें. तिचें वळण राणीसाहेबांकडे फार आहे. ती स्वरूपानें फार देखणी असून मोठी नखरेबाज आहे. तिचे चाळे पाहून माझें मन आज कित्येक

बर्षे तिजवर बसलें आहे, व तिनें मला वश व्हावें ह्मणून मी आजपर्यंत तिच्या अनेक कामगिऱ्या बजाविल्या, तथापि तिनें ह्मणून माझी इच्छा पूर्ण केली नाहीं. महाराज, काय सांगूं? तिनें मला इतकें मोहून टाकलें कीं, तिजवांचून मला अन्नपाणी सुद्धां गोड लागेनासें झालें. मनुष्य अशा प्रकारच्या नादास लागला ह्मणजे त्याची बुद्धि ठिकाणावर राहत नाहीं. त्यास बरें वाईट कांहींच समजत नाहीं; व आपल्या आवडत्या वस्तूच्या प्राप्ती-करितां तो पाहिजे तें करण्यास तयार होतो, असें जें ह्मणतात तें खोटें नाहीं. **कमळेच्या** नादीं मी लागल्यामुळें माझी बुद्धि अगदीं नष्ट झाली, व तिची मर्जी प्रसन्न होण्याकरितां आपल्या अन्नदात्याच्या आवडत्या पुत्रास मारण्याची अति नीच कामगिरी म्यां दुष्टानें पत्क-रली. मी आपल्या साथीदारांस बरोबर घेऊन **कमळेनें** सांगितलेल्या दिशेस **जगदेवाचा** पाठलाग करीत निघालों. पंधरा दिवसपर्यंत त्यांचा आह्मांस थांग लागला नाहीं. सोळावे दिवशीं ते **टुकटोड्यास** जाणाऱ्या रस्त्यानें गेल्याचें समजलें. तेव्हां आह्मी त्या मार्गानें आपले घोडे झपाट्यानें फेंकले, तों संध्याकाळच्या सुमारास तेथील सरकारी बागे-च्या दरवाज्याजवळ ते आयतेच निजलेले सांपडले. महाराज, काय सांगूं? मी विषारी औषधानें भिजविलेला रुमाल त्यांच्या तोंडावर टाकून त्यांस तसेंच उचललें, आणि आपले घोडे भरधांव फेंकीत निघालों. त्यांस उचलून चाल-विलें, त्या वेळीं त्या बागेंत कांहीं स्त्रियांनीं गलबला केल्याचें आमच्या ऐकण्यांत आलें, पण त्याकडे आह्मीं मुळींच लक्ष

दिलें नाहीं. आह्मी जे निघालों ते सहा कोस जमीन चालून गेलों. पुढें अंधार पडल्यामुळें आह्मांस मार्ग सुचेना. शिवाय त्या दिवशीं सकाळपासून आह्मी सारखे घोड्यावर बसलेलों असल्यामुळें आह्मांस पुष्कळ थकवाही आला होता, ह्मणून जवळच एक गर्द झाडी पाहून तेथें मुक्काम केला. विषाचा अंमल लवकर व्हावा ह्मणून **जगदेव** महाराजांचें तोंड त्या विषारी रुमालानें गच्च बांधलें, व त्यांच्या अंगावर एक धोतर घालून आह्मी स्वस्थ घोरत पडलों. पहाट होतांच आह्मी उठलों, व पुढील प्रवासाचा विचार करीत बसलों. इतक्यांत दोन तरुण घोडेस्वार घोडे फेंकीत येत असल्याचें आमच्या दृष्टीस पडलें. त्यांस अडवून त्यांचे जवळ असलेली चीजवस्त हिरावून घ्यावी ह्मणून आह्मी चौघेहीजण पुढें झालों. आह्मांस पहातांच त्या दोघांसही त्वेष चढल्याचें दिसलें. त्यापैकीं एका तरुण स्वारानें मजवर भाल्याचा असा नेम केला कीं, त्या वेळीं मी ठारच मरावयाचा; परंतु मी इतक्यांत उडी मारल्यामुळें तो माझ्या डाव्या पायांत शिरला, व मी धाडकन जमिनीवर पडलों. तथापि अवसान करून तसाच उठलों, व बाजूच्या टेंकडीवरून खालील डोहांत उडी घेतली, त्यामुळें माझा बचाव झाला. मला चांगलें पोहतां येतें. थोडा वेळ डोहांत दम धरून बसल्यानंतर हळूच बाहेर आलों, व आजूबाजूस कोणी आहेका ह्मणून एक वेळ न्यहाळून पाहिलें. माझ्या दृष्टीस कोणी पडलें नाहीं. मग मी आपल्या पायाची जखम चांगली आवळून बांधली व हळू हळू तें टेंकाड चढून वर आलों, आणि आपल्या साथीदारांचा शोध करूं लागलों. तों आमच्यापैकीं

एकजण मरून पडलेला दिसला, पण दोघांचा पत्ता लागेना. मग ज्या ठिकाणीं आह्मीं मुक्काम केला होता तेथें गेलों. त्या ठिकाणीं तीन घोडे व आमचें सामान जसेंच्या तसेंच होतें. फक्त **जगदेव** व एक घोडा दिसला नाहीं. त्यावरून त्या तरुणांनींच **जगदेवास** सावध करून नेलें असावें अशी माझी खातरी झाली. पायाच्या वेदनेमुळें माझा जीव व्याकुळ झाला होता, ह्मणून मी थोडासा फराळ करून तेथेंच आपल्या दोघां सोबत्यांची वाट पहात बसलों. संध्याकाळच्या सुमारास (**पेमला** व **दयाळसिंगा**कडे बोट करून) हे माझे दोघे सोबती माझा शोध करीत करीत तेथें आले, तेव्हां मला थोडासा धीर आला. मग आह्मीं तेथेंच न राहतां जवळच्या एकाद्या खेड्यांत जावें, व तेथून कांहीं **भिल्ल** आपल्या सांथीस घेऊन आपल्या शत्रूस गाठावें असा विचार केला, आणि पाय दुखत होता तरी तसाच घोड्यावर स्वार झालों व आह्मीं सर्वांनीं रस्ता धरला. ती सारी रात्र आह्मीं मार्ग काटण्यांत घालविली, व सकाळीं आह्मी एका खेड्याशीं गेलों. तेथें दोन दिवस मुक्काम करून माझ्या पायास कांहीं औषधोपचार केले. नंतर तेथून पांच **भिल्लांस** आपल्या नोकरीस ठेवलें; आणि **जगदेवा**च्या शोधाकारितां पुन्हा निघालों. **टुकटोड्या**च्या जवळ येतांच आह्मांस **जगदेव** व **वीरमती** सड्या स्वारीनिशीं गेल्याचें समजलें. तेव्हां तसेच आह्मी त्यांच्या शोधाकरितां वळलों, आणि आज या ठिकाणीं त्यांचा व आमचा सामना झाला. ज्या तरुण स्वारानें माझ्या मांडीस जखम केली होती, त्या स्वाराचें सोंग घेणाऱ्या (**वीरमतीकडे**

बोट करून) ह्या शूर प्रतापी बाईसाहेब होत असें आज मला समजलें. मी सर्वस्वी अपराधी आहें. **कमळे**सारख्या एका हलक्या लवंडीच्या नादीं लागून मीं जें कृत्य केलें, त्याबद्दल मला फार पश्चात्ताप होत आहे. मी आपल्या सर्वस्वीं स्वाधीन झालों आहें, तेव्हां या जीवास पाहिजे ती शिक्षा करण्यास आपण मुक्त्यार आहांत.'

**क्रूरसिंगा**चे हकीकतींत सर्व गोष्टी समजून आल्यामुळें बाकीच्यास त्यांची हकीकत विचारली नाहीं. नंतर ज्या दोघांस जखमा झाल्या होत्या, त्यांस पट्टे वगैरे बांधून सर्वां-च्या दंडास काढण्या बांधण्याचा **धीरसिंहानें** हुकूम केला, नंतर सर्व मंडळीनें तेथें जेवण केलें, व ह्या कैद्यांस थोडथोडें खावयास दिलें.

भोजनोत्तर सर्व मंडळी पुढील प्रवासाचा विचार करा-वयास बसली. **जगदेवानें** आतां प्रवासाचे नादीं न पडतां परत **धारानगरीस** चलावें, व हें एकंदर घडलेलें वर्तमान महाराजांस सांगून त्यांच्या मनांतील संशय दूर करावा, असें **धीरसिंहाचें** ह्मणणें होतें; पण **जगदेवास** तें पसंत पडेना. त्यास स्वपराक्रमानें उदयास यावें अशी इच्छा होती. शिवाय असेंच परत जाऊन आपल्या सावत्र का होईना, पण मतुश्रीचें कारस्थान उघडें करून जगांत तिची छीः थूः व्हावी व आपण सुखानंद-संपन्न व्हावें, हें त्यास मुळींच पसंत नव्हतें. तसेंच आपल्या अंगच्या सामर्थ्यानें उदयास आल्यावांचून वडिलांस तोंड दाखवायचेंच नाहीं असा त्यानें निघते वेळींच निश्चय केला होता. अशा अनेक कारणांमुळें

**धीरसिंहा**चें ह्मणणें त्यानें कबूल केलें नाहीं. शेवटीं **धीरसिंहा**नें तेथूनच परत **धारानगरीस** जावें, व कोणत्याही गोष्टीचा स्फोट न करतां फक्त **सोळंकी** राणीस **जगदेवा**चें कुशल वर्तमान कळवून स्वस्थ बसावें, आणि **क्रूरसिंग** आदिकरून कैद्यांस **धीरसिंहा**नें आपल्या वाड्यांतच नजरकैदेंत ठेवावें असें ठरलें.

**जगदेवा**नें आपण येथून **अणहिलपुर पट्टणास** जाऊन तेथील राजाजवळ मिळेल ती नोकरी धरून राहण्याचा आपला निश्चय कळविला. **अणहिलपुरास** नच जमलें, तर **मेवाड**च्या राजाकडे जाण्याचा विचार करूं, पण तसें करण्याचा प्रसंग आलाच, तर आपणास कोणामार्फत तरी हकीकत कळवूं असेंही सांगितलें. **वीरमती**चीही **जगदेवा**च्या ह्मणण्यास संमति पडली, व त्याप्रमाणेंच करण्याचें ठरलें.

पहाट होतांच सर्व मंडळीनें आपला स्नानादि विधि आटोपून थोडथोडा फराळ केला. **धीरसिंहा**नें आपला खासा घोडा **जगदेवास** बसावयास दिला, व **वझा** आणि **रामास** बरोबर असूं देण्याविषयीं आग्रह केला; पण ती गोष्ट त्यानें कबूल केली नाहीं. त्यानें पहिल्याप्रमाणेंच सड्या स्वारीनें जाण्याचा विचार ठरविला, व त्याप्रमाणें **जगदेव** व **वीरमती** उभयतां आपलीं शस्त्रास्त्रें घेऊन घोड्यांवर स्वार झालीं. निघण्यापूर्वीं **जगदेवा**नें **धीरसिंहास** प्रेमालिंगन देऊन आपल्या **सोळंकी** मातुश्रीचा काळजीपूर्वक समाचार घेण्याविषयीं बजावून सांगितलें. **वीरमती**नें लवून नमस्कार केला, व त्या उभयतांनीं आपल्या हितचिंतक वृद्ध सरदा-

राचा निरोप घेतला. जातांना क्रूरसिंगादि गुन्हेगार मंडळीचे कोणत्याही प्रकारें अन्नपाण्यासंबंधीं हाल करूं नका, असें जगदेवानें धीरासिंहास विनयपूर्वक कळविलें, व उभयतां अणहिलपूर पट्टणाकडे चालतीं झालीं.

जगदेवास निरोप दिल्यानंतर धीरासिंहानें चार स्वारांस एकेक कैदी सोंपून दिला. दोन स्वार पुढें व दोन स्वार मागें आणि मध्यें कैदी; त्यांच्या दोन्ही दंडांस दोर बांधून ते पुढें चालणाऱ्या स्वारांच्या हातीं दिलेले; अशा प्रकारें चोवीस स्वारांस ते सहा कैदी वांटून दिले. व मरून पडलेल्या दोघांस तेथेंच खास खणून त्यांत ढकलून दिलें. अशा प्रकारें व्यवस्था लावून ही मंडळी परत धारानगरीकडे चालली. जातांना वाटेंत जगदेवानें मारून टाकलेली तीं वाघ व वाघीण आणि घोडा अशीं तिन्ही शवेंही त्यानें बरोबर घेतलीं.

जगदेव व वीरमती तेथून जीं निघालीं तीं मजल दरमजल करीत तिसरे दिवशीं पहाटेच्या सुमारास अणहिलपुराच्या सीमेंत जाऊन पोंचले. या गांवाबाहेर सहस्रलिंग नांवाचा एक विस्तीर्ण तलाव होता व त्याच्याच कांठीं एक फार पुरातन त्याच नांवाचें महादेवाचें स्थान होतें. तळ्याच्या कांठीं वडाचीं व पिंपळाचीं मोठालीं जुनीं झाडें होतीं. त्यांतील बहुतेक झाडांस विटांचे व दगडांचे पार बांधलेले होते. या झाडांपासून त्या सरोवरास एक प्रकारची रमणीय शोभा आलेली होती. थकून भागून आलेल्या प्रवाशांस तर हें स्थान इंद्राच्या नंदनवनाप्रमाणें सुखावह वाटत असे. अशा ह्या आरामस्थलीं आमचीं नायक व नायिका

येऊन पोंचलीं. तें रमणीय स्थान पाहून त्यांस आनंद झाला. त्यांनीं आपला मुक्काम त्या तळ्याचा घाटाशींच असलेल्या एका विस्तीर्ण वटवृक्षाचे पारावर ठेवला. त्यांनीं आपल्या घोड्यांवरील सामान उतरून तें त्या पारावर नीट लावून ठेवलें. दोघांनीं आपल्या घोड्यांस तळ्यांत नेऊन न्हाऊं घातलें, व गवताचा भारा विकत घेऊन त्यांपुढें टाकला. नंतर उभयतांनीं प्रातःर्विधि आटोपून त्या सरोवरांत स्नानें केलीं, आणि शिधा सामुग्री आणण्याकरितां व राहण्यास एकादी सोईची जागा पाहण्याकरितां **वीरमतीस** घोडे संभाळण्यास सांगून **जगदेव** शहरांत गेला.

हें सरोवर विस्तीर्ण असून यांतील पाणी स्वच्छ व गोड असल्यामुळें शहरांतील बहुतेक स्त्रीपुरुष धुण्याकरितां ह्याच सरोवरावर येत असत. ही सकाळची वेळ असल्यामुळें शहरवासी स्त्रीपुरुषांची येथें सारखी रीघ लागलेली होती. कोणी स्नान करतात, कोणी पाणी भरतात, कोणी वस्त्रें धुतात, कोणी भांडीं घासतात, अशी एकसारखी गर्दी उडून राहिली होती. त्याच गांवांतील एका स्त्रीची नजर **वीरमती**वर गेली. तिचें तें तारुण्यभरित सुंदररूप पाहून तिला मोठें आश्चर्य वाटलें. ती मनांत ह्मणाली–' ही कोणी तरी थोरामोठ्याची कन्या असावी; पण हिजबरोबर दासदासी कोणीच दिसत नाहीं ? मग ही कोणी अप्सराच तर नसेलना ? कोणी का असेना, पण ही शिकार जर आपणास मिळाली, तर आपल्या यजमाननीकडून आपणास चांगलें इनाम मिळेल यांत संशय नाहीं. कांहींही असो, आपण तिची हकीकत तर विचारून पहावी!'–असा विचार करून ती

आपला पाण्याच्या हांडा डोक्यावर घेऊन **वीरमती**जवळ गेली, व–'बाई आपण कोण आहांत, कोठून आलां, व कोठें जावयाचें? आपलें नांव गांव काय? आपण एकट्याच आहांत किंवा आपणाबरोबर दुसरेंही कोणी आहे?'–असे तिनें प्रश्न केले.

तिचें तें धीटपणाचें बोलणें ऐकून **वीरमतीस** आश्चर्य वाटलें. ती ह्मणाली–'इतकी चवकशी करणार आपण कोण आहांत? माझें नांव गांव समजून तुह्मांला काय करावयाचें आहे?'

ती स्त्री मोठी धूर्त होती. **वीरमती**चा हा जबाब ऐकून तिनें तेव्हांच ताडलें कीं, ही कोणी तरी नवखीबाई आहे. तिच्या बोलण्यानें ती मुळींच कचरली नाहीं, पण उलट अधिक धिटाईनें ह्मणाली–' आपण मला ओळखलें नाहीं. मी येथील महाराणीची मुख्य दासी आहें. आपणासारखें कोणी नवखें मनुष्य दिसल्यास त्याचा तपास करावा हें माझें काम आहे. आपण जर आपलें मला नांवगांव सांगणार नाहीं, तर कोतवालचावडीवर जाऊन मला आपणाबद्दल वर्दी द्यावी लागेल. कोतवालचे लोक आले ह्मणजे मग चुमीत सर्व सांगाल, आपण सभ्य व थोर मनुष्य दिसलां ह्मणून मी आपणाजवळ आलें. याउपर आपली मर्जी.'

त्या स्त्रीचें हें बोलणें **वीरमतीस** खरें वाटलें, व तिनें आपलें नांव, गांव, तसेंच पतीसह प्रवासांत सडेच निघालों असल्याबद्दलचें एकंदर वर्तमान सांगितलें. तें ऐकून त्या स्त्रीस आनंद वाटला, व ती ह्मणाली–'बाई आपण एवढ्या थोरामोठ्यांच्या आहांत हें मला माहीत नव्हतें. माझ्या बोलण्याचा

आपण राग मानूं नये. येतें आतां मी ' असें बोलून ती निघून गेली.

तिला जाऊन पुऱ्या चार घटका लोटल्या नाहींत तों, कांहीं शिपाई व दासदासी यांसह एका बुरख्याच्या रथांत बसून एक साधारण पोक्त वयाची बाई तेथें येऊन दाखल झाली. ती हिरवा बुट्टीदार शालू नेसली होती. तिनें आपल्या अंगावर हिऱ्यामोत्यांचे पुष्कळ दागिने घातले होते. तिचा वर्ण सोन्याच्या रंगासारखा पिंवळा असून गालांच्या भागावर लाली मारीत होती. तिचे डोळे काळे भोर असून ते भोंकरा-सारखे मोठे होते. तिनें आपल्या भिवया कोंरून कोंरून कमानदार केलेल्या होत्या. नाक ठसठशीत होतें, पण नाकपु-ड्यांचा भाग बराच पसरट होता. शरीराचा बांधा ठेंगणा होता. चेहरा चापट पण वाटोळा गरगरीत होता. तिच्या तोंडावर बारीक बारीक देवीचे वण होते. डोक्यावरील केंस कुरळे असून कपाळावरील भागांत जागोजाग त्याचे आंकडे वळविलेले होते. हातापायाचीं बोटें मेंदीनें रंगविलेलीं होतीं. तिचे ओंठ शरीराच्या मानाप्रमाणें चांगले लठ्ठ होते, व दांत डाळिंबाच्या दाण्यासारखे लाल रंगविले असून त्यांवर सोन्याच्या टिकल्या बसविलेल्या होत्या. ती स्त्री रथांतून खालीं उतरली, आणि एकाद्या दाट संबंधाच्या माणसाप्रमाणें **वीरमती**जवळ जाऊन ह्मणाली—'काय बाई, यायचं होतं तर अगोदर निरोप तरी पाठवायचा? ह्मणजे रथपालखी तरी सामोरी पाठविली असती. असो, झालं तें झालं, पण चल उठ रथांत बैस. तुझें कांहीं सामान असल्यास त्या शिपायांस दाखीव ते सर्व घेऊन येतील.'

त्या स्त्रीच्या एकंदर थाटमाटावरून ती कोणी तरी मोठ्या घराण्यांतील असावी असें **वीरमतीस** तर वाटलेंच; पण हिचा व आपला कांहीं संबंध नसतां ही इतक्या निकरानें आपणाशीं बरोबर चलण्याविषयीं कसा आग्रह करते असा तिला साहाजिक संशय आला. ती ह्मणाली– 'बाई, आपण कोण आहांत? आणि मला रथांत बसवून कुठें नेणार?'

त्या स्त्रीनें उत्तर दिलें–'तुला अद्याप माहीत नाहीं. मी **जगदेवा**ची आत्या आहे. तुझा सासरा जो **उदयादित्य** राजा त्याची मी चुलत बहीण आहे. तूं आल्याचें समजल्यावरून तुला राजवाड्यांत नेण्याकरितां मी आलें आहे.'

**वीरमती** ह्मणाली–'हा संबंध मला माहीत नव्हता; आतां सर्व समजला. आपल्या ह्मणण्याप्रमाणें मी आलें असतें; पण महाराजांची स्वारी शहरांत गेली आहे; ते आले ह्मणजे त्यांचे विचारें आपण काय तें ठरवावें. त्यांच्या आज्ञेवांचून मला येथून हालतां येत नाहीं.'

**वीरमती**चें असें निश्चयाचें भाषण ऐकून ती स्त्री मनांत चरकली; पण तसें कांहीं न दिसूं देतां ती ह्मणाली– 'अहाग वेडे, **जगदेवा**च्या परवानगीवांचून का मी तुला न्यायला आलें? तो राजवाड्यांत आला, तेव्हां तर तुह्मी येथें आल्याचं वर्तमान मला समजलं. महाराजांनीं त्यास वाड्यांत ठेवून घेतलं ह्मणून **जगदेवानं** मला तुला आणण्याकरितां पाठविलं आहे. व त्यांनीं आपले दोन्ही घोडेही आणण्याबद्दल मला बजावलं आहे.'

'सर्व गोष्टी खऱ्या, पण मी येईपर्यंत तूं येथून हालूं नको अशी जातांना महाराजांनीं आज्ञा केली आहे. तेव्हां त्यांच्या आज्ञेचा भंग करून मी आपणाबरोबर कसं यावं?'—असें **वीरमतीनें** उत्तर दिलें.

ती स्त्री ह्मणाली—'आज्ञेचा भंग करूं नये खरें, पण **जगदेवाच्या** सांगण्यावरूनच मी तरी तुला न्यायला आलें ना? ही त्यांची आज्ञा तुला मान्य नाहीं वाटतं?'

ह्या प्रमाणें त्या स्त्रीचें डावपेंचाचें बोलणें ऐकून **वीरमती** स्तब्ध झाली. तिला तिचें बोलणें खरें वाटलें, व ती आपलें सामान घेऊन तिजबरोबर त्या बुरख्याच्या रथांत जाऊन बसली. त्या स्त्रीस पुष्कळ आनंद झालेला दिसला, व हां हां ह्मणतां सर्व परिवारासह तो रथ एका वाड्याजवळ येऊन दाखल झाला.

ह्या वाड्यास चार चौक होते, व त्या प्रत्येक चौकांत वेगवेगळ्या तऱ्हेचीं चार कारंजीं होतीं. दरेक मजल्यास लहान मोठ्या मिळून बारा बारा खोल्या व एकेक भव्य दिवाणखाना होता. त्या प्रत्येक खोलीस वेगवेगळ्या तऱ्हेचा रंग दिलेला होता. तळमजल्याच्या दिवाणखान्यांत सर्व संगमरवरी दगडांचें सामान होतें, व बिछायतही शुभ्र केलेली होती. दुसऱ्या मजल्यावरील दिवाणखान्यांत सर्व लाल रंगाचें सामान असून बिछायतही लालच होती. तिसऱ्या मजल्यावरील दिवाणखाना पांचाप्रमाणें हिरवागार दिसत होता, व चौथ्या मजल्यावरील दिवाणखाना सोनेरी रंगानें शृंगारलेला होता.

ह्या वाड्याजवळ रथ येतांच ती स्त्री रथांतून खालीं उतरली, व तिनें **वीरमती**चा हात धरून तिला खालीं उतरविलें; व ह्या चौकांतून त्या चौकांत अशीं वळणें घेत घेत तिसऱ्या मजल्यावरील दिवाणखान्यांत नेलें. तेथें गेल्यावर त्या स्त्रीनें आपल्या दासीस कांहीं सुचविलें. त्याबरोबर ती बाहेर गेली, व थोड्या वेळांत चौघी स्त्रिया सुगंधी तेलें, अत्तरांच्या कुप्या, नाना प्रकारचीं उटणीं घेऊन आल्या. त्यांनीं **वीरमती**स चौरंगावर बसवून तिच्या अंगास सुगंधी तेलें व उटणीं लावून तिच्या अंगाची मळी काढली. नंतर तिला त्या स्नानगृहांत घेऊन गेल्या. तेथें स्नान घातल्यानंतर एक गुलाबी शालू नेसावयास आणून दिला. तें परकें वस्त्र नेसणें **वीरमती** कबूल करीना, परंतु त्या घरधनिणीचा फारच आग्रह पडल्यावरून मोठ्या कष्टानें ती तो नेसली. स्नान केल्यानंतर ईश्वराराधना करण्याचा **वीरमती**चा परिपाठ असे, त्याप्रमाणें तिनें एका एकांत खोलींत बसून परमेश्वराची आराधना केली. तिची ती मानस पूजा होईपर्यंत त्या स्त्रीनें इकडे जेवणाची सर्व तयारी करून ठेवली. पूजा आटोपतांच तिला जेवण्याविषयीं आग्रह सुरू झाला; परंतु—**जगदेव** जेवल्यावांचून आपण तोंडांत पाणी सुद्धां धरीत नाहीं—असा आपला कडकडीत नियम असल्याचें **वीरमती**नें सांगितलें, व—'महाराजांस येऊं द्या, ते जेवल्यानंतर त्यांच्याच ताटांत मी जेवीन' असें ती ह्मणाली. **वीरमती**नें जेवावें ह्मणून त्या स्त्रीनें पुष्कळ आग्रह केला, व परोपरीनें तिची समजूत घातली; परंतु तिनें आपलाच हेका शेवटपर्यंत कायम ठेवला. अखेर

त्या स्त्रीनें एका दासीस बाजूस बोलावून तिच्या कानांत कांहीं सांगितलें, व **वीरमती**समक्ष तिला हांक मारून ती ह्मणाली—'**चमेली**, तूं आतांच्या आतां धांवत राजवाड्यांत जा. आणि तेथें **जगदेव** नांवाचे सकाळींच पाहुणे आले आहेत, त्यांची भेट घेऊन सांग कीं, तुमची आत्याबाई जेवणाकरितां तुमची वाट पहात आहे. तुह्मी जेवल्यावांचून **वीरमती**बाई जेवीत नाहीं, व त्यामुळें आह्मी सर्व खोळंबून बसलों आहोंत. करितां ताबडतोब या, व जेवण झाल्यानंतर मग पाहिजे तर खुशाल महाराजांबरोबर गोष्टी बोलत बसा.'

'जी बाईसाहेब'—असें ह्मणून **चमेली** तेथून चालती झाली, व सुमारें एक घटकेनें एकादा मनुष्य लांबून धांवत आला ह्मणजे जसा तो उसासे टाकतो, तसे उसासे टाकीत ती परत आली, आणि ह्मणाली—'बाईसाहेब, **जगदेव** महाराज तर जेवून खाऊन महाराजांशीं गप्पा गोष्टी सांगत बसले आहेत. ते मला ह्मणाले—'महाराजांनीं आग्रह केल्यामुळें मी त्यांच्या पंक्तीसच जेवलों, व ( **वीरमती**कडे बोट करून ) ताईसाहेबांस जेवून घेण्यास सांगा. मी आतां रात्रींच येईन, माझी वाट पाहूं नका' **चमेली**चें बोलणें आटोपल्यावर ती स्त्री ह्मणाली—'झालं बाई, तुमचे यजमान तर जेवून खाऊन बसले, व तुह्मी तर अजून त्यांच्या जेवणाचीच वाट पाहतां ! बरं झालं, **चमेली**ला पाठविलं ह्मणून; नाहींतर आपण अशाच वाट पाहत बसलों असतों. चला, आतां तरी जेवायचं कीं नाहीं ?'

**चमेलीनें** सांगितलेली हकीकत **वीरमतीस** खरी वाटली, तथापि तिनें **चमेलीस** पुन्हा विचारलें–' महाराज खरोखर जेवले कां? व त्यांनीं मला जेवणाची आज्ञा दिलीका?'– **चमेलीनें** उत्तर दिलें–'ताईसाहेब मी खोटं कशाला सांगूं? ते जे बोलले तेंच मी आपणास येऊन सांगितलं, व ते तरी खोटं काय ह्मणून सांगतील?' बरें बाई, त्यांची आज्ञा मला मान्य आहे, असें ह्मणून **वीरमती** भोजनास उठली. तथापि तिला तें पंचपक्वान्नांचें जेवण गोड लागेना. त्या स्त्रीनें हें तरी खा, तें तरी खा, असा पुष्कळ आग्रह केला, पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. थोडेसें खाऊन तीं उठली. पानाचा विडा खाण्याबद्दलही त्या स्त्रीनें व तिच्या दासीनें पराकाष्ठेचा अग्रह केला; पण पतीस दिल्यावांचून मी कधींच विडा खात नाहीं असा तिनें एकच जबाब दिला.

**वीरमतीस** आनंद व्हावा ह्मणून त्या स्त्रीनें व तिच्या दासीनें तिजपुढें अनेक प्रकारचे खेळ आणले; नानाप्रकारचीं चित्रें दाखविलीं; पुष्कळ प्रकारचीं गाणीं ह्मटलीं; परंतु त्यांपैकीं एकापासूनही तिला करमणूक तर झाली नाहींच, पण उलट त्रास मात्र झाला. तिचें सर्व लक्ष **जगदेवा**कडे लागून राहिलें होतें. **जगदेव** केव्हां येईल व मी त्यांस केव्हां भेटेन असें तिला झालें होतें. संध्याकाळ झाली, चार घटका रात्रही लोटली, तरी **जगदेवा**चा ठिकाणा नाहीं! तेव्हां तिचा जीव अगदीं उडून गेला. रात्रीचें जेवण उरकून घेण्याबद्दल त्या स्त्रीनें **वीरमती**ची पुष्कळ प्रकारें समजूत घातली; पण **जगदेव** आल्यावांचून आपण आतां

अन्नाला शिवणार नाहीं असें तिनें साफ सांगितलें. ही जेवली नाहीं व असाच ध्यास करीत बसली, तर हिची प्रकृति बिघडेल, व आपल्या कार्यभागास अडचण येईल, म्हणून त्या स्त्रीनें पुन्हां दुपारप्रमाणेंच **चमेलीस** कानगोष्ट सांगून **जगदेवास** बोलावण्याकरितां पाठविलें. ती बाहेर गेली, व थोड्या वेळानें परत येऊन म्हणाली—'**जगदेव** महाराजांचें आतांचेंही जेवण झालें आहे. ते म्हणाले—तुम्ही आपलें जेवण उरकून घ्या. मी दहा घटका रात्रींच्या सुमारास जरूर येतों.'—**चमेलीनें** जगदेवाचा अशा प्रकारचा जरी निरोप सांगितला, तरी **वीरमती** जेवणाचें कबूल करीना. तिनें—मला भूक नाहीं, मी रात्रीची फार करून जेवीत नसते—अशा अनेक सबबी सांगून त्या स्त्रीची समजूत केली. जेवीत नाहींस तर थोडेंसें फळफळावळ तरी खा, व एकादा उंची मद्याचा प्याला पी, म्हणजे तुला बरें वाटेल' असा त्या स्त्रीनें पुन्हा आग्रह केला. शेवटीं फारच आग्रह झाला तेव्हां निरुपायास्तव तिनें थोडेसें दूध पिण्याचें कबूल केलें. दासीनें लागलींच एका चांदीच्या पेल्यांत उत्तम मसाल्याचें दूध आणलें. त्यांतील थोडेंसें पिऊन बाकीचें परत केलें. नंतर ती स्त्री **वीरमतीस** तळघरांतील भुयारावाटे जवळच दुसरी एक दोनमजली बंगली होती तेथें घेऊन गेली.

ह्या बंगलीच्या चोहोंबाजूस खंदक खणून त्यांत पाणी सोडलें होतें. येथें जाण्यास त्या वाड्यांच्या तळघरांतील रस्त्या शिवाय दुसरा रस्ता नव्हता. त्या बंगलीच्या तिन्ही बाजूंस एक लहानसा बाग होता, व एका बाजूस एक लहानशी गल्ली होती. ह्या बंगलींत उत्तम प्रकारची रोषनाई केले-

ली होती. दुसऱ्या मजल्यावर पश्चिमच्या खिडकीजवळ एक मोठा नक्षीदार पलंग होता. भिंतीवर जागोजाग नग्न चित्रें काढलेलीं होतीं. पलंगाचे दोहों बाजूंस पाऱ्याचे मोठाले आरसे लावले होते. बाजूस एका चौरंगावर कित्येक मद्यांच्या कुप्या व कांहीं फळफळावळ ठेवलेलें होतें. दुसऱ्या बाजूच्या चौरंगावर अत्तरांच्या कुप्या व सुवासिक फुलांचे गुच्छ ठेवलेले होते, व पलंगावर जाईच्या फुलांची शेज केलेली होती. ह्या बंगलींत आल्यावर ती स्त्री **वीरमतीस** ह्मणाली, 'बेटा, आतां तूं ह्या पलंगावर स्वस्थ निज. **जगदेव** महाराज आले ह्मणजे मी त्यांस इकडे पाठवून देईन. तूं कांहीं काळजी करूं नकोस. तुला वाटल्यास यांपैकीं वाटेल तें मद्य पी, व फळफळावळही खा. वेडे, आनंदांत रहावं. दोन घटका नवरा दृष्टी आड झाला नाहीं, तों अशा प्रकारें जिवाचे हाल करून कुठें चालतं? खावं, प्यावं, मजा करावी. आपण सुखी तर जग सुखी. तूं आतां सर्व काळजी सोडून दे. तुझे दिवस आनंदांत जातील अशी मी सर्व व्यवस्था केली आहे, समजलीस? आतां मी जातें. तूं आनंदांत रात्र घालीव.' असें बोलून ती स्त्री आल्या मार्गानें चालती झाली. जातांना तिनें त्या बंगल्याच्या दाराची कडी बाहेरून लावून घेतली.

ती निघून गेल्यानंतर त्या बंगलींत **वीरमती** आपणाशीं विचार करीत बसली. सकाळपासून घडलेल्या एकंदर प्रकाराबद्दल तिच्या मनांत अनेक प्रकारचे तरंग येऊं लागले. ही स्त्री कोण असावी? ही महाराजांची खरोखरच आत्या असेल काय? नाहीं ह्मणावें तर हिला आमची एकंदर

हकीकत कोणीं सांगितली? आत्ता ह्मणावें तर मला एक- टीलाच ह्या बंगलींत सोडून ती कशी निघून गेली! जातांना ती जें कांहीं बोलली त्यावरून तिच्या वर्तनाचा तर संशय येतो. काय असेल तें असो, महाराज आल्याशिवाय या गोष्टीचा खुलासा होणार नाहीं. त्यांची स्वारी दहा घटकारात्रीं येईल असें **चमेली** ह्मणाली होती. अजून येण्याची वेळ झाली नाहीं का? रात्र तर बरीच झाली'—अशा विचार तरंगांत ती गढून गेली. तिचें सर्व लक्ष **जगदेवा**च्या येण्या- कडे लागलें होतें. ती ह्या खिडकींतून त्या खिडकींत अशा एकसारख्या घिरट्या घालीत होती. कांहीं खसबसलें कीं, **जगदेव** आल्याचा तिला भास होई; ती दाराकडे टक लावून पाही; व कोणी नाहीं असें समजलें ह्मणजे पुन्हां विचारतरंगांत गर्क होऊन इकडून तिकडे घिरट्या घालूं लागे. अशा प्रकारें घिरट्या घालतां घालतां तिचे पाय दुखून आले, तेव्हां ती खालीं बसली, व अशा विचार तरं- गांतच तिला झोंप येऊं लागली ह्मणून ती तेथेंच लवंडली. इतक्यांत कोणी धाडधाड जिना चढून वर आलें.

# प्रकरण ११ वें.

## अणहिलपूर पट्टण.

ह्या वेळीं गुजराथेंत जीं लहान मोठीं संस्थानें होतीं त्यांत **अणहिलपूर पट्टण** हें संस्थान चांगलें भरभराटींत होतें. कर्नल **टॉड** यांनीं आपल्या पुस्तकांत कित्येक दंतकथेच्या

आधारें जी माहिती दिली आहे; त्यावरून समजतें कीं, त्यावेळीं या शहराचें क्षेत्रफळ १२ कोस असून त्यांत ८४ चौक व तितक्याच बाजार पेंठा होत्या. पण हल्लीं तें शहर गायकवाड सरकारच्या ताब्यांत असून पुष्कळ ओस पडलें आहे. हल्लीं येथील लोकवस्ती ३२६४६ आहे. असो. त्यावेळीं ह्या भरभराटीच्या शहरांत **सिधराज जयसिंह** नांवाचा राजा राज्य करीत होता. तो मोठा सत्वशील व दयाळू होता. गुजराथेंत अगणीत संपत्ति असल्याची जी कांहीं बोलवा होती; तिचें बरेंच प्रत्यंतर येथें दिसत होतें. हरएक प्रकारच्या लोकांची येथें वस्ती होती व सर्व लोक खाऊन पिऊन सुखी होते. त्यावेळीं या शहरांत नुसतीं गणिकेचींच पांचशें घरें होतीं. त्या सर्वांत **जामोती** नांवाची एक गणिका राजाच्या प्रीतींतील होती. ती सुस्वरूप असून नृत्य व गायन कलेंत चांगली निष्णात असल्यामुळें राज्यांतील बहुतेक सरदार, कामदार, मानकरी व शेटसावकार लोकांचा तिच्या घरीं रोज आखाडा भरत असे. ती मोठी धूर्त, चतुर व कावेबाज असे. तिनें आपल्या चतुराईनें अगणीत द्रव्य संपादन केलें होतें. आठ आठ, दहा दहा चौकाचे असे तिनें चार वाडे बांधले होते. त्या प्रत्येक वाड्यास अनेक प्रकारच्या चोरवाटा ठेविलेल्या होत्या. त्यांमुळें हव्यातशा अब्रूदार लोकांस आपल्या कृत्याचा परिस्फोट न होतां हिच्या घरीं जाऊन मौज मारण्यास सांपडत होती. तिनें आपल्याजवळ चांगल्या देखण्या अशा पस्तीस पोरी बाळगल्या होत्या; व आपल्या घरीं येणाऱ्या लोकांची टापटीप करण्याची व्यवस्था त्यांजकडे

सोंपली होती. त्या चारी वाड्यांतून रोज खाणें, पिणें, गाणें, बजावणें व जुगारही चालत असत. सारांश, त्या शहरांत **जामोती**चा वाडा हें सर्व प्रकारच्या नीच कर्मांचें एक स्थान झालेलें होतें. वरील प्रकारांशिवाय **जामोती**वर सर्वांची विशेष प्रीति बसण्याचा एक प्रकार होता. तो असा कीं, तिला कोणी एकादी नाजूक कामगिरी सांगितली असतां अनाकानी न करितां ती बेमालूम करीत असे, व अशा कामा-करताच तिनें आपल्या वाड्यापासून एका बाजूस एक लहा-नशी बंगली बांधून तिच्या चौफेर खंदक केला होता; व त्या बंगलींत जाण्यास आपल्या वाड्यांतूनच एक चोरवाट ठेविली होती.

**सिधराज** जसा सच्छील व दयाळू होता तसाच तो पुष्कळ भोळाही होता. कोणीं कांहीं सांगितलें तरी तें त्यास खरें वाटत असे. त्यामुळें लबाड लोकांस हवीं तशीं कार-स्थानें करण्यास पुष्कळ फांवत असे. शहरसंरक्षणाचें सर्व प्रकारचें काम त्यावेळच्या रिवाजाप्रमाणें कोतवालाकडे सोंपलेलें होतें. त्या कोतवालाचें नांव **डुंगरसी** होतें. तो मोठा धूर्त व कारस्थानी होता. त्यानें आपणाजवळ एक अट्टल चोरांची टोळी बाळगली होती. त्यांजकडून तो मोठ्या चोऱ्या करवी, व त्यांतील चौथा हिस्सा आपण घेऊन चौथा हिस्सा त्यांस वांटून देई; आणि निम्मा भाग पकडल्याचा डौल घालून सरकारांत रूजू करी व एक दो-घांस कैदेंतही घाली. पण ह्यायोगानें **डुंगरसी** कोतवाल चोऱ्या पकडण्याच्या कामांत फारच हुशार आहे अशी राजाची समजूत झाली होती, व त्याजवर त्याचा विशेष

भरंवसा बसला होता. पेशवाईत **घाशीराम** कोतवालाची जशी चळचळाट होती त्याहीपेक्षां त्यावेळीं **डुंगरसी** कोतवालाची त्या राज्यांत जास्त चळचळाट होती. शहरांतील सर्व लोक राजापेक्षांही त्यास जास्त भीत असत. ह्या कोतवालास **लालदास** नांवाचा एक पुत्र असे. तो मोठा व्यसनी व चैनी असे. एकादी सुंदर स्त्री दिसल्यास हरप्रयत्नें तिला गांठून तिजवर बलात्कारही करण्यास तो भीत नसे, व बापाच्या विशेष चळचळाटामुळें त्यास अटकाव करण्याची कोणाचीच छाती होत नसे. **जामोती** कलावंतिणीशीं त्याचा विशेष स्नेह असे. ती याजकरितां रोज एकादी तरी नवीन तरुणी गांठून आणी व याजपासून हजारों रुपये उपटी. **लालदासा**चें हें जुलमी वर्तन इतकें वाढलें होतें कीं, रस्त्यांतून एकटें दुकटें जाणें सभ्य स्त्रियांस मोठें जोखमेचें झालें होतें, व त्यामुळें शहरांतील अब्रूदार लोक अगदीं त्रासून गेले होते. परंतु कोतवालाच्या भीतीमुळें ही गोष्ट राजाच्या कानावर घालण्यास कोणाचेंच धैर्य होत नसे.

एके दिवशीं संध्याकाळच्या सुमारास **लालदास** आपल्या सोबत्यांसह मद्याचे प्याले झोंकीत मजा करीत बसला असतां **जामोती**ची दासी येऊन ह्मणाली—'**लालदास** साहेब, आपणाकरितां बाईसाहेबांनीं आज एक उत्तम पांखरूं आणलें आहे. त्याची मजा घेण्यास तुह्मांला दहा घटकारात्री बोलावलें आहे, व येतांना चांगलें नटून थटून येण्यास सांगितलें आहे.'

त्या दासीचे तोंडचे हे शब्द ऐकून **लालदास** मोठ्या उत्सुकतेनें ह्मणाला—'काय ग **लवंगे**, पांखरूं खुब मापुक आहेना?'

**लवंगी**—मापुक ह्मणून काय सांगूं ? असें आपण कधीं जन्मांत पाहिलें नसेल. शुद्ध इंद्राची अप्सराच आहे. तिचें नख सुद्धां दृष्टीस पडण्याची मारामार, अशा थोर कुळांत तिचें जनन आहे; पण बाईसाहेबांच्या पराक्रमानेंच तिचा लाभ आपणास मिळणार आहे.

**लालदास** आनंदानें दारूच्या निशेंत झिंगत झिंगत ह्मणाला—‘ एकूण तर मग आज आह्मी इंद्रसुख घेणार ? वाहवा, आमच्यासारखा नशीबवान कोण आहे ! हें घे तुला बक्षिस. ( अंगावरील जरीचा शेला लवंगीच्या अंगावर फेंकतो ) तूं आज चांगली खबर आणलीस याबद्दल आणखीही तुला बक्षीस देईन; समजलीस ? तुझ्या धनिणीला ह्मणावें, तूं फारच उत्तम कामगिरी बजावलीस ह्मणून तुला मोठें बक्षिस देईन. बरं पण, **लवंगे**, बरोबर दहा घटकारात्रीं येऊं किंवा लवकर आलों तर चालेल ? ’

**लवंगी** शेला उचलून हंसत हंसत ह्मणाली—‘ इतके उतावीळ होऊं नका; त्या स्त्रीचा तुह्मांस हमेश उपभोग घेता येईल अशीही एक युक्ति आहे. तिचा नवरा आपल्या गांवांतच आलेला आहे. त्याला गांठून इकडच्या इकडे नाहींसें केलें ह्मणजे झालें तुह्मी तिचे कायमचे मालक. ’

**लालदास**—बरें आहे, त्यास आतांच पकडवून कैद करतों, पण त्याचें नांव काय, व त्याला ओळखण्यासारख्या कांहीं खुणा तुला माहीत आहेत कां ?

**लवंगी**—त्याला मीं कधींच पाहिलं नाहीं; तर्‍ही त्याच्या खाणाखुणा कोठून माहीत असणार ? तथापि त्याचें नांव

**जगदेव** आहे, व तो **धारानगरी**च्या राजाचा मुलगा आहे, इतकें मात्र समजलं आहे.

**लालदास**—ठीक आहे, तेवढ्यावरूनच त्याचा तपास काढतों. पण कायग, तिचा नवरा बरोबर असतां, ही शिकार तुमच्या हातीं कशी लागली ?

**लवंगी**—आज सकाळीं मी तळ्यावर गेलें होतें. त्या ठिकाणीं ती एकटीच बसलेली होती, व तिचा नवरा गांवांत जागा पहाण्याकरितां गेलेला होता. तिच्या चेहऱ्यावरून ही कोणी तरी नवखी स्त्री आहे असं मी तेव्हांच ओळखलं, व युक्तीनं तिची सर्व हकीकत विचारून घेतली, आणि त्याच पायीं ती सर्व आपल्या **जामोती** बाईस जाऊन सांगितली. मग काय, त्या लागल्याच तिच्या आतेसासू बनल्या, व दासदासी बरोबर घेऊन बुरख्याच्या रथांत बसून तेथें गेल्या. मोठमोठ्या मी मी ह्मणणाऱ्यांना सुद्धां हां हां ह्मणतां बाईसाहेब चकवितात, मग त्या बिचाऱ्या पोरीची काय कथा ? त्यांनीं ताबडतोब तिला आपल्या मायाजाळांत घेरलें व आल्या घेऊन वाड्यांत. ती आल्यापासून आपल्या नवऱ्याची वाट पहातच आहे, व आह्मीं थापा देऊन तिची समजूत करीत आहोंत. आज रात्रीं तुह्मास तिचे नवरोबा करून भेटविणार आहोंत. परंतु तिच्या खऱ्या नवऱ्याची वाट लावण्यास तुह्मीं मात्र विसरूं नका हो ? नाहीं तर तो रजपूत बच्चा करील एखादा घोंटाळा.

**लालदास**—शिकार आपल्या ताब्यांत आली आहे, आतां त्याची तुला काळजी नको. पण तुह्मीं ही काम-

गिरी फारच छान बजावली व याबद्दल तुह्माला बक्षीसही तसेंच दिलें पाहिजे. जा तू आतां, मी ठरलेल्या वेळेस हजर होतों.

**लवंगी**—या कामांत सगळी माझी मेहनत आहे हें आपण लक्षांत ठेवावं. जातें तर मी आतां. आपण रात्री जरूर या व पोशाख वगैरे चांगला करा. कारण ती रजपुताणी फिदा झाली पाहिजे.

**लालदास** मिशीवर हात फिरवून ह्मणाला—' ह्या फकडाला ती खुष होणार नाहीं ? बिशाद काय तिची ! तिनें खुष झालेंच पाहिजे, समजलीस ? तूं जा. तुझे मेहनतीचा बदला तुला बरोबर देईन, भिऊं नकोस. '

'लालसाहिबांचा मला भरंवसा आहे' असें ह्मणून **लवंगी** चालती झाली. **लालदासानें** चार शिपायांस बोलावून **जगदेव** नांवाचा प्रवासी गांवांत आला आहे त्यास पकडून कैदेंत ठेवण्याचा हुकूम केला, व आपण चट्टीपट्टी करण्याच्या उद्योगास लागला. त्यानें आपल्या केंसांस सुवासिक तेल लावून ते कंगव्यानें साफ विंचरले, व दोन्ही कानांच्या बाजूला त्यांचे आंकडे वळविले. मिशांस अत्तर लावून त्या साफ केल्या; डोळ्यांत सुरमा भरला; कानांत जडावाचा चौकडा घालून पाचाची बाळी लटकावली. गळ्यांत जडावाचा गळेबंद घालून एक लठ्ठ मोत्यांचा हार चढविला. दोन्ही हातांत जडावाचीं कडीं घालून दोन्ही हातांचीं बोटें हिऱ्या माणकांच्या आंगठ्यांनीं भरून काढलीं. हा रुमाल बांधावा, आरशांत चेहरा पहावा, पुन्हां तो फेंकून दुसरा बांधावा, व पुन्हा आरशांत पहावें; असे त्यानें पांच सहा

मराठी ... आण

जरीचे रुमाल बदलले, शेवटीं पिरोजी रंगाचा रुमाल त्यास पसंत पडला. नंतर त्या स्वारीनें लाल रंगाची किनखापी तुमान चढवून कमरेस एक रेशमी काच्या गुंडाळला व त्याचे गोंडे पुढले बाजूस लोंबते ठेवले. अंगांत एक मलमलीचें पांढरें कुडतें घालून त्यावर भरगच्ची कबजा चढविला, आणि वरून गुलाबी रंगाचा एक जाळीदार अंगरखा घातला. पायांत जरीची वेलबुट्टी काढलेला एक पंजाबी जोडा चढवून हातांत सोन्याची मूठ बसवलेली नकशीदार काठी घेतली. अशा प्रकारें ही स्वारी नटून तयार झाल्यानंतर त्यानें एक अफूची गोळी चढवून त्यावर पांच सहा प्याले भांग झोंकून दिली. इतक्यानेंही त्या स्वारीची तृप्ति झाली नाहीं. त्यानें त्यावर दोनचार दारूचेही प्याले गट्ट केले. मग झिंगत झिंगत तो आपल्या सोबत्यास ह्मणाला—'कां **गुलाब** आतां फक्कडांची स्वारी कशी दिसते? आतां मला इंद्राची अप्सराही प्रसन्न होईल कीं नाहीं?'

'काय सांगावें महाराज, आपण इंद्रापेक्षांही सुरेख दिसतां. अप्सराच काय, पण इंद्राणीसुद्धां आपणास मोहून जाईल.' असें त्यानें उत्तर दिलें.

**लालदास**—तूं बरोबर बोललास. पण मी जरा काळा दिसतों नाहींरे?

**गुलाब**—खरेंच साहेब, आपण कृष्णासारखे दिसतां.

**लालदास**—अगदीं खरें. कृष्ण जसा गोकुळांत गोपींशीं क्रीडा करीत होता, तसेंच आपण या पट्टणांत क्रीडा करतों.

**गुलाब**—मनांत ह्मणाला—'काय मूर्ख, कृष्णाची बरोबरी करूं पहातो! तो सर्वशक्तिमान प्रभु कोठें व हा पापी मशक कोणीकडे! पुनः **लालदासास** उद्देशून ह्मणाला—'त्या गोपी कृष्णाकरितां रानांवनांतून धांवत होत्या व आपण ह्या गोपींकरितां रानांवनांत धांवतां; इतकाच काय तो फरक. बाकी आपण कृष्ण आहांत यांत कांहीं संशय नाहीं. बरें पण तुह्मांला दहा घटका रात्रीं जायाचें ना? वेळ झाली.

**लालदास**—खरंच कां दहा घटकाचा अमल झाला? चल तर मग तूं माझ्याबरोबर. तुलाही गम्मत दाखवितो. ही घे थोडीशी पी. (असें ह्मणून त्यानें दारूचा एक प्याला भरून त्याच्या तोंडास लावला. )

**गुलाब** दारूचा घुटका घेऊन ह्मणाला—'मला कशाला बरोबर नेतां? आपणच जाऊन मजा मारा. मी पाहिजे तर तेथपर्यंत पोंचविण्यास येतों.'

'बरं तर तेथपर्यंत तर चल' असें ह्मणून ते दोघे हातांत हात घालून निघाले. **वीरमतीस** त्या बंगलींत सोडल्यानंतर **जामोती** वाड्यांत येऊन याची वाट पहातच बसली होती. ह्या स्वारीस पहातांच ती उठून उभी राहिली व **लालदासास** मुजरा करून ह्मणाली—'**लालदास** साहेब, आज तुह्मांला एक मापुक पाखरूं भेटविलें तर मला काय बक्षीस द्याल?'

**लालदास** तिच्या गळ्यांत हात घालून ह्मणाला—'हा जीव तुला खुर्बान आहे. तूं जें बक्षीस मागशील तें देण्यास हा फक्कड तयार आहे. चल अगोदर तें पाखरूं कोठें आहे तें दाखीव.'

'असे माझ्या मागून या'–असें ह्मणून **जामोतीनें** **लालदासा**स तळघरांतील रस्त्यानें त्या बंगलीच्या दाराजवळ नेलें व त्यास वर जावयास सांगून आपण परत निघून आली.

**लालदासा**ची स्वारी धाडधाड जिना चढून वर गेली. त्या आवाजानें **जगदेव**च आला असा भास होऊन **वीरमती** उत्सुकतेनें पदर सांवरीत उठली. व 'किती तरी हा वेळ? वाट पाहतां पाहतां'–इतके शब्द तिच्या तोंडांतून निघताहेत नाहींत तों, **लालदासा**चा फेंफऱ्या नाकाचा चेहरा तिच्या दृष्टीस पडून ती एकदम दचकली, व मागें सरली. तिचें तें मोहक स्वरूप पाहून **लालदास** अगदीं कामातुर झाला. तो ह्मणाला–'छबुकडे, अशी कां घाबरतेस? बोल बोल. माझी वाट पाहतां पहातां तुझ्या जीवास त्रास झाला, त्याबद्दल या दासाला तुला वाटेल ती शिक्षा कर. पण अशी मागें सरूं नकोस.'

तशा अपरात्रीस त्या एकांत जागेंत धुंद झालेल्या **लालदासा**चें निर्भीडपणाचें भाषण ऐकून **वीरमती** अगदीं गर्भगाळित झाली. काय जबाब द्यावा हें तिला सुचेना. तिच्या सर्वांगास दरदरून घाम सुटला. छाती धडधड उडूं लागली व पाय लटलटां कांपूं लागले. ती खालीं मान घालून चित्राप्रमाणें स्तब्ध उभी राहिली. तिजकडून कांहीं जबाब मिळेना, तेव्हां **लालदास** तिच्या अगदीं पुढें गेला व दोन्ही हात पुढें करून ह्मणाला–'प्रिये, अशी स्तब्ध कां? येथें आपणावांचून दुसरें कोणी नाहीं. चल ये, दासाला आलिंगन देऊन याचें शांतवन कर.' असें ह्मणून आलिंगन देण्याकरितां तो पुढें सरला. आतां हा आपल्या

अंगास स्पर्श केल्यावांचून राहत नाहीं असें जेव्हां **वीरमतीस** वाटलें तेव्हां ती अगदीं संतप्त झाली. पण तिनें लागलाच आपला राग आंवरून ती थोडी मागें सरली, आणि दोन्ही हात जोडून ह्मणाली—'महाराज, आपण मोठे कुलवान दिसतां, असें असून मजसारख्या एका अबलेवर अशी पापदृष्टि ठेवतां हें बरें नाहीं.'

**लालदास**—मी खरोखरच कुलवान आहें, आणि ह्मणूनच तुझ्या सारख्या सुंदरीवर फिदा झालों आहें. आतां तुला त्या भिकारड्या **जगदेवा**बरोबर रानोरान फिरावें लागणार नाहीं, असा मीं बंदोबस्त केला आहे. राजाच्या राणीपेक्षांही तुला अधिक सुखांत ठेवीन. ह्या राज्याचें एकंदर कळसूत्र माझ्या बापाच्या स्वाधीन आहे समजलीस? (असें ह्मणून आलिंगन देण्याकरितां तो पुन्हा पुढें सरला.)

त्या मदांधाच्या तोंडून **जगदेवास** उद्देशून निघालेले निंदाप्रचुर शब्द ऐकतांच **वीरमती**चा क्रोधाग्नि एकदम भडकून गेला. तशांत हा मदांध अंगावर आलेला पाहून ती अधिक चवताळली व—'हा नीचा, माझ्या प्राणनाथांची निंदा करणारी तुझी ती चांडाळ जिव्हा झडून कशी पडली नाहीं? ह्या **चावडा**कुळांतील स्त्रीला तूं इतर स्त्रियांप्रमाणें समजतोस काय?'—असें ह्मणून तिनें त्याच्या छातींत जोरानें लाथ मारली. आधींच निशेंत धुंद झालेला, तशांत ह्या वीरबालेची लाथ छातींत बसली. मग काय? एकादी लांकडाची मोळी आपटावी तसा तो धाडदिशीं उलथून पडला. तथापि तसाच डोकीचा रुमाल सांवरीत तो उठला व झुकत झुकत पुढें होऊन ह्मणाला.—'प्रिये अशी रागावूं

नकोसग, मजकडून कांहीं अपराध झाला असल्यास माफ कर, व मला एकदा प्रेमालिंगन दे.'

**वीरमती** रागानें ह्मणाली–'तूं बऱ्या बोलानें येथून चालता हो. जी इच्छा धरून तूं येथें आला आहेस ती तुझी इच्छा कधीं सफळ होणार नाहीं.'

**लालदास** डोळे वटारून मिशांवर ताव देत ह्मणाला–'काय मला तूं येथून निघून जा ह्मणतेस? माझी इच्छा सफळ होणार नाहीं? मला तूं अद्याप ओळखलें नाहींस? तुझ्यासारख्या छप्पन हजार स्त्रियांस मी लोळवून सोडलें आहे! तुझी ती बिशाद काय? तूं बऱ्या बोलानें कबूल न झालीस तर तुझ्यावर बलात्कार करून मी आपली इच्छा तृप्त करीन समजलीस?'

**वीरमती** तिरस्कारयुक्त स्वरानें ह्मणाली–'जारे माकडा, ह्या शरीरास नुसता स्पर्श केलास तर तुझ्या हाताचा तुकडा उडवीन, मग बलात्काराची गोष्टच राहूं दे. तूं शहाणा असशील तर येथून चालता हो. नाहींपेक्षां तुझा अथवा माझा बळी पडल्यावांचून राहणार नाहीं.'

**लालदास** 'काय? तूं ऐकत नाहींस?'–असें ह्मणून तिच्या अंगावर धांवला, व तिच्या लुगडयाचा पुढील घोळ धरून तो ह्मणाला—'बऱ्या गोष्टीनें कबूल होतेस कीं नाहीं बोल?'

आतां हा आपणावर बलात्कार केल्यावांचून राहत नाहीं असें जेव्हां पाहिलें, तेव्हां तिनें आपल्या कमरेची कटयार सरकन बाहेर काढली, व डाव्या हातानें त्यास गचांडी देऊन उजव्या हातानें त्याच्या पोटांत ती कट्यार खुपसली! त्यास-

रसें तो—बापरे मेलों रे मेलों—ह्मणून धाडकन जमिनीवर पडला. त्याचें पोट फाटून त्या वाटे रक्ताचा पाट वाहूं लागला, व त्याचा प्राण कासावीस होऊन मोठ्यानें विव्हळत तो जमिनीवर गडबडां लोळूं लागला. 'भोग मेल्या आपल्या कर्माचें प्रायश्चित्त, असें ह्मणून तिनें त्याच्या कुशींत कट्यारीचा दुसरा वार केला. त्याबरोबर धाडकन पाय आपटून त्यानें डोळे फाडले, व त्याचें शरीर लागलेंच निश्चेष्ट पडलें.

अशा प्रकारें त्याचा अंत झाल्यावर **वीरमतीनें** त्याच्या कंबरेचा काचा सोडला; पलंगावरील एक गादी काढून त्यांत तें प्रेत गुंडाळलें व काच्यानें ती वळकटी घट्ट बांधून खिडकीवाटे रस्त्यावर फेंकून दिली. मग तिनें दुसरें कोणी आंत येऊन त्रास देऊं नये ह्मणून खालील दाराची कडी आंतून घट्ट लावून घेतली, व पुढें काय प्रकार होतो तो पहाण्याकरितां ती त्या खिडकीजवळ विचार करीत बसली.

# प्रकरण १२ वें.

## सत्याचा उत्कर्ष.

मध्यरात्रीचा समय झाला होता. जिकडे तिकडे शांत दिसत होतें. अशा वेळीं गस्तीस निघालेले चौघे कोतवाली शिपाई हातांत कंदील घेऊन एका लहानशा बोळांतून जात असतां एक मोठें थोरलें लांबट गाठोडें त्यांच्या नजरेस पडलें. तें पहातांच त्यांत कांहीं तरी माल असावा, व तें

कोणा तरी चोरांनींच टाकलेलें असावें, असें त्यांस वाटलें. त्या चौघांनीं त्यांतील माल आपापसांत वांटून घेण्याचें ठरविलें, व तें गाठोडें तसेंच उचलून रस्त्यापासून एका बाजूस नेलें. मोठ्या उत्सुकतेनें सोडून पहातात तों **लालदासा**चा रक्तबंबाळ झालेला मुर्दा त्यांच्या दृष्टीस पडला. तो पहातांच त्यांच्या छातींत धस्स झालें. यास कोणी मारलें असावें; याचा तपास आतां कसा लागेल; हें लफडें आपल्या गळ्यांत तर पडणार नाहींना, असे विचार येऊन ते अगदीं घाबरून गेले. पुढें काय विचार करावा त्याची त्यांस सूज पडेना. कांहींवेळ आपापसांत विचार करून शेंवटीं त्यांनीं असें ठरविलें कीं, **लालदासा**चे अंगावरील सर्व दागिने काढून ते आपण चौघांनीं सारख्या हिश्शानें वांटून घ्यावे, आणि त्याचें प्रेत पुन्हा जसेंच्या तसें बांधून कोतवाल साहेबांपुढें न्यावें; व त्यांस सांगावें कीं, 'हें गाठोडें आह्मांस रस्त्यांत मिळालें आहे, त्यांत काय आहे तें आपण सोडून पहावें.' त्यांनीं गाठोडें सोडलें ह्मणजे आपोआप त्यांस सर्व दिसून येईल. कोणी चोरांनीं दागिन्याच्या अभिलाषानें त्यांस मारलें असें ठरलें ह्मणजे आटोपलें. इतकें जों ठरत आहे तों त्या चौघांपैकीं एकजण आठवल्यासारखें करून ह्मणाला—'अरे पण आणखी एक आपणाजवळ युक्ति आहे. **लालदासा**च्या सांगण्यावरून आज संध्याकाळीं एका प्रवाशास पकडून आणून कैदेंत ठेवलें आहे. त्याजवरच हें खटलें लोटलें ह्मणजे ज्यास्त पुरावा वगैरेची जरूर न पडतां याचा आपोआप निकाल लागणार आहे. दोन साक्षी मात्र तयार करावे लागतील, ते मीं करतों.'

हा बेत त्या तिघांसही पसंत पडला. त्यांनीं **लालदासा**च्या प्रेताचें पहिल्याप्रमाणें गाठोडें बांधलें व तसेंच कोतवालाकडे घेऊन गेले. कोतवाल साहेब आपल्या रंगमहालांत घोरत पडले होते. त्यांस वर्दी पोंचतांच ते अर्धवट झोपेंत डोळे चोळीत चोळीतच ह्मणाले–'क्या हय, रातके बखत क्यंव गडबड मचा रख्खो हो, जो कुच होयगा सो सबेरकू देख लेंगे.'

हें भाषण ऐकून ते शिपाई ह्मणाले–'कोतवाल साहेब, एह बडा जोखमका खटला दिखता हय. मेहेरबानी करके आप जरा अभीही देख लो तो ठीक.'

शिपायांचा विशेषच आग्रह पाहून कोतवाल एकदाचे उठले आणि काय खटला आहे तो पुढें आणावयास सांगितला. शिपायांनीं तें गाठोडें पुढें नेऊन ठेवलें. त्यानें तें सोडावयास सांगितलें. शिपायांनीं हळू हळू एकेक पदर सोडून एकदाचें तें मोकळें केलें. आपल्या पुत्राचें तें रक्तबंबाळ प्रेत पहातांच कोतवालाच्या डोळ्यांवरील झोप झटकन उडाली व त्याचें काळीज चर्र झालें. तो त्या शिपायांस घाबऱ्या घाबऱ्या ह्मणाला–'अरे ये गठरी तुमकू क्यांसे मिली?' शिपायांनीं उत्तर दिलें–'**जामोतीं**के बारेके पडोसमे जो गल्ली आती हय वहांसे यह गठडी मिल आई.'

शिपायांचा जबाब ऐकतांच कोतवाल साहेब पांच पन्नास शिपाई घेऊन **जामोती**च्या घरीं गेले; व तिला दम भरून **लालदासा**ची खबर विचारूं लागले. ती ह्मणाली–'तुह्मी असे घाबरतां कां? **लालदास** नव्या बंगलींत चैनींत आहेत. पाहिजे असल्यास त्यांस बोलावून

आणतें.' असें ह्मणून ती त्या तळघराच्या मार्गानें बंगली-कडे गेली. तों बंगलीचें दार आंतून लावून घेतलेलें होतें. दारास धक्के मारून दार उघडण्याकरितां तिनें **वीरमतीस** पुष्कळ हांका मारल्या; पण तिला कांहींच जबाब मिळाला नाहीं, तेव्हां ती परत आली. त्या बंगलीचें हें दार मोठें भक्कम होतें. तें साधारण उपायानें उघडण्यासारखें नव्हतें ह्मणून रस्त्यावरून खिडकीस शिडी लावून आंत जाण्याचा त्यांनीं विचार ठरविला. कोतवालानें लगेच एक मोठी शिडी मागवून ती त्या बंगलीच्या गल्लींतील खिडकीस लावली, व एका शिपायास वर चढून जाण्यास सांगितलें. **वीरमती** त्या खिडकींतच हातांत तरवार घेऊन बसली होती. तो शिडीवर चढून गेलेला मनुष्य खिडकीवाटे डोकें घालून आंत उतरणार, इतक्यांत **वीरमतीनें** त्याच्या मानेवर तरवारीचा वार केला. त्याबरोबर त्याचें डोकें आंत व धड खंदकांत पडलें. एकाची अशी वाट झाली तेव्हां दुसरा शिपाई हातांत तरवार घेऊन वर चढला. पण त्याचीही तीच वाट लागली. अशा प्रकारें एकामागें एक अकरा जणांची वाट लागली. त्या बंगलीच्या खिडक्या लहान असल्यामुळें एका वेळीं एकाच मनुष्यास व तेंही लवून शिरण्याशिवाय मार्ग नव्हता. त्यामुळें ह्या लोकांचा इतर कांहीं उपाय चालेना. अकरा मनुष्यांची अशी वाट लागली तेव्हां इतर कोणीही शिडीवर चढण्यास कबूल होईना. इतकें होत आहे तों ही बातमी हां हां ह्मणतां सर्व गांवभर पसरली, व हजारों लोक मजा पहाण्याकरितां तेथें जमले. त्या स्त्रीस पकडण्या-चे सर्व मार्ग खुंटले, तेव्हां कोतवालसाहेबांनीं ही वर्दी

**सिद्धराजा**स कळविली. हें चमत्कारिक वर्तमान ऐकतांच राजाची स्वारी स्वतः घोड्यावर बसून तेथें आली. त्यांनीं कोतवालास एकंदर हकीकत विचारली. कोतवालानें आपल्या पुत्राच्या खुनापासून एकंदर हकीकत सांगून **जामोतीनें** सांगितलेलें वर्तमानही कळविलें. त्यावरून राजास आश्चर्य वाटून तो ह्मणाला—'काय? हा इतका अनर्थ एका स्त्रीनें केला आहे? यावरून ती मोठी शूर असावी. असो. तुह्मी सर्व बाजूस व्हा. मीच तिचा तपास करतों.' असें ह्मणून तो त्या खिडकीच्या समोर उभा राहिला व तेथून तिला विचारूं लागला.

**राजा.**—हे स्त्रिये, तूं कोण आहेस, येथें कशी आलीस व माझ्या मनुष्यांस तूं कां मारलेंस? मी या शहरचा राजा आहें, तुझें कोणीं कांहीं नुकसान केलें असल्यास मीं त्यास जरूर शिक्षा करीन. तूं मनांत कोणतीही भीति न धरितां खरें वर्तमान जें असेल तें सर्व सांग.

राजाचें हें आश्वासनयुक्त भाषण ऐकून **वीरमती** त्या खिडकीच्या आड उभी राहून ह्मणाली—'महाराज, **चावडा**-कुळोत्पन्न **विरज** राजाची मी बहीण असून **धारानगरी**-च्या **परमार** राजपुत्राची धर्मपत्नी आहें. या देहास **वीरमती** असें ह्मणतात. मी आपल्या पतीबरोबर प्रवासास निघालें आहे. काल सकाळीं ह्या शहराबाहेरील तलावावर मला बसवून माझे पति शहरांत जागा पहाण्याकरितां गेले होते. इतक्यांत ह्या वाड्याची मालकीण मजकडे आली व तिनें आपण माझ्या पतीची आत्या असल्याचें खोटेंच सांगून मला दुष्ट हेतूनें येथें आणलें. मी येथें आल्यावर

माझे पति कोठें आहेत ह्मणून विचारतां ते महाराजांजवळ आहेत, महाराजांनीं त्यांस ठेवून घेतलें, ते रात्रीं येतील. अशा प्रकारें सांगून तिनें माझी समजूत केली; व काल रात्रौ मला ह्या बंगलींत आणून ठेवलें. मी येथें आल्यावर थोडया वेळानें एक भलताच पुरुष या ठिकाणीं आला, त्याच्या बोलण्यावरून तो कोतवालाचा मुलगा असावा असें समजलें. मी त्यास बरेपणानें निघून जाण्याबद्दल पुष्कळ सांगितलें, पण तें त्यास न आवडून तो मजवर बलात्कार करण्यास तयार झाला. तेव्हां पातिव्रत्यरक्षणार्थ मला त्यास यमसदनास पाठविणें भाग पडलें. त्यानंतर मला पकडण्याकरितां जे लोक वर आले त्यांचाही मीं वध केला. मी क्षत्रियकन्या आहे. माझ्या शरीरांत प्राण आहे तोंपर्यंत मी कोणासही आपल्या देहास स्पर्श करूं देणार नाहीं.'

**वीरमती**चें हें भाषण ऐकून राजास संतोष वाटला. तो म्हणाला—'बेटा **वीरमती, रजपुतां**च्या स्त्रियांस जें योग्य तेंच तूं केलेंस. तुझी हकीकत ऐकून मी फार संतुष्ट झालों. तुला सर्व गुन्हे माफ आहेत. तूं माझी धर्मकन्या आहेस. तूं आतां कोणत्याही प्रकारची भीति मनांत न धरतां मजबरोबर वाडयांत चल. तुझ्या पतीचा शोध लागेपर्यंत तूं माझ्या मुलीबरोबर आनंदानें रहा.

**वीरमती**—महाराजांची आज्ञा मला शिरसावंद्य आहे, पण माझे पति आल्यावांचून येथून हालावयाचें नाहीं अशी मीं प्रतिज्ञा केली आहे. करितां महाराजांनीं मला वाड्यांत चलण्याचा आग्रह न करतां माझ्या पतीचा शोध करून त्यांची व माझी भेट येथेंच करविण्याची कृपा करावी.

'ठीक आहे, तुझ्या इच्छेप्रमाणें मी आतांच त्याचा शोध करवितों.' असें ह्मणून राजानें कोतवालास, शहरांतील सर्व भागांत मनुष्यें पाठवून **जगदेवा**चा तपास करण्याबद्दल हुकूम केला. हुकूम होतांच पांचपंचवीस शिपाई शोध करण्यास धांवले. इतक्यांत एक वृद्ध शिपाई पुढें येऊन ह्मणाला—' महाराज, आज सायंकाळींच **लालदास** साहेबांच्या सांगण्यावरून **जगदेव** नांवाच्या एका मनुष्यास पकडून कैदेंत ठेवलें आहे. तोच ह्या बाईचा नवरा असल्यास तपास करून पहावा.' त्या शिपायाचें भाषण ऐकतांच राजानें त्यास घेऊन येण्याबद्दल आज्ञा केली. आज्ञा होतांच तो चावडीवर गेला व **जगदेवा**स बरोबर घेऊन तेथें आला.

**जगदेवा**स पहातांच **वीरमती** खिडकींतूनच मोठ्यानें ह्मणाली—' महाराज, हेच ते माझे पतिराज.' ती पुढें बोलणार, इतक्यांत तिचें हृदय हर्षातिशयानें भरून जाऊन तिच्या डोळ्यांवाटे प्रेमाश्रु वाहूं लागले.

महाराजांनीं **जगदेवा**स जवळ बोलावून सर्व हकीकत विचारली, व **वीरमती**च्या ह्मणण्याप्रमाणें **जगदेव** तो हाच अशी त्यांची खात्री होतांच त्यांनीं **वीरमती**ची सविस्तर हकीकत त्यास सांगितली. ती ऐकून **जगदेवा**स आनंद झाला, आश्चर्य वाटलें व स्फुरणही चढलें. तो लगेच महाराजांची आज्ञा घेऊन त्या शिडीवाटे वर चढून गेला. **जगदेवा**स पहातांच **वीरमती** हर्षभरित होऊन तिनें त्यास प्रेमालिंगन दिलें. तिचें हृदय सद्गदित होऊन डोळ्यांवाटे आनंदाश्रु वाहूं लागले. **जगदेवा**चीही तीच स्थिति झाली;

पण त्यानें आपलें मन आवरून तिचें सांत्वन केलें. इतक्यांत महाराजांनीं **जामोती**च्या वाड्यांतून त्यांस बाहेर आणण्याकरितां मनुष्यें पाठविलीं, आणि तीं उभयतां त्या तळघराच्या मार्गानें बाहेर आलीं. महाराजांनीं **वीरमती**करितां वाड्यांतून एक बुरख्याचा रथ मागविला. त्यांत **वीरमती** जाऊन बसली, व **जगदेव** घोड्यावर बसला. नंतर त्या **जामोती** कलावंतिणीस तिच्या दासींसह कैद करून तिच्या वाड्याची जप्ती करण्याचा महाराजांनीं हुकूम केला, आणि ते **जगदेव** व **वीरमती** यांसह वाड्यांत निघून गेले. राजवाड्यास लागूनच एक लहानसा सरकारी बंगला होता तेथें या पाहुण्यांचा मुक्काम ठेवला.

हा इतका प्रकार होईपर्यंत फटफटीत उजेडायला झालें होतें. साऱ्या रात्रीचें जागरण; तशांतच जीवापाड झालेला त्रास व संताप, यामुळें **वीरमती**चें डोकें भणभणून गेलें होतें. ह्मणून थोडीशी झोंप घेण्याबद्दल **जगदेवा**नें तिला सांगितलें; पण आतां तिला कसचा डोळा लागतो? तिला आपल्या नवऱ्याची चुकामुक झाल्यापासून परत भेट होईपर्यंतची आपली हकीकत केव्हां सांगेन व त्यांची हकीकत केव्हां ऐकेन असें होऊन गेलें होतें. **जगदेवा**नें गोष्ट काढताच तिनें **जामोती** आपणाकडे कशी आली; तिनें थापा मारून आपणास कसें वाड्यांत नेलें; तेथें दासींनीं वेळोवेळीं बनावट गोष्टी सांगून आपलें समाधान कसें केलें; पुढें बंगलींत गेल्यानंतर तेथें कोतवालपुत्र कसा आला; वगैरे इत्थंभूत हकीकत सांगून, शेंवटीं ती ह्मणाली 'आपण जर न येतां, तर त्याच बंगलींत अन्नपाण्यावांचून

जितके दिवस राहवतें तितके दिवस आपली मार्गप्रतीक्षा करावयाची, व शेंवटच्या प्रसंगीं आपली मूर्ति डोळ्यांपुढें आणून हा प्राण अर्पण करावयाचा; पण जीवांत जीव आहे तोंपर्यंत बंगलीच्या बाहेर निघून या शरीरास कोणाचाच स्पर्श होऊं द्यावयाचा नाहीं, असा मीं निश्चय केला होता.'

**वीरमतीनें** सांगितलेली एकंदर हकीकत व शेंवटलें तिचें निश्चयाचें भाषण ऐकून **जगदेवास** फार समाधान वाटलें; व तो विनोदानें ह्मणला–' प्रिये, पण ह्या तुझ्या निश्चयानें माझा शोध तुला कसा लागला असता? मी शहरांत आल्यावर इकडे तिकडे फिरून पुष्कळ जागा पाहिल्या, पण मनासारखी एकही मिळेना. दोनप्रहर टळून संध्याकाळची वेळ झाली, तेव्हां एक जागा नक्की करून थोडासा शिधा घेतला व तसाच तलावावर गेलों. तेथें तं व घोडे वगैरे कांहींच सामान नाहीं असें पाहून फारच आश्चर्य वाटलें. आजूबाजूस पुष्कळ शोध केला. शेंवटीं शहरांत येऊन कोतवाल चावडीवर तपास करूं लागलों. इतक्यांत त्या कोतवालच्या लोकांनीं माझ्याभोवतीं गराडा घालून माझ्या कमरेची तरवार एकानें झटकन काढून घेतली, व चौघांनीं माझे हात बांधून 'यही वो हरामखोर' असें ह्मणून कोणत्याही प्रकारची विचारपूस न करतां एका अंधार कोठडींत मला कोंडून ठेवलें. 'मीं काय गुन्हा केला, मला उगीच कां कोंडून ठेवतां?' असें मीं त्यांस पुष्कळ बोललों, पण त्यांजकडून कांहींच जबाब मिळाला नाहीं. 'कोतवालसाबके लडकेके तुम गुन्हेगार हो' इतके

मात्र ते मला ह्मणाले. पण मीं त्याचा काय गुन्हा केला तें कांहींच समजेना. मध्यरात्रीचे सुमारास एक शिपाई कंदील घेऊन माझ्या कोठडींत आला, व आपल्या बरोबरील दुसऱ्या दोघां इसमांस ह्मणाला–'**लालदास**का खून करनार येही अदमी हय. इसकू बराबर पछान लो, व यह गलेबंद इसकेपास मिला हय' असें ह्मणून त्यांनीं आपल्या डगल्याच्या खिशांतून एक रत्नखचित दागिना काढून दाखविला. त्या दोघां इसमांनीं मजकडे न्याहाळून पाहिलें, व पुन्हा कोठडीचें दार लावून निघून गेले. त्यांचें तें बोलणें ऐकून मला फारच आश्चर्य वाटलें, व अतिशय रागही आला. परंतु काय करूं, माझे हातपाय त्या लोकांनीं जखडून टाकले होते, त्यामुळें कांहींच उपाय चालेना. ते लोक गेल्यावर माझ्या मनांत भलभलते विचार येऊं लागले. तूं कोठें असशील, तुला कोणी नेलें असेल, तुझें काय होईल, हे तर विचार होतेच; पण त्या लोकांनीं मजवर बनावट खुनाचा खटला तयार केला, व कदाचित् तसाच इनसाफ होऊन आपणास सुळीं देण्याचा हुकूम झाला तर अशा दीन स्थितींत आपणास मरावें लागेल याबद्दल फार वाईट वाटलें. कांहीं वेळ माझें देहभानसुद्धां ठिकाणावर राहिलें नाहीं. शेवटीं काय होईल तें होवो, तसाच प्रसंग आल्यास दोन हात दाखवून दहा पांच जणांस निजविल्यावांचून हा प्राण जाऊं द्यावयाचा नाहीं असा निश्चय केला, व त्या विचारांत माझा किंचित डोळा लागला. इतक्यांत तीन चार इसम दार उघडून आंत आले, व 'महाराज साबनें तुमकू बुलाया हय' असें सांगून त्यांनीं

मला बंदमुक्त केलें. अशा रात्रीच्या प्रसंगीं हे लोक मला महाराजांकडे घेऊन चालले, तेव्हां आतां आपलीं शंभर वर्षें पुरीं भरलीं, व दिवस उजेडण्यापूर्वींच हे लोक आपली कत्तल करणार असें वाटलें; व त्यांस तेथेंच दोन हात दाखविण्याचें माझ्या मनांतही आलें; परंतु महाराज काय न्याय करतात हें अगोदर पहावें व मग जें काय करणें तें करावें असें माझ्या मनानें ठरविलें, व त्या शिपायांबरोबर कोणत्याही प्रकारें हूं चूं न करतां तेथें गेलों. आणि तुझी भेट झाल्यामुळें सर्वच विघ्न टळलें. पण समज, तेथें मी न येतो किंवा ते माझा तपास न करविते, तर तुला त्या बंगलींत माझा पत्ता कसा लागता ?'

जगदेवाच्या तोंडची ही हकीकत ऐकतांना वीरमतीचें हृदय सद्गदित झालें होतें. तिच्या डोळयांवाटे एकसारख्या अश्रुधारा वाहत होत्या. जगदेवाचें बोलणें पुरें होताच, ती त्याच्या गळयास मिठी मारून ह्मणाली--खरोखरच आपणास अतिशय त्रास पडला. मला जर आपली ही हकीकत समजती, तर खरोखर मी धांवून आलें असतें, व त्या मेल्यांच्या एकेकाच्या नरडीचा घोंटच घेतें. त्या चांडाळणीनें आपण राजवाड्यांत आनंदांत आहांत, आतां येतील, मग येतील, असें सांगून मला भुरळ पाडली. व म्यां चांडाळणीनेंही तिच्या बोलण्यावर भरंवसा ठेवून खुशाल पंचपक्वान्नें खाल्लीं ! खरोखर तीं पक्वान्नें नव्हत, पण मीं विषच खाल्लें असें मला वाटूं लागलें.' असें बोलत असतांना तिचा कंठ दाटून आला, व दोन्ही डोळयांवाटे पुनः घळघळा अश्रुधारा वाहूं लागल्या.

जगदेवानें तिचे डोळे पुसून सांत्वन केलें. तो ह्मणाला–‘ प्रिये, यांत तुझा काडीमात्र दोष नाहीं. तूं आपलें कर्तव्य, शूर व पतिव्रता स्त्रियांस जें योग्य तें, बरोबर बजावलेंस. तुझी एकंदर हकीकत ऐकून मला फारच संतोष झाला आहे, व तुझ्यासारखी गुणवती स्त्री परमेश्वरानें मला दिली याबद्दल मी त्याचा फार आभारी आहें. तूं आतां मनाला कोणत्याही प्रकारें वाईट वाटूं देऊं नको. प्रसंग आल्यावांचून मनुष्याच्या अंगांतील खरे गुण लोकांच्या नजरेस येत नाहींत; व आज तूं जें शूरत्व गाजविलेंस तें जर न गाजवितीस तर महाराज साहेबांपुढें आपली दाद लागण्यास महत्प्रयास पडते. तेव्हां असा प्रसंग जुळवून आणून आपला उदय करण्याचा परमेश्वराचाच हेतु होता असें समज, व झाल्या गोष्टीबद्दल दुःख न मानतां उलट परमेश्वराचे आपण आभारच मानले पाहिजेत.’

अशा प्रकारें या उभयतांच्या सुखदुःखाच्या गोष्टी चालल्या आहेत, तों फटफटीत उजाडलें. तेव्हां त्यांनीं आपलें बोलणें आटोपलें, व प्रातःर्विधि आटोपून उभयतांनीं स्नानें केलीं. महाराजांनीं त्यांच्या बंगल्यांत सर्व प्रकारची सामुग्री तेव्हांच पोंचविण्याबद्दल हुकूम करून चार पांच दासदासीही तैनातींत सोंपल्या होत्या. त्यांजकडून वीरमतीनें शिधा मागून घेतला, व लागलींच लापशी, पुऱ्या, खाटीडाळ, भात वगैरे पदार्थ तयार करून जगदेवास भोजन घातलें व त्यास गोविंदविडा देऊन नंतर ती त्याच ताटांत जेवली. इतका प्रकार होईपर्यंत चार घटका दिवस वर आला. हे उभायतां जेवण आटोपून

दिवाणखान्यांत पुढील विचार करीत बसलीं, इतक्यांत महाराजांकडील बोलावणें आलें. तेव्हां तीं उभयतां महाराजांकडे निघून गेले.

**वीरमती** व **जगदेव** यांची एकंदर हकीकत ऐकून व त्या उभयतांचें शूरत्व पाहून **सिद्धराजास** मनस्वी आश्चर्य व समाधान वाटलें; व अशा सारखीं शूर माणसें आपल्या पदरीं राहिल्यास आपल्या राज्यास एक प्रकारचें भूषण होणार आहे, ह्मणून त्यांस आपणाजवळ खास ठेवावयाचें असें त्याच्या मनानें ठरविलें होतें. तसेंच कोतवाल व **जामोती** यांच्या एकंदर कृत्याबद्दल त्यास अतिशय त्वेष उत्पन्न झाला होता, व त्यांचें एकंदर कारस्थान समजून घेण्याविषयीं तो अतिशय उत्सुक झाला होता. त्यानें त्याच वेळीं **डुंगरसी** कोतवालाच्या व **जामोती** कलावंतिणीच्या कित्येक माणसांस बोलावून त्यांस लालूच दाखवून सर्व हकीकत विचारून घेतली होती, व त्या लोकांनीं महाराजांपुढें त्यांच्या एकंदर कृष्णकारस्थानाचा पाढा वाचला होता. तो ऐकल्यापासून त्याचा क्रोध त्याच्या हृदयांत मावेनासा झाला होता. केव्हां दिवस उजाडेल व त्यांस केव्हां शिक्षा करीन असें त्यास झालें होतें. दिवस उजेडतांच दिवाणजींस सूचना पाठवून दरबार भरविला. याच दरबाराकरितां **जगदेव** व **वीरमती** यांस हें बोलावणें आलें होतें. **जगदेव** येतांच महाराजांनीं त्यास आपल्या उजव्या बाजूस जवळच बसवून घेतलें. स्त्रियांकरितां माडीवर पडद्याची जागा केली होती, तेथें **वीरमती** जाऊन बसली. **वीरमती**च्या शूरत्वाची बातमी सर्व शहरभर पसरली होतीच, तेव्हां काय न्याय होतो

तो पहाण्याकरितां नगरवासी लोकांची सरकारवाड्याजवळ एकच गर्दी उडून गेली.

दरबारची तयारी झाल्यावर महाराजांनीं कोतवालास पुढें आणावयास सांगितलें. शिपायांनीं त्यास कचेरीच्या मध्यभागीं आणून उभा केल्यानंतर राजा ह्मणाला—'**डुंगरसी,** तुला मी मोठा इमानी नोकर समजत होतों, पण आजपर्यंतचीं तुझीं एकंदर कृत्यें ऐकून तुजसारखा नीच व स्वामिद्रोही दुसरा कोणी नसेल अशी माझी खातरी झाली आहे. तुझ्या जुलमी पुत्रास परमेश्वरानेंच योग्य शिक्षा दिली, पण तुला शिक्षा देण्याचा प्रसंग आज मजवर आला आहे. तूं लोकावर आजपर्यंत अनेक प्रकारचे जुलूम करून जें द्रव्य संपादन केलें आहेस, तें सर्व सरकारांत भरावें व नुसत्या अंगावरील कपड्यानिशीं आपल्या कुटुंबासुद्धां तूं माझ्या राज्याबाहेर निघून जावेंस, असा मी हुकूम करतों.'

**डुंगरसी** कोतवाल खालीं मान घालून उभा होता. महाराजांचा हुकूम ऐकून त्याचें देहभान नाहींसें झालें. तो लटलट कांपत दीनस्वरानें ह्मणाला—'मी खरोखर अपराधी आहें, पण महाराजांनीं माझ्या वृद्धावस्थेकडे लक्ष पुरवून दया करावी. केल्या कर्माबद्दल मला पूर्ण पश्चात्ताप झाला आहे. व इतःपर मी असलीं कृत्यें कधींही करणार नाहीं '

**राजा**—तुला जीवदान दिलें हेच तुजवर महत उपकार केले आहेत. कारण आजपर्यंत तुझ्या हातून कित्येकांचे प्राण गेले असतील तें सांगवत नाहीं; त्यांच्या प्राणाबद्दल तुझा प्राण घेतला पाहिजे होता, पण तुझी वृद्धावस्था लक्षांत आणून यापेक्षां जास्त शिक्षा तुला देऊं इच्छित नाहीं.

राजाच्या तोंडचे हे शब्द ऐकून **जगदेव** हात जोडून ह्मणाला—'महाराजांनीं मजकरितां ह्या कोतवालावर दया करावी, व त्याचा वृद्धापकाळ लक्षांत घेऊन त्यास थोडेसें जीवनार्थ वेतन करून द्यावें. त्यास आपल्या कृत्याचा पश्चात्ताप झाला आहे तेव्हां तो दयेस पात्र आहे.'

**जगदेवाचें** हें दयाभूत वर्तन पाहून महाराजांस समाधान वाटलें, व त्याच्या ह्मणण्याप्रमाणें त्यांनीं **डुंगरसी** कोतवालास दरमहा ३० रुपयांचें बैठें वेतन करून दिलें पण त्याची संपत्ति मात्र सरकारांत जप्त करून घेतली.

**डुंगरसी** कोतवालाचा असा निकाल केल्यानंतर **जामोती** कलावंतिणीची धिंड काढून गांवाबाहेर हांकून देण्याचा हुकूम केला, व तिचीही सर्व संपत्ती सरकारांत जप्त करून घेतली. नंतर तिच्या पोरींपैकीं ज्या चांगल्या कुलवान दिसल्या, त्यांस आपआपल्या घरीं जाण्यास हुकूम दिला, व **लवंगी, चमेली,** वगैरे सारख्या ज्या कारस्थानी होत्या, त्यांस दोन दोन वर्षांची कैद दिली. तसेंच जे शिपाई वगैरे लोक **डुंगरसी** कोतवाल व **लालदास** यांस कृष्णकृत्यांत सामील होते, त्यांची दौलत जप्त करून त्यांस नोकरींतून बरतर्फ केलें, आणि ज्या लोकांनीं **लालदासा**च्या सांगण्यावरून **जगदेवास** पकडून अंधारकोठडींत कोंडलें होतें, त्यांस पांच पांच वर्षें सक्त मजुरीची शिक्षा फर्माविली.

याप्रमाणें गुन्हेगार लोकांचा न्याय झाल्यावर महाराजांनीं **जगदेवास** सालीना साठ हजारांची नेमणूक करून देऊन त्याचें नांव आपल्या पहिल्या प्रतीच्या सरदारांच्या पटांत

दाखल केलें. शिवाय जमाबंदी, कोतवाली व दिवाणी ह्या खात्यांत सुधारणा करण्याचें काम त्याजकडे सोंपून त्याबद्दल त्यास दरसाल तीस हजारांची वेगळी नेमणूक बांधून दिली, आणि आपला मोतीबागेंतील बंगला त्यांस राहण्याकरितां बक्षीस दिला. नंतर **जगदेव** आणि **वीरमती** यांच्या गुणांची व शूरपणाची त्या दरबारांत महाराजांनीं फार तारीफ करून त्या उभयतांस उंची पोशाख दिले. **जगदेवानें** राजाच्या न्यायीपणाचें वर्णन करून आपणावर केलेल्या उपकाराबद्दल त्याचे आभार मानले. याप्रमाणें एकंदर प्रकार होऊन दरबारचें काम आटोपलें.

**लालदासा**च्या जुलमी वर्तनानें **पट्टण** शहरांतील सर्व लोक त्रासून गेले होते, व त्याचा बंदोबस्त होण्याची त्या लोकांस आशा राहिली नसल्यामुळें ते फार दिलगीर झाले होते. अशा प्रसंगीं त्या जगच्छत्रूचा नाश **वीरमतीनें** केलेला पाहून सर्वांस त्यांतून विशेषतः अब्रूदार स्त्रियांस अतोनात समाधान झालें होतें, व सायंकाळचे वेळीं **जगदेव** व **वीरमती** रथांत बसून जेव्हां मोतीबागेंत जावयास निघालीं तेव्हां हजारों स्त्रीपुरुषांनीं **वीरमतीवर** पुष्पवृष्टि केली. कित्येकींनीं पंचारती ओंवाळली, कित्येकांनीं दुरूनच त्या पतिव्रतेचें दर्शन घेऊन तिला दीर्घायु करण्याबद्दल परमेश्वराची आराधना केली, व वृद्धांनीं तिला मनापासून आशिर्वाद दिले. सारांश त्या दिवसापासून पट्टणांतील सर्व लोक **जगदेव** व **वीरमतीस** मनापासून पूज्य मानूं लागले.

# प्रकरण १३ वें.

## अविचारीपणाचा कळस.

रजनीनाथ अस्तास जाऊन फटफटीत उजेडायला झालें होतें, वृक्षाच्या डोलींत लपून बसलेले पक्षी अन्नपाण्याच्या शोधार्थ उडूं लागले होते. स्त्रीपुरुषांचा जमाव, कित्येक हातांत लोटा व गडवे घेऊन नित्यविधीकरितां लगबगीनें गांवाबाहेर धांवत आहेत, कित्येक स्त्रिया लहान मोठीं भांडीं डोकीवर व काखेंत घेऊन पाण्याकरितां गोष्टी बोलत चालल्या आहेत; व्यापारी उदमी लोक आपआपलीं दुकानें उघडून त्याची मांडामांड करीत आहेत; अशा प्रकारें जे ते आपापल्या उद्योगास लागले होते. अशा समयीं **धारानगरींत** जुन्या सरकार वाड्याच्या दिवाणखान्यांत एक स्त्री कोणाचीशी वाट पहात इकडून तिकडे घिरट्या घालीत होती. ती वरचेवर खिडकीशीं येई, रस्त्याकडे न्याहाळून बघे, तिची इच्छित वस्तु दिसली नाहीं ह्मणजे निरासल्यासारखी होई, पुन्हां इकडे तिकडे फिरे, व खिडकीवाटे कोणी येतें का ह्मणून पाही. असें करतां करतां शेंवटीं ती अगदींच निरासली, व आपल्या मनाशींच ह्मणूं लागली—'अजून कां बरें ते येत नाहींत ? दिवस तर अगदीं वर आला. मोठ्या पहाटेच आपण निघूं असें ह्मणून गेले होते, मग महाराजांनीं तर कांहीं आडकाठी घातली नसेलना? असें जरी होतें तरी ते येथपर्यंत येऊन मला हकीकत सांगितल्यावांचून राहतेना. या सर्व राज्यांत माझी काळजी घेणारा त्यांजवाचून दुसरा कोणींच नाहीं. विचाऱ्यानें भूक तहान कांहीं न पाहतां रानोमाळ हिंडून माझ्या

**जगदेवा**चा शोध लावला! नाहीं तर या अभागिनीला माझ्या बाळाचें वर्तमान कोण सांगणार होतें! आतां एकदां केव्हां जाऊन माझ्या बाळास मी डोळे भरून पाहीन व त्याला कड-कडून भेटेन असें मला झालें आहे. महाराजांनीं **जगदेवास** कोठें व कोणत्या कामगिरीस पाठविलें ह्मणून विचारण्या करितां, आज जवळ जवळ वर्ष होत आलें, महाराजांची वाट पाहपाहून थकलें; पण त्यांनीं इकडे ढुंकून सुद्धां पाहिलें नाहीं! ते इतके निष्ठुर कां बरें झाले? **वाघेला** राणीनंच त्यांच्या मनांत कांहीं तरी भरविलं असावं! एरवीं असं न होतें. पण **धीरसिंह**जी तर तसं कांहींच सांगत नाहींत! मग **जगदेव** रागानं का गेला असावा? **जगदेवा**च्या जा-ण्यांत कांहीं तरी विपरीत प्रकार आहे यांत संशय नाहीं. कारण जेव्हां जेव्हां मीं **धीरसिंह**जीजवळ **जगदेवा**च्या जाण्या-संबंधीं विशेष चौकशी करतें, तेव्हां तेव्हा ते कांहीं तरी का-रण सांगून माझें समाधान करीत असतात! यावरून मला हकीकत कळूं नये असाच त्यांचा विचार दिसतो. काय असेल तें असो, एकदां **जगदेवा**ची समक्ष भेट झाल्यावा-चून मनाचं समाधान होणार नाहीं.' अशा विचारांत ती गर्क झाली आहे, इतक्यांत धाडधाड दादर चढून कोणी वर आलें. त्याबरोबर हा **धीरसिंहच** आला असें समजून राणी एकदम ह्मणाली–' या, **धीरसिंहजी**, आपली केव्हां ची मी वाट पहात आहें.' इतके शब्द राणीच्या तोंडून पुरे होत आहेत तों, तो पुरुष तिच्या जवळ येऊन ठेपला, व त्यास पहातांच राणी एकदम दचकून मागें सरली, आणि तोंडावरून बुरखा घेऊन खालीं मान घालून उभी राहिली.

तो आलेला पुरुष डोळे वटारून कर्कश आवाजानें ह्मणाला—' चांडाळणी, तुझ्या जाराची मीं पुरी वाट लावली, व तुझीही तीच वाट लावण्याकरितां आलों आहे. तुझ्या सारख्या जारिणी स्त्रियांस जीवंत ठेवून या **परमार** कुलास बट्टा लावून घेण्यापेक्षां तुला जगांतून नाहींसें केल्यास काय वाईट? बोल, त्या लुच्च्या **धीरसिंहा**बरोबर तूं कोठें निघून जाण्याचा विचार केला होतास? '

राजाच्या तोंडून निघालेले वरील उद्गार ऐकून त्या स्त्रीस अतोनात वाईट वाटलें. ते शब्द कानानें ऐकण्यापेक्षां मरण आलेलें बरें असें तिला वाटूं लागलें. ती हलक्या स्वरानें ह्मणाली—' महाराजांनीं ह्या अनाथ गाईवर अशी आग पाखडूं नये. या देहास जारिणी ह्मणवून घेण्यापेक्षां मरण आलेलं फार चांगलं व तें जर आपल्या हातानं आलं, तर मजसारखी भाग्यशालीच कोणी नाहीं असं मी समजेन. घ्या तरवार व करा या अभागिनीचे दोन तुकडे. पण मजकरतां दुसरे कोणाला त्रास देऊं नका, इतकं मी हात जोडून मागतें. '

**राजा**—चांडाळणी, तुला सुखानें मरण आल्यानें माझ्या रागाचें सांत्वन होणार आहे काय? तुला व तुझ्या जाराला तर हाल हाल करूनच मारलें पाहिजे समजलीस? जा आतां कोणीकडे पळून जातेस ती. ह्मणे मजकरितां दुसरे कोणाला त्रास देऊं नका—किती तरी आपल्या जारावर दया? पण त्या बच्चाजीस आतांच कैद केलें आहे. दोनप्रहरीं त्याची व आपली पुरी वाट लावतो. तुझ्या त्या नीच हरामखोर कारभाऱ्याची वाट ज्या वेळीं लावली, त्याच वेळीं तुझीही वाट लावली

असती, तर आज तुझीं कृष्णकृत्यें ऐकण्याची पाळी मला न येती! पण ही बुद्धि त्या वेळीं सुचली नाहीं!! आणि ह्मणूनच तुला हजारों कारस्थानें करण्यास फांवलें. त्या वेळेस तुमचें हें काळें बेरें कृत्य मला समजलें नाहींग, नाहीं तर इतका प्रसंग न येता! असो; आतां मात्र तुमच्या कर्माचें तुम्हांस योग्य प्रायश्चित्त मिळाल्यावांचून राहत नाहीं.

राजाच्या ह्या एकंदर भाषणावरून त्याचें मन आपणाविषयीं कोणी तरी चांगलेंच गढूळ केलें आहे असें राणीनें पुरतेपणीं ताडलें. पण आपणावर हा जो भयंकर आरोप आला त्याबद्दल तिला मनस्वी वाईट वाटलें. तिच्या डोळयांवाटे घळघळा अश्रुधारा वाहूं लागल्या व तिचा कंठ दाटून आला; तथापि तो आंवरून ती रडक्या स्वरांतच ह्मणाली–' मजवर हा खोटा आरोप आहे. महाराजांनीं कृपा करून याची पूर्ण चौकशी करावी, व आपल्या मनाची खात्री झाल्यावर मग हवं तें करावं. अशा दुःखद स्थितींत रात्रंदिवस पडून राहण्यापेक्षां मरण आलेलं फार चांगलं. मी मरणास भीत नाहीं, पण असा डाग लावून मरणं मला फारच दुःसह होणार आहे! ज्या मेल्यांनीं आपलं निर्मळ मन आम्हां मातापुत्रांविषयीं गढूळ केलं असेल, त्यांस परमेश्वर पाहून घेईल.'

**राजा**–हें मानभावी बोलणें मी सर्व ओळखतों. मला ठार मारून जाराच्या साह्यानें त्या अधमाधमास गादीवर बसविण्याचा तुमचा विचार होता नाहीं कां? घ्या, आतां तुह्मांला स्वर्गीचेंच राज्यसुख देतों. (असें बोलून त्यानें जमादार, जमादार, अशा दोन हांका मारल्या. त्याबरोबर एक काळा

कुळकुळीत वर्णाचा व गलेलठ्ठ शरीराचा मनुष्य कमरेस लट-काविलेली तरवार हातानें सांवरींत आंत धांवत आला, व हात जोडून काय आज्ञा ह्मणून राजापुढें उभा राहिला.)

**राजा**—जमादार, ह्या चांडाळ स्त्रीस आतांच्या आतां येथून उचलून किल्ल्यांतील अंधारकोठडींत नेऊन ठेवा. व हिला दिवसांतून दोन वेळ अर्धी भाकर व एकादी भाजी यापेक्षां जास्त कांहीं खावयास देऊं नका, आणि हिच्याकडे कोणासही जाऊं देऊं नका. संभाळा, चांगल्या बंदोबस्तांत ठेवा. ही फार कारस्थानी बायको आहे. तशा ठिकाणींही कांहीं घोंटाळा करण्यास चुकणार नाहीं. हिला जिवंत ठेवणें फार जोखमेचें आहे, पण एकदम ठार मारल्यास तिला आपल्या कृतकर्माचा पश्चात्ताप होणार नाहीं; ह्मणून हिला असेंच झिजून झिजूनच मरण आलें पाहिजे. चला, मागवा पालखी व घाला हिला आंत; माझ्या डोळ्यासमोर ती आतां नको आहे.

राजाचें वरील भाषण ऐकून त्या स्त्रीस मरणापेक्षांही अधिक दुःख झालें. ह्या वेळेस आपल्या अंगावर वीज जरी कडकडून पडली असती तरी बरें होतें, असें तिला वाटलें. ती दीनस्वरानें हात जोडून ह्मणाली— ' महाराज आपल्या मनांत मजविषयीं जो संशय भरला आहे, तो सर्वस्वीं खोटा आहे. मला जी शिक्षा आपण कराल ती भोगण्यास मी तयार आहे, परंतु मजवर व्यभिचाराचा व राजद्रोहाचा असे जे खोटे आरोप ठेवतां तेवढे मात्र ठेवूं नका. मी परमेश्वराला स्मरून खरोखर सांगतें; आपण ह्मणतां ही गोष्ट माझ्या स्वप्नांत सुद्धां कधीं यावयाची नाहीं, व आले-

लीही नाहीं. मीं आपल्या **जगदेवा**च्या शोध लावण्याच्या खटपटीशिवाय इतर कोणतीही खटपट केली नाहीं. **धीरसिं**हजींस तरी मी एवढ्या करितांच वारंवार बोलावतें. त्या बिचाऱ्यानें माझ्या **जगदेवा**चा शोध लावून ह्या अनाथ अभागिनीवर महत् उपकार केले आहेत, व आपल्या प्रिय पुत्रास जाऊन भेटावें ह्मणून मींच त्यांस आपली आज्ञा घेण्यास सांगितलें होतें. याशिवाय आपणास न कळत अशी एकही गोष्ट मजकडून झालेली नाहीं. व माझें हें करणें आपणास आवडत नसल्यास मी आजपासून **जगदेवा**चें नांव सुद्धां काढणार नाहीं. त्याचं रक्षण परमेश्वर करील. मला आपल्या चरणाशिवाय ह्या जगांत दुसरं कांहीं अधिक नाहीं. आपलं मन खरोखर कोणीं गढूळ केलं आहे. तें माझ्या ह्या इतक्या खुलाशानं निर्मळ होत नसल्यास आपल्या हातांतील तरवारीनं या अभिगिनीचे दोन तुकडे करून टाका. परंतु,'–इतकें बोलत आहे तों तिचा कंठ एकदम भरून आला; व तिच्या तोंडांतून एक शब्द सुद्धां निघेनासा झाला, तेव्हां तिनें आपलें डोकें राजाच्या पायांवर ठेवून त्यास साष्टांग नमस्कार घातला.

ह्या तिच्या विनवणीवरून एकाद्या पाषाणहृदयासही दया आली असती, पण त्या मदांध झालेल्या **उदयादित्य** राजास थोडीशीही दया तर आली नाहींच, पण उलट तो अधिक संतप्त झाला. त्यानें जोरानें तिच्या डोक्यांत लाथ मारली, व कर्कश स्वर काढून तो ह्मणाला–' हें मानभावी भाषण ऐकून फसणारा मी नव्हें. तुझें सर्व कृष्णकृत्य मला माहीत झालें आहे. त्याच्या बदल्यांत तुला

मीं जी शिक्षा केली आहे ती फारच कमी आहे.' असें ह्मणून लाथेनेंच त्यानें तिला लोटून दिलें; व जमादारास सांगितल्याप्रमाणें व्यवस्था करण्याविषयीं पुन्हां बजावून तो तेथून चालता झाला.

राजा वाड्याबाहेर पडतो आहे इतक्यांत दोन स्वार त्याजपुढें येऊन कांहीं वर्दी सांगू लागले. ते ह्मणाले—'महाराज, आह्मी आपले आज्ञेप्रमाणें **धीरसिंहास** त्याच्या पत्नीसह कैद करून कोटावर नेऊन ठेवलें, पण त्याच्या घराची झडती घेतांना तळघरांत आपला **क्रूरसिंग** जमादार व दुसरे पांच इसम पायांत मोठमोठ्या बिड्या ठोकलेले सांपडले. शिवाय एक घोड्याचें व दोन वाघांचीं अशीं तीन प्रेतेंही सांपडलीं आहेत. त्यांची काय व्यवस्था करावयाची तें विचारण्याकरितां दिवाणजींनीं आह्मांस आपणाकडे पाठविलें आहे.' त्या स्वारांच्या तोंडचें हें वर्तमान ऐकून राजास आश्चर्य वाटलें, व त्या लोकांस राजवाड्यांत घेऊन येण्याविषयीं दिवाणजींस निरोप पाठवून तो राजवाड्याकडे निघून गेला.

वरील घोंटाळा घडण्यास काय कारण झालें तें समजून घेण्याविषयीं वाचक फारच उत्सुक झाले असतील, ह्मणून त्यांस थोडीशी मागील हकीकत येथें सांगणें अवश्य आहे. **क्रूरसिंगास** जाऊन बरेच दिवस झाले, तरी त्याचा कांहीं थांग लागेना, तेव्हां **वाघेला** राणीस काळजी उत्पन्न झाली होती. तशांत **सोळंकी** राणीनें **धीरसिंहास जगदेवाचे** शोधाकरितां पाठविल्याचें आणि **रूपवती सोळंकी** राणीकडे वरचेवर येत असल्याची बातमी तिला समजली.

तेव्हां आपलें कारस्थान फुटण्याची तिला पुष्कळ भीति उत्पन्न होऊन ती व **कमळा** पुढें कसें करावें या विचारांत सारख्या गढून गेल्या होत्या. इतक्यांत **धीरसिंह** परत आल्याची खबर त्यांस लागली, तेव्हां तिनें त्याच्यामागें बातमी काढण्याकरितां आपले हेर ठेविले. **सोळंकी** राणी-चें समाधान करण्याकरितां तिजकडे **धीरसिंहाचें** जाणें वरचे-वर होत असे, व तो तिजजवळ जी जी हकीकत सांगत असे ती ती त्या गुप्त हेरांकडून **वाघेला** राणीस समजत असे. **क्रूर-सिंगास** कैद करून आणलें, त्यानें **धीरसिंहास** सर्व गोष्टी सांगितल्या, वगैरे वर्तमान समजतांच **वाघेली** राणीची पांचावर धारण बसली होती. आतां आपलें कारस्थान खास उघडकीस येतें; व तें आलें ह्मणजे मग आपल्या फजितीस पारावार राहणार नाहीं; तेव्हां कोणती युक्ति करावी ह्या मंत्राचा ध्यास त्यास सारखा लागला होता. **सोळंकी** राणी-च्या तैनातींतील **दाळिंबी** नांवाची एक दासी **कमळेनें** वश करून घेतली होती; व तिच्या द्वारें **सोळंकी** राणीकडील सर्व हकीकत तिला समजत असे.

**जगदेव** गेल्यापासून **सोळंकी** राणीस एकसारखी हुरहुर लागलेली होती. व केव्हां एकदा जाऊन आ-पल्या प्रिय पुत्रास भेटेन असें तिला झालें होतें. ती **धीरसिंहाजवळ** रोज हीच गोष्ट काढी, व **धीरसिंह** वायदे करून तिची समजूत घाली. **जगदेवाकडे** **सो-ळंकी** राणीस घेऊन गेल्यास महाराजांच्या मनांत आपल्या-विषयीं वाईट कल्पना येईल, व **वाघेली** राणीकडूनही त्यास भर पडून भलताच अनर्थ ओढवेल, अशी त्यास भीति

होती; ह्मणून तो **सोळंकी** राणीची समजूत करून संधि पहात असे. राणीचा विशेषच आग्रह पडला, तेव्हां त्यानें महाराजांच्या कानावर खरी हकीकत घालून त्यांजपासून दोन महिन्यांची रजा मागून घ्यावी, आणि त्यांच्या परवानगीनेंच **सोळंकी** राणीस नेऊन **जगदेवास** भेटवून परत आणावें, असें ठरविलें. हा विचार **सोळंकी** राणीसही पसंत पडला, व त्याप्रमाणें **धीरसिंहानें** राजाजवळ युक्तीनें गोष्ट काढून रजा मिळविली, आणि दुसरे दिवशीं सकाळींच त्या उभयतांनीं निघण्याचा विचार नक्की ठरविला.

ही बातमी त्याच वेळीं **दासिवीकडून वाघेली** राणीस समजली, तेव्हां ही संधि त्या दोघांचा घाट घडण्यास चांगली आहे असें पाहून **कमळेच्या** सल्ल्यानें तिनें असें ठरविलें कीं, रात्रीं महाराज रंगमहालांत आले ह्मणजे त्यांचे मनांत पुढें लिहिल्याप्रमाणें हकीकत भरून द्यावयाची, ती अशी कीं, ' **सोळंकी** राणीचा **धीरसिंहाशीं** आंतून वाईट संबंध आहे, व आपला घात करून **जगदेवास** गादीवर बसविण्याचा त्यांचा विचार चालू आहे, आणि तेवढ्याकरितां ते **पट्टणच्या** राजाकडे जाऊन त्याचें साह्य मागणार आहेत. **जगदेव** आपल्या बायकोसह **पट्टणास** पूर्वींच जाऊन राहिला आहे, व तो तिकडे सर्व प्रकारची तयारी करीत आहे. **धीरसिंहानें** येथील लोकांत फितूर केला आहे, तो **सोळंकी** राणीस बरोबर घेऊन **पट्टणास** गेला, कीं **जगदेव पट्टणच्या** राजाची मदत घेऊन आपणावर स्वारी करणार, व आपल्या सैन्यांतील फितूर झालेले लोक आयते वेळीं त्यांस मिळून

आपणास कैद करणार, व **जगदेवास** गादीवर बसविणार.'— त्याप्रमाणें रात्रीं महाराज रंगमहालांत येतांच **वाघेली**राणीनें मोठ्या युक्तीनें ही सर्व गोष्ट त्याच्या मनांत भरविली.

**उदयादित्य** राजास स्वतःचा विचार फारच थोडा असे. त्यांतून **वाघेली** राणीवर त्याचा जीव कीं प्राण असल्यामुळें तिचें हरएक बोलणें त्यास नेहमीं खरें वाटत असे. **वाघेली** राणीनें वरील हकीकत तिखटमीठ लावून सांगतांच ती त्यास खरी वाटली. इतकेंच नाहीं, पण **धीरसिंहा**विषयीं त्याच्या मनांत जी पूज्यबुद्धि वास करीत होती, ती क्षणांत नष्ट होऊन त्याचें एकंदर वर्तन त्यास कपटाचें दिसूं लागलें. त्याच दिवशीं सकाळीं **जगदेवाचे** भेटीस **सोळंकी**राणीस घेऊन जाण्याविषयीं **धीरसिंहानें** रजा मागितली होती, त्या गोष्टीशीं राणीनें सांगितलेल्या हकीकतीची सांगड त्याच्या मनांत एकदम जुळली, व त्याबरोबर त्या दोघांचें केव्हां पारिपत्य करीन असें त्यास होऊन गेलें. त्यास सारी रात्र चैन लागलें नाहीं. पहाट होतांच त्यानें पहाऱ्यावरील जमादारास बोलावून, **धीरसिंहास** त्याच्या कुटुंबांतील एकंदर मनुष्यांसह कैद करून किल्ल्यावर नेऊन ठेवण्याविषयीं आणि त्याचा वाडा जप्त करण्याविषयीं दिवाणजींस हुकूम पाठविला, व आपण तसाच घोड्यावर स्वार होऊन **सोळंकी**राणीच्या वाड्याकडे निघून गेला. तेथें गेल्यावर त्यानें काय केलें तें वर सांगितलेंच आहे.

दहाव्या भागांत सांगितल्याप्रमाणें **धीरसिंह जगदेवाचा** निरोप घेऊन निघाल्यानंतर तो मुक्काम दरमुक्काम करीत दहावे दिवशीं **धारानगरीस** आला होता. पण आपण

आल्याची बातमी कोणास समजूं नये ह्मणून तो मध्य-रात्रीचे सुमारास शहरांत आला होता, व त्यानें आपणा-बरोबर आणलेले करसिंगादि सहा कैदी, तशींच घोड्याचें व वाघाचीं शवें, ह्या सर्वांस तळघरांत नेऊन ठेवलें होतें. त्यामुळें तें वर्तमान गांवांत कोणास समजलें नव्हतें. जप्तीच्या प्रसंगीं सरकारी शिपाई लोकांस तळघरांत हें सर्व लटांबर जेव्हां सांपडलें, तेव्हां हां हां ह्मणतां तें वर्तमान सर्व गांवभर पसरलें. वाघेलीराणीस करसिंगआदि मंडळी धीरसिंहाचे तळघरांत सांपडल्याचें वर्तमान समजतांच तिचे छातींत धस्स झालें. आपलें सर्व कारस्थान आतां खास बाहेर पडलें असें वाटून ती गांगरून गेली, व त्या भरांत मूर्छा येऊन ती धाडक-न जमिनीवर पडली. कमळा जवळच उभी होती, तिचीही हें वर्तमान ऐकून पांचावर धारण बसली; तथापि ती मोठी धीट, धूर्त व कावेबाज बायको असल्यामुळें तिनें लगेच आपलें मन आं-वरून धरून तेवढ्यांतल्या तेवढ्यांत युक्ति शोधून काढली. आणि राणीस हुशार करून ती ह्मणाली—'तुह्मी अशा घाबरूं लागलां तर कसें होणार? धीर धरा. मी एक युक्ति शोधून काढली आहे, तेवढी ह्या वेळेस साधल्यास आपल्या कामा-चा सुरेख शेवट होईल.'

कमळेच्या तोंडांतील वरील उद्गार ऐकतांच वाघेली राणीस तशाही स्थितींत पुष्कळ धीर आला, व ती मोठ्या उत्सुकतेनें ह्मणाली 'काय? काय युक्ति शोधून काढली आहेस तूं?'

कमळा—हें पहा, करसिंगानें महाराजांजवळ आप-ली हकीकत सांगितली नाहीं; त्यापूर्वीच त्यास व त्या-

च्या साथीदारांस आपल्या ताब्यांत मागून घ्या. ते आपल्या तैनातींतील नोकर असल्यामुळें महाराज आपली मागणी नाकबूल करणार नाहींत. **क्रूरसिंगादि** मंडळी आपल्या ताब्यांत आली ह्मणजे मग त्यांस पढवून ठेवण्यास उशीर नाहीं. चवकशीचें काम कचेरी भरल्यावांचून होत नाहीं, व कचेरी दोनप्रहरीं भरणार आहे. तेव्हां आतां विलंब न लावतां इतकी गोष्ट झालीच पाहिजे. तुह्मी आज्ञा करीत असल्यास मी आतां महाराजांकडे जाऊन हरप्रयत्नानें त्यांचें मन वळवून **क्रूरसिंगादि** सर्व कैद्यांस आपणाकडे घेऊन येतें.

**राणी**—जा, तुला वाटेल तें कर. माझी तुला पूर्ण आज्ञा आहे. कसेंही करून एकदाचें हें लफडें मिटलें ह्मणजे कमाविलें. आतां पुन्हां मात्र अशा कारस्थानांत पडणार नाहीं. परमेश्वर यांतून कशी लाज राखील ती राखो.

**कमळा**—'अशा घाबरूं नका. तुह्मी स्वस्थ बसा. मी सर्व व्यवस्था करतें.' असें ह्मणून **कमळा** तशीच निघाली ती महाराज राजवाड्यांत शिरत आहेत तोंच त्यांस जाऊन भेटली, व राणीचा मोठ्या निकडीचा वरील निरोप तिनें सांगितला. 'चवकशी केल्यानंतर कैद्यांस राणीकडे पाठवूं, सध्यां पाठविण्याची कांहीं जरूर नाहीं' वगैरे प्रकारें राजानें पुष्कळ सांगितलें; पण **कमळेनें** अपला हेका सोडला नाहीं. राणीचा अत्याग्रह दर्शवून ती ह्मणाली—'**क्रूरसिंगास** राणीसाहेबांनीं **धीरसिंहाचे** तपासाकरितां पाठविलें होतें असें असतां त्यास त्यानें कसें कैद केलें, व दुसऱ्या मंडळीची काय अवस्था झाली हें समजून घेण्या-

विषयीं राणीसाहेब अतिशय आतूर झाल्या आहेत; व त्यांची एकंदर हकीकत ऐकल्यावांचून त्या अन्नपाणी सुद्धां घेणार नाहींत. करितां त्या लोकांस आतां मजबरोबर कसंही करून पाठवावें. राणीसाहेबांस भेटवून त्यांस आपल्या कचेरीच्या वेळापूर्वीं मी आणून रुजू करतें.' राणीचा इतका आग्रहाचा निरोप ऐकून राजाचें बोलणेंच खुंटलें. त्यानें **कमळे**च्या ह्मणण्याप्रमाणें जमादारास बोलावून त्या कैद्यांस राणीकडे घेऊन जाण्याविषयीं हुकूम फर्माविला; व दोन प्रहरीं कचेरी भरवून तेथें त्यांची हकीकत ऐकण्याचें ठरविलें.

**क्रूरसिंगा**दि कैदी मंडळी राणीकडे येतांच **कमळेनें** शिपायांस सांगून त्यांस बंदमुक्त करविलें, व त्या सर्वांस एका खोलींत घेऊन शिपाई लोकांस बाहेर बसावयास सांगितलें, आणि आपण व राणी अशा दोघी व बाकी ती कैदीमंडळी इतकींच मनुष्यें तेथें ठेवून बाकीच्या दासदासींसही बाहेर घालविलें. नंतर त्यांची एकंदर हकीकत विचारून घेतली. ती संपल्यानंतर **कमळेनें** त्या लोकांस महाराजांजवळ पुढीलप्रमाणें जबानी देण्या विषयीं पढवून ठेवलें. तें असें कीं—'राणीसाहेबांनीं सांगितल्यावरून आह्मी **धीरसिंह** कोठें जातो व काय करतो याच्या तपासावर त्याच्या मागोमाग गेलों होतों. **धीरसिंहा**ची व **जगदेवा**ची भेट होऊन ते या राज्यावर स्वारी करण्याचा विचार करीत असल्याचें आह्मीं आमच्या कानानें ऐकलें, तेव्हां आह्मीं ज़ाऊन त्यांस गांठलें. त्यांचे लोक फार व आह्मी थोडे असल्यामुळें आमचा उपाय चालला नाहीं. त्यांनीं आह्मांस कैद करून येथें आणलें व तळघरांत ठेवलें.'--

याप्रमाणें चांगलें पढवून हुशार केल्यानंतर **कमळेनें** त्यांस पुष्कळ धीर दिला, आणि आपल्या मूळ गोष्टीचा किंचितूही स्फोट न होऊं देण्याविषयीं बजावून सांगितलें. त्या लोकांनीं ती सर्व गोष्ट कबूल केली. दोन प्रहरीं कचेरी भरली. सरदार, मानकरी आदि मंडळी हा काय चमत्कार आहे, तो ऐकण्याकरितां हजर झाली. दिवाणादि मंडळी आपापले जागीं येऊन बसल्यानंतर महाराजांची स्वारी आली व सिंहासनावर आरूढ झाली. त्या सर्व कैद्यांस सामोरें बोलावलें. **क्रूरसिंगानें** आपली हकीकत **कमळेनें** पढविल्याप्रमाणें अशी सुरेख जमवून सांगितली कीं, दरबारांतील सर्व मंडळीस ती खरी वाटली इतकेंच नाहीं, पण ती हकीकत ऐकतांच **धीरसिंह** सरदाराबद्दल आजपर्यंत महाराजांपासून सर्व लोकांचा जो पूज्य ग्रह होता तो तत्काल नष्ट झाला, व जो तो छिःथू करूं लागला. महाराज तर अतिशयच संतप्त झाले, व त्या आवेशांत ते ह्मणाले–' पहा, **धीरसिंहा**सारख्या एका विश्वासू सरदाराची ही स्थिति ! मी त्याचा सर्व प्रकारें मान ठेवीत असतां त्यानें माझाच घात करण्याचा विचार करावा हें किती अधमपणाचें कृत्य आहे ? व याबद्दल त्यास जी शिक्षा करावी ती थोडीच आहे. माझ्या प्रिय **वाघेली**राणीनें ह्यावेळीं जी दक्षता वापरली ती जर वापरली नसती, तर मला आज ह्या जगांतून नाहींसें होण्याचा प्रसंग आला असता. आपलें कारस्थान फुटूं नये ह्मणून त्या हरामखोरानें ह्या लोकांस आपल्या तळघरांत कोंडून ठेवलें होतें, आणि आजपर्यंत त्याच

मागमूस सुद्धां लागूं दिला नाहीं. पण असलें पाप किती दिवस छपून राहणार? आता. त्यानें जसें ह्या लोकांस तळघरांत कोंडून ठेवून त्यांचे हाल हाल केले, तसेच त्या व त्या कुलांगार **सोळंकी**राणीचेही हाल केले पाहिजेत. असो; **क्रूरसिंग** माझ्या हिताकरितां झटत असतां त्यास कैदेंत पडावें लागलें याबद्दल मला फार वाईट वाटतें. त्यानें बजाविलेल्या कामगिरीच्या बदल्यांत **धीरसिंहा**कडे जी सुभेगिरी होती ती त्यास देण्यांत येत आहे. आणि त्याचे साथीदार इतर मंडळीस आजपासून शिलेदारीच्या जागेवर नेमण्यांत येत आहे.' याप्रमाणें राजानें निकाल केल्यावर कचेरीचें काम बरखास्त झालें.

ह्या निकालामुळें पुष्कळ समंजस लोकांस वाईट वाटलें; परंतु ते बिचारे काय करतात? **धीरसिंहा**संबंधी दुसरे बाजूचा पुरावा कोणासच माहीत नव्हता. त्यामुळें **क्रूरसिंगानें** सांगितलेली हकीकतच सर्वांस खरी मानणें भाग पडलें. **क्रूरसिंगास** सुभेगिरी मिळतांच तदानुयायी नीच, हलकट वगैरे लोकांचा चळचळाट सुरू झाला. व अब्रूदार व घरंदाज लोकांचा मान दिवसेंदिवस कमी होत चालला. **कमळेचें** प्राबल्य इतकें कांहीं वाढलें कीं, ती धारील तें होऊं लागलें. त्यामुळें थोड्याच दिवसांत जिकडे तिकडे अस्वस्थता सुरू झाली.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

# प्रकरण १४ वें.

## स्वामिनिष्ठेचा मासला.

जे लोक परोत्कर्षासहिष्णु असतात त्यांस दुसऱ्याचा उत्कर्ष कधीं सहन होत नाहीं. ते त्याचा पाडाव करण्याकरितां नेहमीं खटपट करीत असतात. त्याप्रमाणें **पट्टण** शहरांत **जगदेवा**चा होत असलेला उत्कर्ष तेथील जुन्या कामदार व सरदार आदि मंडळीस सहन होईनासा झाला होता. **जगदेवा**ची दक्षता व हुशारी पाहून **सिद्धराजा**ची त्याजवर विशेष प्रीति बसत चालली होती, व हरएक कामांत तो त्याची सल्ला घेत असे. इतकेंच नाहीं तर सर्व राज्यसूत्रें **जगदेवा**च्या विचारावांचून चालतनाशीं झालीं होतीं. **जगदेव** सांगेल तें प्रमाण व करील ती पूर्वदिशा अशी स्थिति होऊन गेली होती. राजानें अशा प्रकारें सर्व प्रकारचा भरंवसा सोंपल्यामुळें **जगदेव** अधिक उत्साहानें व कळकळीनें काम करीत असे. त्यानें कोतवाली, मुलकी, फौजदारी, वगैरे खात्यांतील पूर्वीची अंदाधुंदी मोडून टाकून सर्वांस नियम घालून दिले; शेतकऱ्यांवर सारा न वाढवितां जमिनीचें उत्पन्न वाढविलें; शहरसंरक्षणाचे कामाकरितां नेमलेल्या कोतवाली खात्यांत जे बदमाष लोक होते त्यांस कमी करून त्यांचे ठिकाणीं चांगल्या समंजस व घरंदाज लोकांचा भरणा केला. फौजदारी व दिवाणी असे न्यायाचे दोन भाग पाडून लोकांस वेळेवर न्याय देण्याची व्यवस्था केली. अशा प्रकारें अनेक सुधार-

णा केल्यामुळें अब्रूदार व वरंदाज लोकांस पुष्कळ आनंद झाला; परंतु त्यापासून कारस्थानी व फुकटचें खाऊन सुखावलेल्या लोकांस आपलें तट्टू चालविण्यास मार्ग मिळेनासा झाला. त्यांस **जगदेव** शत्रूसारखा भासूं लागला, व त्याचा पाडाव कसा होईल याचा विचार त्या चांडाळचौकडींत रोज होऊं लागला.

एक वर्षांतच **वीरमती**स गर्भ राहून सुंदर पुत्ररत्न झालें, त्यावेळीं महाराजांनीं शहरांत मोठा उत्सव केला. सर्व गांवांत हत्तीवरून साखरा वांटल्या, कित्येक बंदीवान सोडून दिले, सर्व शहरांत रोषनाई केली, व बारशाचे दिवशीं मोठ्या थाटानें मुलास पाळण्यांत घालून त्याचें नांव **जगधवल** ठेवलें. सारांश राजास पुत्र झाला असतां जसा उत्सव व आनंद होतो, तसा ह्या प्रसंगीं **सिद्धराजा**नें केला होता, पण त्यामुळें खटपटी लोकांत महत्वाकांक्षा जास्त पसरली होती; व त्यांनीं **जगदेवा**विरुद्ध अनेक प्रकारचीं कुलंगडीं उत्पन्न करण्याची खटपट जारीनें सुरू केली होती. तथापि राजाच्या मनांत **जगदेवा**विषयीं तिरस्कार उत्पन्न होण्यास कोणता मार्ग स्वीकारावा तें त्यास बरोबर सुचेना. शेवटीं त्यांनीं आपसांत असा ठराव केला कीं,—महाराज रोज प्रातःकाळीं एकटेच शहराबाहेर श्री जगदंबेच्या पूजेस जात असतात, त्या वेळीं एकानें देवीच्या मागें लपून बसावें, व महाराजांची पूजा आटोपून ते प्रार्थना करूं लागले ह्मणजे जणूंकाय देवताच बोलते अशा खोल स्वरानें बोलावें कीं,—'हे राजा, तुझी भक्ति पाहून मी संतुष्ट झालें आहें, परंतु आजपासून तिसरे दिवशीं तूं मरणार आहेस, तथापि त्यास

एक उपाय आहे. तो असा कीं, बत्तीस लक्षणांनीं युक्त असा राजवंशांतील मुलगा तूं बळी दिल्यास तुला शंभर वर्षें आयुष्य वाढेल.'—ही इतकी कामागिरी योग्य रीतीनें बजावली गेली ह्मणजे आपला बहुतेक कार्यभाग शेंवटास गेलाच. आपल्या ह्या सबंध राज्यांत **जगदेव**च कायतो बत्तीस लक्षणांनीं युक्त राजपुत्र आहे. त्यासच बळी देण्याची सल्ला हरयुक्तीनें महाराजांस द्यावी. स्वतःचे जिवापेक्षां मनुष्यास दुसरें कांहीं प्रिय नसतें. अर्थात् महाराजही ही गोष्ट कबूल करतील. आणि तसें झालें ह्मणजे सुंठीवांचून खोंकला गेल्यासारखें होईल. ही युक्ति त्या मंडळींत सर्वांस पसंत पडली, आणि त्याप्रमाणें एकानें देवीच्या मागें लपून बसून बोलण्याचें कबूल केलें.

रोज मोठ्या प्रातःकाळीं देवीच्या पूजेस जाण्याचा **सिद्धराजा**चा नियम असे. त्याप्रमाणें तो सदर दिवशींही गेला, व पूजा आटोपून देवीचें ध्यान करूं लागला. इतक्यांत कोणी अंतरिक्षांतून बोलतो आहे असा ध्वनि त्याचे कानीं आला, ह्मणून तो तिकडे लक्ष देऊन ऐकूं लागला. तों त्याच्या कानीं पुढील शब्द पडले. 'हे राजा, तुझी भक्ति पाहून मी संतुष्ट झालें आहे. परंतु तुझ्या राज्यांत जो अनाचार वाढत चालला आहे, त्यामुळें तुझें आयुष्य क्षीण होऊन तुझें मरण जवळ येऊन ठेपलें आहे, व त्याबद्दल मला फार वाईट वाटतें. तथापि त्यास एकच उपाय आहे. तो असा कीं, तूं जर बत्तीस लक्षणांनीं युक्त असा राजवंशांतील मुलगा बळी देशील, तर तुझ्या आयुष्यांत १०० वर्षें वाढतील.' हे शब्द कानीं पडतांच राजा अतिशय चिंतातूर झाला. ते

शब्द प्रत्यक्ष देवीच्याच तोंडांतून निघाले असें त्यास वाटलें, व तो पुन्हां हात जोडून ह्मणाला.—'हे जगदंबे माते, माझें मरण टळण्यास याशिवाय दुसरा उपाय असल्यास सांगा. कारण बत्तीस लक्षणांनीं युक्त असा राजवंशांतील मुलगा तीन दिवसांचे आंत मिळणें कठीण आहे.' त्यावर त्या देवळांतून पुन्हां आवाज निघाला कीं,—'राजा, असा तूं वेड्यासारखा काय करतोस? तूं आपणाजवळ जो **जगदेव** नांवाचा मनुष्य ठेवला आहेस, तो राजवंशांतील असून बत्तीस लक्षणांनीं युक्त आहे. त्यानें आपला स्वतः-चा बळी दिल्यास तुझे आयुष्यांत शंभर वर्षांची वृद्धि होईल. तो तुझा इमानी नोकर आहे आणि त्यास तूं आजपर्यंत आपल्या पुत्रापेक्षांही अधिक पाळलें आहेस, तेव्हां तुझें वचन तो कधीं मोडणार नाहीं. तसेंच त्याची स्त्रीही महान् पतिव्रता आहे, तेव्हां तीही जर आपला बळी देईल तर तिजबद्दलही तुला आणखी शंभर वर्षे आयुष्य अधिक मिळेल. तसेंच तिचा जो तीन वर्षांचा बालक आहे त्याचा बळी दिल्यास आणखी शंभर वर्षे वाढतील, अशा प्रकारें तुला आणखी तीनशें वर्षे आयुष्य वाढेल. मात्र पहिला बळी **जगदेवा**चाच मिळाला पाहिजे, व तूं मनावर घेतल्यास हें सहज होण्यासारखें आहे. जा; ऊठ; उद्योगास लाग. वेड्यासारखा विचारांत बसूं नकोस.'

हे शब्द ऐकून **सिद्धराजास** थोडेसें समाधान वाटलें खरें, परंतु ही भयंकर गोष्ट **जगदेव** कशी कबूल करील, व आपण तरी त्याजजवळ असली ही भलतीच गोष्ट कशी काढावी असे त्याच्या मनांत विचार येऊन तो चिंताकुळ झाला,

व तसाच घरीं आला. त्या दिवशीं त्यास अन्नपाणी वगैरे कांहींच गोड लागेना. नेहमींप्रमाणें **जगदेव** दोन-प्रहरीं राजाच्या भेटीस आला, व राजा चिंतातुर बसलेला पाहून त्यानें त्यास चिंतेचें कारण विचारलें. परंतु राजाच्या तोंडून कांहींच शब्द निघेना. **जगदेवा**ची उत्सुकता पाहून त्यास जबाव देण्याचे ऐवजीं **सिद्धराजा**चा कंठ एकदम भरून आला, व त्याचे डोळ्यांतून टपटपा अश्रु पडूं लागले. हा प्रकार पाहून **जगदेवास** फारच आश्चर्य वाटलें. कधींच नाहीं व आज महाराजांचा चेहरा म्लान झालेला असून त्यांचे डोळ्यावाटे अश्रु पडत असलेले पाहून त्याचे पोटांत तटतटा तुटूं लागलें. तो पुन्हां हात जोडून ह्मणाला—'महाराजांस इतकें वाईट वाटण्यासारखें कोणतें कारण झालें तें ह्या दासास समजलें पाहिजे. कशाही व कितीही जोखमेचें कोणतेंही काम असल्यास तें करण्यास मी तयार आहें. फार तर काय पण महाराजांकरितां मी, माझी स्त्री व पुत्र यांचे बळी पडले तरी मी भिणार नाहीं. महाराजानीं कृपा करून दुःख करण्याचें कारण काय तें जरूर सांगावें.

**जगदेवा**चें हें निश्चयाचें भाषण ऐकून **सिद्धराजास** अधिकच रडें कोसळलें, व **जगदेवा**चा अति आग्रह पाहून तो ह्मणाला—'**जगदेवा**, काय सांगूं? मी आतां फक्त तीन दिवसांचाच सोबती आहें. तीन दिवसांनंतर हें जग मला नाहींसें होणार आहे! पण—' इतकें बोलत आहे तों त्याचा कंठ पुन्हां भरून आला, व डोळ्यांवाटे घळघळा अश्रु वाहूं लागले. राजाचें हें अर्धवट बोलणें ऐकून **जगदेव** अधिकच गोंधळांत पडला! त्यास मनस्वी वाईट वाटलें;

व तो हात जोडून पुन्हां ह्मणाला—'महाराज, हें आपण काय आधारानें बोलतां ? आपल्या मनांत हें कोणीं भरवून दिलें? व **पण** ह्मणून आपण कां थांबलां ? काय असेल तें स्पष्ट सांगा. कोणीं जोशाबिशानें भविष्य केलें असल्यास त्यावर भरंवसा ठेवूं नका. ते लोक खरें गणित केल्यावांचून कांहीं तरी सांगत असतात.'

**राजा**—जोशाबिशानें सांगितलें असतें तर मी त्याजेवर भरंवसा ठेवला नसता, परंतु आज सकाळीं जगदंबेच्या पूजेस गेलों असतां प्रत्यक्ष देवीनें मला सांगितलें आहे. तेव्हां आतां त्यांत खोटें मानण्यास जागाच राहिली नाहीं.

**जगदेव** आश्चर्यानें ह्मणाला—'काय प्रत्यक्ष देवीनें आपणाला असें सांगितलें ? देवी जर आपणाबरोबर बोलली, तर तिजजवळ ह्या विघ्नाचे निवारणार्थ कांहीं उपाय आपण विचारावयाचा होता कीं नाहीं ?'

**राजा**—होय, मी उपाय विचारला, व तिनेंही सांगितला; परंतु तो होण्यासारखा मुळींच नाहीं.

**जगदेव**—होण्यासारखा नाहीं असा कोणता उपाय जगदंबेनें आपणास सांगितला आहे ? मला कळूं द्या. मी तो हरप्रयत्नानें शेवटास नेईन.

**राजा**—काय सांगूं ? जीभ रेटत नाहीं. तथापि तुझा विशेष आग्रहच असल्यामुळें सांगतों. जगदंबा ह्मणाली—'बत्तीस लक्षणांनीं युक्त असा राजपुत्र बळी दिल्यास तुला शंभर वर्षें आयुष्य वाढेल—' पण असा राजपुत्र कोण मिळणार ? व मिळाला तरी मजकरितां आपला प्राण देणारा

कोण आहे ? ( असें बोलताना राजाचे डोळे पुन्हा पाण्यानें भरून आले. )

**जगदेव**—हा तर फारच सोपा उपाय आहे. मी स्वतः राजपूत आहे व माझे अंगीं बत्तीस लक्षणें पूर्ण असल्याबद्दल कित्येक जोशी ह्मणत आहेत. तेव्हां माझा बळी देण्यास कांहीं हरकत नाहीं. हा देह आपल्या उदार आश्रयावरच वाढला आहे आणि केव्हां तरी एकदां मरावयाचें आहेच, मग स्वामीकार्याकडे जर याचा उपयोग होत आहे, तर या सारखा कोणता सुयोग पाहिजे ? आणि असें झाल्यास मज सारखा दुसरा कोणीच धन्य नाहीं असें मीं समजेन. महाराजांनीं आतां निर्घोर राहावें. मी आपल्या प्रीयपत्नीचा शेवटचा निरोप घेऊन उद्या सकाळींच श्री जगदंबेस हा देह अर्पण करतों. आतां मला रजा द्यावी व माझ्यामागें माझ्या बालकावर प्रेम ठेवावें.

**राजा**—**जगदेव**, असा उतावळा होऊं नकोस. तूं आपला बळी दिल्यापासून माझें आयुष्य शंभर वर्षे वाढेल खरें, परंतु तसें केलें असतां जग मला काय ह्मणेल ? त्यापेक्षां माझें मरण मींच स्विकारतों. माझ्या मागें तूं या राज्याचा, माझ्या प्रीयपत्नीचा व माझ्या आवडत्या कन्येचा चांगला सांभाळ कर ह्मणजे झालें.

**जगदेव**—महाराज, आपण असा भलताच आग्रह धरूं नका. आपण शंभर वर्षे आणखी वाचल्यास आपल्या हातून अनेक महत्वाचीं कामें होतील ‘ देहा मरावे पण देहाचा पालन कर्ता मरूं नये ’ अशी एक मराठी भाषेंत ह्मण आहे व ती बरोबर आहे. स्वामीनिष्ठेकरितां मी स्व-

संतोषानें व मोठ्या आनंदानें आपला प्राण बळी देत आहें, तेव्हां त्याबद्दल आपणास कोणी नांवें ठेवणार नाहीं, व ती कल्पनाही आपण मनांत आणू नका. माझा निश्चय झाला. उद्यां सकाळीं श्री जगदंबेस हा प्राण अर्पण करणार. आपण स्वस्थ असा. ( असें ह्मणून तो महाराजाची रजा घेऊन तसाच निघाला व घोडयावर स्वार होऊन आपल्या वाडयाकडे चालता झाला. )

**जगदेव** निघून गेल्यानंतर राजा त्याच्या धैर्याविषयीं फारच आश्चर्यचकित झाला. आणि '**जगदेव** ह्मटल्याप्रमाणें करील काय, त्याची स्त्री त्यास अनुमोदन देईल काय, आपल्या तान्ह्या बाळाचें प्रेम त्याच्याच्यानें सोडवेल काय?' असे एकामागून एक विचार त्याच्या मनांत येऊं लागले. व त्यांचे काय विचार होतात हें समजून घेण्याविषयीं त्याचें मन अतिशय आतुर झालें. तो तसाच उठला, व कोणीं ओळखूं नये ह्मणून एक लांब झगा घालून त्यानें डोक्यास एक काळ्या रंगाचा पटका बांधला, व तसाच घोडयावर स्वार होऊन **जगदेवाच्या** वाडयाकडे जाऊन एका आडोशाचे जागेंत उभा राहिला, व तेथून त्या उभयतांचें बोलणें ऐकूं लागला.

**जगदेव** घरीं जातांच त्यानें आपल्या प्रियपत्नीस जवळ बोलावून महाराजाकडे घडलेलें सर्व वर्तमान सांगितलें. तें ऐकून **वीरमतीस** थोडें वाईट वाटलें, तथापि तसें न दिसूं देतां ती ह्मणाली—' आपले विचार फार स्तुत्य आहेत. आपल्या अन्नदात्याकरितां आपण आपला प्राण अर्पण करून आपल्या देहाचें सार्थक करून घेण्यास जसे तयार झालां आ-

हांत, तसेंच मी व माझें बालक तयार आहे. आह्मां दोघांचे बळी देऊन जगदंबा आपल्या महाराजांस आणखी कांहीं अधिक आयुष्य देत असल्यास विचारून पहावें, आणि माझी ही विनंति आपण मान्य करावी, असें माझें हात जोडून मागणें आहे.'

**वीरमती**चें बोलणें ऐकून **जगदेवास** फार आनंद झाला. तो ह्मणाला—' प्रिये, शूर व क्षत्रियकन्येस उचित असे हे तुझे विचार पाहून मला फारच आनंद वाटतो. ठीक आहे, तूं आपली सर्व तयारी कर. उद्यां मोठ्या पहाटेच आपण सर्व देवीच्या देवळांत जाऊन आपल्या देहास मोक्ष देऊं. मी आतां महाराजांकडे जाऊन हें वर्तमान सांगतों.'

त्या दंपत्याचा हा संवाद ऐकून आडोशास उभा राहिलेल्या राजास फारच आश्चर्य वाटलें; व **जगदेव** घराबाहेर पडण्यापूर्वीच तो आपल्या घोडयावर स्वार होऊन राजवाडयांत गेला. त्याच्या मागोमाग **जगदेव**ही येऊन दाखल झाला. त्यानें महाराजांस प्रणाम करून आपण त्रिवर्गही बळी जाण्यास तयार असल्याचें निवेदन केलें. स्वामिनिष्ठेविषयीं त्यांचे ठिकाणीं असलेलें प्रेम पाहून राजाचें मन अगोदरच सद्गदित झालें होतें. त्यानें **जगदेवा**चे तोंडचे हे शब्द ऐकतांच त्यास एकदम आलिंगन दिलें, व आपल्या पोटाशीं गच्च आवळून धरलें. त्याचा कंठ भरून आला, व त्याच्या दोन्ही डोळ्यांतून प्रेमाश्रूंचा लोट इतका चालला कीं, त्यायोगें **जगदेवा**च्या अंगावरील सर्व कपडे भिजून गेले. बराच वेळपर्यंत त्याच्या

तोंडांतून शब्द निघेना. शेवटीं सद्गदित कंठानें तो ह्मणाला 'जगदेवा, तुझी व तुझ्या पत्नीची एकनिष्ठा व उदारता पाहून मला फारच आनंद झाला. मजकरितां तुह्मी सर्वजण आपले प्राण जगदंबेस अर्पण करण्यास सिद्ध झालां एवढ्यानें मी फार धन्य झालों. आतां माझें सांगणें इतकेंच आहे कीं, तुह्मी केलेला सर्व विचार सोडून द्या. मी माझें मरण दुसऱ्यास देऊं इच्छित नाहीं. तुमची माझे ठायीं असलेली एकनिष्ठा पाहून माझें मन संतुष्ट झालें आहे. माझें राज्य तुझ्या स्वाधीन करतों, याचा स्वीकार कर, व माझ्या मागें माझ्या प्रजेचें पुत्राप्रमाणें रक्षण कर.'

**जगदेव**—महाराजांनीं हा आग्रह आतां सोडून द्यावा. मीं आपला निश्चय कायम केला आहे तो कधीं फिरावयाचा नाहीं. (असें ह्मणून त्यानें राजाची मिठी सोडविली, व निरोप घेऊन तो तसाच निघून गेला.)

**जगदेव** निघून गेल्यानंतर राजा त्याच्या एकंदर गुणांविषयीं विचार करीत बसला. ह्या विचारतरंगांत त्याचें मन इतकें गढून गेलें कीं, त्यास दुसरा कोणताच विषय सुचेना. बरीच रात्र झाली तथापि महाराज उठत नाहीं असें पाहून राणी जवळ गेली, व तिनें त्यास जेवणास उठण्याविषयीं विनंती केली. त्या वेळीं जरी इच्छा नव्हती तरी, त्यानें राणीच्या आग्रहास्तव थोडेंसें खाल्लें, व पुन्हा विचार करीत तो पलंगावर पडला. तो मनांत ह्मणूं लागला. 'कधींच नाहीं व आज जगदंबा मजशीं कशी बोलली? त्यांतून तिनें नेमका **जगदेवा**चाच बळी कसा मागितला! वास्तविक पहातां

हल्लीं माझ्या राज्यांत शांतता व धर्माची जागृति असतां अनाचार वाढत चालला आहे, असें ती काय आधारानें ह्मणाली! या एकंदर गोष्टीचें अनुमान कांहींच होत नाहीं! अथवा यांत कांहीं कपट तर नसेलना? जगदेवाचा होत असलेला उत्कर्ष जुन्या लोकांस पहावत नाहीं, व ते त्यास नेहमीं पाण्यांत बघतात अशी कुरकुर बऱ्याच दिवसांपासून माझ्या कानीं येत आहे, तेव्हां त्या लोकांनींच हें बनावट तर कांय रचलें नसेलना? पण तसें ह्मणावें तर सकाळीं देवळांत जो आवाज माझ्या ऐकण्यांत आला तो माणसाचा असेलसें वाटत नाहीं. मग काय असेल तें असो. जगदेव तर आपल्या पत्नी व मुलासह बळी जाण्यास तयार झाला आहे. धन्य आहे त्या स्त्रीपुरुषांची कीं जीं स्वामिकार्या-करितां आपले प्राण देण्यासही तयार झालीं आहेत. खरो-खर ते दोघेंही नवराबायको ईश्वरी अवतारच आहेत! त्यांची बरोबरी साधारण मनुष्याच्यानें कधीं होणार नाहीं. पण हीं रत्नें नाहींशीं झाल्यावर यांजसारखीं दुसरीं मनुष्यरत्नें मला मिळतील काय? छेः आशा कशाला! जगदेवानें माझ्या राज्याची किती तरी सुधारणा केली? व त्या बाब-तींत त्यानें मजवर जो उपकाराचा बोजा केला, त्याचा मोबदला आतां थोडा बहुत मजकडून त्यास मिळूं लागला नाहीं, तोंच आजन्मांत कधींही ज्याची फेड व्हावयाची नाहीं असा मोठा उपकाराचा बोजा मजवर पडणार आहे! जगदेवा, तुझे हे उपकार माझ्या हातून कसे व केव्हां फिटतील! आणि आतां माझ्या राज्याचें संरक्षण करणारा व मला कळकळीनें सल्ला मसलत देणारा कोण मिळेल!

झाले, माझे सुखाचे दिवस आज पुरे झाले. तुझ्यामागें या राज्यांत पुन्हां पहिल्यासारखी पुंडाई माजणार, व नीच व हरामखोर लोकांचें प्राबल्य वाढणार'—असे अनेक प्रकारचे विचारतरंग सारी रात्र राजाचे मनांत घोळत होते; शेवटीं पहाटच्या गारव्यानें तशा स्थितींतच त्यास डोळा लागला, आणि थोडा वेळ झाला नाहीं तोंच त्यास पुढीलप्रमाणें स्वप्न पडलें.

जिच्या कपाळास भला मोठा लाल मळवट भरलेला आहे, व जिला आठ हात असून प्रत्येक हातांत वेगवेगळ्या प्रकारचें आयुध धारण केलेलें आहे, अशी अष्टभुजा देवीची मूर्ति त्याजपुढें उभी राहिली, व ती आपले नेत्र आरक्त करून ह्मणाली, 'हे राजा तूं अगदीं मूढ आहेस, तुला तुझ्या लोकांचे डावपेंच मुळींच समजत नाहींत. आज सकाळीं माझ्या देवळांत जो अवाज तुला ऐकूं आला, तो माझा नसून तुझ्या राज्यांतील एका कारस्थानी मनुष्याचा आहे. **जगदेवाचा** उत्कर्ष सहन न झाल्यामुळें त्या लोकांनीं हा खोटा व्यूह रचला आहे हें पुरतेपणीं लक्षांत घे, आणि मनांतील भ्रम सोडून दे. ऊठ, **जगदेव** आपल्या स्त्रीपुत्रांसह बळी जाण्याकरितां देवळांत जाऊन पोंचला आहे, त्यास जाऊन प्रतिबंध कर.' इतकें बोलून ती देवी अंतर्धान पावली, व राजा ताटकन जागा झाला. स्वप्नांतील चमत्कार पाहून त्यास पुष्कळ आनंद झाला व आश्चर्यही वाटलें. तथापि विशेष विचार न करितां देवीच्या आज्ञेप्रमाणें तो लगेच कपडे करून घोड्यावर स्वार झाला, आणि जगदंबेच्या देवळाकडे घोडा फेंकीत चालला.

जगदंबेनें राजास दृष्टांत दिला व त्याजजवळ **जगदेवा**-चा बळी मागितला, त्यावरून **जगदेव** आपल्या स्त्री-पुत्रासह देवीस बळी देणार आहे, ही गोष्ट हां हां ह्मणतां सर्व शहरभर पसरली, व काय चमत्कार होतो तो पहाण्या-करितां तमासगिरांचे थव्याच्या थवे देवीच्या देवळाकडे धांवूं लागले. समंजस लोक **जगदेव** व **वीरमती** यांसारखी गुणी मनुष्यें आज नाहींशीं होणार ह्मणून हळहळत होते. व्यसनी, लबाड व लुच्चे लोकांस मात्र आपला शत्रु अनायासें नाहींसा होतो ह्मणून आनंद झाला होता. ज्या कारस्थानी लो-कांनीं हा व्यूह रचला होता, त्यांचा आनंद तर त्यांच्या हृदयांत मावेनासा झाला. ती मंडळी ही मजा पहाण्याकरितां मध्यरात्रींच त्या देवळांत जाऊन कुसुंबापाणी उडवीत बसली. सूर्योदय होण्यापूर्वीं तें देऊळ आणि देवळाच्या आसमंतांतील मैदान हीं, मजा पहाण्याकरितां जमलेल्या लो-कांच्या समुदायानें गजबजून गेलीं होतीं.

इकडे **जगदेव, वीरमती** व **जगधवल** यांनीं मोठ्या पहाटेस उठून अभ्यंग स्नानें केलीं, व मानसिक पूजा करून जगदंबेच्या पुजेचें साहित्य तयार केलें, व तिघांनींही धौतवस्त्रें परिधान करून आपणाजवळ असलेलें एकंदर द्रव्य व चीजवस्त गोरगरीब व अपंग लोकांस धर्म केलें. **वीरमतीनें** एकशेंएक सुवासिनी बायांची पूजा करून खणानारळांनीं त्यांच्या ओट्या भरल्या; व आपले नेसण्याचे शालू, लुगडीं, चोळ्या वगैरे एकंदर सामान गरीब बायांस वांटून दिलें. याप्रमाणें सर्व विल्हेवाट लावणें झाल्यावर पूजेचें साहित्य घेऊन तीं जगदंबेच्या देवळाकडे जावयास निघालीं. त्यांस

पाहून भाविक लोक नमस्कार करूं लागले, कोणी त्यांच्या अंगावर फुलें उधळूं लागले, व कित्येक सुवासिनी **वीरमतीस** पंचारती करूं लागल्या. वृद्ध स्त्रीपुरुषें त्यांजकडे पाहून अशीं रत्नें नाहींशीं होणार ह्मणून ढळढळां रडूं लागलीं. लबाड व लुच्चे लोक–बरें झालें हा एक कांटा अनायासें नाहींसा होतो–असें ह्मणून निंदा करूं लागले. सारांश, जो तो आपापल्या मनाप्रमाणें दुःख व सुख मानूं लागला. असो; अशा प्रकारें लोकांकडून आदरसत्कार घेत घेत तीं त्रिवर्ग जगदंबेच्या देवळाजवळ येऊन पोहोंचलीं. त्यांस पहातांच लोकांनीं बाजूस सरून वाट करून दिली. **जगदेव, वीरमती** व **जगधवल** यांनीं देवळांत प्रवेश करून देवीची यथासांग पूजा केली; आणि प्रथम कोणाचा बळी द्यावा याचा विचार करून त्यांनीं आपसांत असें ठरविलें कीं, प्रथम **जगधवल** यास बळी दिल्यानंतर दुसऱ्यानें **वीरमतीस** बळी द्यावें, व शेंवटीं **जगदेवानें** स्वतःचा बळी द्यावा. त्याप्रमाणें **जगधवल** देवीस व मातापित्यास साष्टांग नमस्कार करून देवीसमोर हात जोडून सारखी मान वांकवून बसला, व **जगदेवानें** आपल्या हातांत तरवार घेऊन तिची धार रुमालानें पुसून काढली, आणि जगदंबेचें स्मरण करून वार करण्याकरितां हात वर उचलला. इतक्यांत–'हां थांबा, बळी देऊं नका. महाराजांची स्वारी आली आहे.' असें मोठ्यानें ओरडत दहापांच शिपाई देवळांत शिरले. ही गडबड ऐकतांच **जगदेवानें** आपला हात आवरून धरला व दाराकडे वळून पाहिलें, तों घामावुम झालेली महाराजांची स्वारी धांपा टाकीत आप-

णाकडे मोठ्या वेगानें येत असलेली त्यास दिसली. महाराजांस पहातांच तो पुढें सरला व साष्टांग प्रणाम करूं लागला, त्याबरोबर महाराजांनीं त्यास वर उचलून आपल्या पोटाशीं आवळून धरलें, आणि सद्गदित कंठानें ते ह्मणाले–' **जगदेवा,** माझ्या मूर्खपणामुळें तुह्मी आज बळी जाणार होतां, परंतु श्री जगदंबेनें वेळींच दृष्टांत देऊन हें विघ्न दूर केलें. काल पहाटे येथें जे शब्द माझ्या ऐकण्यांत आले ते जगदंबेचे नसून कोणा लबाड मनुष्यानें आपणास फसविण्याकरितां काढले होते, असें श्री जगदंबेनें मला आतांच स्वप्नांत येऊन सांगितलें आहे. बरें झालें कीं मी वेळेवर येऊन पोंचलों, नाहीं तर आज केवढा अनर्थ होणार होता!'

राजाचें भाषण **जगदेवास** खरें वाटेना. आपण बळी जाऊं नयें ह्मणूनच त्यानें हा बनावट प्रकार उभा केला आहे असें त्यास वाटूं लागलें. तो ह्मणाला–'महाराज, आह्मी बळी जाऊं नये ह्मणून आपण कांहीं तरी सांगत आहांत. पण अशाप्रकारें माझी समजूत होणार नाहीं. मीं जो निश्चय केला आहे तो कधीं ढळणार नाहीं.'

**राजा–जगदेवा,** मी श्री जगदंबेसमक्ष शपथ घेऊन सांगतों कीं, मीं जें सांगत आहें, तें आतां दोन घटकेपूर्वीच श्री जगदंबेनें मला स्वप्नांत येऊन सांगितलें आहे, व त्यांत लवलेशही खोटें नाहीं.

**जगदेव**–आपलें ह्मणणें खरें असेल, तसाच माझा निश्चयही, जर मनापासून खरा असेल, आणि महाराजांस उदंड आयुष्य मिळून आह्मी आता बळी जाण्याची मुळींच आवश्यकता नाहीं

असें जर श्री जगदंबा मातेच्या मनांत असेल, तर तिनें ह्या प्रसंगीं कांहीं तरी अनुभव दाखवावा, ह्मणजे मी आपला विचार मागें घेतों.

अशा प्रकारें **जगदेवाचें** बोलणें पुरें होत आहे तोंच, एकदम कडकडकड असा भयंकर आवाज होऊन सर्व दिशा एकदम लक्क झाल्या; आणि त्या जगदंबेच्या देवळास भोंक पाडून मोठा थोरला विस्तवाचा लोळ आंत शिरला, व ती चांडाळ मंडळी (ज्यांनीं देवीचा बनावट आवाज काढून हा प्रसंग आणला होता ती) बसली होती, त्या ठिकाणीं येऊन त्यांतील कोणाचा पाय, कोणाचा हात, कोणाचा डोळा, कोणाचें नाक, व कोणाच्या नुसत्या दाढ्यामिशाच, अशा प्रकारें नेमक्या त्या कारस्थानांतील मंडळीसच प्रसाद देऊन तो ज्वालालोट गुप्त झाला. हा चमत्कार पाहून सर्व लोकांस आश्चर्य वाटलें. हजारों मंडळीच्या समुदायांत नेमक्या कांहीं मंडळीसच इजा झालेली पाहून हेच लोक या कारस्थानांतील पुढारी असावेत, आणि ह्मणूनच जगदंबेनें त्यांस हा प्रसाद दिला आहे, असें वृद्ध व शास्त्री वगैरे मंडळीनीं तेव्हांच ताडलें. महाराजांनीं त्या सर्व लोकांस ताबडतोब कैद करविलें, आणि शहरांतून पालखी मागवून तींत **वीरमतीस** बसवून सर्व मंडळी जयजयकार करीत परत फिरली. **जगदेव** व **वीरमती** यांस ह्या वेळीं महाराज सरकारवाड्यांतच घेऊन गेले. तेथें सर्वांनीं पुन्हां शुचिर्भूत स्नानें वगैरे केल्यानंतर भोजन केलें. नंतर महाराजांनीं त्या कैद केलेल्या मंडळीस जवळ बोलावून त्यांस खरी हकीकत काय आहे ती सांगण्याबद्दल तंबी दिली. प्रथम ते लोक

तर उडवाउडवीच करूं लागले, परंतु अजून खरें न सांगितल्यास पुन्हां देवीचा कोप होऊन तुमच्या कुटुंबाचें निसंतान होईल असें जेव्हां त्यांस सांगितलें, तेव्हां त्यांची खातरी होऊन त्यांनीं पहिल्यापासून आपला खरा खरा पाडा वाचला. अशा प्रकारें एकंदर सर्व हकीकत खुलासेवार बाहेर पडल्यावर त्या लोकांच्या पायांत बिड्या ठोकून त्यांस किल्ल्यावर नेऊन ठेवण्याचा हुकूम फर्माविला. नंतर दुसरे दिवशीं मोठा दरबार भरवून त्या ठिकाणीं महाराजांनीं स्वतः होऊन ह्या लोकांच्या कारस्थानाचा पाडा सर्वांसमक्ष वाचून दाखविला, आणि ज्या मनुष्यानें देवीच्या देवळांत लपून बसून महाराजांस चकविलें होतें, त्यास हत्तीच्या पायास बांधून मारण्याची शिक्षा फर्माविली; व ह्या कृत्यांत साह्य असलेल्या इतर मंडळीस चवदा चवदा वर्षे कैदेची शिक्षा सांगितल्यानंतर सर्वांस उद्देशून महाराजांनीं पुढीलप्रमाणें मोठ्यानें भाषण केलें. ते ह्मणाले—

'**जगदेवानें** आज जी स्वामिनिष्ठा दाखविली, तिच्या बदल्यांत त्यास कितीही बक्षिस दिलें तरी तें थोडेंच आहे. याच्यासारखे पुरुष ज्या राज्यांत अथवा ज्या देशांत असतील, तो देश खरोखर सधन व सर्वसुखसंपन्न होईल. **जगदेवाची** स्वामिनिष्ठा पाहून मला इतका संतोष झाला आहे कीं, त्याचा उल्लेख करण्यास मजजवळ कोणत्याच प्रकारचें साधन नाहीं. तथापि माझ्या शक्तीप्रमाणें मी त्यास ह्या प्रसंगीं थोडासा मोबदला देऊं इच्छितों. तो असा कीं, माझीं जीं गांवें आहेत, त्यांतील पंचवीस गांवें मी

मोठ्या खुषीनें त्यास बक्षीस देतों, व आजपासून त्याची मूळची नेमणूक कायम ठेवून शिवाय सालीना पन्नास हजारांची खास नेमणूक बांधून देतों. आणि माझी प्रिय कन्या त्यांस मोठ्या प्रेमानें अर्पण करितों.'

याप्रमाणें निकाल सांगितल्यानंतर दरबार बरखास्त झाला. **जगदेव** व **वीरमती** यांची सर्व शहरभर कीर्ति पसरली. ज्याच्या त्याच्या तोंडीं **वीरमती** व **जगदेव** याशिवाय दुसरा विषय नाहींसारखा झाला. पुढें सुमुहूर्त पाहून **सिद्ध राजानें** मोठ्या थाटानें आपल्या कन्येचें लग्न **जगदेवा**बरोबर लावून दिलें. व कन्यादानांत पंधरा गांवें, पांच हत्ती, शंभर घोडे व कोट्यावधि रुपयांचे जडजवाहीर दिलें. अशा प्रकारें यश व कीर्ति संपादन झाल्यानंतर **जगदेवानें** आपल्या प्रिय मातेस व पित्यास जाऊन भेटण्याचा विचार केला. ही गोष्ट **वीरमतीस**ही पसंत पडली. तेव्हां त्यानें **सिद्धराजास** आपला हेतू कळवून रजा मागितली. **सिद्धराजास** प्रथम पुष्कळ अवघड वाटलें, त्यानें पुष्कळ हरकती घेतल्या; पण **जगदेवाचा** फारच आग्रह दिसला, तेव्हां त्यानें सुमुहूर्त पाहून जाण्याचा दिवस नक्की ठरविला. **जगदेवास** पोंचाविण्याकरितां निवडक असे दोन हजार घोडेस्वार, पांच हजार पायदळ, शिवाय हत्ती, उंट, वाजेगाजे वगैरे विपुल सरंजाम तयार केला. **जगदेव** व **वीरमती** अमुक दिवशीं जाणार हें वर्तमान त्या राज्यांत सर्वत्र पसरलें, व दहा दहा, वीस वीस कोसांवरील लोक त्यांचें दर्शन घेण्याकरितां **पट्टणास** येऊं लागले. **जग-**

**देव** जाण्याचे आदले दिवशीं सर्व शहर लोकांच्या समुदायानें गजबजून गेलें होतें. दुसरे दिवशीं ठरल्याप्रमाणें तिसरें प्रहरीं रथांत बसून **जगदेवाची** स्वारी **धारानगरीस** जावयास **पट्टण**शहरांतून निघाली. **जगदेवा**चे रथामागेंच दुसरा बुरख्याचा रथ होता, त्यांत **वीरमती** व **प्रभावती** अशा दोघी बसल्या. पुढें-मागें लष्कर व मध्यभागीं हे दोन रथ, रथाच्या पुढें बाजेगाजे आदि सरंजाम, अशा थाटानें ही स्वारी निघाली, तेव्हां रस्त्याच्या दोहों बाजूस व घरांच्या खिडक्यांतून मुंग्यांप्रमाणें उभ्या असलेल्या जनसमुहांतून त्यांजवर एकसारखी पुष्पवृष्टि होऊं लागली. **सिद्धराज** शहराबाहेर दोन कोसपर्यंत **जगदेवास** पोंचविण्यास गेला होता, व तेथपर्यंत लोकांची सारखी गर्दी लागून राहिली होती. त्या ठिकाणीं अगाऊच तंबू वगैरे लावून उतरण्याची सोय केली होती. तेथें त्या रात्रीस सर्वांनीं मुक्काम केला. व दुसरे दिवशीं मोठ्या पहाटेच **सिद्धराजा**चा निरोप घेऊन **जगदेव** उभयतां स्त्रियांसह व लष्कर वगैरे लवाजम्यासह **धारा**नगरीस जावयास निघाला. **सिद्धराजानें जगदेव, वीरमती** व **प्रभावती** अशा तिघांस आलिंगन देऊन मोठ्या कष्टानें त्यांस निरोप दिला, व आपणाजवळील आणखी शंभर कडवे घोडेस्वार त्यांच्या तैनातीस दिले. व ती मंडळी दृष्टीपलीकडे निघून गेल्यानंतर **जगदेवा**च्या प्रेमानें विव्हळ झालेली ही पट्टणची मंडळी परत फिरली.

# प्रकरण १५ वें.

## सत्याचा विजय व आनंद.

काठेवाडाचे उत्तरेस असलेलें कच्छभुजचें राज्य सर्वांस माहीत आहेच. ह्या भुज नगरांत त्या वेळीं लाखनेफुल नांवाचा राजा राज्य करीत होता. हें राज्य जरी लहानसेंच होतें, तरी व्यवस्थेच्या मानानें तें चांगलें होतें. विशेषतः शिकलेल्या लष्कराची तयारी गुजरातेंतील इतर राज्यांपेक्षां या राज्यांत विशेष होती. ह्या राजास चंदनवती व फुलमती या नांवाच्या दोन मुली होत्या. दोन्ही मुली सुस्वरूप होत्या; पण त्यांत धाकटी मुलगी फार हुशार व चाणाक्ष होती; व ती बापाची फार लाडकी असे. चंदनवतीबद्दल राजास फारशी काळजी नसे, पण फुलमती जसजशी उपवर होत चालली, तसतशी त्यास तिच्या लग्नाची काळजी अधिक उत्पन्न होऊं लागली. एके दिवशीं राजा दरबारांत बसला असतां एका भाटानें येऊन जगदेवाची फार स्तुति केली, व फुलमतीस तोच वर योग्य आहे असें त्यानें सांगितलें. भाटाचें भाषण ऐकून राजास फार आनंद झाला. त्यानें लगेच आपले दिवाणाबरोबर दोन सरदार व थोडेंसें लष्कर दिलें, आणि उपाध्याबरोबर नारळ देऊन त्या सर्व मंडळीस सुमुहूर्त पाहून धारानगरीस रवाना केलें.

चवदावे प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें धारानगरींत ह्या वेळेस सर्वत्र अंदाधुंदी झाली होती. लबाड, तोंडपुंजे, कारस्थानी अशा लोकांचें प्राबल्य विशेष वाढलें होतें, व

त्यामुळें ज्ञाते व समंजस लोक अतिशय नाराज झालेले होते. ज्यावर कमळेची प्रीति, तो शहाणा व हुशार अशी स्थिति झाल्यामुळें, ज्यास राज्यकारभाराचा जन्मांत संसर्ग नाहीं, व जन्मापासून ज्यांचें आयुष्य नुसतें ऐषआराम व ख्यालीखुशालींत गेलेलें, अशी विशीपंचविशीच्या उमरींतील तरणी मंडळी मोठमोठ्या कारभाराच्या व जोखमेच्या जागांवर चमकूं लागली! रोज नवे हुकूम व नवी व्यवस्था. यायोगें जुन्या रीतीभाती नाहींशा होऊन जुने लोक घरीं बसले! लांच रुसवतीचें प्राबल्य वाढलें! व्यभिचारास तर सीमाच नाहींशी झाली! अशा प्रकारें सर्व राज्यांत वेबंदशाही झाली होती. **उदयादित्य** राजास **वाघेली** राणीच्या सहवासावांचून दुसरें कांहींच आवडेनासें झालें होतें. तो नेहमीं रंगमहालांतच पडलेला असे! दिवाणासही महिन्याचे महिने राजाची भेट होत नसे, मग इतर कारभाऱ्यांची कथा काय! राजाचा सर्व कारभार **कमळे**च्या वतीनें चालत असे! कितीही मोठ्या अधिकाऱ्यास कशाही महत्वाच्या कामांत राजाची सल्ला घेणें असल्यास अगोदर **कमळेची** भेट घ्यावी लागत असे. ती सर्व हकीकत ऐकून घेऊन राजास कळवी व राजा जो हुकूम करी तो ती अधिकाऱ्यास फर्मावी. हल्लीं जसे राजांजवळ प्रायव्हेट सेक्रेटरी ह्मणून एक अधिकारी असतात, तशी **कमळा** ही **उदयादित्य** राजाची प्रायव्हेट सेक्रेटरीणच झाली होती. शिवाय त्यांत विशेष हें कीं, कोणतीही गोष्ट राजास समजावितांना व राजाचा हुकूम अधिकाऱ्यांस सांगतांना, पाहिजे तशा रीतीनें ती आपला अधिकार चालवीत असे. सर्व काम तोंडींच व्हावयाचें,

व अधिकाऱ्यांस राजाचे भेटीची आशा नसावयाची, अर्थात् कमळा सांगेल तेंच प्रमाण होत असे. अशा प्रकारें सर्वत्र मूर्खांचा बाजार झाल्यामुळें जुने व घरंदाज लोक अगदीं नाराज झालेले होते.

भुजहून नारळ व साखरपुडा घेऊन आलेली मंडळी हा सर्व प्रकार पाहून आश्चर्यचकित झाली. तीन दिवस झाले तरी त्यांस राजाची भेट होईना, तेव्हां कमळेजवळ त्यांनीं नारळ देऊन आपल्या राजाचा हेतु कळविला. जगदेवाचें नांव ऐकतांच कमळेच्या तळव्याची आग मस्तकास जाऊन पोंचली. तथापि तिनें ती फारशी उघड दिसूं न देतां त्या मंडळीस सांगितलें कीं, 'जगदेव वाईट चालीचा निघाल्यामुळें महाराजांनीं त्यास हांकून दिलें आहे. तो कोठें भीक मागत फिरत असेल तिकडे जाऊन नारळ द्या. त्याची आई व्यभिचार करूं लागल्यामुळें तिलाही महाराजांनीं कारागृहांत टाकलें आहे. जगदेवासच नारळ देण्याचा विचार असला तर येथून आपण चालते व्हा. नाहींपेक्षां विनाकारण बंदींत पडाल! तुम्ही चांगले दिसतां ह्मणून तुमच्या लाभाची अशी एक गोष्ट तुम्हांस सांगतें. ती ही कीं, आमच्या उदयादित्य राजाच्या पट्टराणीचा रणधवल नांवाचा मुलगा आहे. तो रूपानें व गुणानें संपन्न असून महाराजांमागें ह्या राज्याचा मालक तोच आहे. त्यास जर मुलगी देण्याचा विचार केला, तर मी सर्व जुळवून आणतें; परंतु ह्या कामगिरीबद्दल तुम्ही मला काय द्याल तें अगोदर ठरविलें पाहिजे; व ठरलेली रक्कम माझे हातीं अगोदर आली पाहिजे.'

भुजच्या राजाचा दिवाण मोठा चाणाक्ष होता. त्य राज्यांतील एकंदर व्यवस्थेंत झालेली बेबंदशाही; त्यांत कमळेच्या चळचळाट, आणि मुत्सदी लोकांचा नाराजपणा, पाहून आपला स्वार्थ साधण्याचा त्यानें विचार केला. नाराज झालेल्या जुन्या मंडळीच्या अंतस्थरीतीनें भेटी घेऊन त्यांस त्यानें हाताशीं घेतलें, व या राज्यावर स्वारी घेऊन येण्याचा विचार नक्की केला. लगेच आपल्याबरोबरील सरदारांपैकीं एकास सर्व हकीकत समजून सांगून राजावर एक लखोटा देऊन भुजनगरास रवाना केलें, व आपण इकडील अंतर्व्यवस्थेंच्या तयारीस लागला. त्या सरदारानें आपल्या राजास दिवाणजीचा लखोटा देऊन सर्व हकीकत समजून सांगितली. दिवाणजीच्या पत्राप्रमाणें फुलराजा दोन हजार पायदळ आणि एक हजार घोडेस्वार बरोबर घेऊन निघाला, व मजलांवर मजला करीत येऊन त्यानें धारानगरीस एकदम वेढा घातला. उदयादित्य राजाचे बहुतेक लोक फितूर झाले होतेच; त्यांनीं हूं चूं कांहींएक न करितां शत्रूच्या सैन्यास शहरांत येण्याच्या सर्व वाटा मोकळ्या करून दिल्या. परचक्राचा वेढा येऊन पडल्याचें वर्तमान राजास समजतांच त्याची पांचावर धारण बसली. त्यानें आपल्या दिवाणजीस व सेनापतीस बोलावून आणलें, आणि शत्रूंस आतांच्या आतां हटविण्याबद्दल हुकूम केला. परंतु काय उपयोग! इतका प्रकार होईपर्यंत शत्रूच्या लोकांनीं येऊन राजवाड्यास वेढा घातला, आणि महाराजांसह राजवाड्यांतील तमाम लोकांस कैद केलें. उदयादित्य राजाचें एकंदर मुत्सदी मंडळ आंतून फितूर झालेलें असल्यामुळें राजास कैद करण्यास

त्या लोकांस एक रक्ताचें टिंब सुद्धां पाडण्याचा प्रसंग आला नाहीं. चार घटकांचे अवकाशांत त्यांनीं राजा, राणी, **कमळा** व नवीनं अधिकारारूढ झालेली **क्रूरसिंगादि** मंडळी या सर्वांस कैद केलें, व जुन्या मंडळीच्या विचारें जिकडे तिकडे बंदोबस्ताची व्यवस्था करून टाकली.

**धीरसिंह** सरदार व **सोळंकी** राणीस बंदमुक्त करून त्यांस राजवाड्यांत आणून ठेविलें. कारागृहांत ह्या दोघांचे इतके हाल झाले होते कीं, त्यांच्या तोंडावर शुद्ध प्रेतकळा आली होती. **कमळे**च्या सांगण्यावरून पहाऱ्यावरील लोकांनीं त्यांस कधींही पोटभर अन्नपाणी दिलें नव्हतें; इतकेंच नव्हे, तर त्यांचे जिवास जेणेंकरून त्रास होईल असा त्यांनीं सतत क्रम चालविला होता. थंडीवाऱ्याच्या निवारणार्थ एकादी फाटकी घोंगडी तरी द्या, असें त्यांनीं तोंड वेंगाडून मागितलें असतांही त्या लोकांनीं त्यांस फाटकी चिंधीही देऊं नये. सारांश अन्नपाणी व कपड्यालत्यावाचून त्यांचे हाल करूनच ते लोक राहिले नव्हते, पण कुशब्दाचें वरचेवर ताडण करीत, तेणेंकरून त्यांच्या काळजांस घरें पडत. **धीरसिंह** व **सोळंकी** राणी यांस वेगवेगळ्या ठिकाणीं ठेवलें असल्यामुळें एकाचें वर्तमान दुसऱ्यास समजण्यास सुद्धां मार्ग नसे. **धीरसिंहास** एकदम कैद केल्यामुळें तो फारच विचारांत पडला होता. त्याला आपल्या बायकोमुलांची तर काळजी रात्रंदिवस लागली होतीच, परंतु **सोळंकी** राणीची काय अवस्था झाली असेल, याची त्यास इतकी कांहीं काळजी लागली होती कीं; तिजमुळें त्याची स्थिति वेड्यासारखी बनली होती. त्यांचा समाचार कळवि-

ण्याबद्दल पहाऱ्यावरील लोकांची तो रोज विनवणी करीत असे; परंतु **क्रूरसिंग** व **कमळा** यांचा आंतून फारच सक्तीचा बंदोबस्त असल्यामुळें त्याच्या विनवणीचा कांहीं उपयोग होत नसे. शेंवटीं शेंवटीं तर आपली सुटका होण्याचीही त्यांस आशा राहिली नव्हती. ती सर्व आशा जेव्हां नष्ट झाली, तेव्हां त्यांनीं लवकर मरण यावें व या जाचांतून आपली सुटका व्हावी, ह्मणून अन्नपाणी सुद्धां वर्ज्य केलें होतें, व रात्रंदिवस मृत्यूची आराधना चालविली होती. आणखी एक आठवडा अशाच स्थितींत लोटला असता तर **सोळंकी** राणी खरोखरच इहलोक सोडून गेली असती. परंतु परमेश्वरास तिला पुत्रसुखाचा खरा लाभ द्यावयाचा होता, आणि तिच्या सद्वर्तनाचा प्रकाश पाडून **वाघेली** राणी आदि मंडळीचीं कृष्णकृत्यें उजेडांत आणावयाचीं होतीं; ह्मणून त्यानें **भुज**च्या राजास येथें आणून त्यांजकडून हा इतका प्रकार करविला. असो. **फुल**राजानें **धीरसिंह, सोळंकी**राणी व **रूपवती** यांस दासदासीकडून उटणीं वगैरे लावून ताबडतोब स्नान घातलें, व त्यांची सर्व प्रकारची व्यवस्था लावून दिली; आणि त्यांचे जागीं **वाघेली** राणी, **उदयादित्य** महाराज, **कमळा, क्रूरसिंग**, आदि मंडळीची योजना लगेच केली; आणि दुसरे दिवशीं दरबार भरवून पुढें राज्याची व्यवस्था कशी काय करावयाची त्याचा विचार करण्याचें ठरविलें.

याप्रमाणें व्यवस्था झाल्यावर दुसरे दिवशीं दरबार भरला. शहरांतील मोठमोठ्या अशा तमाम लोकांस या दरबारास आमंत्रण केलें होतें, व त्याप्रमाणें सर्व लोक हजर

झाले होते. या दरबारांत गादीवर कोणास बसवावें, व राजा, राणी, आदि राजकीय कैद्यांची काय वाट लावावी, या महत्वाच्या दोन प्रश्नांचा निकाल लागावयाचा असल्यामुळें शहरवासी सर्व लोकांचें लक्ष तिकडे लागलें होतें. कित्येकांचें ह्मणणें असें होतें कीं, **रणधवलास** गादीवर बसवावें, व अष्टप्रधानांची योजना करून त्यांच्या विद्यमानें राज्यव्यवस्था चालवावी. कित्येकांचें ह्मणणें **जगदेवास** बोलावून आणून गादीवर बसवावें असें होतें. पण **भुज**च्या राजाचा आणि त्यांच्या मंडळीचा विचार निराळाच होता. त्यांच्या मनांतून **रणधवल** वेडा आहे, तेव्हां त्यास नामधारी गादीवर बसवून सर्व राज्यसूत्रें आपल्या हातीं घ्यावीं असें होतें. अशा प्रकारें ज्याचे त्याचे मनांत वेगवेगळे विचार घोळत होते. ठरल्याप्रमाणें दोन प्रहरीं दरबार भरला. **फुल**-राजा व त्याचे सरदार व कामदार मंडळ येऊन बसलें. इतक्यांत एक स्वार लाखोटा घेऊन आला. तो फोडून पाहतात तों त्यांत पुढीलप्रमाणें मजकूर होता.

श्री.

तीर्थरूप प्रियतात **उदयादित्य** महाराज—

साष्टांग नमस्कार. आपल्या प्रेमांतून नष्ट झालेला आपला बालक **जगदेव** आपल्या भेटीची इच्छा धरून आला आहे. मला आपल्या राज्यांत राहण्याची मुळींच इच्छा नाहीं, परंतु आपलें व माझ्या मतुश्रीचें दर्शन घ्यावें अशी उत्कट इच्छा आहे. तरी बालकाची इतकी इच्छा अवश्य तृप्त करावी. आपल्या शहरापासून दोन कोसांवर

माझा मुक्काम आहे. तेव्हां मी आपल्या भेटीस कधीं यावें किंवा आपण उभयतां येथें येऊन मला भेट द्याल, तें उत्तरीं लिहून कळविण्याची कृपा होईल. ही विनंती.

आपला बालक.

**जगदेव.**

वरील पत्र पहातांच सर्व लोकांस आनंद झाला, व लगेच सर्वांच्या विचारें ठरलें कीं, **फुलराजा, धीरसिंह** सरदार, व दुसरे **फुलराजाचे** चौघे कारभारी, आणि **उदयादित्य** राजाचे दोघे कारभारी, अशा मंडळींनीं सामोरें जाऊन **जगदेवास** वाजत गाजत शहरांत आणावें, व समारंभानें गादीवर बसवावें. त्याप्रमाणें ती मंडळी लगेच **जगदेवास** आणण्याकरितां थोडें लष्कर बरोबर घेऊन सामोरी निघाली. **जगदेवास** ही वर्दी त्याच्या मनुष्याकडून पोंचतांच तोही सामोरा आला. सर्वांच्या भेटी झाल्या. ह्या मंडळींत आपला पिता मुळींच नसून हा दुसराच राजा कोण असावा असा त्यास संशय उत्पन्न झाला. तोंच **धीरसिंह** सरदाराची ती झालेली वाईट अवस्था पाहून त्यास मोठेंच सखेदाश्चर्य वाटलें. त्यानें **धीरसिंहाचे** गळ्यांस कडकडून मिठी मारली, व असें होण्याचें कारण विचारलें. नंतर **धीरसिंहानें** आपण परत आल्यापासून ते कारागृहांत कसें पडलों, तेथें आपले हाल कसे झाले, व शेवटीं आपली सुटका कशी झाली, तें सर्व वर्तमान सांगून व **फुल**राजाची ओळख करून दिली. **फुल**राजानें आपला एकंदर हेतु कळवून आपण काय काय व्यवस्था केली तेंही सांगितलें, ती एकंदर हकीकत ऐ-

करून जगदेवास पुष्कळ वाईट वाटलें. तो फुलराजास उद्देशून ह्मणाला-' आपण जें केलें तें ठीक केलें. माझ्या मातुश्रीस व धीरसिंह सरदारास बंदमुक्त केलें याबद्दल मी आपला आभारी आहे. परंतु माझ्या पित्यास व वाघेली मातेस आपण किल्ल्यावर कैदेंत ठेवलें हें मात्र बरें केलें नाहीं.'

जगदेवाचें हें भापण ऐकून फुलराजास वाईट वाटलें. तो ह्मणाला-' आपल्या पित्यास कैद करण्याची माझी इच्छा नव्हती; परंतु त्यांनीं जीं कृत्यें केलीं त्यांचे बदल्यांत त्यांस असें करण्याशिवाय दुसरा मार्गच नव्हता. आतां आपण आलां आहांत, तेव्हां आपल्या इच्छेनुरूप सर्व व्यवस्था करावी. मात्र माझी विनंती इतकीच आहे कीं, आपण या झालेल्या एकंदर बाबतींत कोणत्याही प्रकारें वाईट न मानतां मजवर प्रेम ठेवून माझ्या कन्येचा स्वीकार करावा.'

फुलराजाच्या बोलण्यांत कोणत्याही प्रकारचा राज्याभिलाप दिसला नाहीं, तेव्हां त्याच्याविषयीं मनांत आलेला संशय दूर होऊन जगदेवास बरें वाटलें. त्यानें आपल्या पित्यास व वाघेली मातेस बंदमुक्त करून सरकारवाड्यांत नेऊन ठेवण्याचा हुकूम केला, व सर्वांचे विचारें तिसरे दिवशीं सकाळीं वाजत गाजत थाटानें जगदेवास शहरांत न्यावें असें ठरलें. त्याप्रमाणें दोन रात्रींत सर्व शहर गुढ्या तोरणांनीं शृंगारलें. जागोजाग लतापल्लवाच्या सुंदर कमानी उभ्या केल्या. ज्या ज्या रस्त्यानें जगदेवाचा रथ जावयाचा, त्या त्या रस्त्यास नानारंगाकृति पताकांनीं व सुवासिक पुष्पमालांनीं अवर्णनीय शोभा आणली. जगदेव आल्याचें

वर्तमान समजतांच श्री **रामचंद्राचे** आगमनानें **अयोध्येंतील** लोकांस जसा आनंद झाला होता तसाच **धारानगरींतील** लोकांस एकच आनंद झाला. ज्या दिवशीं **जगदेव** शहरांत यावयाचा त्या दिवशीं मोठ्या पहाटेच हजारों नर-नारीजन राजमार्गावर जाऊन जागा धरून उभे राहिले. ज्या रस्त्यानें **जगदेव** शहरांत यावयाचें ठरलें होतें, ते रस्ते लोकांचे जमावानें मध्यरात्रीपासूनच अगदीं गजबजून गेले होते. सूर्योदय होतांच **जगदेव, वीरमती** व **प्रभावती** यांच्या स्वाऱ्या आपापल्या वाहनांत बसून सहपरिवार वाजत गाजत शहरांत यावयास निघाल्या. त्या वेळीं दोहों-बाजूंनीं त्यांच्या रथावर लोक पुष्पवृष्टि करूं लागले. श्रीमंत लोकांनीं तर चांदी सोन्याचीं फुलें करून उधळलीं. हजारों सुवासिनी बाया **जगदेवास** व **वीरमतीस** पंचारती ओंवाळूं लागल्या. अशाप्रकारें मोठ्या थाटानें **जगदेवाची** स्वारी लोकाचा सत्कार घेत घेत आपल्या उभयतां पत्न्यां-सह राजवाड्यांत येऊन दाखल झाली. तेथें आंतील एका दिवाणखान्यांत **सोळंकी** राणी पुत्राचे भेटीकरितां बसली होती. **जगदेव** वाड्यांत शिरतांच अगोदर आपल्या मातु-श्रीच्या भेटीस गेला. त्यास पाहतांच **सोळंकी** राणीचें हृदय प्रेमानें भरून आलें. तिनें त्यास आपल्या पोटाशीं गच्च आवळून धरलें, व आपल्या डोळ्यांतील आनंदाश्रुंनीं न्हाऊं घातलें. **वीरमती** व **प्रभावती** यांनीं आपल्या सासूस नमस्कार केला, व **वीरमतीनें** ‘ ह्या आपल्या नातवास सं-भाळा’ असें ह्मणून **जगधवलास** पुढें केलें. तिनें त्यास पट-कन उचलून कडेवर घेतलें, व त्याचें तोंड कुरवाळून पटापट

त्याचे पांच पंचवीस मुके घेतले. आपल्या मातुश्रीची झालेली दैन्यावस्था पाहून **जगदेवास** अतिशय वाईट वाटलें, व तिचें तें अस्थिपंजर झालेलें शरीर पाहून तर त्याचे उरांत एकदम भडभडून आलें. परंतु त्यानें आपलें दुःख आवरून धरून आपल्या मातेचें सांत्वन केलें. नंतर तो आपल्या पित्याच्या भेटीस गेला. **जगदेवास** पहातांच **उदयादित्य** राजास आनंद होण्याचे ऐवजीं उलट त्वेष आला. **जगदेवानें** जाऊन आपल्या पित्यास साष्टांग नमस्कार घातला, त्याबरोबर त्यानें जोरानें त्याचे मस्तकावर लाथ मारली, व दात चांवून तो ह्मणाला—'कारट्या, तुझें काळें तोंड मला कशाला दाखवितोस ? लोकांकडून मला कैद करवून मोठ्या डौलानें माझें समाधान करण्यास येतोस तुला शरम कशी वाटत नाहीं ! जा येथून चालता हो. तुझ्या त्या जारिणी मातेस घेऊन खुशाल राज्य कर. माझा असा तुह्मी घात करणार हें मला माझ्या प्रिय राणीकडून अगोदरच समजलें होतें ! आणि तेव्हांच मी त्या जारिणीस व तिच्या जारास कैदेंत घातलें होतें. परंतु काय करूं रे, डाव चुकला, नाहीं तर तूं व तुझे साह्यकर्ते या जगांत होते का नव्हते असें करून टाकले असते.'

बापाचें असें निष्ठुर भाषण ऐकून **जगदेवास** अतोनात वाईट वाटलें. तथापि मन शांत करून तो ह्मणाला—'आपण असें रागावूं नका. विचाराअंतीं आपल्या मनांत भरलेला हा सर्व भ्रम दूर होईल, व त्याची खातरीही आतां होईल.' इतकें बोलून **जगदेव** तेथून चालता झाला. ठरल्याप्रमाणें एकंदर गोष्टीचा खुलासा करण्याकरितां

दुसरे दिवशीं मोठा दरबार भरला. या दरबारांत स्त्रियांस बसण्याकरितां खास सोई केली होती. तेथें चिकाचे पडद्यांत एका बाजूस **सोळंकी** राणी, **वीरमती, प्रभावती** व **रूपवती** यांस बसण्याची, व दुसरे एके बाजूस नागवे तरवारीचे पाहऱ्यांत **वाघेली** राणीस बसण्याची व्यवस्था केली होती. तसेंच **उदयादित्य** राजावरही फुलराजानें राजकैद्याप्रमाणें पहारा ठेवला होता. **कमळा, क्रूरसिंग,** वगैरे मंडळीच्या पायांत व हातांत बिड्या ठोकून त्यांस दरबारच्या मध्यभागीं पिंजऱ्यांत उभें केलें होतें. सर्व मंडळी येऊन आपापल्या जागेवर बसल्यानंतर **फुलराजा, जगदेव,** व **धीरसिंह** असे सिंहासनाच्या उजवे बाजूस येऊन बसले, व **उदयादित्य** महाराज व त्यांचें नवीन प्रधान मंडळ डावें बाजूस बसलें होतें. **जगदेवानें** राजसिंहासनावर बसून न्याय करावा असा **फुलराजाचा** आग्रह होता, परंतु **जगदेवानें** तें कबूल न करितां आपल्या पित्यानेंच न्याय करावा, व त्याजपुढें सर्वांनीं आपली खरी खरी जबानी द्यावी असें सांगितलें. **उदयादित्य** राजास आतां सिंहासनावर बसूं देऊं नये असा **फुलराजाचा** आग्रह होता; परंतु **जगदेवाच्या** विशेष अग्रहामुळें त्याचें ह्मणणेंच कबूल करणें सर्वांस भाग पडलें, व त्याप्रमाणें **उदयादित्य** राजास सिंहानावर बसण्याविषयीं **जगदेवानें** विनंती केली. हा बनाव पहातांच **उदयादित्य** राजास प्रथम तर ती सर्व थट्टाच वाटली; पण **जगदेवाच्या** इच्छेप्रमाणें सर्वांनीं ज्या वेळीं आग्रह केला, तेव्हां त्यास तें खरें वाटलें, व आपण स्वप्नांत तर नाहींना असा कांहीं वेळ त्यास भास झाला.

तो सिंहासनावर जाऊन बसल्यानंतर **धीरसिंहानें** उठून सर्व समाजापुढें, 'आपण **जगदेवाचे** शोधास गेलों होतों, तेथें **क्रूरसिंग** वगैरे मंडळीस कसें पकडलें, **क्रूरसिंगानें** आपणाजवळ कोणकोणत्या गोष्टी कबूल केल्या, व त्यानंतर त्यास आपण कैद करून आपल्या तळवरांत आणून ठेवलें; आणि ही हकीकत महाराजांचे कानावर घालूं नयें असें **जगदेवानें** मला आग्रहपूर्वक सांगितल्यावरूनच मी शेंवटपर्यंत ही गोष्ट महाराजांपासून गुप्त ठेवली होती' वगैरे हकीकत सांगितली. याप्रमाणें **धीरसिंहाची** हकीकत सांगणें झाल्यावर **रामा** व **वझा** यांस पुढें बोलावून त्यांस आपली हकीकत सांगण्यास फर्माविलें. त्यांनीं आपण **धीरसिंहाजवळ** नोकर राहिल्यापासून दरम्यानें वाघांचे तावडींत सांपडलों असतां तेथून **जगदेव** व **वीरमती** यांहीं त्यांचा नाश करून आपली कशी सुटका केली, नंतर **क्रूरसिंगादि** मंडळीनें आपणास कसें गांठलें, **जगदेव** व **वीरमतीनें** त्या लोकांची कशी धुळधाणी उडविली, व शेंवटीं **धीरसिंहानें** येऊन सर्वांस कसें कैद केलें, वगैरे एकंदर हकीकत सांगितली. ह्या लोकांची हकीकत ऐकून **उदयादित्य** राजाच्या मनावर बराच प्रकाश पडला. त्यानंतर **क्रूरसिंगास** पुढें बोलावलें, व त्यास खरी खरी हकीकत सांगण्याबद्दल **धीरसिंहानें** बजाविलें. **धीरसिंह** व **जगदेव** यांस हल्लीं अधिकारारूढ झालेल्या स्थितींत पहातांच त्याचे हातपाय गळाले होते. तशांत राज्यक्रांति फिरलेली, तेव्हां जर आपण कांहीं चोरून ठेवलें, तर आपले पुरे हाल झाल्यावाचून राहणार नाहींत. तेव्हां

जें कांहीं असेल तें खरें खरें सांगावें, मग जें काय होणें असेल तें होवो, असा विचार करून त्यानें पहिल्यापासून शेंवटपर्यंतची एकंदर कच्ची हकीकत सांगितली. ती ऐकतांच **उदयादित्य** राजाच्या चेहेऱ्यांत फरक झाला. त्याच्या पोटांत राग मावेनासा झाला; तथापि त्यानें आपला सर्व राग दाबून आणखी कोणाकोणाकडून काय हकीकत बाहेर येते ती ऐकून घेण्याचा विचार केला. नंतर **रूपवती**ची दासी **चंपा** हिला बोलावून तिला आपली हकीकत सांगण्याचा हुकूम झाला. तिनें **कमळे**चें व आपलें झालेलें बोलणें सर्व सांगितलें.

यांच्या जबान्या चालू असतांना **कमळे**ची पांचांवर धारण बसली होती. **क्रूरसिंगा**चे व **चंपा**चे जबानींत आपलीं एकंदर कृत्यें बाहेर पडलेलीं पाहून तर तिच्या हातापायांतील जीवच भिवून गेला. तिचा चेहेरा एकदम काळा ठिक्कर पडला, व एकाद्या वेड्यासारखी ती इकडे तिकडे कावऱ्या बावऱ्या सारखी पाहूं लागली. दरबारांतील सर्व मंडळी तिला **यमदूतां**सारखी भासूं लागली. **चंपेची** जबानी आटोपतांच शिपायांनीं **कमळे**स पुढें बोलावलें, त्याबरोबर तिच्या अंगाचा एकसारखा कंप सुरू झाला. तिच्याच्यानें पुढें पाऊल उचलवेना. शेंवटीं दोघां शिपायांनीं तिच्या दंडास धरून तिला पुढें आणून उभें केलें. पुष्कळ वेळ झाला तरी तिच्या तोंडांतून शब्द निघेना. तेव्हां **धीरसिंह** डोळे वटारून ह्मणाला—‘ सांग लवकर तुझी हकीकत काय आहे ती. अशा ढोंगानें तुझी सुटका तर होणार नाहींच, पण उलट मार मात्र बसेल. ’ **धीरसिं-**

हाते ते रागाचे आवेशांत निघालेले खणखणीत शब्द ऐकून ती लगेच शुद्धीवर आली, व चांचरत चांचरत म्हणाली—'मी सर्वस्वी अपराधी आहें, मला जीवदान द्या, आतां मी असें कधीं करणार नाहीं—' **धीरसिंहानें** उत्तर दिलें—' तुझ्या अशा सांगण्यानें कधीं समाधान होणार नाहीं. तूं ह्या एकंदर कृत्याची नायिका आहेस, तेव्हां तुझ्या तोंडून एकंदर हकीकत समजलीच पाहिजे. एरवीं तुझी सुटका कधींच होणार नाहीं.' **धीरसिंहाचें** हें निश्चयाचें भाषण ऐकून **कमळेस** एकंदर हकीकत सांगण्यावांचून दुसरें गत्यंतरच राहिलें नाहीं. तिनें दोन्ही हात जोडून **जगदेवाची** क्षमा मागितली, व प्रथमपासून आपण **जगदेवा**विषयीं महाराजांच्या मनांत कसें भलतेंच भरून दिलें, **वाघेलीराणी**कडून कसें सोंग आणवून राजाची खातरी केली, **क्रूरसिंगास** लालुच दाखऊन त्यास **जगदेवास** ठार मारण्याकरितां पाठविलें; व पुढें **धीरसिंहाचा** व **सोळंकी**राणीचा वाईट संबंध असल्याबद्दल राजाच्या मनांत कशा रीतीनें भरविलें व त्यांस कैद करविलें, वगैरे एकंदर पाडा अक्षरशहा वाचून दाखविला. हिची हकीकत सांगणें चालली असतां **उदयादित्य** राजाच्या चेहेऱ्यावर क्षणोक्षणीं जबरदस्त फेरफार होत होता. क्षणांत त्याचा चेहेरा रागानें लाल झाल्यासारखा दिसे, व क्षणांत तो काळवंडून त्यावर प्रेतासारखी निस्तेज कळा आल्यासारखी दिसे. **कमळेची** हकीकत सांगणें आटोपल्यावर त्यानें एक दीर्घ श्वास सोडला, व चटकन सिंहासनावरून खालीं उतरून त्यानें **जगदेवास** आपल्या पोटाशीं गच्च आवळून धरलें. त्याच्या

पोटांत आजपर्यंतच्या एकंदर गोष्टी एकदम उभ्या राहून त्याचें हृदय भरून आलें, व त्याच्या डोळ्यांवाटे एकसारख्या अश्रुधारा वाहूं लागल्या. कांहीं वेळपर्यंत त्याच्या तोंडांतून एक शब्द सुद्धां निघेना. शेंवटीं एक मोठा सुस्कारा टाकून तो म्हणाला—' बाळा **जगदेवा,** मी ह्या चांडाळणीच्या व त्या मानभावी रांडेच्या बोलण्यावर भरंवसा ठेवून तुझा छल केला, तुझ्या मातेचे करूं नये तसे हाल केले, याबद्दल परमेश्वर मला योग्य प्रायश्चित्त दिल्यावाचून राहणार नाहीं. याबद्दल तुझी व तुझ्या मातुश्रीची मीं कितीही क्षमा मागितली, अथवा तुह्मीं मला कितीही शिक्षा केली, तरी ती थोडीच होणार आहे. मी स्त्रीलंपट होऊन अगदीं विचारशून्य बनलों; सारासार विचारास झुगारून दिलें; व ह्या जगांताल सर्व सुखास आंचवलों. आतां हें काळें तोंड ह्या जगांत राहून सर्वांस दाखवीत फिरण्यापेक्षां अरण्यांत जाऊन शेष आयुष्य ईश्वरभजनांत घालवावें हें चांगलें. हें सर्व राज्य तूं संभाळ व याची वाटेल ती व्यवस्था कर.' इतकें बोलतांना त्याचा कंठ पुन्हां भरून आला, व त्याच्या दोन्ही डोळ्यांवाटे घळघळां अश्रुधारा वाहूं लागल्या.

बापाची अशी स्थिति पाहून **जगदेवा**सही वाईट वाटलें. बापाची मिठी सोडवून तो ह्मणाला—' बाबासाहेब-आपण कोणत्याही प्रकारें वाईट मानूं नका. यांत आपणाकडे कांहींएक दोष नाहीं. प्रारब्धानुरूप सर्व गोष्टी घडून येतात. आपण जर त्यावेळेस मला रागानें घालवून लावलें नसतें, तर माझा उत्कर्ष कधीं झाला नसता. तेव्हां जें झालें तें माझ्या बऱ्याकरतांच झालें असें मी समजतों. आपण अ-

सले भलते विचार मुळींच मनांत आणू नका. सिंहासनारूढ व्हा व आनंदानें रहा. आजपासून आपणास कोणत्याही प्रकारची दगदग पडूं न देतां पुत्राच्या कर्तव्याप्रमाणें आपली सेवा बजावून पितृऋणांतून मला मुक्त होणें आहे. करितां माझ्या विनंतीस मान द्या, इतकेंच आपणाजवळ माझें मागणें आहे.'

**जगदेवाचें** तें विनययुक्त भाषण व त्यावर **फुलराजाचा** आग्रह पडला, तेव्हां **उदयादित्य** राजाचे सर्व उपाय खुंटून तो पुन्हां सिंहासनारूढ झाला व म्हणाला 'आतां मला जास्त हकीकत ऐकण्याची मुळींच इच्छा नाहीं. या सर्व कृत्यांत **कमळा** मुख्य गुन्हेगार आहे. तिनें केलेल्या अपराधाच्या मोबदल्यांत कितीही व कोणतीही शिक्षा केली तरी बस्स होणार नाहीं. तथापि सर्वांत शेवटची जी मरणाची शिक्षा ती तिला द्यावी, व तिचा प्राण जितक्या क्रूरतेनें घेववेल तितक्या क्रूरतेनें घ्यावा. **वाघेली** राणीनें केलेलीं कृत्येंही फार भयंकर आहेत, परंतु तिनें तीं सर्व **कमळेच्या** सांगण्यावरून केलीं आहेत, ह्मणून तिला ठार न मारतां पांच पाट काढून गाढवावर बसून तिची धिंडका काढावी व तिला गांवाबाहेर हांकून द्यावी. **क्रूरसिंग** व त्याचे सांथीदारांस सुळावर चढवावें, व **दाळींबी** वगैरे दासींस मेरपर्यंत कैदेंत ठेवावें.' हा निकाल ऐकतांच सर्व दरबारांत एकच हलकल्लोळ झाला. **कमळा** दोन्ही हात जोडून आपणावर दया करण्याविषयीं **जगदेवाकडे** तोंड करून विनवूं लागली. तो सर्व प्रकार पाहून **जगदेवाचें** मन द्रवून गेलें. त्यानें त्या मंडळीवर दया करण्याविषयीं

बापास विनंती केली, व इतर मंडळीकडूनही **जगदेवा**च्या ह्मणण्यास टेंका मिळाला. तेव्हां **उदयादित्य** राजानें **जगदेवा**सच शिक्षा सांगण्याची परवानगी दिली. बापाची आज्ञा होतांच **जगदेवानें** उभें राहून पुढीलप्रमाणें सुनावणी केली. तो म्हणाला—' ह्या एवढ्या मोठ्या राजकुटुंबांत कलह लावून माझ्यासुद्धां सर्वांस अनिवार संकटें भोगण्याचा प्रसंग **कमळे**सारख्या एका साधारण स्त्रीनें आणला.. ही थोडया महत्वाची गोष्ट नव्हे. **कमळेनें** हीच बुद्धि चांगल्या कामाकडे वापरली असती, तर तिची किंमत न होती; परंतु अशा नीच कर्माकडे तिनें तिचा उपयोग केल्यामुळें तिला आज हा भयंकर प्रसंग भोगण्याचा प्रसंग आला आहे. पायापुरता विचार करून दुष्कृत्यास प्रवर्त होणाऱ्या लोकांस **कमळेचें** उदाहरण चांगलें लक्षांत घेण्यासारखें आहे, व तें त्यांच्या नजरेसमोर रात्रंदिवस रहावें ह्मणून तिला ठार न मारतां तिच्या नाकाचा शेंडा कापून तिच्या पायांत बिडया ठोकाव्या व तिजकडून रोज शहरची घाण साफ करण्याचें काम घ्यावें. **क्रूरसिंग** आदि मंडळीचेही गुन्हे भयंकर आहेत, परंतु त्यांस आतां चांगला पश्चाताप झाला आहे, करितां त्यांस ठार न मारतां त्यांचे पायांत सवा सवा मणाच्या बिड्या ठोंकून त्यांजकडून रस्ते झाडण्याचें काम घेत जावें. **दाळिंबी** वगैरे ज्या लवंड्या **कमळे**स साह्य झाल्या होत्या, त्यांच्या नाकाचे शेंडे कांपून त्यांत एकेक कवडी बांधावी, व त्यांच्या कपाळावर एकेक डाग देऊन गांवाबाहेर हांकलून द्यावें. **वाघेली** मासाहेबांसंबंधीं महाराजांनीं जो हुकूम केला आहे तो अजी रद्द करावा. कारण

यांत त्यांचा कांहीं गुन्हा नसून त्यांनीं जें कांहीं केलें तें **कमळे**च्या सांगण्यावरून केलें आहे. **कमळे**सारख्या क्षुद्र मनाच्या स्त्रीची संगत न लागती, तर त्यांजकडून असें कर्म कधींच घडलें नसतें. करितां त्यांस सर्व अपराधांची क्षमा करून महाराजांनीं त्यांजवर पूर्ववत् प्रेम करावें अशी माझी विनंती आहे.'

**जगदेवा**चे हे विचार व दयेनें परिपूर्ण असें भाषण ऐकून सर्वांस आनंद झाला; व त्याप्रमाणें करण्याविषयीं सर्वांनीं **उदयादित्य** महाराजांस विनंती केली. तेव्हां महाराजांनीं **जगदेवाचें** ह्मणणें मान्य केलें; पण '**वाघेली** राणीस माझेजवळ ठेवल्यास माझ्या जिवास संताप होईल' करितां तिला दुसरी कोणती शिक्षा करणें नसली, तरी गांवाबाहेर लांब नेऊन ठेवावें, व तिचें तोंड पुन्हां माझ्या दृष्टीस पडूं नये, अशी व्यवस्था झाली पाहिजे' असें त्यानें निक्षून सांगितलें' व महाराजांच्या आग्रहास्तव तें ह्मणणें सर्वांस कबूल करणें भाग पडलें.

याप्रमाणें दरबारांतील व्यवस्था झाल्यावर सर्व मंडळी आपापल्या घरीं निघून गेली. **उदयादित्य** राजानें रात्रौ **सोळंकी** राणीचे महालांत जाऊन आजपर्यंत केलेल्या हेळसांडीबद्दल व छळणुकीबद्दल तिची माफी मागितली. **सोळंकी** राणीनें महाराजांच्या मनांतील सर्व किल्मीष गेलेलें पाहून हर्षभरित होत्साती आपल्या पतीस प्रेमानें आलिंगन दिलें, व त्या दिवसापासून **सोळंकी** राणीवर महाराजाचें प्रेम विशेष बसलें.

**भुजहून** आलेल्या **फुलराजानें** आपल्या कन्येचा स्वीकार करण्याविषयीं **जगदेवा**जवळ दुसरे दिवशीं गोष्ट काढली. त्यानें केलेल्या उपकारामुळें **जगदेवास** त्याचें ह्मणणें नाकारतां येईना. तथापि त्यानें आपली थोरली मुलगी **रणधवलास** द्यावी, अशा कबुलायतीवर लग्न करण्याचें कबूल केलें.

**जगदेवाचें** ह्मणणें **फुलराजानें** मान्य केलें, व त्याप्रमाणें आपली थोरली मुलगी **रणधवलास** व धाकटी मुलगी **जगदेवास** देऊन दोघांही जावयांस लक्षावधि रुपयांचें जवाहीर व दहा दहा गांवें आंदण दिलीं. लग्नसमारंभ **धारा**नगरीसच मोठ्या थाटानें झाला, व तो साजरा करण्याकरितां गांवोगांवचे राजेरजवाड्यांस आमंत्रण केलें होतें. ह्या प्रसंगीं **जगदेवानें** बापाची युक्तीनें समजूत घालून **वाघेली** राणीस राजवाड्यांत आणून ठेवलें, व लग्नांत वरमाईचा सर्व मान तिला देवविला. व पुढें तिला गांवाबाहेर न पाठवितां राजवाड्यांतच ठेऊन घेतलें. तथापि राजा तिजकडे कधींच जात नसे. त्याचें सर्व प्रेम आतां **सोळंकी** राणीवर बसलें होतें, तरी **सोळंकी**राणी वरचेवर राजास '**वाघेला** राणीचें नांव अगदींच टाकणें बरें नाहीं. आठवड्यांतून एकदोन वेळ तरी तिजकडे जावें' असा बोध करीत असे. पण राजास **वाघेली** राणीचा इतका वीट आला होता कीं, तिचें नांव काढलें तर त्याच्या मस्तकास तिडिक उठत असे. व त्यामुळें कोणाचाच उपाय चालत नसे, तथापि **जगदेव** तिला आपल्या **सोळंकी** मातेप्रमाणेंच 'मान

देत असे, व तिच्या एकंदर इतमामांत त्यानें काडीमात्रही कमतरता केली नव्हती.

**धीरसिंह** सरदारानें पहिल्यापासून नेकीनें वागून मोठालीं कामें बजावलीं याच्या बदल्यांत त्यास पंधरा गांवें बक्षीस दिलीं, व शिवाय साठ हजारांची वंशपरंपरेची नेमणूक बांधून दिली.

**जगदेवास** जरी एकंदर तीन स्त्रिया झाल्या होत्या, तरी तो **वीरमतीस** सर्वांत अधिक मान देत असे. व **वीरमती**ही स्वतः फार शहाणी बायको असल्यामुळें ती आपल्या सवतींस सख्या बहिणींपेक्षांही अधिक प्रेमानें वागवीत असे. तसेंच उभयतां सासवांशींही ती चांगल्या प्रेमानें वागत असे. कांहीं दिवसांनीं **वीरमतीस** दुसरा मुलगा झाला, त्यावेळीं **उदयादित्य** राजानें फारच मोठा उत्सव केला, व त्या मुलाचे बारशाचे प्रसंगीं **वीरमती**ची कीर्ति ऐकून तिचें दर्शन घेण्याकरितां लांबलांबचे राजे लोक **धारान**गरीस आले होते. सारांश, जन्मांत येऊन **वीरमतीनें** आपलें माहेर व सासर ह्या दोन्ही कुळांचें नांव गाजविलें, इतकेंच नाहीं, तर आपलें शूरत्व, कडकडीत पातिव्रत्य व सौजन्य यांचा कीर्तिध्वज सर्व जगभर फडकविला, व आपल्या आर्यभगिनींस एक उत्तम कित्ता घालून दिला.

## गोपीनाथ कृष्णाजी क्षत्रियकृत



## अचूक गुणकारी औषधें.

पुणें येथील सन १८८८ सालांतलि देशी कलाकौशल्याचे जंगी प्रदर्शनांत औषधांच्या योग्यतेबद्दल व गुणांबद्दल सर्टिफिकेट ( दाखला ) मिळालें आहे.

ज्वरांकुश-( तापावर रामबाण ) तीन दिवसांत हटत नाहीं व ताव व पाळीचे ताप जातात. पैसे परत करणाऱ्या पैजेच्या हिवतापाचे औषधापेक्षां हें किती गुणकारी आहे ह्याची अनुभवाअंतीं खात्री होईलच. कारण, जास्त फाजील लिहिण्यांत हंशील नाहीं. किंमत रु० १ ट. व बं. ख.१८-. जुलाब पोटदुखी ( व पटकी ( कॉलरा ) बंद करण्याचें वस्ताद औषध प्रत्येक कुटुंबानें अवश्य संग्रहीं ठेवावें. कि. .॥। ट. व बं. ख. ।॥. शक्तीवरील गोळ्या—नंबर १, बलवर्धक, शक्तीवर्धक, पौष्टिक इ० विशेष माहिती पत्र पाठविल्यास मिळेल. किं. १०० गो. रु. ३॥ ट. बं. खर्च, ।≈ कपाळशूर व अर्धशिशीवर—पांच मिनिटांत गुण. किं. रु. १॥ ट. बं. खर्च .॥. शक्तिवरील गोळ्या नंबर २ सुस्तीवर, पानथर मुलांचे ढब्यावर व अफूचे व्यसनावर वस्ताद. किं. रु. १। ट. व बं. खर्च .।≈ परम्यावर वस्ताद.—ह्या औषधानें बारापेक्षांही कमी तासांत खात्रीनें गुण पडतो. किं. रु. १ ट. व बं. ख. -॥।. केंस काळेभोर करण्याचा कलप—किं. रु. १। ट. व बं खर्च .॥≈ रक्तपितिवर रामबाण-किं. रु. ६ ट. व बं. ख. १।- खोकल्यावर गोळ्या-कि. .॥। ट. व बं. खर्च. ।≈ गजकर्ण व खरजेवर मलम—किं, ।= ट. व बं. ख तीन डब्यांपर्यंत. ।= नेत्र संजीवनी वेंब-कि. रु. १ ट. व बं. खर्च. .॥. मुळव्याधीवर चूर्ण अथवा मलम-किं. रु. २ ट. व बं. ख. ।≡ वायुनाशक तेल—किं. ।. ट. व बं. खर्च. ।॥. खोकल्यावर सरबत ( दम्यावर फारच गुणकारी ) किं. रु. १ व बं. खर्च .॥. मेदोवृद्धीवर औषध ( वायुनें व इतर कारणानें स्थूल झालेलें शरीर पूर्वस्थितीवर येतें. ) किं रु. १॥ ट. व बं. ख. -॥।≈.

**वैद्य-गोपिनाथ कृष्णाजी क्षत्रिय.**

१ ली सदाशिवजीची गल्ली, गिरगांव पोस्ट आफिसाचे समोरचे गल्लींत, मुंबई.